**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**पृ.शी./मु.शी.:** तोंडी उत्तरे.

**उप सभापती :** आता दिनांक 23 जुलै 2015 रोजी स्थगित ठेवण्यात आलेला ता.प्र.क्र.6805 घेण्यात येईल.

**<u>ता.प्र.क्र.6808</u>**

(प्रेस : येथे सोबतचा जोडलेला ता.प्र.क्र.6805 छापावा.)



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.6808..

(प्रा.राम शिंदे, श्री.एकनाथराव खडसे यांच्याकरिता)

श्री.आनंद ठाकूर : सभापती महोदय, वाडा तालुक्यातील राज्य कृषी विभागाच्या माध्यमातून तलाव खोदण्याच्या तत्सम कामामध्ये झालेल्या भ्रष्टाचारासंबंधी मी प्रश्न विचारला होता. त्याला आज जे उत्तर देण्यात आले आहे त्यात क्लिन चिट देण्यात आली आहे. मी येथील रहिवासी आहे. अनेक तक्रारी आलेल्या आहेत. पण त्याची नोंद घेण्यात आलेली नाही असे एकंदरीत दिसत आहे. आपण उदात्त हेतूने शेतकऱ्यांसाठी योजना राबवितो. त्याचा खराखुरा उपयोग त्यांच्यासाठी होत नाही, मूळ उद्देश पूर्ण होत नाही. येथे मशीनरी वापरून कामे करण्यात आली आहेत. 15 लाखाची कामे रूपये 2 ते 3 लाखामध्ये करण्यात आली आहेत अशी माझी माहिती आहे. कराडो रूपये आपण खर्च करतो. त्यामुळे यात झालेल्या गैरव्यवहाराबाबत आपण उच्चस्तरीय समिती नेमली तर वस्तुस्थिती कळेल. त्यामुळे मी आपल्या माध्यमातून मंत्री महोदयांना विनंती करतो की, या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्यात येईल काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, ता.वाडा, जिल्हा पालघर येथे शेततळे खोदण्याच्या कामात अपहार झाल्याच्या संदर्भात प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. या प्रश्नाच्या अनुषंगाने कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. त्यात कुठल्याही प्रकारचा भ्रष्टाचार झालेला नाही. परंतु, गावथरे गावामध्ये एक तक्रार प्राप्त झाली होती. त्या अनुषंगाने गावथरे गावातील 17 शेततळ्यांची चौकशी केली असता रूपये 17 लाख 77 हजार एवढे अनुदान वितरित केले असल्याची माहिती प्राप्त झाली आहे. ज्या व्यक्तीने ही तक्रार केली होती त्या व्यक्तीने स्पॉट व्हिजीटच्या वेळी संपूर्ण समाधान झाले असल्याचे तक्रारीच्या अनुषंगाने लिहून दिलेले आहे. येथे मशीनरीने काम केले असा दुसरा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. केंद्र सरकारच्या गाईड लाईन्स नुसार एखाद्या परिस्थितीमध्ये असे काम आपल्याला मशीनरीने करता येते. वाडा तालुक्यामध्ये इंडस्ट्रियल एरिया आहे. त्यामुळे मजुरांची तेथे उपलब्धतता नाही. अशा परिस्थितीमध्ये केंद्र शासनाच्या गाईड लाईन्सप्रमाणे मशीनरी लावण्यास परवानगी आहे.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.6808..

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, आता येथे सांगण्यात आले आहे की, केंद्र सरकारच्या गाईड लाईन्स आहेत. त्या गाईड लाईन्स नेमक्या काय आहेत ? एका बाजूला आपण म्हणतात की, या कामासाठी मशीनरी वापरता येत नाही आणि दुसऱ्या बाजूला आपण म्हणता की, याला अपवाद करता येतो. तेव्हा अपवाद करण्यासाठी केंद्र सरकारच्या नेमक्या गाईड लाईन्स काय आहेत याबाबत सभागृहाला अवगत करावे या सर्व कामामध्ये पारदर्शकता यावी म्हणून कोणती उपाययोजना करणार आहात ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, केंद्र सरकारच्या गाईड लाईन्स आहेत. त्यातील नवव्या क्रमांकावर वॉटर हार्वेस्टींग आणि मॅनेजमेंटच्या गाईड लाईन्स आहेत. त्यात नमूद केले आहे की, Water Harvesting System for individuals मध्ये नमूद केले आहे की, "The families who are eligible for individual beneficiary oriented works under NREGA should personally be given the labour component through MGNREGA and the material component through NMCA." या गाईड लाईन्सच्या अनुषंगाने..... (अडथळा).....

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, यात कुठे म्हटले आहे की, मशीनरी वापरता येते.

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, जेथे लेबर उपलब्ध होणार नाहीत परंतु, काम करणे क्रमप्राप्त आहे.... आणि वाडा येथे इंडस्ट्रियल एरिया आहे. तेथे लेबरची उपलब्धता नाही. अशा परिस्थितीत या योजनेच्या अंतर्गत मशीनरीला अलाऊ करतो.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, लेबर उपलब्ध होणार नाही ही गोष्ट कोणाच्याही मनाला पटण्यासारखी नाही. लेबर उपलब्ध होतात. अनेक कामे चालतात. आपण घरांची कामे करतो. अनेक वेळा अशी परिस्थिती असते की, जेथे मशीनरी जात नाही तेथे लेबर उपलब्ध करून देण्यात येतात. रॉक मिळाल तर तेथे अपवाद असू शकतो. लेबर मिळत नाही म्हणून मशीनरी वापरावी असे कुठे म्हटलेले आहे ते आपण सभागृहासमोर सांगावे.

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, अशा अपवादात्मक परिस्थितीसाठीच आपण मशीनरी वापरतो. शेवटी शेततळे हे डीप असते. रॉक, हार्ड मुरूम लागतो त्याच वेळी मशीनरीचा वापर करण्यात येतो. IWMP आणि राष्ट्रीय कृषी विकास योजनेच्या अंतर्गत शेततळ्याचे खोदकाम करण्यात येते त्यावेळी मशीनरी वापरावी लागते. त्या अनुषंगानेच या मशीनरी वापरण्यात आलेल्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे..

आहेत. एका गावातील 17 शेततळ्यासंबंधातील हा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्यांनी ज्यावेळी प्रश्न विचारला होता त्यावेळी त्यांचे पूर्णतः समाधान झाले होते. परंतु, पालघ्र जिल्ह्यातील वाडा तालुक्यातील शेततळ्यांचा प्रश्न होता. त्यामुळे हा प्रश्न राखून ठेवण्यात आला होता. त्या अनुषंगाने मी सविस्तर उत्तर दिलेले आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, या कामामध्ये सर्रासपणे मशींनरी वापरली जाते अशा प्रकारची चर्चा आहे व त्याची सर्व सन्माननीय सदस्यांना कल्पना आहे. त्यामुळे मी स्पष्टपणे प्रश्न विचारला की, या सर्व कामामध्ये अपवादात्मक म्हणून मशींनरी वापरली असेल तर त्यामध्ये पारदर्शकता येण्यासाठी चित्रीकरण करणे किंवा अन्य काही उपाययोजना करणार काय असा माझा दुसरा प्रश्न होता. त्यास आपण उत्तर दिलेले नाही. त्यामुळे सरकारला यात पारदर्शकता आणावयाची आहे किंवा काय यासंबंधी माझ्या मनात शंका निर्माण व्हायला लागली आहे. केवळ अपवाद दाखवून मशीनरी वापरण्यासाठी प्रोत्साहन द्यायचे असे काही होते काय, यासंबंधी सरकारने उत्तर द्यावे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, प्रश्न शेततळ्यांचा आहे. या 17 शेततळ्यांच्या प्रश्नासंबंधी तक्रारी दिल्या आहेत असे जरी म्हणत असले तरी त्यासंबंधातील कुठलीही तक्रार राज्य शासनाकडे प्राप्त झालेली नाही. एक तक्रार ग्रामपंचायतीमध्ये आली होती. त्या नुसार ग्रामस्थांसहित, मालकांसहित जाऊन तेथे पाहणी करण्यात आली. तेथे कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळून आलेली नाही असे ग्रामसभेमध्ये सांगण्यात आले आहे. त्याने जी तक्रार केली होती ती त्याने मागे घेतली आहे. यासंदर्भात जे काही करायची आपली इच्छा आहे किंवा करावेसे वाटते त्यासंबंधी आपण वेगळा प्रस्ताव आणावा म्हणजे राज्यभरासाठी वेगळे निर्णय घेता येईल. यात कुठलीही अनियमितता झालेली नाही. तेथे कुठल्याही प्रकारची तक्रार आता शिल्लक राहिलेली नाही. त्यामुळे हा प्रश्न संपलेला आहे.

......

==5

**राजापूर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील देवस्थान इनामाच्या जमिनी वहिवाटदारांच्या नावावर करण्याबाबत**

**(1) * ७१९६ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक उर्फ भाई जगतापप:प** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राजापूर (जि.रत्नागिरी) या तालुक्यातील शहरी व ग्रामीण भागात अनेक जमिनींची देवस्थान इनाम जमिनी म्हणून नोंद करण्यात आलेली असून या जमिनीवर अनेक रहिवाशी मागील कित्येक वर्षापासून वहिवाट करीत आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, या रहिवाशांना सदर जमिनीवर मालकी हक्क दिला नसल्यामुळे राहत्या घराची दुरुस्ती अथवा इतर काही सोयी करण्यासाठी परवानगी मिळत नसल्यामुळे ही घरे मोडकळीस येऊन धोकादायक झाली असल्याने रहिवाशांच्या जीवाला धोका निर्माण झाला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, या देवस्थान इनाम म्हणून नोंद झालेल्या जमिनी वहिवाटदारांच्या नावावर करण्याबाबत व त्यांना जमिनीचा मालकी हक्क मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(4) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय हे खरे आहे.
(2) व (३) देवस्थान जमिनी अहस्तांतरणीय आहेत. त्यावरील वहिवाटदारांना घर दुरूस्तीसाठी परवानगी आवश्यक असल्यास संबंधित देवस्थानाकडून नाहरकत दाखला प्राप्त झाल्यावर संबंधित ग्रामपंचायतीकडून सदर ठिकाणी घर दुरूस्तीसाठी परवानगी दिली जाते. अशा परवानगी अभावी देवस्थान जमिनीवरील घर मोडकळीस आल्यामुळे रहिवाश्यांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे असे निदर्शनास आले नाही. देवस्थान ईनाम जमिनी संदर्भात शासनाने अभ्यास समिती नेमली होती. सदर अभ्यास समितीचा अहवाल प्राप्त झाला असून सदर अहवालाची छानणी सुरू आहे.
(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्रीमती हुस्नबानू खलिफे : सभापती महोदय, राजापूर जिल्हा रत्नागिरी या शहरी व ग्रामीण भागात अनेक जमिनींवर देवस्थान इनाम म्हणून नोंद झालेली आहे. या जमिनींवर कित्येक वर्षापासून म्हणून 100 ते 150 वर्षांपासून घरे बांधण्यात आली आहेत. या घरांची अवस्था अत्यंत बिकट झालेली आहे. कारण देवस्थान समित्या घरांना दुरूस्तीची परवानगी देत नाही. त्याच बरोबर 7/12 वर त्या वहिवाटदाराचे नाव नसल्यामुळे बँका कर्ज देत नाही. आपण उत्तरामध्ये म्हटले आहे की, इनाम जमीन संदर्भात शासनाने अभ्यास समिती नेमली आहे. या अभ्यास समितीच्या अहवालाला अनुसरून ज्या जागेवर ती घरे आहेत, त्या घरांच्या वहिवाटदारांना त्यांचे नाव घरावर लावण्यासंबंधी शासनाकडून धोरण आखले जाणार आहे काय ?

यानंतर श्री.अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7196...

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, राज्यातील देवस्थान ईनाम जमिनी संदर्भात काय करता येईल याबाबत अभ्यास करण्यासाठी मागील राज्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्ती केली होती. गुजरात राज्याने देवस्थान ईनाम वर्ग ॲक्ट ॲबॉलिश करुन स्वतंत्र स्वरुपाचा कायदा तयार केला. आपल्या राज्यात सुद्धा तसे करता येईल काय या संदर्भात नेमण्यात आलेल्या समितीकडून अहवाल प्राप्त झालेला आहे. त्या अहवालाची छाननी सुरु आहे. या ठिकाणी देवस्थानच्या जमिनीवर असलेल्या घरांच्या दुरुस्तीचा प्रश्न आहे. या सर्व घरांच्या दुरुस्तीच्या संदर्भात आपण परवानगी देणार आहोत. नियमामध्ये बसत नसले तरी देवस्थानच्या जमिनीवर बांधण्यात आलेली घरे मोडकळीस आल्यामुळे लोकांच्या जीविताला धोका पोहचू नये याची काळजी राज्य सरकार घेईल. जेवढे काही अर्ज आले असतील त्याची छाननी करुन त्याबाबत शासन योग्य ती कार्यवाही करील.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर दिलेले आहे. हा प्रश्न फक्त घरांच्या दुरुस्तीबाबत मर्यादित नाही. देवस्थान ईनाम जमिनीवर असलेली ही घरे 100-150 वर्षापूर्वीची आहेत. काही घरांना 300 वर्षे झालेली आहेत. या संदर्भातील नवीन कायदा येईल तेव्हा येईल किंवा आपण सांगितल्याप्रमाणे समितीच्या अहवालाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. पण या ठिकाणी फक्त घरांच्या दुरुस्तीचा प्रश्न नाही तर काही लोकांनी पुनर्बांधणीसाठी देवस्थान किंवा सबंधितांकडे अर्ज केलेले आहेत. त्यांना पुनर्बांधणीसाठी परवानगी मिळेल काय ? आपण या संदर्भात कायदा करणार आहोत. आपण कालानुरुप देवस्थान ईनाम जमिनीबाबत नवीन निर्णय घेत आहोत. माझा प्रश्न आहे की, आपणास या संदर्भात कायम स्वरुपी पथदर्शी निर्णय किंवा कायदा बनविता येईल काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, देवस्थान ईनाम जमिनी या वर्ग-3च्या प्रकारामध्ये मोडतात. फार पूर्वी म्हणजे ब्रिटिश काळाच्या अगोदरपासून देवस्थान ईनमाच्या जमिनी आहेत. मंदिरातील पूर्जाअर्चा, मंदिराची देखभाल इत्यादी खर्च देवस्थान ईनामी जमिनीतील उत्पन्नातून करावी त्यासाठी ती जमीन एखाद्या व्यक्तीच्या नावे असावी, अशा स्वरुपाचा त्याचा आशय आहे. या



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7196...

श्री.एकनाथराव खडसे......

देवस्थान ईनाम जमिनीच्या संदर्भात मागणी आली की, या जमिनीच्या संदर्भात शासनाने काही तरी निर्णय घेऊन या वर्ग-3 च्या जमिनी वर्ग-2 कराव्यात किंवा शक्य असल्यास वर्ग-1 पर्यंत आणाव्यात आणि त्यासाठी काही नियमावली तयार करावी. या संदर्भात राज्य सरकारने राज्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नियुक्ती केली होती. त्या समितीचा अहवाल प्राप्त झाला असून समितीने ज्या काही शिफारशी केलेल्या आहेत त्यामध्ये अशीही शिफारश आहे की, देवस्थानच्या ईनामी जमिनी ज्यांच्या ज्यांच्या ताब्यात आहेत - त्यांची नावे मालकी हक्काने येऊ शकत नाही कारण त्या वर्ग-3च्या जमिनी आहेत- त्यांना त्या जमिनी मालकी हक्काने देण्याच्या संदर्भात विचार करावा. राज्यभरामध्ये मोठ्या संख्येने देवस्थान ईनामाच्या जमिनी आहेत. परंतु आता अशा काही जमिनी आहेत की, त्या जमिनीची देखभाल दुरुस्ती करण्यासाठी माणसे उपलब्ध नाहीत किंवा त्या जमिनीवर मालकी हक्क सांगण्यास कोणी तयार नाही. काही अशाही जमिनी आहेत की, त्या जमिनीचा मालकी हक्क आहे. ते त्या जमिनीतून उत्पन्न घेतात परंतु ते सारा भरत नाहीत अशा देखील तक्रारी आहेत. देवस्थान ईनामाच्या जमिनी काही जणांनी बेकायदेशीरपणे हस्तांतर केलेल्या आहेत. अशा हस्तांतरण केलेल्या जमिनीचे काय करावे असा सरकारपुढे प्रश्न होता. त्या संदर्भात नेमण्यात आलेल्या समितीने शिफारस केलेली आहे. राज्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखालील समितीने जो अहवाल दिलेला आहे, त्या अहवालानुसार शासन सकारात्मक विचार करणार आहे. जुना कायदा रद्द करावा. वर्ग-3 च्या जमिनी वर्ग-2 कराव्यात. काही शहरा लगत असलेल्या देवस्थान ईनामाच्या जमिनी एन.ए.कराव्यात अशी मागणी होते. पण आपण एन.ए.कोणाच्या नावे करणार असा प्रश्न आहे. कारण देव अस्तित्वात नाही. मग ती जमीन सांभाळणारा जो मालक आहे, त्याला मालकी हक्क देण्याच्या संदर्भात प्रस्थापित कायद्यामध्ये बदल करीत असताना जर एन.ए. झाला तर त्या देवस्थानचे काय होईल, देवस्थानच्या देखभाल दुरुस्तीसाठी कोण पुढे येईल याचा देखील विचार करावा लागेल. या सर्व जमिनी गेल्यानंतर देवस्थान ओस पडू नये याची काळजी घेण्या संदर्भात राज्य सरकार निर्णय घेणार आहे. यातील काही हिस्सा देवस्थानासाठी राखून ठेवून तो पैसा कायम स्वरुपी देखभाल व दुरुस्तीसाठी ठेवावा अशी अहवालामध्ये शिफारस केलेली आहे. तसेच अशा

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7196...

श्री.एकनाथराव खडसे...

जमिनीचे हस्तांतरण करण्यासाठी परवानगी देण्याबाबत अहवालामध्ये शिफारस केलेली आहे. त्याबाबत राज्य सरकार जरूर विचार करील.

सभापती महोदय, देवस्थान ईनामी जमिनीपैकी काही जमिनी अशा आहेत की, त्या ठिकाणी कोणी काही पेरत नाही. तर काही जमिनींना कुणी मालकही नाही. अशा जमिनी सरकारच्या ताब्यात घेऊन त्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावणे. एन.ए.साठी मागण्यात आलेल्या जमिनीबाबत जी अनार्जित रक्कम भरावी लागते ती अनार्जित रक्कम रेडीरेकनरच्या 50 टक्के रक्कम भरुन संबंधितांना परवानगी देणे, ज्या ठिकाणी मालक आहे त्याच्या ऐवजी दुसऱ्याचे नाव लावण्याची परवानगी देणे, या जमिनी विकण्यासाठी स्थानिक पातळीवर अधिकार देणे, त्यासाठी राज्य सरकारकडे न येता प्रांत किंवा तहसीलदारापर्यंत अधिकार देऊन या जमिनी हस्तांतरणाची परवानगी देणे, ज्यांनी बेकायदेशीरपणे हस्तांतरण केलेले आहे, त्या बाबतीत जमिनी परत घेण्यापेक्षा त्यांना काही तरी दंड करुन जे काही बेकायदेशीर हस्तांतरण झालेले आहे ते हस्तांतरण नियमित करणे अशा स्वरुपाचा विचार राज्य सरकार करीत आहे. या सर्व शिफारशींचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन शासन त्याप्रमाणे कार्यवाही करील. या ठिकाणी घरांच्या दुरूस्तीचा प्रश्न विचारलेला आहे. राजापूर तालुक्यातील घरांच्या पुनर्बांधणीचे किंवा दुरूस्तीचे सर्व प्रस्ताव तपासण्यात येतील आणि त्यांना परवागनी देण्याच्या संदर्भात काही नियमांची अडचण नसेल तर त्यांना 100 टक्के परवानगी देण्याचे राज्य सरकार आदेश देईल. या दुरूस्तीला सरकार परवानगी देईल. पुनर्बांधणी करायची असेल तर मालकीचा प्रश्न येतो. त्यामुळे ती बाब तपासण्यात येईल. असलेल्या घरावर बांधकाम करण्यासाठी स्थानिक ग्रामपंचायतीने किंवा स्थानिक प्राधिकरणाने परवानगी दिली तर त्यास परवानगी देण्याचा सरकार निश्चितपणे विचार करील.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7196...

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अतिशय सविस्तर उत्तर दिलेले आहे. रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील देवस्थानच्या ईनामी जमिनीच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. राज्यात अशा प्रकारच्या अनेक ईनामी जमिनी आहेत. हा प्रश्न फक्त देवस्थानच्या ईनामी जमिनीपुरता मर्यादित नाही आपल्या राज्यात महार वतनाच्या देखील जमिनी आहेत.. मध्यंतरी मंत्री महोदयांनी सांगितले होते की, महार वतनाच्या जमिनी संदर्भात बैठक घेण्यात येईल. त्या संदर्भात कायदा करणार आहोत. देवस्थानच्या ईनामी जमिनीवर अनेक लोक 100-150 वर्षापासून घरे बांधून राहत आहेत. या घरांची अवस्था अतिशय बिकट झालेली आहे. ही घरे केव्हा कोसळतील हे सांगता येत नाही. देवस्थानच्या ईनामी जमिनीवर असलेली व मोडकळीस आलेल्या घरांची पुनर्बांधणी करण्याची परवागनी त्यांना मिळणार काय ? सन 2000 पूर्वीच्या सरकारी किंवा खाजगी जमिनीवर अतिक्रमण झालेल्या झोपडपट्टीला संरक्षण देण्याचा धोरणात्मक निर्णय झालेला आहे. ही बाब लक्षात घेऊन शासन या संदर्भात निर्णय घेणार आहे काय ?

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7196....

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, या विषयी अहवालाच्या माध्यमातून काही शिफारशी करण्यात आलेल्या आहेत. त्या शिफारशींचा राज्य सरकार अभ्यास करीत आहे. सन्माननीय सदस्य सांगत आहेत त्या स्वरुपाच्या काही शिफारशी आहेत. त्यानुसार बहुतांश जमिनी सरकारच्या ताब्यात किंवा इनामांच्या ताब्यात न ठेवता त्या मालकी हक्काने देण्याच्या बाबतीत सरकारकडून विचार सुरु आहे. राज्यातील इनामी जमिनींच्या बाबतीत कायद्यामध्ये बदल करीत आहोत की, ज्यांचा त्या जमिनींवर अधिकार आहे, ज्यांनी वर्षानुवर्षे त्या जमिनी जोपासल्या आहेत, काही ठिकाणी कुळांची नावे लागलेली आहेत, काही ठिकाणी बेकायदेशीर लॅण्ड होल्डींग आहेत, त्यामुळे या सर्व बाबींचा विचार करुन शक्यतो या जमिनी त्यांना मालकी हक्काने देण्याच्या बाबतीत राज्य सरकार विचार करीत आहे. त्यांनी रेडी रेकनरचा काही हिस्सा म्हणजे 50 टक्के भाग भरावा. त्या जमिनीची मालकी त्यांच्याकडे राहील. परंतु अंतिम मालकी मात्र सरकारची राहील. म्हणजे विशिष्ट रेषेच्या खाली ते मालक राहतील आणि रेषेच्या वर सरकारची मालकी राहील. कारण या देवस्थानची पुढील कालखंडात देखभाल व दुरुस्ती कोणी केली नाही तर या जमिनी खालसा करण्याचे अधिकार सरकारला असावेत, हा त्यामागील हेतू आहे.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, राज्यात बहुतांश जमिनी देवळांच्या ट्रस्टच्या नावाने दिलेल्या आहेत. त्यामुळे ट्रस्टच्या नावाने असलेल्या जमिनी हस्तांतरित करता येत नाहीत, असा कायदा आहे. देवळांच्या दुरुस्ती आणि देखभालीसाठी मोठ्या संस्थानिकांनी आणि राजेरजवड्यांनी या जमिनी त्या काळात दिलेल्या आहेत. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, या संदर्भाद्यातील कायदा बदलत असताना, देवस्थानचा पूर्णतः विचार करुन, इनामी जमिनी ज्या कामासाठी दिल्या आहेत त्याच कामासाठी ठेवण्याबाबतची दुरुस्ती नवीन कायद्यात करण्यात येईल काय ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, दुरुस्ती करण्याची आवश्यकता नाही. संबंधितांना इनाम जमीन ज्या कामासाठी दिली आहे त्यांनी त्या देवस्थानची पुढे देखभाल व दुरुस्ती



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7196....

श्री.एकनाथराव खडसे....

केली पाहिजे, अन्यथा जमीन आपल्या मालकीची झाल्यामुळे देवस्थानाकडे दुर्लक्ष करणे, असे होता कामा नये. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केली त्या बाबत शासनाकडून नक्कीच गंभीरपणे विचार केला जाईल.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, माननीय मंत्र्यांनी उत्तर देताना सांगितले की, गुजरातच्या धर्तीवर राज्य सरकार निर्णय घेत आहे. परंतु गुजरात राज्यामध्ये इनाम जमिनीच्या बाबतीत एकदा नजराणा रक्कम भरली असेल तर पुन्हा पुन्हा ती भरावी लागत नाही. त्यामुळे आम्ही गेल्या वर्षभरापासून ऐकत आहोत की, या अडचणीतून मार्ग काढण्यासाठी राज्य सरकार गुजरात राज्याच्या धर्तीवर कायदा तयार करीत आहे. त्यामुळे मी स्पेसिफिक विचारतो की, हा कायदा कधीपर्यंत तयार होईल आणि या अभ्यास समितीच्या अहवालानुसार राज्य सरकार एक महिन्यात निर्णय घेईल काय ?

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नालाच अनुसरुन मी विचारु इच्छितो की, माननीय मंत्र्यांनी उत्तर देताना सांगितले की, इनाम जमिनी काही लोकांनी चुकीच्या पध्दतीने हस्तांतरित केल्या आहेत. त्यामुळे अशा प्रकरणी दंड आकारुन त्या नियमित केल्या जातील. या संदर्भातील कायदा होईल तेव्हा होईल. परंतु चुकीच्या पध्दतीने हस्तांतरित झालेल्या जमिनी दंड आकारुन नियमित होणार असल्याचे माहीत झाल्यानंतर, दरम्यानच्या अशा लोकांनी मोठ्यामोठ्या देवस्थानाच्या जमिनी हस्तांतरित करुन घेतल्या तर, अशा प्रकरणांमध्ये सरकार काय करणार ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांच्याकडून गुजरातच्या धर्तीवर कायदा करण्याबाबत सातत्याने मागणी होती. आपल्याकडे अशा जमिनींच्या बाबतीत वारंवार पैसे भरावे लागतात, हे बरोबर आहे. वर्ग-2 च्या जमिनी असल्यामुळे त्या हस्तांतरित झाल्याशिवाय व दोन्ही बाजूने प्रत्येकी 50 टक्के रक्कम भरुन कार्यवाही होईल. त्यानुसार त्यांनी एकरकमी रक्कम भरावी आणि त्यानंतर त्यांना पुन्हा रक्कम भरण्याची आवश्यकता राहणार नाही असे अहवालाच्या शिफारशीत नमूद केले आहे. माननीय राज्यमंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखालील समितीने पुढीलप्रमाणे शिफारशी केलेल्या आहेत. ..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7196....

श्री.एकनाथराव खडसे....

1. गुजरात राज्याने देवस्थान इनाम खालसा करण्यासाठी सन 1969 मध्ये गुजरात देवस्थान इनाम ॲबॉलिशन ॲक्ट 1969 तयार केला आहे त्या धर्तीवर त्या राज्यातील देवस्थान इनाम खालसा करण्यासाठी कायदा बनविण्यात यावा.

2.देवस्थान इनाम खालसा करताना गुजरात राज्याच्या कायद्यातील UNAUTHORISED HOLDER च्या व्याख्येऐवजी जमिनीचा ताबा बेकायदेशीरपणे असलेली व्यक्ती असा बदल करणे व या UNAUTHORISED HOLDER ने प्रचलित बाजार भावाप्रमाणे 50 टक्के रक्कम देवस्थानास देणे.

3.देवस्थान इनाम जमीन म्हणजे लॅंड ॲलिनेशन रजिस्टरला इनाम वर्ग-3 म्हणून नोंद असलेली जमीन अशी तरतूद महाराष्ट्र राज्याच्या कायद्यात करणे.

4.गुजरात इनाम कायद्यातील कलम 9 ते 18 हे मोबदल्यासंदर्भात असल्याने ती कलमे राज्याच्या देवस्थान इनाम खालसा कायदा तयार करताना वगळावी.

5.गुजरात देवस्थान कायद्यातील कलम 2 (9) मधील 'इन्फेरिअर होल्डर' ची व्याख्या बदलून त्या ऐवजी कनिष्ठ धारक म्हणजे ज्यांच्याकडे देवस्थान इनामाची जमीन परंपरेने वा वारसाहक्काने आलेली आहे असा बदल राज्याच्या देवस्थान इनाम कायद्यात करणे.

6.देवस्थान इनाम जमिनीपैकी 50 टक्के जमीन वहिवाटदारांना व 50 टक्के जमीन देवस्थानाच्या नावे करणे. असे करताना वहिवाटदारांना 50 टक्के जमिनीचा मालकी हक्क देणे.

7.देवस्थानांना जमीन देताना त्या देवस्थानाचा नोंदणीकृत ट्रस्ट असणे बंधनकारक असणे.

8.देवस्थान इनाम जमिनीचे अवैधरित्या हस्तांतरण झाले असल्यास अशा व्यक्तींनी प्रचलित बाजारभावाने येणाऱ्या जमिनीच्या मूल्यांकनाच्या 50 टक्के रक्कम मोबदला म्हणून देवस्थानास देणे व या मोबदल्याच्या रकमेवर 50 टक्के दंड आकारुन तो शासनाकडे जमा करण्यात यावा.

9.देवस्थान इनाम खालसा करताना कुळाच्या ताब्यात असलेली निम्मीच जमीन कुळास खरेदी करता येईल. उर्वरित निम्मी जमीन मालक देवस्थानच्या ताब्यात जाईल, अशा प्रकारची सुधारणा मुंबई कुळ वहीवाट व शेतजमीन अधिनियम 1948 मध्ये कलम 88 (ई) द्वारे करण्यात यावी.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

..4..

ता.प्र.क्र.7196....

श्री.एकनाथराव खडसे....

10.देवस्थान इनाम जमिनींना महाराष्ट्र शेतजमीन (कमाल धारणा) अधिनियम 1961 च्या तरतुदी लागू करण्याच्या अनुषंगाने सुधारणा करण्यात यावी.

सभापती महोदय, उपरोक्त शिफारशी स्वीकारण्याच्या दृष्टीने राज्य सरकार सकारात्मक विचार करीत आहे. परंतु या जमिनी मालकी हक्कानेच द्यावयाच्या आहेत. त्यांनी त्या जमिनी पुन्हा इतरांना हस्तांतरित केल्या तरी पुन्हा पैसे भरण्याची आवश्यकता असता कामा नये. एन.ए. करीत असताना प्रथम पैसे भरण्याची तरतूद कायद्यात करावयाची आहे. या जमिनी त्यांच्याकडे मालकी हक्काने देत असताना त्यांना त्यांची विक्री करण्याची परवानगी देणे, या बाबत सरकार विचार करीत आहे. साधारणतः डिसेंबर पर्यंत नवीन कायदा आणावा असा आमचा प्रयत्न आहे. त्यानुसार आम्ही प्रयत्न करीत आहोत. यामध्ये अशा जमिनींच्या बाबतीत एक मोठा निर्णय राज्य सरकारच्या वतीने करण्याचा सरकारचा विचार आहे.

----------

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सोयाबीनच्या बोगस बियाणांची विक्री करून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या कंपन्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(२) * ७१४२ श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.संजय दत्त, ॲड.रामहरी रुपनवर :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

u

(१) राज्यात सोयाबीन बियाणांचे नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले असता चार कंपन्यांच्या बियाणांमध्ये उगवण क्षमता ५० टक्केपेक्षा कमी असल्याचा अहवाल प्रयोगशाळेने कृषी विभागाला दिला असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बोगस बियाणे देऊन शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या चार कंपन्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**प्रा.राम शिंदे, श्री. एकनाथराव खडसे यांच्याकरिता :** (१) राज्यातील बीज परीक्षण प्रयोगशाळेत तपासणीसाठी प्राप्त झालेल्या सोयाबीन बियाणांच्या नमुन्यांपैकी काही नमुने ५०% पेक्षा कमी उगवण क्षमतेचे असल्याचे निदर्शनास आलेले आहे.

(२) कमी उगवण क्षमतेच्या अप्रमाणित बियाण्यांप्रकरणी बियाणे नियंत्रण आदेश १९८३ मधील तरतुदीनुसार कायदेशीर कारवाई चालू आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मराठवाडा आणि विदर्भात मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. या वर्षी दुबार पेरणी करण्याचे संकट शेतकऱ्यांवर ओढवले आहे. अशा परिस्थितीत 50 टक्क्यांपेक्षा जास्त बियाणे बोगस निघाल्याचे शासनाने स्वत: कबूल केले आहे. या प्रश्नाच्या लेखी उत्तरात नमूद केले आहे की, "कमी उगवण क्षमतेच्या अप्रमाणित बियाण्यांप्रकरणी बियाणे नियंत्रण आदेश 1983 मधील तरतुदीनुसार कायदेशीर कारवाई चालू आहे". महोदय, कोणती कारवाई सुरु आहे ? महोदय, हा प्रकार एप्रिल महिन्यात घडलेला होता. मे ते जुलै या चार महिन्यांपासून अजूनपर्यंत कारवाई सुरु आहे. बोगस बियाण्यांमुळे विदर्भातील वर्ध्यामध्ये शेतकऱ्याने आत्महत्या केली आहे. या प्रश्नाला केवळ दोन ओळीचे लेखी उत्तर देऊन



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7142...

श्री.राजेंद्र मुळक....

आमचे समाधान होणार नाही. त्यामुळे या निमित्ताने मी स्पेसिफिक विचारतो की, ज्या कंपन्यांची बियाणे बोगस निघाली त्या कंपन्यांची नावे काय आहेत, त्या कंपन्यांवर गुन्हे दाख्ल करणार काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, या राज्यामध्ये पुणे, परभणी आणि नागपूर येथे बीज परीक्षण प्रयोगशाळा आहेत. सन्माननीय सदस्यांनी 50 टक्क्याचा जो अर्थ लावला तो तसा नसून, '50 टक्के पेक्षा कमी उगवण क्षमता आढळून आलेले नमुने' असा त्याचा अर्थ आहे. या निमित्ताने सांगतो की, एकूण सर्वसाधारण 4579 नमुन्यांची तपासणी केली. त्यापैकी या चार महिन्यांच्या काळात 3793 नमुने तपासले. यातील अप्रमाणित नमुने 600 होते आणि 50 टक्क्यांपेक्षा कमी उगवण क्षमता असलेले नमुने 197 होते. एकंदर नमुन्याच्या तुलनेत ही टक्केवारी 33 टक्के होती. आपण जिल्हावार निरीक्षक नेमतो. त्यांच्या माध्यमातून ज्या तक्रारी प्राप्त होतात व ज्या संशयास्पद असतात, त्यानुसार 1235 नमुने जून-2015 अखेरपर्यंत प्राप्त झाले. त्यापैकी 830 नमुने तपासले आणि यामध्ये अप्रमाणित नमुने 77 होते. 50 टक्क्यांपेक्षा कमी उगवण क्षमता असलेले नमुने फक्त 20 होते. एकंदर नमुन्याच्या तुलनेत ही टक्केवारी 2.40 टक्के आहे.

नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7142....

प्रा. राम शिंदे ....

सन्माननीय सदस्यांनी 2.40 टक्क्यांच्या अनुषंगाने प्रश्न विचारला आहे. अप्रमाणित बियाणे किंवा जे बियाणे उगवले नाहीत त्या संदर्भात सन 1983 च्या नियमानुसार त्यांना सक्त ताकीद देण्यात येते, तसेच त्यांना शो कॉज नोटीस देण्यात येते. फेरतपासणीची मागणी केल्यास वाराणसी येथील लॅबला ते नमुने पाठविण्यात येतात आणि त्या अनुषंगाने ते अंतिम समजून त्याच्यावर कारवाई करण्यात येते.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, कंपनीला पाठीशी घालण्याचे काम आहे. मी प्रश्नामध्ये कंपन्यांची नावे काय आहेत असे विचारले आहे. पण ते सांगण्यात आलेले नाही. सन 1983 च्या नियंत्रण कायद्यप्रमाणे कारवाई सुरू आहे असा सर्व आलेख दिला आहे. सर्व बाबी खोट्या आहेत. यावेळी सोयाबीनचे बियाणे मोठ्या प्रमाणात चुकीचे निघाले आणि त्यामुळे आत्महत्या झाल्या. हे प्रमाणित झाले आहे. असे असताना आम्ही त्यांना ताकीद दिली असे सांगितले जात आहे. आपण कसली ताकीद दिली ? या कारणास्तव एका शेतकऱ्याचा आत्महत्या केल्याने मृत्यू होतो, मग याला कोण जबाबदार आहे ? यासाठी कंपनी जबाबदार आहे. आपण कृपया त्या कंपन्यांची नावे सांगावीत आणि आपण सभागृहात सांगावे की, त्यांच्यावर गुन्हे दाखल होतील की नाही ?

प्रा. राम शिंदे : सभापती महोदय, एकूण 20 नमुने डिफॉल्ट आढळले आहेत. कंपन्यांची नावे आणि एकूण नमुन्यांच्या संदर्भात जाहीर करण्यास कसलीही अडचण नाही. महाबीजचे 9 आहेत, बसंत ॲग्रोचे 2 आहेत, आधुनिक शेतकरी गट, काडगाव यांचे 2 आहेत, अमित सीड्स यांचे 1 आहे, हरित क्रांती सीड्स, बुलढाणा यांचे 1 आहे, ईगल सीड्स यांचे 1 आहे, कृषीधन यांचे 1 आहे, शेट्टी सीड्स यांचे 1 आहे, महागुजरात सीड्स, नागपूर यांचे 1 आहे, अमर स्वयंसहाय्यता शेतकरी गट यांचे 1 आहे असे एकूण 20 हे नमुने अप्रमाणित आढळले आहेत, त्यानुसार कारवाई करण्याच्या संदर्भात .... (अडथळा) त्या संदर्भात केंद्र सरकारचा ॲक्ट आहे, दी सीड ॲक्ट हा सन 1966 चा आहे आणि त्या अंतर्गत यामध्ये फारशी काही तरतूद नाही, त्यामध्ये

ता.प्र.क्र.7142....

प्रा. राम शिंदे ....

कारवाई एवढीच आहे की, त्याला दंड 500 रूपये होतो आणि जर दंड भरला नाही तर 6 महिन्यांची सजा लागते. त्यामुळे शासनाकडून केंद्र सरकारला कळविण्यात आले आहे की, या संदर्भात आमूलाग्र बदल करावा. शेतकऱ्यांच्या जीवनाशी खेळणाऱ्या या कंपन्या आहेत, त्या अनुषंगाने या कायद्यात दुरूस्ती करावी आणि म्हणून ....

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, गुन्हे दाखल करावेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या का झाल्या ?

प्रा. राम शिंदे : सभापती महोदय, या कायद्याच्या अंतर्गत गुन्हे देखील दाखल करण्यात येतील. मी तेच सांगत आहे. (अडथळा) माझे उत्तर झाल्यावर आपले समाधान होईल. जी कारवाई करण्याची गरज असेल ती केली जाईल. तुम्हाला सांगतो की, गुन्हा .... जो क्रमप्राप्त, अपेक्षित आहे, त्या गुन्ह्याची तरतूद मी आपल्याला सांगतो.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, हा विषय ज्या पध्दतीने गंभीर झालेला आहे त्या पध्दतीने त्यावर सांगितले पाहिजे.

प्रा. राम शिंदे : सभापती महोदय, मी आपल्या प्रश्नाला प्रो-ॲक्टिव्हली उत्तर देण्याचा प्रयत्न करीत आहे, या नियमातील तरतूद काय आहे हे सांगत आहे. या नियमातील तरतूद फक्त 500 रूपये दंड व्हावा एवढीच आहे. त्याला सजा 6 महिन्यांची आहे. त्यामुळे शासनाने प्रयत्नपूर्वक केंद्र सरकारला कळविले आहे की, या कायद्यात बदल झाला पाहिजे. केंद्र सरकारचेही पत्र प्राप्त झाले आहे. या अधिवेशनात या सीड ॲक्टच्या संदर्भात कायदा करणार असे केंद्र सरकारने कळविले आहे. त्या संदर्भात पुन्हा एकदा राज्य शासन पाठपुरावा करेल.

श्री. राजेंद्र मुळक : सभापती महोदय, पंचनामे झाले, त्यामध्ये या घटनाक्रमामुळे आत्महत्या झाली हे सिध्द झाल्यानंतरही माननीय मंत्री गुन्हे दाखल करण्याच्या संदर्भात काहीही बोलत नाहीत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7142....

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, राज्यामध्ये बियाणे नियंत्रक कायद्याच्या पलीकडे दुसरा असा कोणताही कायदा अस्तित्वात नाही. या कायद्याच्या अंतर्गत जी काही कार्यवाही आहे ती केलेली आहे. हा कायदा फार कमजोर आहे. कायदा केंद्र सरकारचा आहे. त्यामुळे केंद्र सरकारने हा कायदा बदलावा यासाठी केंद्र सरकारला सूचना केली आहे. बियाणे नियंत्रक कायदा अधिनियम, 1966, बियाणे नियम, 1968, बियाणं नियंत्रण आदेश, 1983 हे सर्व केंद्र सरकारचे कायदे आहेत. राज्य सरकारचा या संदर्भात कोणताही कायदा नाही. कारण राज्य सरकारला अधिकार नाही. या कायद्याच्या मर्यादा अशा आहेत की, अशा स्वरूपाचे बियाणे बोगस आढळले किंवा अन्य आढळले तर त्या संदर्भात फक्त 500 रूपयांचा दंड पहिल्या गुन्ह्यासाठी करता येतो, दुसऱ्या गुन्ह्यासाठी 6 महिन्यांची सक्त मजुरी दिली आहे. देशभरात या बियाणांच्या संदर्भात अंतिमत: अधिकृत अशा स्वरूपाची तपासणी करून अहवाल देण्याचा अधिकार फक्त वाराणसीच्या लॅबला दिला आहे. देशात ज्या-ज्या ठिकाणाहून असे बियाणे येतात ते वाराणसीला पाठवावे लागतात, त्यांचा रिपोर्ट येण्यास बराच कालावधी लागतो. मागच्या राज्य शासनाने केंद्र सरकारला या संदर्भात कायद्यात बदल करावा अशी विनंती केली होती. आताही आम्ही मोठा प्रस्ताव पाठविला आहे की, वारंवार अशा स्वरूपाच्या घटना घडतात आणि शेतकऱ्यांची हानी होते आणि ते त्यामुळे आमहत्या करतात, या ठिकाणी तरी कायदा कठोर केला पाहिजे. सन 2004 ला केंद्र सरकारने या संदर्भातील कायद्यामध्ये काही दुरूस्त्या आणून लोकसभेत ठेवल्या. परंतु लोकसभेत अजून तो कायदा चर्चेला येऊ शकलेला नाही. आता पुन्हा आम्ही त्यांना या संदर्भात पत्रव्यवहार केला आहे. कारण नवीन बियाणे आले, नवीन कंपन्या आल्या, यानुसार सुधारित असा कायदा आम्ही या येणाऱ्या अधिवेशनात ठेवत आहोत अशा स्वरूपाचे उत्तर केंद्र सरकारकडून प्राप्त झाले आहे, तोपर्यंत या कंपन्यांवर कारवाई करणे, ज्यांचे नुकसान झाले आहे त्यांना नुकसानभरपाई देणे या संदर्भात कंझुम्यर कोर्टाकडे जाण्याशिवाय दुसरा काही पर्याय आपल्याकडे आता नाही. म्हणून या सर्वांना ग्राहक तक्रार मंचाकडे जाण्याचा संदर्भात पूर्वीपासून सूचना दिलेल्या आहेत. काही केसेस ग्राहक तक्रार मंचाकडे मागच्या व त्या मागच्या वर्षी गेल्या आहेत. मोठ्या प्रमाणात नुकसानभरपाई

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7142....

श्री. एकनाथराव खडसे ....

देण्याचे आदेश कंझ्युमर कोर्टाने त्या बियाणे कंपन्यांना दिले आहेत. या कंपन्यांना काळ्या यादीत टाकायचे, या कंपन्यांविरूध्द फौजदारी गुन्हा दाखल करायचा, एमआरपीपेक्षा जास्त किंमतीने विकू नये यासारखा कायदा करायचा, या कंपन्यांना जीवनावश्यक वस्तू कायदा लागू करायचा, या कंपन्यांच्या संदर्भात स्थानिक गोडाऊन सील करण्याचे अधिकार राज्याला मिळावेत या संदर्भातील अशा स्वरूपाची विनंती केंद्र सरकारला केली आहे. जोपर्यंत केंद्र सरकारचा कायदा अस्तित्वात येत नाही तोपर्यंत अस्तित्वात असलेल्या कायद्याच्या पलीकडे आपल्यालाही कोणतीही कार्यवाही करता येत नाही ही वस्तुस्थिती आहे.

श्री. प्रकाश गजभिये : सभापती महोदय, माननीय कृर्षी मंत्र्यांनी निवेदन केले आहे, भावना व्यक्त केल्या आहे. आपण भेसळ झाली तर गुन्हे दाखल करतो. बियाणे, किटकनाशके किंवा त्यांना लागणारी यंत्रे यासाठी त्यांच्याकडे पैसे नसल्यामुळे ते आत्महत्या करतात हे सरकारला माहीत आहे आणि असे असतानासुध्दा 50 टक्के उगवन नसणारे बियाणे दिले असहे आणि आपण त्यांच्यावर काहीच कारवाई करू शकत नाही. फक्त 500 रूपये दंड आहे. आपण त्यांचे परवाने रद्द करणार का ? आपणच पूर्वी परवाने दिले आहेत, ते परवाने रद्द करणार का ? आपण तसे केले तर निश्चितच त्यावर आळा बसेल आणि राज्यातील शेतकऱ्याला आपण न्याय देऊ शकू. शासन त्यांच्यावर कारवाई करण्याकरिता या अधिवेशनात नाही तर पुढील अधिवेशनात तरी विधेयक आणेल का ?

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, शासनाने मागच्या काळात परवाने निलंबित केले होते. परंतु न्यायालयामध्ये हा खटला गेला आणि त्यांनी त्यांच्या बाजूने निर्णय दिला. राज्य शासनाला असा कायदा करण्याचा अधिकारच नाही, कारण केंद्र सरकारच्या कन्करंट लिस्टमध्ये बियाणे, खते, औषधे या तीनही बाबी आहेत. त्यामुळे राज्य शासनाला या संदर्भात कायदा करण्याचा कोणताही अधिकार नाही. केंद्र सरकारकडे राज्य शासनाचा पाठपुरावा सुरू आहे. माननीय केंद्रीय मंत्र्यांबरोबर बैठकीत आपल्या राज्यासहित सर्व राज्यांनी मागणी केली होती की, हे



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7142....

श्री. एकनाथराव खडसे ....

अधिकार राज्य शासनाला द्यावेत अन्यथा केंद्र सरकारनेच कायदा दुरूस्त करावा. चालू अधिवेशनात हा कायदा चर्चेसाठी ठेवला आहे, चर्चा होईल आणि नव्याने कायदा येईल, त्यानुसार कारवाई करण्यात येईल.

श्री. प्रकाश गजभिये : सभापती महोदय, शासन त्यांचे परवाने रद्द करणार का ?

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, परवाने रद्द केले होते, न्यायालयामध्ये त्यांनी त्यास आव्हान दिले आणि न्यायालयाने परवानाधारकांच्या बाजूने निर्णय दिला.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7142 .............

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, या कंपन्यांचे परवाने शासन रद्द करणार का ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, परवानेच नाही तर त्यांना फाशी देण्यासही आम्ही तयार आहोत. एखादा व्यक्ती शेतकऱ्यांना फसवत असेल तर त्याच्याविरुध्द कठोर कारवाई केली पाहिजे, अशी सन्माननीय सदस्यांप्रमाणेच सरकारचीही भावना आहे. परंतु, कायद्याच्या काही मर्यादा आहेत. त्या मर्यादेत राहून जी काही कठोर कारवाई करावयाची आहे, ती नक्की करु.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, केंद्रीय कायदा आणि त्याची अंमलबजावणी या संदर्भातील माहिती कृषी मंत्री महोदयांनी सभागृहासमोर ठेवली आहे. 50 टक्क्यांपेक्षा कमी उगवण क्षमता असलेली बियाणे या कंपन्यांव्दारा विकली गेली, हेही त्यांनी मान्य केले आहे. कायदा त्याच्या जागी आहे व त्यामध्ये सुधारणा करण्याबाबत आपण केंद्र सरकारला कळविले आहे.

सभापती महोदय, वाराणसी येथील लॅबमध्ये बियाण्यांचे नमुने पाठवावे लागतात व त्यांच्याकडून वेळेवर अहवाल मिळत नाहीत, अशी एक तांत्रिक अडचण लेखी उत्तरातून मांडण्यात आली आहे.

सभापती महोदय, आजच्या काळात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने एवढी झेप घेतली असताना अशाच प्रकारची लॅब आपल्या राज्यात स्थापन करता येईल किंवा कसे, हे देखील आपण तपासले पाहिजे. कारण, अशा प्रकारची बोगस बियाणांची विक्री केली जाते आणि त्या माध्यमातून शेतकऱ्यांना फसविले जाते. त्याऐवजी या कंपन्यांव्दारा शेतकऱ्यांना बियाणांचा पुरवठा करण्यापूर्वी आपल्या लॅबमार्फत तपासणी करणे व दाखला देणे, अशा प्रकारचे काही फ्रेमवर्क आपण राज्य पातळीवर तयार करु शकतो का आणि चांगल्या दर्जाचीच बियाणे शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतील, अशा प्रकारची दक्षता घेणारी यंत्रणा निर्माण करु शकतो का, याचाही विचार आपण केला पाहिजे.

सभापती महोदय, केंद्र शासनाकडून कायद्यात दुरुस्ती होईल तेव्हा होईल. आज परिस्थिती अशी आहे की, कायद्यात केवळ 500 रुपये द्रव्यदंडाची तरतूद आहे. ज्याप्रमाणे प्रवासात एखादे वाहन वाहतूक पोलिसांनी अडविल्यानंतर 50-100 रुपये देऊन निघून जाता येते, तसेच जर बियाणांच्या बाबतीत होणार असेल तर ते दुर्दैवी आहे.

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.7142 .............

श्री.हेमंत टकले.........

सभापती महोदय, हा प्रश्न महाराष्ट्रातील शेतकऱ्यांशी निगडित आहे. वैज्ञानिक दृष्टीकोन ठेऊन आपल्याला विभागीय पातळीवर लॅब स्थापन करता येऊ शकतील. यामध्ये फार मोठे विज्ञान आहे, असे मला तरी स्वत:ला वाटत नाही. आपल्या राज्यात कृषी विद्यापीठे आहेत. या विद्यापीठांमध्ये बियाणांच्या तपासणीची यंत्रणा उभी करता येईल का आणि बियाणांचे वाटप होण्यापूर्वी त्या बाबतचे प्रमाणपत्र पुरवठादारांनी विद्यापीठांकडून घेतले पाहिजे, अशा प्रकारचा काही नियम, कायद्याची चौकट गृहित धरून आपण करु शकू का, याबाबत शासनाने जरूर विचार करावा. असा विचार शासन करणार आहे का ?

**उप सभापती :** सन्माननीय सदस्यांनी प्रश्न उपस्थित करताना केलेले एक वक्तव्य मला आक्षेपार्ह वाटत आहे. रस्त्यावरील पोलीस 100 रुपये दिले की सोडतात, असा अर्थ त्यामधून निघतो. त्यामुळे जनमानसात पोलिसांबाबत अविश्वास तयार होऊ शकेल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, दंडाची पावती देऊन ते सोडतात, असा त्या वक्तव्याचा अर्थ आहे.

**उप सभापती :** सन्माननीय सदस्यांना पावतीचा उल्लेख अगोदरच करता आला असता.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केल्या आहेत, त्या योग्य आहेत. तथापि, या संदर्भातील प्रारुप कायदा संसदेच्या विचाराधीन आहे. केंद्र सरकारने कायद्याचे प्रारुप चर्चेसाठी संसदेसमोर ठेवले आहे. या प्रस्तावित कायद्यामध्ये नुकसान भरपाईची तरतूद आहे आणि बियाणे उत्पादक कंपन्यांशी संबंधित लोकांना अटक करण्याचीही तरतूद आहे.

सभापती महोदय, केंद्र सरकारने वाराणसी येथील लॅबला अशा सूचना दिल्या आहेत की, त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या नमुन्यांबाबतचा अहवाल त्यांनी 30 दिवसांच्या आत दिला पाहिजे. कारण, सध्या सहा ते आठ महिन्यांचा कालावधी यासाठी लागत आहे. त्यामुळे जो काही असेल तो अहवाल 30 दिवसांच्या आत दिला पाहिजे, अशा प्रकारचे बंधन केंद्र सरकारने वाराणसीच्या लॅबवर घातले आहे.

-----------

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**दुधावरील कमिशन वाढवून देण्यासाठी मुंबई-ठाणे दूध विक्रेत्यांनी दूध विक्रीवर बेमुदत बहिष्कार टाकल्याबाबत**

**(3) *८१८५ श्रीमती दिप्ती चवधरी, डॉ.सुधीर तांबे, श्री.माणिकराव ठाकरे, श्री.राजेंद्र मुळक, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.संजय दत्त, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.सुनील तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.नरेंद्र पाटील, श्री.दीपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.सतिश चव्हाण, श्री.रामराव वडकुते, श्री.विक्रम काळे, श्री.हेमंत टकले, श्री.अमरसिंह पंडित, अॅड.जयदेव गायकवाड, श्री.जगन्नाथ शिंदे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.प्रकाश बिनसाळे, श्री.अशोक उर्फ भाई जगताप :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दुधावरील कमिशन दहा टक्के वाढवून दयावे या मागणीसाठी शहरातील दूध विक्रेत्यांनी गोकुळ, महानंदा, वारणा, अमुल आणि मदर डेअरी या पाच दूध कंपन्याच्या दूध विक्रीवर बेमुदत बहिष्कार टाकण्यात आल्याने मुंबई-ठाणे शहरातील अनेक भागात या कंपन्यांच्या दूधाचा पुरवठा झाला नसल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उपरोक्त दूध कंपन्या कमिशन वाढवून देत नसल्यामुळे दूध विक्रेत्यांचे नुकसान होत आहे तसेच दूध ग्राहकांचीही गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(3) असल्यास, दूध विक्रेत्यांच्या बहिष्कारामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(4) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) एप्रिल, २०१५ मध्ये ठाणे जिल्हा व परिसरातील गोकुळ, महानंद, वारणा, अमूल व मदर डेअरी या पाच दूध कंपन्यांच्या दूध विक्रीवर बहिष्कार टाकल्याने या कंपन्यांच्या दुधाचा पुरवठा कमी प्रमाणात झाला ही बाब निदर्शनास आली हे खरे आहे.
(2) विक्रेते त्यांना सोयीस्कर अशा इतर ब्रैंडचे दूध विक्री करीत असल्याने विक्रेत्यांचे नुकसान झालेले नाही. तसेच बाजारपेठेत पुरेशा प्रमाणात अन्य ब्रैंडचे दूध उपलब्ध असल्यामुळे ग्राहकांची गैरसोय झाली नाही.
(3) व (४) विक्रेत्यांचे कमिशन ठरविणे ही बाब वितरक व दूध पुरवठादार कंपनी यांचेशी संबंधित असून हा प्रश्न त्यांच्यात परस्पर सामंजस्याने सुटल्याने शासनास हस्तक्षेप करण्याचा प्रश्न उद्भवला नाही.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, तारांकित प्रश्नाच्या प्रश्न भाग 3 व 4 ला दिलेल्या लेखी उत्तरात असे नमूद करण्यात आले आहे की, "विक्रेत्याचे कमिशन ठरविणे ही बाब वितरक व दूध पुरवठादार कंपनी यांचेशी संबंधित असून हा प्रश्न त्यांच्यात परस्पर सामंजस्याने सुटल्याने शासनास हस्तक्षेप करण्याचा प्रश्न उद्भवत नाही." असे असले तरी दूध विक्रेत्यांच्या

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.8185 .............

श्रीमती दिप्ती चवधरी.........

बहिष्कारातून झालेल्या निर्णयामुळे नागरिकांचे हाल होत आहेत. तशी परिस्थिती भविष्यात उद्‌भवू नये म्हणून शासन कोणत्या उपाययोजना करणार आहे ?

सभापती महोदय, प्रति लीटर 20 रुपयांपेक्षा कमी दराने दूध उत्पादकांकडून दूध घेणाऱ्या दूध सहकारी संघांवर कारवाई करण्याची घोषणा मुख्यमंत्री महोदयांनी केली होती. आतापर्यंत अशा किती दूध संघांवर शासनाने कारवाई केली आहे ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, राज्यातील सर्व दूध सहकारी संस्थांना महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमाच्या कलम 79 अन्वये संघांनी प्रति लीटर 20 रुपये यापेक्षा कमी दराने दूध खरेदी करु नये, अशा नोटीसा दिलेल्या आहेत. त्याप्रमाणे अनेक सहकारी संस्थांनी असे कळविले आहे की, प्रति लीटर 20 रुपयांपेक्षा जास्त दराने त्यांनी दूध खरेदी केली आहे. तथापि, या किमान दरापेक्षा कमी दराने दूध संघ दूध खरेदी करीत आहेत, अशी तक्रार प्राप्त झाली तर अशा दूध संघांवर शासनाला कारवाई करता येईल. या क्षणापर्यंत कोणत्याही दूध सहकारी संघाविरुध्द राज्य सरकारकडे तक्रार प्राप्त झालेली नाही. तथापि, भविष्यात राज्य सरकारच्या सूचनेचे किंवा कायद्याचे उल्लंघन केल्याची बाब निदर्शनास आल्यास अशा सहकारी संस्था बरखास्त करुन त्या संस्थांवर राज्य सरकार प्रशासक नेमेल.

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, या विषयातील वास्तव आपल्याला माहीत आहे. ग्राहकांना 60 ते 70 रुपये प्रति लीटर पेक्षा जास्त दराने दूध खरेदी करावे लागते आणि शेतकऱ्यांना मात्र प्रति लीटर 20 रुपयांपेक्षा कमी दर मिळतो. एकीकडे विक्रेते आपले कमिशन वाढवून मागत असताना शेतकऱ्यांना रास्त दर मिळवून देण्याच्या दृष्टीने शासन कोणते प्रयत्न करीत आहे ?

सभापती महोदय, ग्राहकांना दूधासाठी अधिक दर द्यावा लागणे आणि दूध उत्पादक शेतकऱ्यांना मात्र अपेक्षेपेक्षा कमी दर मिळणे, हा एक प्रकारचा असमतोल आहे. हा असमतोल शासन कशा प्रकारे घालविणार आहे ?

...5....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.8185 .............

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, दूध उत्पादक शेतकऱ्यांना किमान 20 रुपये दर द्यावा, असा निर्णय सरकारने घेतला आणि त्याबरोबरच दुधाचे दर प्रति लीटर 2 रुपयांनी कमी करावेत, अशा सूचना महानंद, आरे किंवा अन्य डेअऱ्यांना देण्यात आल्या आहेत. त्यापूर्वी महानंद डेअरीचा दुधाचा दर प्रति लीटर 40 रुपये होता, तो 38 रुपये करण्यात आला आणि आरेच्या दुधाचा दर 35 रुपयांच्या आत करण्यात आला आहे.

श्रीमती विद्याताई चव्हाण : सभापती महोदय, हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. शेतकरी गायी, म्हशी पाळतो. या गायी, म्हशींना खाद्य पुरविणे, त्यांची निगा राखणे, त्यांचा औषधोपचार, दूध काढणे, यासाठी शेतकऱ्याला खर्च करावा लागत असतो. मात्र, त्यांना प्रति लीटर 20 रुपयांपेक्षाही कमी दर मिळतो. शेतकऱ्याचा खर्च वजा जाता एका लीटरमागे त्याच्या हातात केवळ 5 ते 7 रुपये पडतात. दुसरी बाजू लक्षात घेतली तर पुण्या, मुंबई सारख्या शहरांमध्ये प्रती लीटर 50 रुपयांपेक्षा कमी दराने दूध मिळत नाही. दूध, फळे, भाजीपाला या विक्री साखळीत दलाल असतात. या दलालांवर नियंत्रण ठेवण्याचे काम सरकारने केले पाहिजे. आज आपण दुधाचे 50, 60, 70 रुपये दर उघड्या डोळ्यांनी पहात आहोत व त्यामुळे मुंबई, पुण्यासारख्या शहरातील लोकांची पिळवणूक होत आहे आणि पुन्हा शेतकऱ्याला 5 ते 7 रुपयांपेक्षा अधिक उत्पन्न होतानाही दिसत नाही. सरकार मात्र असे म्हणत आहे की, यावर शासनाला नियंत्रण ठेवता येणार नाही. शासनाने लेखी उत्तरात असे नमूद केले आहे की, "विक्रेत्याचे कमिशन ठरविणे ही बाब वितरक व दूध पुरवठादार कंपनी यांचेशी संबंधित असून हा प्रश्न त्यांच्यात परस्पर सामंजस्याने सुटल्याने शासनास हस्तक्षेप करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही." शासनाने अशा प्रकारे बघ्याची भूमिका घेणे बरोबर नाही. शेतकरी जनावरांवर मोठ्या प्रमाणावर खर्च करीत असतो व तो केल्यानंतरही त्याला 5 ते 7 रुपयांपेक्षा अधिक मोबदला मिळत नाही. यामधील दलाल मात्र लीटरमागे 25 ते 30 रुपये कमिशन घेत आहेत आणि सरकार हस्तक्षेप करणार नाही, असे सांगत आहे. या सर्व परिस्थितीत दूधाच्या दरांवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासन हस्तक्षेप करणार आहे का ?

...6.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.8185 .............

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, दूध उत्पादक शेतकरी आणि दूध खरेदी करणारे नागरीक या दोघांकडेही सरकारचे लक्ष आहे. त्यासाठी शासनाने एकीकडे शेतकऱ्यांकडून प्रति लीटर 20 रुपयांपेक्षा कमी दराने दूध खरेदी करु नये, असा आग्रह दूध संघांकडे धरला आहे आणि त्याबरोबरच डेअऱ्यांनी दूध विक्रीसाठी करण्यात येणाऱ्या वरकड खर्चावर नियंत्रण आणून दुधाचे दर कमी करावेत, अशाही सूचना दिल्या आहेत.

सभापती महोदय, दूध ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी दुधाची वाहतूक, चिलिंग, कुलींग, अन्य प्रक्रिया यासाठी मोठ्या प्रमाणावर खर्च येत असतो, असे दूध विक्रेत्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे शासनाने हस्तक्षेप करुन विधानसभेचे माननीय अध्यक्ष श्री.हरिभाऊ बागडे यांच्या अध्यक्षतेखाली एक बैठक घेतली होती. त्यांनीही या संदर्भात अशी सूचना केली की, दूध संघ किंवा विक्रेत्यांनी वरकड खर्चावर मर्यादा घातल्या पाहिजेत. आज दूध विक्रीवरील कमिशन 3 रुपये 40 पैसे आहे.

या नंतर श्री.बोरले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.8185.........

श्री.एकनाथराव खडसे............

कमिशन वाढवून द्यावे, अशी विक्रेत्यांची मागणी आहे. यामध्ये त्यांना 20-20 रुपये कमिशन मिळत नाही. परंतु, मी सांगितल्याप्रमाणे हा खर्च मोठ्या प्रमाणावर होत असतो. आम्ही या आठवड्यात प्रमुख दूध उत्पादक संघांची बैठक घेण्याचे ठरविले आहे आणि वरकड खर्चामध्ये मर्यादा असावी, तो कमी करावा, या संदर्भात आवाहन करण्याच्या पलीकडे आपल्या हातात काही नाही. कारण, या संदर्भात कार्यवाही करावयाची म्हटले तर दूध हा असा पदार्थ आहे की तो फार काळ ठेवताही येत नाही आणि खर्च कमीत कमी असला पाहिजे, यासाठी राज्य शासन उपाययोजना करीत आहे. एकतर आपण वरकड खर्चासाठी सहकारी संस्थांना मदत करतो. म्हणजे 20 रुपये लिटरने दूध खरेदी करीत असताना 2 रुपये, 2 रुपये 50 पैसे सरकार वरकड खर्चासाठी देत असते की, शासनाच्या तिजोरीतून पैसे घ्यावेत, परंतु ग्राहकांना त्याची तोशीस लागू नये. दुसरे म्हणजे, दुधावर प्रक्रिया करणाऱ्या उद्योगांना अधिक चालना दिली तर दूध, लोणी, तूप किंवा दुधापासून जे पदार्थ तयार होतात यामुळे दुधाच्या विक्रीचा भाव कमी करण्यास त्याची मदत होऊ शकते. मग अशा प्रोसेसिंग युनिटलाही प्रोत्साहन देण्याच्या संदर्भात राज्य शासनाने काही उपक्रम जाहीर केले आहेत. पूर्वी पासून हे उपक्रम सुरु होते. जसे दुधाची पावडर तयार करणे किंवा दुधापासून अन्य पदार्थ तयार करणे अशा प्रप्लँटला आरकेव्हीवायच्या माध्यमातून किंवा अन्य योजनांच्या माध्यमातून आपण पैसे दिलेले आहेत. राज्य शासनाने अशा प्लँटला 50-50 कोटी रुपयांपर्यंतचे अनुदान दिलेले आहे आणि आमचा असा प्रयत्न राहणार आहे की, वरकड खर्च कमी करण्यासाठी त्यांना इतर गोष्टींसाठी मदत करावी. म्हणजे वरकड खर्च कमी होऊन ग्राहकांना कमी दरात दूध मिळेल. परंतु, 60-70 रुपये असे जर कोणी करीत असेल आणि तशा स्वरुपाची तक्रार प्राप्त झाली तर त्या संदर्भात कोणती कारवाई करता येईल, हे शासन तपासून घेईल. शुद्ध आणि चांगल्या प्रतीचे दूध मिळाले पाहिजे यासाठी अन्न व औषध प्रशासन विभागालाही कळविण्यात आले आहे आणि राज्यात दररोज कोठे ना कोठे दुधाचे नमुने तपासून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याचा प्रयत्न शासनाकडून सुरु आहे.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**वैरागड (ता.चिखली, जि.बुलढाणा) व खामगांव तालुक्यातील शिवारात टॉवर उभारणी केलेल्या जमिनींचा मोबदला मिळण्याबाबत**

**(४)** * **८१५३ श्री.पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वैरागड (ता.चिखली, जि.बुलढाणा) व खामगाव तालुक्यातील शिवारात महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण व ट्रान्समिशन (महावितरण) कंपनी करीता महाराष्ट्र ईस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनी प्रा.लि., औरंगाबाद यांनी टॉवर उभारण्याचे काम सुरु केलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शिवारातील शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीत टॉवर उभारल्याबाबत ठरलेल्या करारप्रमाणे मोबदला देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मोबदला न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांनी टॉवरचे काम थांबविण्याचे प्रयत्न केल्यामुळे त्यांना कंपनीच्या काही अधिकाऱ्यांनी तसेच पोलीस अधिकाऱ्यांनी जबरदस्ती करुन शेतकऱ्यांना त्यांच्या शेतातून धक्के मारुन काढून दिल्याबाबत पोलीस विभागाकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शेतकऱ्यांच्या जमीनीचा ठरल्याप्रमाणे मोबदला न देता जबरदस्ती करुन तसेच स्थानिक पोलीसांची मदत घेऊन जमिनी बळकावणाऱ्या महाराष्ट्र ईस्टन ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनी प्रा.लि., औरंगाबाद या कंपनीच्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) महाराष्ट्र ईस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनीतर्फे बुलढाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील वैरागड व खामगाव तालुक्यातील शिवारात टॉवर उभारणीचे काम पूर्ण झाले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण व ट्रान्समिशन कंनीच्या माध्यमातून महाराष्ट्र ईस्टर्न ग्रीड पॉवर ट्रान्समिशन कंपनी प्रा.लि., औरंगाबाद या कंपनीचे त्या भागात टॉवर उभारण्याचे काम सुरु होते. आता ते काम पूर्ण झाले आहे, असे लेखी उत्तरात नमूद केले आहे. परंतु, प्रश्न क्र.2 व 3 ला 'हे खरे नाही' तसेच, प्रश्न क्र.4 व 5 ला 'प्रश्न उद्‌भवत नाही' असे लेखी उत्तर दिलेले आहे. खामगांव तालुक्यातील गणेशपूर आणि चिखली तालुक्यातील वैरागड या दोन गावातील शेतकऱ्यांची जमीन घेत असताना ट्रान्समिशन कंपनीने दादागिरीने आणि पोलिसांच्या संगनमताने त्या लोकांच्या जमिनीवर टॉवर उभे केले आहेत. लोक त्यांना अडविण्यासाठी गेले असता पोलिसांनी त्यांना धक्काबुक्की केली. पोलिसांनी त्यांना त्यांच्याच शेतातून बाहेर काढले आणि पोलिसांच्या दबावाखाली त्यांनी हे टॉवर उभारले

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.8153.......

श्री.पांडुरंग फुंडकर.......

आहेत, अशा प्रकारच्या तक्रारी पोलीस स्टेशनमध्ये करण्यात आलेल्या आहेत. परंतु, पोलिसांनी कोणतीही कारवाई केलेली नाही. मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे की, हे खरे नाही. माझ्याकडे निवेदनाच्या प्रती आहेत. मी त्या प्रती मंत्री महोदयांकडे देण्यास तयार आहे. परंतु, जे उत्तर दिलेले आहे ते चुकीचे आहे. ज्या शेतकऱ्यांच्या फळबागा गेल्या, जमिनी गेल्या, त्यांना पुरेसा मोबदला मिळालेला नाही. त्या कंपन्यांनी अर्धवट मोबदला दिलेला आहे. तक्रारी केल्यानंतर देखील त्यांना मोबदला मिळालेला नाही आणि या कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनी दादागिरी करुन तेथे टॉवर उभे केलेले आहेत. म्हणून याची संपूर्ण चौकशी करुन ज्या शेतकऱ्यांना पैसे मिळालेले नाहीत त्यांना पैसे देण्यासंबंधी शासनाचे धोरण काय आहे ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, शासनाकडे अशा प्रकारच्या तक्रारी आलेल्या नाहीत. म्हणून 'हे खरे नाही' असे लेखी उत्तर दिलेले आहे. सन्माननीय सदस्यांचे असे म्हणणे आहे की, त्यांच्याकडे काही तक्रारी आलेल्या आहेत. त्यांनी माझ्याकडे ते पुरावे दिले तर त्याची पुन्हा चौकशी करण्यात येईल. पोलीस बळाचा वापर केला असेल, शेतकऱ्यांना छळले असेल या संदर्भात त्यांच्याकडे जे पुरावे असतील त्याबाबत पुन्हा चौकशी करण्यात येईल. परंतु, आता पर्यंत शासनाकडे या संदर्भात कोणतेही पत्र आलेले नसल्यामुळे असे उत्तर देण्यात आले आहे. राज्यात या व्यतिरिक्त दोन-तीन ठिकाणी तक्रारी आलेल्या आहेत. माननीय श्री.अजित पवार साहेब, माननीय श्री.सुनील तटकरे साहेब ऊर्जामंत्री होते. माननीय श्री.राजेंद्र मुळक साहेब ऊर्जा राज्यमंत्री होते. त्यांनी दिनांक 1 नोव्हेंबर, 210 रोजी चांगला शासन निर्णय निर्गमित केला होता की, जिल्हाधिकारी आणि एसडीओ यांच्या लेव्हलवर कमिट्या तयार करुन त्यांनी आपले म्हणणे त्या कमिटी समोर मांडावयाचे, त्यांनी मोबदला सर्टिफाय करावा आणि तो मोबदला संबंधित शेतकऱ्यांना वाटप करावा. शासनाने शासन निर्णय काढलेला आहे. परंतु, या ठिकाणी तसे झालेले दिसत नाही. हा 8 जिल्ह्यांचा प्रश्न आहे आणि 8 जिल्ह्यातील जवळपास 56 गावांमधून विजेची लाईन गेलेली आहे. त्यामुळे 8 जिल्ह्यातील जिल्हाधिकाऱ्यांना सूचना देण्यात येतील की, अशा समित्या स्थापन



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.8153.......

श्री.चंद्रशेखर बावनकुळे........

करण्यात आल्या नसतील तर त्या स्थापन कराव्यात. त्या शेतकऱ्यांना मोबदला दिला नसेल तर तो देण्यात यावा. शासनाचा शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न राहणार आहे.

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, संबंधित शेतकऱ्यांना मोबदला देणे बाकी आहे. तो मोबदला तातडीने देण्यात येणार आहे काय ? तसेच, आता नवीन जमीन अधिग्रहण कायदा आलेला आहे. जोपर्यंत 70 टक्के शेतकऱ्यांची मान्यता मिळत नाही तोपर्यंत कोणत्याही प्रयोजनासाठी जमीन अधिग्रहित करता येत नाही. मग ते येथे लागू होईल काय ? कारण, टॉवर लाईनसाठी जमिनीचे अधिग्रहण केले जाते आणि त्याचा मोदबला दिला जातो. आता मोदबला देण्याबाबत रेश्यो ठरवून दिलेला आहे. मोबदला 4 पटीने जास्त देण्यात यावा वगैरे. मंत्री महोदयांनी या संदर्भात उत्तर द्यावे.

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.राजेंद्र मुळक साहेबांनी चांगला प्रश्न विचारला आहे. मी सांगू इच्छितो की, 8500 शेतकऱ्यांना 75 कोटी रुपये दिल्याचे रेकॉर्डवर आहे. परंतु, ते जिल्हाधिकारी किंवा एसडीओ यांच्या समिती समोर गेले नसतील, त्यांनी परस्पर मोबदला वाटप केला असेल, तो चुकीचा असेल तर या संदर्भात पुन्हा समिती करुन सर्व शेतकऱ्यांची चौकशी करुन पुन्हा निर्णय करता येईल. दुसरे म्हणजे, आजच्या तारखेला कोणत्या शेतकऱ्याला पैसे मिळाले नाहीत काय, तर सर्वच शेतकऱ्यांना पैसे मिळाले आहेत. परंतु, जे पैसे दिले ते बरोबर दिले किंवा नाही, हे जिल्हाधिकाऱ्यांकडून तपासले गेले नाही. जिल्हाधिकाऱ्यांकडून संपूर्ण तपासणी करण्यात येईल. सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या दुसऱ्या प्रश्नाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, हा टेलिग्राफ कायदा आहे. टेलिग्राफ कायद्यानुसार पारेषणच्या लाईन टाकण्यात येतात. मनोरे कसे उभारले जावेत, दोन मनोऱ्याच्या मधील जमिनीसाठी मोबदला दिला जात नाही. जेथे मनोरे उभारले जातात तेवढ्याच जागेसाठी मोबदला दिला जातो. परंतु, आता केंद्र शासनाचा पारेषण बाबत नवीन कायदा येत आहे. त्याबाबत केंद्र शासनाचे नोटिफिकेशन येणार आहे. ते नोटिफिकेशन चांगले आहे, असे अभ्यासावरुन कळले आहे. केंद्र शासनाने तो जीआर,

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.8153.......

श्री.चंद्रशेखर बावनकुळे.........

नोटीफिकेशन तत्काळ काढावे. मी एवढेच सांगू इच्छितो की, केंद्र शासनाचे जे नोटिफिकेशन येणार आहे त्यामध्ये मनोऱ्यासह जो तारांचा आडवा स्पॅन आहे त्यासाठी देखील मोबदला देण्याचा समावेश आहे. आपण राज्यात तो कायदा लागू करणार आहोत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मी स्पेसिफिक प्रश्न विचारला होता की, ते शेतकरी जिल्हाधिकारी, एसडीओ यांच्याकडे गेले होते. परंतु, कोठेही सुनावणी झाली नाही आणि पोलिसांनी त्या कंपनीला सपोर्ट केल्यामुळे पोलीस स्टेशनमध्ये देखील त्यांची सुनावणी झाली नाही. म्हणून आपण जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना सांगून ही प्रकरणे पुन्हा त्या समिती समोर आणून ज्या शेतकऱ्यांवर अन्याय झालेला आहे त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न शासन करणार आहात काय ?

श्री.चंद्रशेखर बावनकुळे : सभापती महोदय, मी मघाशीच सांगितले की, जिल्हाधिकारी यांच्याकडून 8 जिल्ह्यातील संपूर्ण टॉवर लाईनची चौकशी करुन, त्यांनी सर्व शेतकऱ्यांना समिती समोर बोलावून आपण बुलढाणा जिल्ह्यासह आठही जिल्ह्यांतील संपूर्ण प्रकल्पाचा आढावा घेऊ. त्यामुळे सर्वच प्रकल्पग्रस्तांना यातून न्याय देण्याचा प्रयत्न होईल.

**उप सभापती :** प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

----------

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** लेखी उत्तरे

**मु.शी.:** अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी व सहावी यादी सभागृहासमोर ठेवणे

सचिव : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी व सहावी यादी सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अतारांकित प्रश्नोत्तराची पहिली, दुसरी, तिसरी, चौथी, पाचवी व सहावी यादी सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : येथे सोबत जोडलेली यादी छापावी.)

--------

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**माननीय संसदीय कार्यमंत्री श्री. गिरीष बापट यांना हार्दिक शुभेच्छा**

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय संसदीय कार्य मंत्री श्री.गिरीष बापट हे मोठ्या आजारातून बरे होऊन आज सभागृहात उपस्थित झाले आहेत, त्यांचे आम्ही स्वागत करतो. ते सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सभागृहाच्या कामकाजाची जी गैरसोय झाली ती गैरसोय भरुन काढण्याचा प्रयत्न उरलेल्या दीड दिवसात आम्ही करु आणि विरोधकांना संसदीय कार्यमंत्री न्याय देतील अशी अपेक्षा व्यक्त करुन त्यांना आम्ही सर्व मनापासून शुभेच्छा देत आहोत.

**नियम 289 अन्वये दिलेल्या सूचनांबाबत**

**उप सभापती** : नियम 289 च्या दोन सूचना प्राप्त झाल्या आहेत या दोन्ही सूचना माननीय सभापती यांनी दालनात नाकारल्या आहेत.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, काल नियम 289 अन्वये सूचना सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी उपस्थित केली होती. नियम 289 अन्वये सूचनेच्या बाबतीत माननीय सभापतींकडून रुलिंग येणे बाकी आहे. ते रुलिंग आज आले तर आज कार्यक्रम पत्रिकेवर अंतिम आठवडा प्रस्ताव व नियम 260 अन्वये दोन प्रस्ताव चर्चेसाठी दर्शविली आहेत. या प्रस्तावाबाबत काल नियम 289 अन्वये सूचना दिली होती त्याचे रुलिंग आलेले नाही. रुलिंग आल्यानंतर चर्चेला सुरुवात झाली तर ते योग्य होईल. अंतिम आठवडा प्रस्तावाची चर्चा अगोदर होणार की, नियम 260 अन्वये दिलेल्या प्रस्तावाची चर्चा अगोदर होणार हे देखील स्पष्ट होणे आवश्यक आहे. काल नियम 289 अन्वये सूचना मांडण्यात आली होती त्याचे रुलिंग अगोदर द्यावे अशी माझी आपणाला विनंती आहे.

**उप सभापती** : विरोधी पक्ष नेत्यांनी जो विषय उपस्थित केला त्याबाबत मी असे सांगू इच्छितो की, यासंदर्भात संबंधितांशी चर्चा करुन निर्णय होणार आहे, निर्णय प्राप्त झाल्यावर मी सभागृहाला ताबडतोब अवगत करीन, तोपर्यंत आपण पुढील कामकाज घेऊ या.

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती, कळंबोली यांचा सन 2013-2014 या वर्षाचा सत्ताविसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाचा सन 2014 या वर्षाचा नववा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

------

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** लेखी माहिती

**मु.शी.:** नियम 46 अन्वये निवेदनाच्या चर्चेच्या वेळी आंबेजोगाई येथील एका विद्यार्थीनीने अकरावीमध्ये प्रवेश न मिळाल्याने केलेली आत्महत्या या विषयावरील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2013 च्या दुसऱ्या (पावसाळी) अधिवेशनात नियम 46 अन्वये निवेदनाच्या चर्चेच्यावेळी श्री.भगवान साळुंखे वि.प.स. यांनी 'आंबेजोगाई येथील एका विद्यार्थीनीने अकरावीमध्ये प्रवेश न मिळाल्याने केलेली आत्महत्या' या विषयावर उपस्थित केलेल्या पॉईट ऑफ इन्फॉर्मेशन च्या वेळी दिलेल्या आश्वासनाच्या अनुषंगाने अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : सोबतची अधिक माहिती येथे छापावी.)

-------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** लेखी माहिती

**मु.शी.:** नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी उपस्थित केलेल्या जीवनावश्यक वस्तूंमध्ये प्रचंड भेसळ होत असल्याचे निदर्शनास येण्यासंदर्भातील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवणे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने दिनांक 16 मार्च, 2011 रोजी श्री.पांडुरंग फुंडकर आणि इतर वि.प.स. यांनी म.वि.प. नियम 260 अन्वये प्रस्तावावरील चर्चेच्या वेळी उपस्थित केलेल्या जीवनावश्यक वस्तूंमध्ये प्रचंड भेसळ होत असल्याचे निदर्शनास येण्यासंदर्भातील अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली आहे.

(प्रेस : सोबतची अधिक माहिती येथे छापावी.)

------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

....6...

**पृ.शी.:** लेखी माहिती

**मु.शी.:** नियम 101 अन्वये लक्षवेधी सूचनेची अधिक माहिती सभागृसमोर ठेवणे.

डॉ. रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 1992 च्या दुसऱ्या अधिवेशनात राज्यात बिघडत चाललेली कायदा व सुव्यवस्थेची स्थिती या विषयावरील श्री.जयसिंग गायकवाड व इतर वि.प.स. यांनी उपस्थित केलेल्या नियम 101 अन्वये लक्षवेधी सूचनेबाबत दिनांक 9 जुलै, 1992 रोजी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : अधिक माहिती सभागृहासमोर ठेवण्यात आली.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, 1992 ची माहिती आता सभागृहात सादर करण्यात येत आहे, ही माहिती इतक्या उशिरा सादर का करण्यात येत आहे, एका वर्षाच्या आत अहवाल सादर केले पाहिजे अशी माझी विनंती आहे. सन्माननीय सदस्य श्री. जयसिंग गायकवाड खासदार होऊन गेले व त्यांनी उपस्थित केलेल्या विषयाच्या संदर्भातील माहिती आता सभागृहात येत आहे.

(प्रेस : सोबतची अधिक माहिती येथे छापावी.)

-----

....7.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.रणजित पाटील (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचा सन 2007-2008 या वर्षाचा आठवा वार्षिक अहवाल सभागृहासमारे ठेवतो.

**उप सभापती** : अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आला आहे.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ मर्यादितचा सन 2007-2008, 2008-2009 व 2009-2010 या वर्षाचा अनुक्रमे छत्तिसावा, सदतिसावा व अडतिसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

श्रीमती पंकजा मुंडे (महिला व बालविकास मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळ यांचा सन 2011-2012, 2012-2013 व 2013-2014 या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवते.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांचे सन 2007-2008 ते 2012-2013 या वर्षाचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवते.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

डॉ.रणजित पाटील (संसदीय कार्य राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग यांचे सन 2012-2013 व 2013-2014 या वर्षाचे वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उप सभापती** : वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

--------

....8....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

श्री.महादेव जानकर (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा पहिला,दुसरा व तिसरा अहवाल सादर करतो.

**उप सभापती** : विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

--------

....9...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सादर करणे व संमत करणे.

प्रा.अनिल सोले (समिती सदस्य) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार दिनांक 31 जुलै, 2015 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय कामकाजास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार दिनांक 30 जुलै, 2015 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे, शुक्रवार दिनांक 17 जुलै आणि दिनांक 24 जुलै, 2015 रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेले परंतु प्रलंबित राहिलेले तीन अशासकीय ठराव आणि एक पुर:स्थापनार्थ व चार विचारार्थ असलेली अशासकीय विधेयके दर्शविण्यात येणार असून त्यांना खालील प्रमाणे वेळ नेमून देण्यात यावा अशी शिफारस समितीने केली आहे.

**बॅलेटद्वारे ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय ठराव**

(1) श्री.अमरनाथ राजूरकर, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 172 वेळ 25 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(2) श्री.प्रकाश बिनसाळे, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 44 वेळ 25 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(3) श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांचा ठराव क्रमांक 7 वेळ 25 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

**पुर:स्थापनार्थ विधेयके :-**

सन 2015 चे वि.प.वि.क्रमांक 16 महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक वयोमर्यादा विधेयक, 2015 श्री.माणिकराव ठाकरे वि.प.स. यांचे - वेळ 5 मिनिटापेक्षा जास्त नाही.

**बॅलेटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय विधेयके**

(1) सन 2014 चे वि.प.वि. क्रमांक 3 महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण)(सुधारणा) विधेयक, 2014 श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स यांचे- चर्चा अपूर्णावस्थेत - वेळ 15 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(2) सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 11 मुंबई ग्रामपंचायत (सुधारणा) विधेयक, 2014 श्री.अमरसिंग पंडित, वि.प.स. यांचे. वेळ- 15 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

...10....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.अनिल सोले....

(3) सन 2014 चे वि.प.वि.क्रमांक 2 महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक 2014 श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचे वेळ 20 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

(4) सन 2014 चे वि.प.वि क्रमांक 14 महाराष्ट्र शेतकरी कारागीर व भूमिहीन मजूर यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, 2014 श्री.अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे वेळ 30 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

**उप सभापती** : अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

प्रा.अनिल सोले : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

-------

या नंतर श्री.भोगले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** सागरी सुरक्षेच्या दृष्टीने मासेमारी नौकांची तपासणी करण्यासाठी कंत्राटी पध्दतीने सुरक्षा रक्षक नेमणे

**मु.शी.:** सागरी सुरक्षेच्या दृष्टीने मासेमारी नौकांची तपासणी करण्यासाठी कंत्राटी पध्दतीने सुरक्षा रक्षक नेमणे यासंबंधी माननीय पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्य व्यवसाय मंत्र्यांचे निवेदन

श्री.एकनाथराव खडसे (पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्य व्यवसाय मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

----

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर करण्याची मुदत वाढविणे

डॉ.नीलम गोऱ्हे (समिती प्रमुख) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव प्रस्तुत करते की, विधानपरिषद विशेषाधिकार समितीकडे विचारार्थ प्रलंबित असलेल्या,

***(१) श्री. पुरुषोत्तम खेडेकर लिखित "शिवरायांच्या बदनामीची केंद्रे"या पुस्तकातील मजकुरांवर आधारित "लोकप्रभा" अंकामधील प्रा.हरी नरके यांच्या "फॅसिस्ट शक्तींमुळे बहुजनांचे विभाजन"या लेखातील अवमानजनक लिखाणामुळे उद्‌भवलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण,***

***(२) सन्माननीय विधानपरिषद सदस्य श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप व इतर सन्माननीय सदस्यांनी श्री.निखिल वागळे, संपादक, आय.बी.एन. लोकमत व श्री.राजीव खांडेकर, संपादक, ए.बी.पी. माझा यांचेविरुध्द उपस्थित केलेले विशेषाधिकार भंग व अवमानाचे प्रकरण.***

***उपरोक्त दोन्ही प्रकरणांवरील विशेषाधिकार समितीचा अहवाल सादर*** करण्याक***रिता म.वि.प. नियम १७८ (१) च्या परंतुकान्वये पुढील अधिवेशनाच्या शेवटच्या दिवसापर्यंत मुदत वाढवून देण्यात यावी.***

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, माझी आपल्याला आणि सभागृहाला विनंती आहे की, बराच काळ लोटला आहे, परिस्थिती बदलली आहे. राजीव खांडेकर आणि निखिल वागळे यांच्या विरुध्दचे हक्कभंगाचे प्रकरण परत घ्यावे. त्यामधून एक चांगला संदेश जाईल. अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या संदर्भात एक चांगला निर्णय लोकशाहीच्या सभागृहाने घ्यावा अशी माझी विनंती आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हा विषय गटनेत्यांच्या बैठकीपुढे आणला पाहिजे. स्वतःची प्रसिध्दी करुन घेणे बरोबर नाही.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, लोकशाहीला अभिप्रेत असलेली जी प्रोसेस करावयाची असेल ती करण्यात यावी, त्याला आमची हरकत नाही. माननीय कपिल पाटील आणि माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी त्यांचे म्हणणे मांडले आहे. यापूर्वी सुध्दा सभागृहात अशा प्रकारचे निर्णय घेतले गेले आहेत. मी स्वतः हक्कभंगाची सूचना मांडली होती. समितीच्या बैठकीमध्ये सुध्दा आणि त्यापूर्वी आम्ही शासनाला सुध्दा विनंती केली होती. आता बराच कालावधी लोटला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप.....

आहे. हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. त्यांना त्यांचे मत मांडण्याचा अधिकार आहे. त्यांना वगळावे अशी विनंती आम्ही केली होती. माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांचे म्हणणे आहे की, समितीसमोर प्रकरण आले पाहिजे, त्याला देखील आमची हरकत नाही. आपल्याला पिन्सिपली निर्णय घ्यावा लागेल. याबाबत थोडी सौम्य भूमिका घ्यावी लागेल अशी आपल्यामार्फत मी सभागृहाला विनंती करतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माझी आपल्याला एवढीच विनंती आहे की, त्या काळात सभागृहामध्ये एकमताने एखादा विषय संमत झाला असेल तर सभागृहात एखाद्या सदस्यांनी भूमिका मांडण्याऐवजी गटनेत्यांच्या बैठकीमध्ये किंवा सकाळी एकत्र बसता त्यावेळी अशा विषयाची चर्चा करुन प्रस्ताव मांडण्यात यावा. वन हॅण्ड मॅन शिप हा प्रकार बंद करावा. हे किळसवाणे आहे. सेटिंग करतात. तेथे मी करुन आणले असे दाखवायचे. गटनेत्यांच्या बैठकीमध्ये विषय मांडून तेथे चर्चा करावी आणि मग प्रस्ताव आणावा.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदय धमकावण्याची भाषा करीत आहेत.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, याच सभागृहात या प्रस्तावाची चर्चा झाली होती. आमदारांना चोर म्हटले गेले होते. सगळ्या पुढाऱ्यांना वेगवेगळी विशेषणे लावली गेली. त्या प्रस्तावावरील चर्चेच्या माध्यमातून माननीय सदस्य सर्वश्री कपिल पाटील व भाई जगताप यांनी देखील भाषण केले होते. त्या चर्चेचे इतिवृत्त आपण तपासावे. आज हेच माननीय सदस्य अशी भाषा वापरत असतील तर त्यांनी आता केलेले स्टेटमेंट मागे घ्यावे किंवा श्री.निखिल वागळे व श्री.राजीव खांडेकर यांनी त्यांचे स्टेटमेंट मागे घ्यावे. या ठिकाणी जी भूमिका मांडली गेली ती राजकारणी लोकांना योग्य वाटेल, परंतु मला योग्य वाटणार नाही. माननीय समिती प्रमुख यांना मी सांगू इच्छितो की, ही भूमिका विशेषाधिकार समितीच्या हक्कावर गदा आणणारी आहे.

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी सभागृहात विशेषाधिकार भंगाचे प्रकरण मागे घेण्यात यावे अशी भूमिका मांडणे योग्य नाही. एक तर त्या संपादकांनी आपले

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

स्टेटमेंट मागे घ्यावे किंवा माननीय सदस्यांनी या ठिकाणी जे स्टेटमेंट केले ते मागे घ्यावे. विशेषाधिकार भंगाच्या प्रकरणामध्ये काय निर्णय घ्यायचा हा अधिकार त्या समितीचा आहे. हा

..4..



श्री.सतीश चव्हाण.....

समितीच्या हक्कावर गदा आणण्याचा प्रकार आहे. मी स्वतः विशेषाधिकार समितीचा सदस्य आहे. या प्रकरणाबाबत विशेषाधिकार समितीचा अहवाल सभागृहाला सादर होईल, त्या अहवालावर माननीय सदस्यांना चर्चा करता येईल.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, आम्ही तक्रारदार आहोत. मी स्वतः प्रस्ताव दिला होता. मी सुरुवातीलाच सांगितले की, मी या समितीमध्ये असणार आहे. माझी समितीपुढे साक्ष होईल. आज सत्ताधारी पक्षात असलेले विरोधी पक्षात होते त्यावेळी सुध्दा विनंती करण्यात आली होती. मागच्या काळात सुध्दा सभागृहात अशी विनंती केलेली होती. तशाच पध्दतीने मी विनंती करीत आहे. त्या वेळी काय घडले हे शोधून काढण्याची गरज नाही. जर सभागृहाने विचार केला, गटनेत्यांनी विचार केला तरच प्रकरण मागे घ्यावे अशी विनंती करतो.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, विशेषाधिकार समितीसमोर मागील काळापासून ही दोन प्रकरणे प्रलंबित आहेत. या प्रकरणाच्या संदर्भात समितीच्या बैठका झालेल्या आहेत, बैठकांमध्ये या प्रकरणाची चर्चा झालेली आहे. या दूरदर्शन वाहिन्यांच्या संपादकांचे जे काही मत होते त्या मताची नोंदही घेण्यात आलेली आहे. वास्तविक अजूनही समितीपुढे हे प्रकरण निर्णय घेण्यासाठी विचारार्थ आहे. या सभागृहात सुरुवातीला व्यक्त झालेल्या भावना आणि त्यानंतर आता कारवाई होऊ नये म्हणून केलेली विनंती यावर चर्चा सुरु होती. विशेषाधिकार समितीच्या अधिकारातील ही बाब आहे. त्या प्रकरणाचा साधकबाधक विचार करुन निर्णय घेण्यासाठी समिती सक्षम आहे. या समितीच्या प्रमुख माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे या त्या प्रकरणाबाबत जी काही योग्य पावले टाकली पाहिजेत ती टाकतील.

नंतर आय.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले...

परंतु, यामध्ये एक अडचण आली होती. समिती पुढे प्रत्यक्षात ज्या गोष्टी यायला पाहिजे होत्या त्या येण्यास थोडा विलंब लागणार होता. त्यामुळे हे प्रकरण पुढे गेलेले आहे. त्यामुळे ही मुदतवाढ मागितलेली आहे. त्यास मान्यता द्यावी.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

......

**सभापती :** माझी सर्व सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी समांतर विधान परिषद चालवू नये. यासंबंधात मी आपणा सर्वांना काल पासून विनंती करीत आहे. आपल्याला औचित्याचे मुद्दे थोडक्यात उरकायचे आहेत. मघाशी नियम 289 अन्वयेच्या सूचनेसंबंधात निर्णय झाला असेल अशी मला खात्री आहे.

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.:** औचित्याचे मुद्दे.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. नागपूर जिल्हा वार्षिक योजना सन 2015-16 अंतर्गत अनुसूचित जाती उपयायोजना याकरिता रू 134.50 कोटी निधीची तरतूद केलेली असणे, परंतु, अद्याप जून महिना उलटला तरी या प्रयोजनेसाठी एकही रूपया उपलब्ध झालेला नसणे, जनरल प्लॅन अंतर्गत जिल्हा निहाय रू 300 कोटी प्राप्त झालेले असणे, त्यातून 122 कोटी रूपयांची कामे झालेली असून आदिवासी उपाययोजने अंतर्गत जिल्हा निहाय 62 कोटी रूपये प्राप्त झाले असून त्यातून 24 कोटी रूपयांची कामे झाली आहेत. परंतु, अनुसूचित जातीसाठी जिल्हा निहाय 134.50 कोटी रूपयाचा निधी अर्थसंकल्पात मंजूर झाला असून सुद्धा सदर निधी पैकी शासनाने एकही पैसा देण्यात न येणे, परिणामी नागपूर जिल्ह्यातील अनुसूचित जाती क्षेत्रातील कामे मोठ्या प्रमाणात प्रलंबित राहणे, परिणामी अनुसूचित जातीमधील नागरिकांत निर्माण झालेला शासनाप्रती असंतोष व चिडीची भावना, याकरिता आपण तो निधी लवकरात लवकर त्या उपाययोजनेसाठी द्यावा अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्यांद्वारे करीत आहे.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंड : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. राज्याचे नाव उज्ज्वल केलेल्या अत्युच्च गुणवत्ताधारक खेळाडुंना शासन सेवेत थेट नियुक्ती देण्याबाबतची कार्यपद्धती शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक 9 डिसेंबर 2010 च्या शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेली असणे, शासन सेवेतशासन निर्णयानुसार दाखल झालेल्या खेळाडू अधिकाऱ्यांपैकी ज्यांनी वयाची 45 वर्षे पूर्ण केलेली आहेत त्यांना विभागीय परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याबाबतचा प्रस्ताव गेल्या 5 वर्षांपासून शासनाच्या विचाराधीन असणे, मात्र अजूनही त्याबाबतीत निर्णन न झाल्यामुळे ज्येष्ठ खेळाडू अधिकाऱ्यांमध्ये नाराजीची भावना असणे, क्रीडा विभागाच्या दिनांक 11 मे 1989 च्या शासन निर्णयानुसार शासन सेवेत असलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय महत्व असलेल्या खेळांमध्ये सहभागी होण्यासाठी काही सवलती व अर्थिक प्रोत्साहने देण्यात येत असणे, मात्र त्या तुटपुंज्या असल्यामुळे राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये वैयक्तिक व सांघिक खेळांमध्ये पदक विजेत्या शासकीय सेवेतील अधिकारी/कर्मचाऱ्यांना अधिकच्या सवलती व वेतनवाढी देण्याची मागणी असणे, परंतु, याबाबत कोणताही धोरणात्मक निर्णय घेण्यात न येणे, त्यामुळे खेळाडुंचे मानसिक खच्चीकरण होत असणे, अखिल भारतीय नागरी सेवा क्रीडा स्पर्धेतील पदक विजेत्या राज्य शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांना शिवछत्रपती पुरस्कारासाठी पात्र ठरविण्याच्या दृष्टीने शिवछत्रपती पुरस्काराच्या प्रचलित नियमावलीमध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असणे, परंतु, याबाबत अद्याप कोणताही ठोस निर्णय न होणे, केंद्र शासनाचा रेल्वे विभाग व राष्ट्रीयकृत बँकेत ज्याप्रमाणे खेळाडुंसाठी मंडळ आहे त्याच धर्तीवर राज्य शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांचा क्रीडा विषयक मंडळ निर्माण करण्याची गरज असणे, शासन सेवेत असलेल्या अधिकारी/कर्मचारी क्रीडा विषयक नैपुण्यात वाढ होण्यासाठी विविध् सोयी-सुविधा निर्माण करण्याची गरज असणे या महत्त्वाच्या बाबीकडे मी शासनाचे या औचित्याच्या मुद्याद्वारे लक्ष वेधित आहे.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. दप्तराच्या ओझ्यामुळे सर्वच वयोगाटातील विद्यार्थ्यांना विविध आजार जडत असल्याचा अहवाल राज्य शासनाच्या समितीने दिला असून शालेय विद्यार्थ्यांचे दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी शिक्षण विभागाने निर्णय घेतला आहे. यासंबंधी माननीय मंत्री महोदयांनी पुढाकार घेतला होता. यासंबंधी सर्वांचीच मागणी होती. शालेय शिक्षण विभागाने दप्तरांचे ओझे कमी करण्यासंदर्भात राज्य मंडळासह सर्व केंद्रीय मंडळांनाही तशा प्रकारचे आदेश दिलेले असणे. मात्र हे आदेश न पाळणाऱ्या शाळांवर कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात येईल याची स्पष्टता नसणे, तसेच पालक-टिचर असोसिएशनच्या फोरमने पाच वर्षापूर्वी शालेय दप्तराचे ओझे कमी करण्याबाबत शासनाला अहवाल दिला होता. या अहवालामध्ये वह्या शाळेमध्येच ठेवण्याची सोय असावी, पिण्याचे शुद्ध पाणी विद्यार्थ्यांना शाळेत मिळावे, चित्रकेलेचे साहित्य शाळेने द्यावे किंवा शाळेत ठेवण्याची व्यवस्था करावी अशा विविध शिफारशी करण्यात आल्या होत्या. परंतु, त्याची शाळांनी अंमलबजावणी केली नाही. यावेळी शासनाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करणे शाळांना शक्य नसल्याबाबत पालकवर्गात संभ्रम असल्याने या विषयी शासनाचे नेमके धोरण काय आहे व सरकार यात काय जबाबदारी घेणार आहे याची स्पष्टता होणे गरजेचे आहे. हा विषय महत्त्वाचा आहे. या विषयाला सर्वांचाच पाठिंबा आहे. आता माननीय शालेय शिक्षण मंत्री सभागृहात उपस्थित आहेत. त्यांना या विषयी थोडक्यात स्पष्टीकरण करण्यास आपण सांगावे अशी माझी विनंती आहे.

**सभापती :** मंत्री महोदय यावर स्पष्टीकरण देण्यास आपली तयारी आहे काय ?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, हा अतिशय महत्त्वाचा व बहुचर्चित असा हा विषय आहे. ज्यांना शिक्षणाची चिंता आहे, वेतनाची चिंता नाही असे जे सदस्य या सभागृहात आहेत, ज्यांना शिक्षणाच्या गुणवत्तेची चिंता जास्त आहे त्यांनी हा विषय मांडलेला आहे. कारण पगाराचे विषय हे सर्वच मांडत असतात. या सभागृहात असा विषय आला की, बरे वाटते. त्यामुळे औचित्याच्या मुद्याला उत्तर द्यावे असे वाटते. त्यामुळे कोणाला सेटींग वाटते फेटींग वाटते....

**सभापती :** आपल्या कार्यक्षमतेविषयी सगळयांना खात्री आहे.

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे : त्यामुळे सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी जो औचित्याचा मुद्दा मांडला आहे त्यासंबंधी मी सांगू इच्छितो की, ग्रामीण भागातील शाळा, डोंगराळ भागातील शाळा, कोकणातील शाळा आहेत किंवा शहरातील शाळा आहेत त्यांना काही अडचणी येऊ शकतात. अशा शाळांतील शैक्षणिक गुणवत्तेवर बोलणारे जागरूक संस्थाचालक किंवा लोकप्रतिनिधी असतील त्यांची एक संयुक्त बैठक घेण्यात येईल आणि यातील ज्या अडचणी असतील त्या नक्की दूर करण्यात येतील.

यानंतर श्री.अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, माझा औचित्या मुद्दा आहे.

"ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील कशेळी, काल्हेर, पूर्णा, राहनाळ तसेच कल्याण तालुक्यातील कल्याण-शीळफाटा रोड तसेच रायगड जिल्ह्यातील कर्जत, पेण व रोहा तालुक्यातील बहुसंख्य बांधकामे शासनाच्या सक्षम प्राधिकरण संस्थांची पूर्व परवानगी न घेता बांधकाम व्यावसायीक/विकासकाकडून अनधिकृत बांधकामे करण्यात येणे, खाजगी वित्तीय संस्था वेगवेगळ्या योजनांच्या आधारे फसवणूक करुन कमी रकमेत घर बुक करण्याचे आमिष दाखवून तसेच दस्तऐवज नोंदवून बांधकाम व्यावसायिक सदनिका वितरित करुन जनतेची फसवणूक करीत असल्याच्या घटना दिनांक 10 मे, 2015 रोजी वा त्यापूर्वीही अनेकदा निदर्शनास आल्या आहेत. संबंधित बांधकाम व्यावसायीक/विकासक सदरचे बांधकाम बेकायदेशीर असताना ते अधिकृत असल्याचे भासवून तसेच त्यासाठी वित्तीय संस्थांकडून कर्ज मंजूर होणार असल्याचे सांगून सदनिका खरेदीचे बुकींग-चार्ज व अन्य प्रक्रिया फी म्हणून लाखो रुपये वसूल करीत आहे. इतकेच नव्हे तर सदर बांधकाम व्यावसायीक/विकासक हे बऱ्याच ठिकाणी बांधकामाच्या बनावट दस्तऐवजाच्या आधारे दुय्यक निबंधक कार्यालयाकडून नोंदणी करुन त्या आधारे कर्जदेखील मंजूर करुन घेत असल्याचे उघडकीस आले आहे. कालांतराने सदरचे बांधकाम अनधिकृत ठरल्याने ते पाडून टाकण्यात येते व त्यासाठी घेतलेल्या कर्जाच्या परतफेडीबाबतचा आर्थिक भूर्दंड हा सामान्य व गरीब सदनिका खरेदीदारास सहन करावा लागत असल्याच्याही तक्रारी शासनाकडे सतत येत असतात. तेव्हा अशाप्रकारे सामान्य जनतेची फसवणूक करणाऱ्या संबंधित बांधकाम व्यावसायीक व विकासकाविरुद्ध कडक कारवाई करुन या गोष्टींना आळा बसण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी" अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे.

-----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.रामहरी रुपनवर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"महाराष्ट्र शासनाने भटके-विमुक्त समाजाच्या मुला-मुलींना शिक्षण घेण्यासाठी आश्रमशाळा सुरु केल्या आहेत. त्यामध्ये सर्व मुलांना इयत्ता पहिली ते बारावी पर्यंत शिक्षण घेण्याची सोय असणे आवश्यक आहे. सन 1996 पासून एकशिव ता.माळशिरस, जि.सोलापूर येथे आश्रमशाळेच्या पहिली ते सातवी या वर्गास शासनाने मान्यता दिली असूनही नैसर्गिक वाढीप्रमाणे सातवी नंतर पुढील माध्यमिक वर्गास मान्यता मिळणे आवश्यक होते. परंतु तसे झालेले नाही. या शाळेस, माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्गांना परवानगी नसल्यामुळे भटके-विमुक्त समाजातील मुलांना सातवी नंतरचे शिक्षण घेता येत नाही. तसेच माळशिरस तालुक्यात भटके-विमुक्तांच्या मुलांसाठी एकच शाळा आहे. काही तालुक्यात व परिसरात एकच प्राथमिक आश्रमशाळा असेल तर, त्या मुलांना सातवी पर्यंत शिक्षण थांबवावे लागते. यासाठी शासनाने त्या प्राथमिक आश्रमशाळेस नैसर्गिक वाढीप्रमाणे माध्यमिक व उच्च माध्यमिक वर्गांना मान्यता देण्याची आवश्यकता असून तशी सर्वसामान्य जनतेकडूनही मागणी होत आहे. भटके-विमुक्त जातीतील मुलांच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाच्या सोयीसाठी धोरण ठरवून त्यास मान्यता देणे, ही अत्यंत निकडीची गरज असल्याने मी हा विषय औचित्याच्या मुद्याद्वारे मांडत आहे."

---------

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.जगन्नाथ शिंदे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"एम.एम.आर.डी.ए. आणि कल्याण-डोंबिवली मनपा यांच्या 27 कोटी रुपयांच्या संयुक्त खर्चातून कल्याण रेल्वे स्थानकावरुन कल्याण शहराच्या पूर्व भागाकडे जाण्यासाठी स्कायवॉकच्या कामाला 2009 ला सुरुवात झाली. परंतु अद्यापपर्यंत या स्कायवॉकचे काम पूर्ण झालेले नसल्यामुळे नागरिकांना अंधाऱ्या बोगद्यातून आणि रेल्वे रुळ ओलांडून जीवघेणा प्रवास करत घर गाठावे लागत आहे. नागरिकांना अनेक यातनांचा सामना करावा लागत आहे. सदरहू स्कायवॉकबाबतच्या सर्व त्रुटी दूर करण्यासाठी माननीय मुख्यमंत्र्यांनी बैठक घेऊन या स्कायवॉकचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत व कल्याण शहराच्या पूर्व भागातील जनतेला दिलासा द्यावा अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास विनंती करीत आहे.

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.दीपकराव साळुंखे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

"मौजे बाम्हणी तालुका सांगोला, जिल्हा सोलापूर सारख्या ग्रामीण भागातीत कुस्तीपटू पै.सुनील सदाशिव साळुखे याने "हिंद केसरी" हा मानाचा पुरस्कार सन 2014-2015 मध्ये पटकाविला आहे. महाराष्ट्राला हा मान दोन ते अडीच दशकानंतर मिळवून देण्याचा पराक्रम या कुस्तीपटुने केला आहे. "हिंद केसरी" सारखा बहुमान मिळाल्याबद्दल कुस्तीपटू पै.सुनील साळुंखे यास शासनाने पोलीस उप अधीक्षक पदावर नियुक्ती करण्याची मागणी कुस्तीपटू संघटना, लोकप्रतिनिधी, क्रीडाप्रेमींनी केली आहे. यापूर्वी परराज्यातील खेळाडूंना हिंद केसरीचा बहुमान मिळाल्यानंतर शासनाने त्यांना विशेष बक्षिस म्हणून पोलीस उप अधीक्षक पदावर नियुक्ती दिलेली आहे. महाराष्ट्राचा रहिवाशी असलेल्या व "हिंद केसरी" सारखा बहुमान मिळविलेल्या श्री.सुनील साळुंखे यास पोलीस उप अधीक्षक पदावर नियुक्ती न दिल्यामुळे राज्यातील क्रीडाप्रेमी आणि नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरलेला आहे. तेव्हा कुस्तीपटू पै.सुनील सदाशिव साळुंखे याची तातडीने पोलीस उप अधीक्षक पदावर तातडीने नियुक्ती करण्यात यावी.

तसेच आपल्या राज्यातील कुमारी दीपाली नारखेडे या कन्येने कॉमन वेल्थ गेमममध्ये वेट लिफ्टींगमध्ये गोल्ड मेडल मिळविले आहे. तिला देखील शासकीय सेवेत नियुक्ती देऊन तिचाही सन्मान करण्यात यावा, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे.

सभापती महोदय, या संदर्भात क्रीडा मंत्री महोदयांची सकारात्मक भूमिका आहे. श्री.सुनील साळुंखे या कुस्तीपटुने एवढा मोठा बहुमान पटकावलेला असताना त्यांना शासकीय नोकरी देण्याबाबत विलंब होत आहे. तेव्हा या विषयाच्या संदर्भात आपल्या दालनात बैठक बोलावून त्या बैठकीला माननीय मुख्यमंत्री, माननीय क्रीडा मंत्री यांना बोलावावे अशी माझी आपणास विनंती आहे.

**सभापती** : या संदर्भात माझ्या दालनात बैठक बोलाविण्यात येईल. श्री.सुनील साळुंखे या कुस्तीपटुने कौतुकास्पद कामगिरी केलेली आहे. तसेच सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांच्या माण तालुक्यातील कु.लतिका बाबर हिची ऑलिम्पिकमध्ये धावपटू म्हणून निवड झाली आहे. ती सध्या रेल्वेमध्ये टी.सी.म्हणून काम करीत आहे. माननीय केंद्रीय मंत्री श्री.सुनील प्रभू यांना देखील मी विनंती केलेली आहे की, ही महाराष्ट्रातील मुलगी असून अत्यंत गरीब कुटुंबातील आहे

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती.....**

तिच्या स्पाईक्सपासून इतर सर्व बाबींसाठी तिला मदत करावी लागणार आहे. आम्ही आमच्या जिल्ह्यातून निश्चितपणे मदत करू परंतु आपणही तिच्या खर्चाचा थोडा भार घ्यावा. आपण नियोजित बैठकीमध्ये हा निर्णय घ्यावा, एवढेच मी आपणाला सांगू इच्छितो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण लतिका बाबर या धावपट्टू मुलीचा उल्लेख केला. त्या मुलीशी माझी दोनवेळा भेट झालेली आहे. आम्ही शासन म्हणून नक्कीच भूमिका पार पाडू. आपल्याकडे मेडल्स मिळवून देणारे खेळाडू आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दीपकराव साळुंखे यांनी कुस्तीपटू श्री.सुनील साळुंखे यांना पोलीस उप अधीक्षक पदावर नियुक्ती देण्याबाबत औचित्याचा मुद्दा मांडलेला आहे. त्याबाबत मी स्वत: माननीय मुख्यमंत्र्यांशी बोललो आहे. कारण क्रीडा खात्यात तो थेट नोकरी करु शकतो. परंतु त्यांना जे पद पाहिजे त्यासंबंधी सामान्य प्रशासन विभाग नियुक्ती करते. मी या ठिकाणी सांगू इच्छितो की, आपण मेडल मिळविलेल्या खेळाडुंना शासकीय नोकरी देतो. पण ते खेळाची प्रॅक्टीस करण्याऐवजी फाईल्स क्लिअर करीत बसतात. त्यामुळे पुढच्या स्पर्धेवर त्याचा परिणाम होतो. त्यामुळे शासनाला अशी भूमिका घ्यावी लागेल की, जोपर्यंत ते प्रत्यक्ष फिल्डवर खेळतात तोपर्यंत नोकरीवर असताना प्रत्यक्ष फील्डवर 8 ते 10 तास प्रॅक्टीस केली पाहिजे. अन्यथा नोकरी मिळाल्यानंतर त्यांची खेळाची प्रॅक्टीस कमी होते आणि ज्यासाठी प्रोत्साहन द्यायचे असते तो उद्देश सफल होत नाही. तेव्हा या संदर्भात क्रीडा विभाग नवीन धोरण बनवित आहे, नागपूरच्या अधिवेशनापर्यंत ते बनविण्यात येईल तोपर्यत ज्या केसेस आहेत त्याबाबत आपण निर्देश दिल्याप्रमाणे न्याय देण्यात येईल.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, माण तालुक्यातील ललिता बाबर या मुलीची ऑलिम्पिकसाठी निवड झाली आहे. त्या संदर्भात क्रीडा मंत्री आणि महिला व बाल विकास मंत्री महोदयांनी निर्णय घेतला त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.

माझा औचित्याचा मुद्दा आहे की, पैठण तालुका, जिल्हा औरंगाबाद येथील जायकवाडी धरण परिसरातील गावात जवळपास 400 मेंढपाळ कुटुंबे असून त्यांच्याकडे 1 लाखापेक्षा जास्त मेंढ्या आहेत. जायकवाडी धरणातील पाण्याची पातळी खाली गेल्यानंतर हे मेंढपाळ आपल्या मेंढ्या घेऊन सदर धरणाच्या मोकळ्या जागेत राहतात. जनावरांना चारा व पाणी मिळण्याच्या उद्देशाने ते धरण परिसरात राहतात. परंतु सदर गावातील स्थानिक लोक व पोलीस त्यांना मारहाण करुन त्यांना नाहक त्रास देतात. सबब, धरणातील परिसरातील शासकीय जागेमध्ये या मेंढपाळांना तात्पुरत्या स्वरुपात जनावरांना घेऊन राहण्याची परवानगी द्यावी, त्यासाठी संबंधित जिल्हाधिकारी अथवा संबंधित विभागाला आदेश देऊन मेंढपाळांना न्याय द्यावा, अशी मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाकडे मागणी करीत आहे.

----------

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) आणि स्टाफ सिलेक्शन कमीशन (एसएससी) यांच्याकडून एकाच दिवशी म्हणजे दिनांक 9 ऑगस्ट, 2015 रोजी परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षा एकाच दिवशी होणार असल्यामळे अनेक विद्यार्थ्यांना कोणत्या तरी एका परीक्षेला मुकावे लागणार आहे. त्यामुळे राज्यातील विद्यार्थी गोंधळात आहेत. महोदय, ग्रामीण भागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने एमपीएससीच्या परीक्षेला बसतात. या शिवाय ते स्टाफ सिलेक्शन कमीशनच्या परीक्षेला सुध्दा बसतात. त्यामुळे राज्यातील विद्यार्थ्यांनी एमपीएससीची परीक्षा पुढे ढकलण्याबाबत विनंती केलेली आहे. शिवाय ही परीक्षा पुढे ढकलणे राज्य सरकारच्या हातात आहे. या दोन्ही परीक्षांमुळे विद्यार्थ्यांना करिअर घडविण्याची संधी निर्माण होणार आहे. त्यामुळे मी या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून विनंती करतो की, एमपीएससीची परीक्षा पुढे ढकलण्याबाबत राज्य सरकारने तातडीने उपाययोजना करुन राज्यातील लाखो विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा.

---------

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, पुणे जिल्ह्यातील माळीण गावावर दरड कोसळल्यामुळे त्या गावातील 151 लोकांचा बळी वर्षभरापूर्वी आजच्याच दिवशी गेला होता. त्या घटनेला आज एक वर्ष पूर्ण होत आहे. या घटनेमध्ये 70 हून अधिक कुटुंबे पूर्णपणे उद्ध्वस्त झालेली आहेत. या घटनेची वर्षपूर्ती होऊनही या संकटातून वाचलेली कुटुंबे माळीण गावामध्ये जुन्या घरातच राहत असून, त्यांना अद्यापपर्यंत कायमस्वरुपी पक्की घरे दिलेली नाहीत. संपूर्ण गावाच्या पुनर्वसनाचा निर्णय होऊन सुध्दा त्या बाबत कार्यवाही झालेली नाही. सदरहू गावाच्या पुनर्वसनासाठी निवडलेले आमडे हे गाव डोंगर उताराचे असल्यामुळे तेथेही दरड कोसळण्याची शक्यता आहे. वर्षभरानंतरही ग्रामस्थ दुर्घटनेच्या छायेत वावरत आहेत. पुणे जिल्ह्यात डोंगराळ भागातील 23 गावे माळीणप्रमाणेच धोकादायक स्थितीत आहेत. त्या गावांवर कधीही माळीणसारखी स्थिती ओढवण्याची शक्यता आहे. त्यामुळे भीतीच्या सावटाखाली जगणाऱ्या ग्रामस्थांचे पुनर्वसन करुन त्यांना धीर देण्याची आवश्यकता आहे. तसेच दरड कोसळून होणाऱ्या दुर्घटना टाळण्यासाठी सरकारने उपाययोजना करणे आवश्यक आहे. शिवाय त्या ग्रामस्थांना आधार देण्याची आवश्यकता आहे.

महोदय, या औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून मी विनंती करतो की, माळीणच्या दुर्घटनेला आज एक वर्ष पूर्ण होत असल्यामुळे राज्य सरकाराने या विषयी गांभीर्याने विचार करावा.

**सभापती** : आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये या विषयीचा प्रश्न अनुक्रमांक-6 वर हो्ता. परंतु तो चर्चेला येऊ शकला नाही. त्यामुळे राज्य सरकारने या बाबत विचार करावा. सन्माननीय सदस्यांनी या विषयी जो औचित्याचा मुद्दा मांडला त्याला राज्य सरकारने उत्तर द्यावे.

---------

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अनंत गाडगीळ : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, राज्यात आर्थिक संकटात सापडलेल्या बँकांना कॉर्पोरेशन बँकांनी त्यांच्यात विलिनीकरणाची तयारी दर्शविली असणे, त्या माध्यमातून छोट्या-छोट्या बँकात गुंतवणूक केलेल्या ठेवीदारांना दिलासा मिळणे, बँका दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर येऊन ठेपत असल्याने सर्वसाधारण ठेवीदारांच्या तोंडचे पाणी पळणे, स्त्री बँकेच्या सव्वा लाख ठेवीदारांमध्ये अस्वस्थता आणि असुरक्षिततेची भावना निर्माण होणे, परिणामी स्त्री बँकेच्या सर्वसामान्य ठेवीदारांमध्ये पसरलेली असुरक्षितता, असंतोष व चिडीची भावना, सबब आर्थिक डबघाईस आलेल्या बँकांचे कॉर्पोरेशन बँकांमध्ये विलिनीकरण करण्याबाबत, तसेच सर्वसामान्य ठेवीदारांच्या पैशांच्या सुरक्षिततेसाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना, अशर या अतिशय महत्त्वाच्या विषयाच्या अनुषंगाने मी हा औचित्याचा मुद्दा मांडत आहे.

--------

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

## सभागृहापुढील कामकाजाबाबत

**सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, मी काल म.वि.प. नियम 289 अन्वयेच्या सूचनेवरील निर्णय राखून ठेवला होता. सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी सदरहू सूचना उपस्थित केली होती. हा निर्णय घेताना आजच्या दिवसाचे सभागृहाचे कामकाज डोळ्यासमोर ठेवून, संपूर्ण कामकाजाचे चित्र पाहिले तर आजच्या कामकाजपत्रिकेवर 11 लक्षवेधी सूचना, 10-15 शासकीय विधेयके, म.वि.प. 260 चे 4 प्रस्ताव आणि 1 अल्पकालीन चर्चा दर्शविलेली आहे. या शिवाय 93 ची निवेदने सुध्दा आहेत. अशाप्रकारे सभागृहासमोर मोठ्या प्रमाणात कामकाज आहे. एवढे कामकाज आजच्या दिवशी पूर्ण होणे शक्य नाही.

तसेच महत्त्वाची बाब म्हणून आपल्या सभागृहाने आतापर्यंत पुरवणी विनियोजन विधेयका व्यतिरिक्त केवळ दोन विधेयके संमत केलेली आहेत. काही विधेयके पुर:स्थापित केली आहेत. आज विरोधी व सत्ताधारी पक्षाने प्रत्येकी दोन अशा प्रकारे एकूण चार प्रस्ताव दिलेले आहेत. यामध्ये विरोधी पक्षाच्या अंतिम आठवडा प्रस्तावाचा समावेश आहे. 289 च्या सूचनेवर निर्णय घेत असताना सभागृहाला सांगू इच्छितो की, आजच्या कामकाजपत्रिकेवर दर्शविण्यात आलेली नियम 93 ची निवेदने आणि अन्य कामकाज पुढे ढकलण्यात येईल. लक्षवेधी सूचना सुध्दा पुढे ढकलण्यात येतील. आता विरोधी पक्षाच्या नियम 260 च्या प्रस्तावावरील चर्चेला आता सुरुवात करु या. त्यानंतर अंतिम आठवडा प्रस्ताव चर्चेला घेण्यात येईल. तसेच सत्ताधारी पक्षाची सहमती असेल तर त्यांनी त्यांच्या दोन प्रस्तावांपैकी एक प्रस्ताव सिलेक्ट करुन दिला तर माझे काम सोपे होईल. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी या बाबत सांगावे. जेणकरुन तो प्रस्ताव उद्या घेता येईल. सन्माननीय सदस्यांचा आग्रह असल्यामुळे 93 च्या सूचनांची निवेदने उद्या घेता येतील का ते बघू या. पण सर्व कामकाज होणार नाही.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, विधेयके केव्हा चर्चेला घेण्यात येतील ?

**सभापती** : नियम 260 च्या प्रस्तावानंतर विधेयकांवर आजच चर्चा घेण्यात येईल.

आता सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी नियम 260 चा प्रस्ताव मांडून त्यावर आपले भाषण सुरु करावे.

श्री.शरद रणपिसे : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांच्या नंतर मला सुध्दा बोलण्याची संधी द्यावी.

..5..

**पृ.शी.**: विदर्भातील सहा जिल्ह्यांप्रमाणे मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये विशेष पॅकेजद्वारे शेतकऱ्यांना पीक विमा हप्त्यात अनुदान योजना लागू करण्याची मागणी करणे

**मु.शी.**: विदर्भातील सहा जिल्ह्यांप्रमाणे मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये विशेष पॅकेजद्वारे शेतकऱ्यांना पीक विमा हप्त्यात अनुदान योजना लागू करण्याची मागणी करणे, या संबंधी माननीय कृषी राज्यमंत्र्यांचे निवेदन

प्रा.राम शिंदे (कृषी राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

..6..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** शासनाच्या विविध विभागांकडून शासन निर्णयाचे उल्लंघन करुन कोट्यवधी रुपयांची खरेदी करण्यात येणे

**मु.शी.:** शासनाच्या विविध विभागांकडून शासन निर्णयाचे उल्लंघन करुन कोट्यवधी रुपयांची खरेदी करण्यात येणे, या संबंधी सर्वश्री शरद रणपिसे, धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, संजय दत्त, हेमंत टकले, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री अमरसिंह पंडित, अशोक ऊर्फ भाई जगताप, किरण पावसकर, चंद्रकांत रघुवंशी, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री अनंत गाडगीळ, अनिल भोसले, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री सुभाष झांबड, प्रा.जनार्दन चांदूरकर, सय्यद मुझफ्फर हुसेन, जयंत प्र.पाटील, जयवंतराव जाधव, वि.प.स.यांचा प्रस्ताव

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, आम्ही दोन-चार दिवसांपूर्वी सदरहू विषयाच्या अनुषंगाने प्रस्ताव दिला होता. परंतु काहीना काही कारणांमुळे तो मागे पडत होता. परंतु आजच्या कामकाजपत्रिकेवर सदरहू प्रस्ताव शेवटी असताना सुध्दा त्याला प्राधान्य देऊन, या प्रस्तावावरील चर्चा आपण सभागृहात घडवून आणत आहात, या बद्दल मी आपले आभार व्यक्त करतो.

सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 260 अन्वये पुढील प्रस्ताव मांडतो.

"शासनाने 3.00 लक्ष रुपयांच्या वरील खरेदी ई-टेंडरींगद्वारे करण्याचा निर्णय दिनांक 18 डिसेंबर, 2014 रोजी घेतलेला असणे, या शासन निर्णयाचे उल्लंघन करुन अनेक विभाग त्यांच्या मर्जीतील ठेकेदारांना कामे देण्यासाठी दर करारानुसार कोट्यवधी रुपयांची खरेदी करीत राहणे, महिला व बालकल्याण विभागाने 166 कोटी रुपयांची चिक्की खरेदी एकाच दिवशी विना निविदा केलेली असणे, या खरेदीतील चिक्कीचा दर्जा निकृष्ट असणे, बालकांच्या आरोग्यावर त्याचा गंभीर परिणाम होणे, याच विभागातील इतर वस्तुंचा दर्जाही निकृष्ट असणे, शालेय शिक्षण विभागाने 191 कोटी रुपयांची अग्निशामक यंत्रेही ई-निविदेद्वारे न घेता दर करारावर निधी उपलब्ध नसताना घेण्याचा प्रयत्न करणे, या खरेदीच्या प्रक्रियेस वित्त विभागाने आक्षेप नोंदविल्याने या प्रकरणातही

..7..

श्री.भाई जगताप....

गैरव्यवहार व भ्रष्टाचार झाल्याचे उघड होणे, आदिवासी विभागातही अशाच पध्दतीने 19 कोटी रुपयांच्या वह्या व साडेचार कोटी रुपयांचे बूट दर करारावर खरेदी करण्याचा प्रयत्न होणे, या नियमबाह्य खरेदीला माननीय मुख्यमंत्री यांनी दिलेली स्थगिती, आरोग्य विभागाच्या ठेकेदार धार्जिण्या व भ्रष्ट कारभारामुळे औषधांची मागणी नसताना 50 कोटी रुपयांची दर करारावर खरेदी करण्यात आलेली असणे, कृषी खात्याच्या चारा यंत्राच्या खरेदीमध्येही 125 कोटी रुपयांपेक्षा जास्त रक्कमेचा गैरव्यवहार आढळून येणे, या सर्व प्रकरणांची चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, या अतिशय महत्त्वाच्या गंभीर विषयावर शासनाने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

नंतर श्री.कांबळे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भाई जगताप ....

सभापती महोदय, नियम 260 अन्वयेचा हा प्रस्ताव 3-4 दिवसांपासून विरोधी पक्षांकडून मांडला जात होता. या प्रस्तावाची व्याप्ती फार मोठी आहे. अनेक विभागांचा सहभाग आहे. मी सर्वच विभागांबाबत बोलणार नाही. काही विशिष्ट विभागांबाबत नक्की बोलणार आहे. इतरही सहकारी सन्माननीय सदस्य आहेत, त्यांना सुध्दा आपले विचार व्यक्त करावयाचे आहेत. आम्ही सदनात खरेदीचा विषय नुसता विरोधक म्हणून उचललेला नाही. आपण महिन्याभरात पाहिले असेल की, इलेक्ट्रॉनिक मीडिया, प्रिंट मीडिया किंवा तत्सम मीडिया यांच्या माध्यमातून प्रत्येक गोष्टीच्या बाबतीत नुसती बातमी देण्यात आली नाही तर ज्या ज्या कंपन्यांकडून अशा प्रकारच्या खरेदी केल्या आहेत, त्या कंपन्यासुध्दा अस्तित्वात नाहीत अशी पडताळणी सुध्दा करण्यात आलेली आहे. ही अतिशय गंभीर बाब असून लोकशाहीला काळीमा फासणारी आहे. देशाच्या राज्यघटनेच्या चौकटीत समाजांना, घटकांना संरक्षित केले आहे, नुसते तेवढेच नाही तर त्यांच्यासाठी निधी उपलब्ध करून दिला आहे. परंतु या निधीचा गैरवापर कसा केला जात आहे याचे मूर्तीमंत उदाहरण हे आहे. नुसता गैरवापर नव्हे तर त्यातून भ्रष्टाचाराचा वास येत आहे. मला काही मुद्यांच्या माध्यमातून त्या संदर्भात काही बाबी मांडायच्या आहेत. मला एका गोष्टीचे आश्चर्य वाटते. एखादी गोष्ट मीडियामध्ये आली की, विरोधक त्या बाबतीत मत व्यक्त करतात. तेव्हा ते अधिवेशन सुरू नव्हते, या सर्व गोष्टी मीडियामध्ये सर्वप्रथम आल्या आणि त्यानंतर काही माननीय मंत्र्यांनी पत्रकार परिषदा घेतल्या आणि हे योग्य कसे आहे हे सांगण्याचा केविलवाणा प्रयत्न केला. माझा त्यावर आक्षेप आहे. आपण नेहमी म्हणतो की, म्हातारी मेल्याचे दु:ख नाही पण काळ सोकावतो. असे असेल तर ते योग्य नही. लोकशाहीमध्ये उघडपणे असे होत असेल तर ते योग्य नही. आपल्याला या संदर्भात शब्दच वापरायचा झाला तर दिवसाढवळ्या असे प्रकार होतात असे आपण म्हणू शकतो. असे प्रकार होत असतील तर विरोधक म्हणून आम्ही ते कधीही होऊ देणार नाही.

सभापती महोदय, चिकी, आदिवासी मुलांना मिळणारे मेडिकल किट किंवा त्यांना मिळणाऱ्या सुखसोयी, अंगणवाडी सेविकांचे प्रश्न या बाबतीतील काही गोष्टींचा मी येथे खुलासा करणार आहे. मला काही प्रश्न शासनाला विचारायचे आहेत. सर्वात आश्चर्याची गोष्ट अशी आहे की, माननीय

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भाई जगताप ....

बालविकास मंत्र्यांनी त्या गोष्टींचे समर्थन करण्याचा प्रयत्न केला. मला त्या बाबतीत आश्चर्य वाटते आणि खंतही वाटते. एकाच दिवशी म्हणजे 13 फेब्रुवारीला एकाच दिवशी 24 निविदा फ्लोट करून जवळजवळ 206 कोटी रुपयांचा निधी वापरण्यात आला, जसे उद्यापासून तो निधी मिळणार नाही, वापरताच येणार नाही, त्यांनी माध्यमांद्वारे असा दावा केला. आम्ही त्यांच्या मुलाखती पाहिल्या, त्यामध्ये त्यांनी सांगितले की, 31 मार्चच्या अगोदर केले नाही तर तो निधी व्यपगत होईल, तो निधी आपल्याला वापरता येणार नाही. सभापती महोदय, अशा चुकीच्या पध्दतीने आणि चुकीच्या प्रोसेसने या सर्व केलेल्या निविदा प्रक्रियांच्या बाबतीत एक मोठी शंका आहे, शंका नव्हे तर आमचा आरोप आहे. आम्ही 24 निविदांच्या संदर्भात मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करीत आहोत.

सभापती महोदय, मला शासनाचे आणि माननीय मुख्यमंत्र्यांचे मनापासून अभिनंदन करावेसे वाटते. एकेकाळी 50 लाख रुपयांपर्यंत ई-टेंडरिंग करीत नव्हतो. मागच्या आघाडी सरकारने हा निर्णय 10 लाख रुपयांवर आणला, जेणेकरून या सर्व व्यवहारांमध्ये पारदर्शकता असावी, यामध्ये भ्रष्टाचार करण्यासाठी स्कोप राहू नये. हा तुमचा आमचा सर्वांचाच अतिशय जिव्हाळ्याचा, कन्सर्न असलेला, चिंता असलेला विषय आहे. नवीन माननीय मुख्यमंत्री झाले, त्यांनी ज्यावेळी निर्णय घेतला, नुसता निर्णय घेतला नाही तर तशा पध्दतीचे अध्यादेश काढले आणि त्याचे आम्हीही स्वागत केले. त्यावेळी डिसेंबरचे हिवाळी अधिवेशन सुरू होते. 26 तारखेचा अध्यादेश आहे, त्यामध्ये स्पष्ट सूचना दिल्या आहेत की, उपरोक्त पार्श्वभूमीवर आज दिनांक 26.11.2014 पासून रुपये 3 लक्षपेक्षा जास्त किंमतीच्या निविदेकरिता ई-निविदा पध्दतीचा अवलंब करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यानुसार सर्व मंत्रालयीन विभागांनी आणि त्यांच्या अधिनस्त असलेली कार्यालये, महामंडळे, मंडळे यांनी रुपये 3 लक्षपेक्षा जास्त किंमतीच्या निविदा प्रक्रियेकरिता ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब करावा. हा अध्यादेश दिनांक 26.11.2014 आहे. सर्वात महत्त्वाची एक गोष्ट म्हणजे त्यानंतर सुध्दा 18 डिसेंबरला आणखी एक अध्यादेश शासनाने काढला, ज्याचे आम्ही स्वागत केले. आम्ही सर्वांनी उठून माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले. पारदर्शकता

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. भाई जगताप ....

आणण्यासाठी, कुठेही भ्रष्टाचाराला जागा न ठेवण्यासाठी 3 लाख रूपयांच्या ई-टेडरिंगला आम्ही सर्वांनी मान्यता दिली. 18 डिसेंबरला सुध्दा एक शासन निर्णय निर्गमित झाला. शासकीय खरेदीची प्रक्रिया जास्त पारदर्शक, परिणामकारक व गतीमान करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला. दिनांक 18 डिसेंबर, 2014 चा निर्णय आहे. आपले त्यावेळी नागपूरचे हिवाळी अधिवेशन सुरू होते. त्या अध्यादेशामध्ये असे सांगितले आहे की, ई-निविदा प्रणालीचा वापर शासनाच्या सर्व विभाग, शासकीय विभागाच्या अधिनस्त असलेली कार्यालये, ग्रामीण व नागरीक स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक उपक्रम आणि मंडळे, माहिती अधिकार कायदा अधिनियम, 2005 मधील कलम 4 प्रमाणे यांना बंधनकारक राहतील. सर्व शासकीय विभाग सध्या माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत उपलब्ध असलेली एनआयई ई-निविदा प्रणाली व सीफीनेट्स टेंडर याचा वापर करण्यात येत आहे. हा निर्णय 18 डिसेंबरचा आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप........

सर्व विभागांनी प्राधान्याने एनआयईच्या निविदा प्रक्रियेचा वापर करावा, अशा प्रकारचे हे आदेश आहेत. हे केवळ विचार मांडलेले नाहीत तर तो अध्यादेश आहे. हे दोन्ही शासनाचे अध्यादेश आहेत. त्याच्या प्रती मी आपल्याकडे माहितीसाठी पाठवितो. या दोन्ही अध्यादेशांच्या माध्यमातून आपल्या सर्वांच्या लक्षात येईल की, मुख्यमंत्री महोदयांनी अतिशय धाडसी पाऊल, अतिशय चांगले पाऊल उचलले आहे. शासन कारभारात पारदर्शकता यावी आणि कोणत्याही प्रकारच्या भ्रष्टाचाराला वाव राहू नये, यासाठी त्यांनी केलेला हा प्रयत्न आहे. त्यामुळे या आदेशांचे दोन्ही बाजूकडील सर्व सन्माननीय सदस्यांनी स्वागत केले होते.

सभापती महोदय, सन 2013 मधील अर्थसंकल्पीय अधिवेशनात दिनांक 1/04/2013 रोजी अर्थसंकल्पाच्या अनुदानाच्या मागण्यांवर चर्चा करीत असताना आताचे मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांनी शासकीय योजना आणि रेट कॉंट्रॅक्ट बाबतची आपली मते व्यक्त केली. तीन महिन्यांमध्ये त्यांना जी उपरती झाली आणि त्यांनी जे पाहिले, त्याचे हे प्रतिक आहे, ही सर्व त्यांची वाक्ये आहेत. त्यांचे म्हणणे असे आहे की, "दुर्देवाने आदिवासी व दलित समाजाकरिता असलेल्या शासकीय योजना या केवळ कंत्राटदारांच्या योजना झाल्या आहेत. कंत्राटदार ठरलेले आहेत, पाहिजे तर मी त्यांची नावे सुध्दा सांगू शकतो." राज्याचे प्रमुख असलेले मुख्यमंत्री जेव्हा अशा प्रकारच्या भावना सभागृहात व्यक्त करतात त्यावेळी त्याला फार मोठे महत्व आहे. "पाहिजे तर नावे सांगू शकतो. मुलांना काय पाहिजे, हे मुले ठरवीत नाहीत, शिक्षक ठरवीत नाहीत तर कंत्राटदारांकडे जो माल पडून असेल तो माल खपविण्यासाठी तो तुमच्याकडे येतो, पाहिजे तशी आर.सी.तयार करतो, कन्झुमर फेडरेशनमार्फत असो वा अन्य माध्यमातून असो, माल सप्लाय करतो, परंतु या मालाचा दर्जा निकृष्ट असतो, दर मात्र बाजारभावापेक्षा तीन पट अधिक असतात. माझी हात जोडून आपल्याला विनंती आहे...." त्यांनी त्यावेळी हात जोडून सर्व खात्यांना विनंती केली. हे मुख्यमंत्री महोदयांचे भाषण आहे. ते रेकॉर्डवर आहे आणि मी ते वाचत आहे. "माझी हात जोडून आपल्याला विनंती आहे की, महाराष्ट्रातील आदिवासींवर आपण रहम करा." मुख्यमंत्री, राज्याचे प्रमुख असे म्हणत आहेत. मुख्यमंत्र्यांची अगतिकता यामधून स्पष्ट होते. ही

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप........

अगतिकता का आली असावी, याच्या मुळाशी आपण जातो त्यावेळी 206 कोटी रुपयांचा आम्ही जो भ्रष्टाचार म्हणतो, कदाचित ते आरोप म्हणतील, तो असतो. पण आम्ही याबाबतचे सर्व पुरावे देत आहोत. त्या संदर्भात आम्ही तक्रारी सुध्दा केल्या आहेत. सभापती महोदय, यानंतरचे मुख्यमंत्री महोदयांचे वाक्य अधिक महत्वाचे आहे. ते अधिक भावनिक आहे. काय म्हणतात मुख्यमंत्री महोदय ? "महाराष्ट्रातील आदिवासींवर आपण रहम करावा, त्यांच्यावर कृपा करावी, त्यांचे अधिकार त्यांच्यापर्यंत पोहोचत नाहीत, इतिहासामध्ये नाव कमाविण्याची खूप कमी संधी आपल्याला मिळत असते." म्हणजे मुख्यमंत्री महोदयांची ज्यावेळी खात्री झाली की, आपण घेतलेला निर्णय 18 डिसेंबरचा असेल, 26 नोव्हेंबरचा असेल, आपण काढलेले अध्यादेश एवढेच नव्हे तर मुख्य सचिवांनी सन 2013 मध्ये घेतलेला निर्णय आणि तो निर्णय घेत असताना पार्श्वभूमी कोर्टाची आहे. नागपूर खंडपीठ 2545 क्रमांकाचा दावा दाखल झाला होता. त्यामध्ये खंडपीठाने निर्णय दिला होता, ज्याचा आधार सन 1992 चा आहे आणि तिकडून त्याबाबत नेहमी उदघोष केला जातो, तुमच्या जुन्या पध्दतीने वगैरे, हा उद्घोष केला जातो आणि त्यामध्ये सेक्शन 5 प्रमाणे आम्ही दिलेला आहे, असा दावा केला जातो, माध्यमांना सांगितले जाते, तो सपशेल खोटा आहे आणि फसवा आहे. नागपूर खंडपीठामध्ये जो 2545 चा दावा होता त्यामध्ये खंडपीठाच्या न्यायाधीशांनी स्पष्ट आदेश दिलेले आहेत की, "अशा पध्दतीने तुम्हाला या अशा संस्थांना ही टेंडर्स देता येणार नाहीत, त्यांना कॉम्पिटिटिव्ह टेंडरमध्ये भाग घेऊ द्या आणि मग काम द्या." अशा प्रकारे खंडपीठाने आदेश दिलेले होते. हे आदेश दिल्यानंतर दिनांक 13 जुलै, 2013 रोजी मुख्य सचिवांनी सर्व सचिवांची एक बैठक घेतली. त्या बैठकीमध्ये त्यांनी असे स्पष्ट आदेश दिले की, "आपल्याला या पुढे टेंडर प्रोसेसनेच करावे लागेल." मग आता जो रेट कॉंट्रॅक्टचा घोळ केला जातो आहे किंवा कॉंट्रॅक्ट पध्दतीबाबत सांगितले जात आहे, ते सपशेल खोटे, आपले पाप लपविण्यासाठी केले जात आहे, असा माझा स्पष्टपणे आरोप आहे.

सभापती महोदय, एक साधी गोष्ट यामध्ये येईल आणि असे बोलले जाते की, मग त्यावेळी, त्या काळात झालेल्या ज्या खरेदी आहेत, वगैरे वगैरे. त्यावर मी नंतर येईन, नक्की येईन. कारण माध्यमांसमोर जाऊन केवळ एक बाजू सांगितली की, होत नाही. कारण, त्यानंतर खरेदी झालेल्या

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप.............

आहेत. आपण घेतलेल्या निर्णयानंतर म्हणजे 16 डिसेंबर नंतर किंवा 26/11 नंतर तुमचे अध्यादेश गेल्यानंतरचे आपले जे काही निर्णय झाले आणि त्याची जी पायमल्ली आपण केली आहे, त्याबाबत मला मुद्दाम सांगावेसे वाटेल.

सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांना हे म्हणण्याचे कारण काय आहे ? तर त्याची काही कारणे आहेत. कारणे आहेत म्हणण्यापेक्षा त्यांना जेव्हा लक्षात आले.. मी 'अगतिकता' हा शब्द मुद्दाम वापरला. कारण त्यांनी अगतिकता व्यक्त करताना या ठिकाणी ज्या काही खरेदी त्या काळात झाल्या आणि महिला व बाल विकास विभागाच्या तर एकाच दिवशी झालेल्या आहेत. म्हणजे महिला व बाल विकास मंत्र्यांनी सगळ्यात पहिल्या प्रथम सांगितले होते, जे आम्ही माध्यमांवर पाहिले की, हा जो काही निधी आहे, तो लॅप्स होईल, वगैरे वगैरे. अशा प्रकारचा जो त्यांनी दावा किंवा खुलासा केला, त्याबाबत मला मुद्दाम सांगावयाचे आहे. त्यांनी दोन मुद्यांवर फार जोर दिला. एक असा की, 31 तारखेपर्यंत हा पैसा जर खर्च केला नाही तर तो परत जाईल. त्यांनी दुसरा आणखी एक मुद्दा सांगितला, तो असा की, आमच्याकडे ई-टेंडरिंग प्रोसेस करण्यासाठी कालावधी नव्हता.

सभापती महोदय, आज आपल्याला हे जाणून घेणे गरजेचे आहे की, एखादा मंत्री हा राज्याचा ट्रस्टी असावा, असे लोकशाहीमध्ये अभिप्रेत आहे. याचा अर्थ जो कोणी मंत्री असेल तो ट्रस्टी म्हणून असावा. कारण, त्याच्यावर देशाच्या आणि राज्याच्या लोकांनी विश्वास ठेवलेला असतो. परंतु, ज्यावेळी हे सर्व करण्याची भूमिका असते, प्रोसेस असते त्यावेळी सेक्रेटरी प्रशासनाचे काम करीत असतात. प्रशासनाने काय केले ? विभागाकडे ई-टेंडरिंग करण्याकरिता वेळच नव्हता, असे मंत्री महोदयांनी प्रसार माध्यमातून सांगताना आम्ही पाहिले. त्यांनी सांगितले सदर निधी 31 तारखेपर्यंत व्यपगत होईल, लॅप्स होईल. परंतु, तसे नाही. हा निधी मुळात डिसेंबरमध्ये आला. डिसेंबरपासून आर्थिक वर्ष 31 मार्चला संपेपर्यंत त्यांच्याकडे वेळ होता. हे आम्ही म्हणत नाही तर कोण म्हणतो ? या चिक्की खरेदीमध्ये प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग यांच्या टिप्पणीनुसार "It is not advisable" हा शासनाचा अभिप्राय आहे. प्रधान सचिव, महिला व बाल विकास विभाग यांचा अभिप्राय आहे. हे कोणा कक्ष अधिकारी वगैरेंचे काम

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप........

नाही. ते काय म्हणाले ? मंत्री महोदयांनी सांगितले होते की, आम्हाला टेंडर फ्लोट करण्यासाठी तेवढा वेळ नाही. मग काय म्हणतात त्या प्रधान सचिव ? "It is not advisable to repeat the order time and again without floating fresh tenders, against the purchase rules and various guidelines issued by the Government from time to time."

यानंतर श्री.बोरले.......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप.........

असे त्या म्हणतात आणि त्यापुढे जे नमूद केलेले आहे ते जास्त महत्वाचे आहे. त्यांनी पुढे असे म्हटले आहे की, "To suggest that the fresh tenders would require time is totally incorrect." हे त्यांचे म्हणणे आहे. हे आमचे म्हणणे नाही. दादा, आमचे म्हणणे हेच राहील की, आपण प्रशासक आहोत. परंतु, प्रशासन म्हणून काम करणारी जी यंत्रणा आहे ती लोकशाहीने तयार केलेली आहे. म्हणून मी म्हटले की, आपण ट्रस्टी आहोत. परंतु, आपण ट्रस्टी म्हणून काम करीत असताना प्रशासन आणि प्रशासक यांच्यामध्ये एकवाक्यता असली पाहिजे आणि लोकशाहीमध्ये तेच अभिप्रत आहे. प्रशासन काय म्हणते ? प्रशासन असे म्हणते की, हे चूक आहे. "It is totally incorrect, as the Department could have easily planned out fresh e-tendering before the expiry of the tender period. However, the same is not done." म्हणजे अशा प्रकारची टेंडर प्रोसेस आम्ही करु शकलो असतो, असे प्रधान सचिव स्पष्टपणे म्हणतात. विरोधी पक्ष म्हणून आम्ही असे सांगत नाही. आम्ही मीडियामध्ये असे पाहिले की, 31 तारखेपर्यंत पैसे लॅप्स झाले असते. त्यामुळे खरेदी करणे आवश्यक होती आणि ते 13 फेब्रुवारीलाच करणे आवश्यक होते. 13 तारखेमध्ये काय दडलेले आहे, हे मला माहीत नाही. 13 हा राशीतील चांगला आकडा आहे, असा काही लोकांचा ग्रह आहे. त्यामध्ये आणखी एक सांगितले गेले की, हे पैसे व्यपगत होतील. म्हणजे लॅप्स होतील, अशा पद्धतीचा दावा खुद्द मंत्री महोदयांनी केला. आपण मीडियावर ते पाहिले आहे. म्हणून याबाबत काय आहे ? कारण, हा निधी आयसीडीएसचा आहे. हा केंद्रीय निधी व्यपगत होत नाही. मुळात म्हणजे हा निधी कधीही व्यपगत होत नाही, लॅप्स होत नाही. कारण, केंद्र शासनाकडून राज्य शासनाकडे सदर निधी वर्ग केला जातो. समजा काही कारणांमुळे सदर निधी 31 मार्चपर्यंत खर्च झाला नाही तर पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागण्यांद्वारे त्याचे पुनर्नियोजन करता येते. त्यामुळे निधी व्यपगत झाला असता असे जे म्हणणे आहे ते पूर्णत: असत्य, खोटे आणि संशयाला जागा करुन देणारे आहे, हे मला सांगावयाचे आहे.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप.........

सभापती महोदय, आपण 14 हजार कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या मंजूर केल्या, ही गोष्ट वेगळी आहे. परंतु, त्यामध्ये शेतकऱ्यांसाठी 900 कोटी रुपये आणि व्यापाऱ्यांसाठी 2800 कोटी रुपयांची पुरवणी मागणी करण्यात आली. आपण ते मान्य केले आणि मान्य करायला पाहिजे. कारण, इतर सर्व गोष्टी आहेत. व्यापाऱ्यांसाठी आमचा विरोध नाही. शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत सभागृहात चर्चा झाली, त्या विषयावर भरभरुन बोलले गेले, तावातावाने बोलले गेले. परंतु, पैसे देताना मात्र 14 हजार कोटी रुपयातील 900 कोटी रुपये शेतकऱ्यांसाठी आणि व्यापाऱ्यांसाठी 2860 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली. मी या विषयावर बोलणार नाही. परंतु, या संदर्भात सर्व गोष्टी एवढ्या गंभीर असताना मी जी माहिती देत आहे ती प्रशासनाची माहिती आहे. मी आरोप करतो, अशातला भाग नाही.

सभापती महोदय, एक गोष्ट नेहमी सांगितली जाते की, पूर्वीच्या शासनाने 408 कोटी रुपयांची जी खरेदी केली ती खरेदी आणि आमचा भ्रष्टाचार, अशा प्रकारचा एक हे केला जातो. हेत्वारोप तर आहेच आहे आणि स्वतःचे कुभांड, स्वतःचा भ्रष्टाचार लपविण्यासाठी हा जो आधार घेतला जातो, तो सुद्धा साफ चुकीचा आहे, खोटा आहे आणि कसे थोतांड आहे, याही बाबतीत मला खुलासा करावासा वाटतो. अगोदरच्या शासनाने 408 कोटी रुपयांची खरेदी केली हे खरे आहे. त्याबद्दल नाही म्हणण्याचे काही कारण नाही. परंतु, यामध्ये रेट कॉन्ट्रॅक्ट नुसार खरेदी करु नये याकरिता 26 नोव्हेंबर आणि 18 नोव्हेंबर रोजी आपलेच काढलेले आदेश आहेत. तेव्हा हे आदेशच नव्हते. त्यामुळे तुम्हाला असा आरोपच करता येत नाही. कारण, त्यावेळी ही मर्यादा 10 लाख रुपयांची होती. मुळात म्हणजे ही मर्यादा 3 लाख रुपयांची नव्हती. आपल्याच शासनाने 3 लाख रुपयांची मर्यादा करण्याबाबत निर्णय घेतलेला आहे. आम्ही त्याचे स्वागत करतो. आम्ही तुमची पाठ थोपटली, तुमचे गुणगान केले. परंतु, तिकडे बोट दाखविताना आपल्याला तीन बोटे विचारतात. तुमचा 26 नोव्हेंबर आणि 18 नोव्हेंबरचा अध्यादेश काय सांगतो ? तुम्हाला टेंडरिंगने

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप.........

खरेदी करावी लागणार आहे. प्रधान सचिव काय सांगतात ? प्रधान सचिव सांगतात की, होय, यामध्ये कोर्टाचा अवमान होईल. कारण, खंडपीठाने दिलेला निर्णय आहे. सन 2013 मध्ये तो निर्णय आलेला आहे. त्यानंतर 13 जुलै, 2013 रोजी प्रधान सचिवांनी जो निर्णय घेतला तो मी आपल्याला सांगितला आहे. यामध्ये काय गंमत असते ? रेट कॉन्ट्रॅक्ट आणि या सर्व गोष्टीमध्येच आपणा सर्वांना फिरविण्यात येते आणि तसेच सांगितले आहे. आता सर्वसामान्यांना ही गोष्ट कळणे फार कठीण आहे आणि सर्वच गोष्टी सर्वसामान्यांना कळाव्यात, असे अभिप्रेत सुद्धा नाही. परंतु, रेट कॉन्ट्रॅक्टच्या बाबतीत सरकारने किंवा या विभागाने विशेषतः सचिवांचा अभिप्राय आहे. सचिवांनी अभिप्रायमध्ये स्पष्टपणे सांगितले आहे की, अशा प्रकारची प्रोसेस करावयाची असेल तर प्रस्ताव आणावे लागतात आणि प्रस्ताव काही एका दिवसात येत नाहीत. एका दिवसात प्रस्ताव आले तर ते प्रस्ताव क्रॉस चेक करण्याचे किंवा त्याची खातरजमा करण्यासाठी, मला असे वाटते की, मंत्री महोदयांनी हवाई प्रयत्न केला की काय ? कारण, पूर्ण दिवस हेलिकॉप्टर दिसले नाही. म्हणजे एका दिवसात 206 कोटी रुपयांचे 24 प्रस्ताव आणि त्याला लगेच प्रशासकीय मान्यता दिली. याबाबत सुद्धा सचिवांनी वक्तव्य केले आहे.....

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, मी काल आपल्या दालनात येऊन आपली भेट घेतली होती. त्यावेळी मी आपल्याकडे या विषयावर चर्चाही केली की, हा विविध खात्यांचा विषय आहे. या संदर्भात कोर्टात पीआयएल दाखल झाल्यामुळे माझ्या विभागाचा विषय न्यायप्रविष्ट आहे आणि विधानपरिषद नियम 34, पोट नियम 2, खंड 1 नुसार जी बाब न्यायप्रविष्ट असते त्यावर सभागृहात चर्चा होऊ शकत नाही. आम्ही पहिल्या दिवसापासून उत्तर देण्यास तयार आहोत. परंतु, आम्हाला 20 जुलै रोजी कोर्टाने शपथपत्र दाखल करण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत. आता ही बाब न्यायप्रविष्ट आहे. त्यामुळे मी सभापती महोदयांना निवेदन करते आणि आपण ही चर्चा सुरु ठेवावी किंवा नाही सुरु ठेवावी, किंवा यामध्ये न्यायप्रविष्ट गोष्टी वगळाव्यात किंवा नाही वगळाव्यात, हा पूर्णपणे सभापतींचा निर्णय आहे. आम्ही उत्तर देण्यासाठी तयार आहोत. परंतु, यामध्ये कन्टेम्ट ऑफ कोर्ट होणार नाही ना, याबाबतची स्पष्टता सभापती महोदयांनी करावी. आम्ही उत्तर देण्यास तयार आहोत.

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : सन्माननीय मंत्री महोदया काल माझ्याकडे आल्या होत्या. त्यांनी या विषयावर माझ्याबरोबर अनौपचारिक चर्चा केली होती. मी या सभागृहाचे आणि पार्लमेंटचे पूर्वीचे प्रेसिडेंट बघितले आहेत. सन 1999 मध्ये माजी सभापती श्री.जयवंतराव टिळक साहेबांनी यावर प्रदीर्घ असे मत दिलेले आहे. आपल्याला आवश्यकता असेल तर मी ते मागवून घेतो आणि थोड्या वेळात वाचून दाखवितो. त्यांनी प्रदीर्घ असे मत दिले आहे. आपल्याला पाहिजे असेल तर मी त्यातील निष्कर्ष वाचून दाखवितो...

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आपण निर्णय देत आहात काय ?

**सभापती** : त्यांनी मला विचारलेले आहे. मी त्यावर निर्णय देणार आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी आपल्याला विनंती केली आणि न्यायप्रविष्ट बाबीच्या संदर्भात सांगितले. आता आपण निर्णय देणार असाल तर त्यापूर्वी इतर सन्मानीय सदस्यांना आपल्या भावना मांडण्याचा अधिकार नक्कीच आहे. आपण निर्णय दिल्यानंतर आम्हाला आपल्या निर्णयावर बोलता येणार नाही. महिला व बाल विकास मंत्र्यांनी आपल्याला या ठिकाणी चर्चा करता येईल की नाही, असा आक्षेप घेतला आहे. सभापती महोदयांनी या संदर्भात निर्णय देण्यापूर्वी इतर सन्माननीय सदस्यांचे म्हणणे ऐकून घ्यावे.

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे असे बोलले की, माननीय मंत्री महोदयांनी जो पॉईंट ऑफ प्रोसिजर उपस्थित केला त्यावर मी निर्णय देणार आहे त्याबाबत आपणाला काही बोलायचे असेल तर आपण बोलावे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, यावर मला देखील बोलावयाचे आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, यामध्ये एक भाग असा आहे की, माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, काल त्यांनी आपल्या दालनात आपली भेट घेतली होती. त्यानंतर या प्रस्तावावर चर्चा करण्यास आपण अनुमती दिली आहे. आज मंत्री महोदयांनी जे म्हणणे मांडले त्यासंदर्भात त्यांनी काल दालनात भेटून आपणाला या विषयाच्या संदर्भात सांगितले आहे. आपण त्या त्या वेळच्या माननीय सभापती महोदयांनी जे आदेश दिले आहेत त्यांचा संदर्भ देऊन निर्णय घेणार आहात तो आपला अधिकार नक्की आहे. यामधून आम्ही असा अर्थ नक्की काढू शकतो की, मंत्री महोदयांनी आपणाला काल सांगितल्यानंतर आज हा प्रस्ताव सभागृहात मांडावयास परवानगी दिली आहे. याचा अर्थ काल मंत्री महोदयांनी दालनात आपणाला जी विनंती केली त्यासंदर्भात आपण सारासार विचार केला असून या प्रस्तावावर आज चर्चा करण्यास अनुमती दिली आहे अशी आमची धारणा आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मला या निमित्ताने एवढेच सांगावयाचे आहे की, आपण सर्व सन्माननीय सदस्य कायद्याच्या चौकटीला बांधील आहोत, याबाबत कोणाचेही दुमत असण्याचे कारण नाही. या सभागृहात व देशाच्या लोकसभेत देशातील विधानसभांमध्ये अशा अनेक गोष्टींबाबत वारंवार चर्चा झालेली आहे. याच सभागृहात सिंचनाच्या बाबतीत, आदर्श प्रकरणाबाबत चर्चा झालेली आहे, या सर्व बाबी न्यायप्रविष्ठ असताना देखील याच प्रकरणांबाबत विविध आयुधांचा वापर वारंवार करुन एकदा चर्चा झाली तरी दहा-दहा वेळा वेगळ्या माध्यमातून चर्चा झालेली आहे, ही बाब मी आपल्या निदर्शनास आणून देतो.

**सभापती** :सन्माननीय सदस्यांनी आपले मत व्यक्त केले आहे आता मी माझा निर्णय देत आहे. मंत्री महोदयांनी पॉईंट ऑफ इन्फर्मेशन उपस्थित केलेला आहे] त्यांनी माझी भेट देखील घेतली होती.]मी या चर्चेला परवानगी दिलेली आहे.

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, या विषयाच्या संदर्भात माननीय मंत्री महोदयांनी कोर्टाचा संदर्भ दिलेला आहे. हे प्रकरण कोर्टात चालू आहे असे सांगण्यात आले आहे. शपथपत्राच्या बाबतीत या ठिकाणी खुलासा झालेला आहे. शपथपत्र 20 जुलैला देण्यात आले असे रेकॉर्डवर आले आहे, रेकॉर्डवर चुकीचे जाऊ नये कारण 20 जुलै ही तारीख होऊन गेली आहे (....अडथळा... ) सभापती महोदय माझे बोलणे पूर्ण होऊ द्यावे.

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, 20 जुलै रोजी आदेश आले आहेत.

**सभापती** : मंत्री महोदया सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे बोलणे पूर्ण होऊ द्यावे मी आपणाला नंतर संधी देतो. 20 जुलै रोजी आदेश आले आहेत असे त्यांचे म्हणणे आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, 20 जुलै रोजी आदेश आल्यानंतर शपथ पत्र देण्यात आले आहे. जे शपथपत्र दिले आहेत त्याची माहिती देखील आहे. यावर आपणाला निर्णय घ्यावयाचा आहे. नियम 260 अन्वये आपण चर्चा सुरु केलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी त्यांचे अर्धे भाषण पूर्ण केलेले आहे. नियम 260 अन्वये चर्चा सुरु करण्याअगोदर असा आक्षेप घ्यायला पाहिजे होता.

**सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांचे भाषण अर्धे झाले आहे तसेच विरोधी पक्ष नेते माझा निर्णय देखील मी 1/4 संपविला होता, उरलेला निर्णय मला संपवायचा आहे. सबज्युडिअस मॅटरवर विधानसभा व विधानपरिषद या दोन्ही सभागृहात बऱ्याच वेळा चर्चा झालेल्या आहेत. ही बाब फारशी नवीन आहे अशातला भाग नाही. मी या पदावर बसल्यावर माननीय मंत्री महोदयांच्या लक्षात आणून देणे मला गरजेचे वाटते की, ही दोन्ही सभागृहे आणि लोकसभा व राज्यसभा ही सार्वभौम व उच्च आहेत. आपण प्रतिज्ञापत्राचा उल्लेख केला आहे, असे कोणतेही उत्तर आपणाकडून अपेक्षित नाही. जी बाब आपण प्रतिज्ञापत्रात टाकू शकणार नाही, त्याबाबत शासनाची जी भूमिका असेल त्यासाठी आपणाला कायदेशीररित्या प्रतिज्ञापत्र करतांना कदाचित ॲडव्होकेट जनरल किंवा इतर तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा लागेल. त्यानुसार थोडाफार फरक होईल. आपल्या उत्तराच्या मूळ गाभ्यात आपणाला कोर्टाच्या संदर्भात हात घालता येणार नाही. कन्टेम्प ऑफ कोर्ट होऊ शकणार नाही असे माझे स्पष्ट मत आहे, या सदनाचे सार्वभौमत्व टीकविणे हे

....3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती..**

माझे कर्तव्य आहे. माझ्या माहिती प्रमाणे 1937 च्या निर्णयापासून माननीय जयवंतराव टीळक यांनी फार मोठे भाष्य केले आहे, त्यावेळी देखील त्यांनी असाच निर्णय केला होता. त्या निर्णयाच्या तपशीलात मी जात नाही त्याचा फक्त मी सार सांगतो. सभागृहाचे सार्वभौमत्व आपणाला टीकवून ठेवायचे आहे, या चर्चेला परवानगी मी विचारपूर्वक दिलेली असल्यामुळे सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, आमचे अभिव्यक्ती स्वातंत्र्य कायद्याच्या चौकटीत राहून या सार्वभौम सभागृहाचे पावित्र्य लक्षात घेऊन आपण अबाधित ठेवले त्याबाबत आम्ही सर्व सन्माननीय सदस्य आपले मनापासून आभारी आहोत.

सभापती महोदय, मी भाषण करताना खूप काळजी घेतली आहे, मी मंत्री महोदयांचे नाव घेतले नाही. या प्रस्तावात बऱ्याच बाबी आहे, मी नाव घेतले नाही, मी सरकार म्हणून विचारणा करीत आहे, आता मी नक्की नाव घेईन, आता मला थोडी ऊर्जा मिळाली आहे. ही ऊर्जा चिक्कीची नक्कीच नाही. ही ऊर्जा चिक्कीची असूच शकत नाही. लोकशाहीच्या व सभागृहाच्या सार्वभौम परंपरेची ऊर्जा मला मिळाली आहे. त्यामुळे मला आता नाव घेण्यात काहीही अडचण नाही. नावाची भीती का वाटावी, मी भाषणाच्या सुरुवातीला असे म्हणालो होतो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या घटनेने व लोकशाहीने आम्हाला आम्ही ट्रस्टी असल्याचे अधिकार दिले आहेत. मालक असल्याचे अधिकार दिले नाहीत. ट्रस्टीच्या नावाखाली कोणी मालकासारखे वागत असेल तर त्याचा बुरखा फाडण्याचा आमचा हक्क अबाधित आहे व तो हक्क आम्ही बजावणार आहे. कोणाला काय वाटेल त्याबाबत आम्हाला काही देणेघेणे नाही. सरकारचा एक रुपया चुकीच्या मार्गाने जात असेल तर त्यावर लक्ष ठेवण्याचे आमचे काम आहे, तो रुपया चुकीच्या पध्दतीने व चुकीच्या बाजूने जाता कामा नये. यासाठी आम्ही विरोधक म्हणून आमचे काम लोकशाहीच्या व घटनेच्या चौकटीत राहून करीत राहणार आहोत.

सभापती महोदय, 24 प्रस्ताव एकाच दिवशी मंजूर करण्यात आले आहेत असा मी उल्लेख केलेला आहे. या 24 प्रस्तावांच्या बाबतीत प्रशासनाने शेरा दिलेला आहे. या बैठकीचे इतिवृत्त माझ्याकडे आहे. प्रशासनाचे असे म्हणणे आहे की, हे 24 प्रस्ताव मागायला हवे होते व ते मागविले

....4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप..

गेले नाहीत. मंत्री महोदयांच्या आदेशानुसार आम्ही हा निर्णय घेत आहोत, असे प्रशासनाचे म्हणणे आहे. भाई जगताप म्हणत नाही, विरोधक म्हणून मी म्हणत नाही. एक प्रोसेस अशी असते की, 31 तारखेपर्यंत एकही पैसा लॅप्स होत नाही. परंतु चुकीची माहिती देण्यात आलेली आहे. असे असताना 13 तारखेत काय दडले आहे. एकाच दिवशी 13 तारखेला आदिवासी मुलांच्या, गरीब विद्यार्थ्यांच्या जीवनाचे तीन तेरा करण्याचे अधिकार तुम्हाला कोणी दिले आहेत ? त्या चिक्कीत लोखंडाचे तुकडे मिळाले, बुरशी मिळाली, लाख मिळाली, लेंड्या मिळाल्या आहेत, हे आरोप मी करीत नाही, हे हेत्वारोप नाहीत, ती चिक्की खाण्यास योग्य नाही, अशा प्रकारचा अहवाल जिल्हाधिकरी यांनी दिलेला आहे. हे खरे नसेल तर चिक्की वितरण थांबविण्याचे आदेश मुख्यमंत्री महोदयांनी का दिले. जी चिक्की वितरित करण्यात आली ती थांबविण्याचे आदेश मुख्यमंत्री महोदयख व कोर्टाने देखील दिले आहेत, माझ्याकडून काही चुकी होत असेल तर मी शब्द मागे घेऊन. कोटाने आदेश दिले म्हणून याबाबत चौकशी सुरु झाली आहे. ही गोष्ट खरी आहे की, जिल्हाधिकारी कार्यालयाने याबाबत अहवाल दिलेला आहे, जिल्हाधिकारी कार्यालय प्रशासन आहे.

या नंतर श्री.भोगले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप....

प्रशासनाचे काम आहे. प्रशासनाने या गोष्टी निदर्शनास आणून दिल्या, तरी सुध्दा आपण म्हणता की, त्या चिक्की खरेदीमध्ये काही गडबड नाही, तर आपण सत्यापासून दूर जात आहोत आणि यातून जो काही भ्रष्टाचार झालेला आहे त्यावर पांघरुण घालण्याचा प्रयत्न करीत आहोत, असे मला सांगावेसे वाटते. चिक्कीचा पुरवठा करणाऱ्या सूर्यकांता महिला सहकारी संस्थेबाबत असे सांगितले जाते की, त्या संस्थेच्या संचालिका या काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी आहेत. मला याठिकाणी मुद्दा सांगावयाचे आहे की, एखादी गोष्ट सांगण्यामध्ये आपली चूक झाली तर आपला समाज अतिशय क्षमाशील आहे, माफी होईल. परंतु अशा पध्दतीने आपल्या चुकांवर पांघरुण घालण्याचा प्रयत्न होत असेल तर तो खपवून घेतला जाणार नाही. सूर्यकांता महिला सहकारी संस्थेच्या प्रमुख या काँग्रेसच्या पदाधिकारी आहेत असे सांगितले जाते. पण कोणी पांढऱ्याचे काळे करीत असेल आणि स्वतःचे तोंड काळे करीत असेल तर ते लोकशाहीला अजिबात मान्य नाही, लोकशाहीला अभिप्रेत नाही. सूर्यकांता महिला सहकारी संस्थेच्या संचालिका काँग्रेसच्या एकेकाळी पदाधिकारी होत्या, त्यांना पक्षातून काढून टाकण्यात आलेले आहे. त्याची कारणे सुध्दा मी सांगतो.

सभापती महोदय, आश्चर्याची गोष्ट म्हणजे स्वच्छ प्रशासन, गतिमान प्रशासन, पारदर्शी प्रशासन असे म्हटले जाते. नवीन सरकार सत्तेवर येऊन आठ महिने उलटून गेले आहेत. बुलेट ट्रेनपेक्षा यांचे प्रशासन गतिमान आहे. मागील सरकारच्या काळात याच सूर्यकांता महिला सहकारी संस्थेने 37 कोटी रुपयांचे चिक्की पुरविण्याचे टेंडर भरले होते, परंतु त्यांना काम देण्यात आले नाही. या संस्थेने मागणी करुनही त्यांना काम देण्यात आले नाही. त्यावेळी कोर्टाचा निर्णय आलेला होता. तत्कालीन राज्यमंत्री श्री.राजेंद्र गावीत यांनी सुध्दा आक्षेप घेतला होता. त्यामुळे तो निर्णय रद्दबातल करण्यात आला आणि याच संस्थेला चिक्की पुरविण्याचे काम दिले नाही. परंतु हे प्रशासन किती वेगवान, किती पारदर्शी आहे ते बघा. कोणत्याही प्रकारची आर.सी.नसताना या संस्थेला 90 कोटी रुपयांची चिक्की पुरविण्याचे काम देण्यात आले. हा सगळा रडीचा डाव आहे. आदिवासी मुलांना द्यावयाच्या चिक्कीचा डाव आहे. मेडिकल कीट खरेदीमध्ये सुध्दा भ्रष्टाचार झालेला आहे. पुरविण्यात आलेली चिक्की शेंगदाणा, राजगिरा आणि खोबऱ्यापासून बनविलेली आहे. यांचे खोबरे महाराष्ट्राच्या जनतेसमोर येणार आहे. या सूर्यकांता

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

महिला सहकारी संस्थेच्या प्रमुखांबद्दल जे सांगितले जाते ते धादांत खोटे आहे. एकेकाळी त्या काँग्रेस पक्षाच्या पदाधिकारी होत्या. त्याचा आधार तुम्ही घेऊ नका. मागील सरकारच्या काळात

...2..



श्री.भाई जगताप....

ज्यांना 37 कोटी रुपयांची चिक्की पुरविण्याचे काम नाकारण्यात आले, त्याच संस्थेला या सरकारने 90 कोटी रुपयांची चिक्की पुरविण्याचे काम द्यावेसे वाटले हा मोठा विनोद आहे.

सभापती महोदय, ज्या संस्थेने 90 कोटी रुपयांची चिक्की पुरविण्याचे कंत्राट घेतले, त्या संस्थेचे चिक्की विक्रीचे साधे दुकान सुध्दा नाही. मी ज्या बाबी सांगत आहे त्याची मंत्री महोदयांनी नोंद करुन घ्यावी. ज्या संस्थेबाबत दीड वर्षापूर्वी तत्कालीन सरकारने आक्षेप घेतला आणि त्यांचे कंत्राट रद्द केले त्याच संस्थेला 90 कोटी रुपयांची चिक्की पुरविण्याचे काम देण्यामध्ये काय गौडबंगाल आहे याचे सभागृहाला उत्तर मिळाले पाहिजे.

सभापती महोदय, नागपूर खंडपीठाचा निर्णय आहे. विभागाने घेतलेल्या आक्षेपांची नोंद आहे. टेंडर प्रोसेसबाबत आणि त्याच्या वेळेबाबतच्या गोष्टी असतील, त्या अनुषंगाने विभागाने टिकाटिप्पणी केलेली आहे. त्या संदर्भात सुध्दा सभागृहाला उत्तर दिले पाहिजे. प्रशासनामध्ये आपण मंत्री म्हणून मालक नाही तर ट्रस्टी म्हणून काम करणे हे लोकशाहीला आणि महाराष्ट्राच्या जनतेला अभिप्रेत आहे. मी चिक्कीचा विषय बाजूला ठेवतो. अनेक संवेदनशील असे विषय आहेत. जी लहान मुले ही चिक्की खातात आज त्यांची काय अवस्था आहे, हे आपण पाहिले आहे.

सभापती महोदय, अंगणवाड्यांच्या बाबतीत विविध प्रकारचे साहित्य खरेदी करण्याचा शासनाने निर्णय घेतला होता. अंगणवाडी हा सर्वांच्या दृष्टीने संवेदनशील विषय आहे. शासनाने किंवा महिला व बालविकास विभागाने वाशी येथील संस्थेकडून अंगणवाड्यांसाठी वह्या, पुस्तके व इतर साहित्यांची खरेदी केली. ही खरेदी करीत असताना प्रचंड गतिमान असे काम केले आहे. त्या खरेदीच्या संदर्भात माहितीच्या अधिकारांतर्गत विभागाकडून जी माहिती प्राप्त झाली, त्यामध्ये विभागाचे शेरे नमूद केलेले आहेत.

नंतर क्यू.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप....

सभापती महोदय, सरकारचा एक रूपयाचा चेक जात असताना तो देखील आपण अतिशय काळजीपूर्वक हाताळत असतो. सद्गुरू संस्थेकडून ही सर्व खरेदी करण्यात आली आहे. या संस्थेचे जे डायरेक्टर आहेत त्यांच्या वैयक्तिक नावाने पाच कोटी रूपयांचा चेक कसा काय दिला आहे, याचे मला आश्चर्य वाटते. मला हे सर्व सांगताना लाज वाटते. आम्ही एक लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. त्यावेळी असे कधी तरी होते अशा प्रकारची कमिटमेंट आली होती. असे होत नाही. शेतकऱ्याच्या नावे असलेला 22 रूपयांचा आपला चेक परत आला आहे. आपण शेतकऱ्याच्या नावे असलेला चेक मुलाला दिल्यामुळे तो चेक परत आलेला आहे. तशीच पद्धत असली पाहिजे. सरकारचा एक रूपया चुकीच्या माणसाच्या हातात जाता कामा नये हे पाहण्याची जबाबदारी सरकारची आहे. आज सरकार कशा पद्धतीने चालले आहे. आपण कशा पद्धतीने या गोष्टीचे समर्थन करीत आहात ? यासंबंधात लक्षवेधी सूचना उपस्थित करण्यात आली होती. त्यावेळी खाली बसून कमेंट करण्यात आली होती. आम्ही देखील बऱ्याच कमेंट करू शकतो. आपण जेव्हा विरोधी पक्षात होता त्यावेळी आपण फार तयारीनीशी येत होतात. त्यावेळी आपण आपले काम करीत होता. त्यास आम्ही उत्तरे देत होतो. त्यामुळे हे पैसे सरकारचे होते की, प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे होते याचे उत्तर आता आपण आम्हाला द्यावे. या पैशाचे मालक कोण होते, एका विशिष्ट माणसाच्या नावावर पाच कोटी पेक्षा जास्त रकमेचा चेक जातोच कसा ? ज्या संस्थेकडून आपण खरेदी केली आहे त्या संस्थेच्या नावावर तो चेक गेला पाहिजे. ही साधी पद्धत आहे.

सभापती महोदय, सगळ्यात आर्श्चयकारक आणि धक्कादायक गोष्ट अशी आहे की, ज्या संस्थेला हे काम देण्यात आले ती संस्था सुद्धा अस्तित्त्वात नाही अशा प्रकारची माझी माहिती आहे. त्यामुळे पाच कोटी पेक्षा जास्त रकमेचा चेक एखाद्या व्यक्तीच्या नावे सरकार कसे काय देऊ शकते याचे उत्तर आज आम्हाला हवे आहे. तो कोणत्या नियमाने दिला गेला आहे? यालाच गतिमान सरकार, पारदर्शक सरकार म्हणायचे काय? आम्हाला यातील पारदर्शकता जाणून घ्यायची आहे. त्यामुळे आता माननीय मुख्यमंत्र्यांची अगतिकता देखील आमच्या लक्षात आली आहे. ..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप...

तीन महिन्यांमध्ये मुख्यमंत्री म्हणतात की, आपणाला इतिहास घडवायला अनेक संधी येतील. आदिवासींवर रहेम करा. गरिबांवर रहेम करा. असे माननीय मुख्यमंत्री अगतिकतेने का बोलले असतील याचे मला थोडे-थोडे उत्तर मिळत आहे.

सभापती महोदय, भारत के जगद्‌गुरू प्रिटींग प्रायव्हेट लि.यांच्याकडून सर्व खरेदी करण्यात आली आहे. सरकारचा एक नियम आहे. एखादी वस्तू खरेदी करीत असताना खरेदीदाराकडून आपण 25 टक्क्यांपर्यंत सूट मागवू शकतो किंवा त्याने दिलेल्या रेट मध्ये 25 टक्के सूट घेऊ शकतो. हा आपला सर्वसाधारण नियम आहे. माझ्याकडे असलेले कागदपत्र आपणाकडे पाठवित आहे. माहितीचा अधिकार अधिनियमान्वये आम्ही हे सगळे कागदपत्र मिळविलेले आहेत. यातील शेरा मी आपल्याला वाचून दाखवितो. तो शेरा असा आहे की, कॉपी राईट भारत के जगद्‌गुरू प्रिंटींग प्रा.लि., एमआयडीसी, तुर्भे, नवी मुंबई यांच्या नावे नाही. अंगणवाडी मार्गदर्शक सेविका पुस्तिकांची छापिल किंमत रूपये 125/- आहे. त्यावर 20 टक्के म्हणजे 24 रूपये सूट घेऊन रूपये 96 रूपये प्रती नग या प्रमाणे पुस्तके खरेदी करण्यात आलेली आहेत. रूपये 120/- चा रूपये 96/- असा रेट झाला. रूपये 120 ऐवजी रूपये 96 ला पुस्तिका मिळाली असल्यामुळे प्रथमदर्शनी ती स्वस्त मिळाली आहे असे वाटेल. पण तसे नाही. एवढे सोपे नाही. हे गतिमान सराकर आहे. ते आपल्या सारखे नाही. हे फार गतिमान आहे, फार पारदर्शक सरकार आहे. ज्यावेळी आपण मोठ्या प्रमाणावर खरेदी करतो त्यावेळी एकूण किंमतीच्या 25 टक्के इतकी किंमतीमध्ये सूट मिळाली पाहिजे. पण ती मिळालेली नाही. वास्तविक संचालक, ग्रंथालय यांनी निश्चित केलेल्या सूट दरानुसार वाङ्‌मयतर या सदराखाली 25 टक्के सूट घेणे अपेक्षित होते. प्रति नग 6 रूपये फायदा झाल्याने चुकीच्या परिघापोटी शासनास शासनाचे 6 लाख 30 हजार, 708 रूपयांचे नुकसान झाले आहे. हे माझे म्हणणे नाही. हे म्हणणे विभागाचे आहे आणि ते योग्य आहे. आपल्याला 100 रूपयाची वस्तू 75 रूपयाला मिळायला पाहिजे होती पण ती 80 रूपयाला मिळाली म्हणून आपण पाठ थोपटून घेत आहात. आपण 20 टक्के सूट घेतली आहे.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप...

आपण 25 टक्के सूट का घेतली नाही. हे वरचे रूपये आपण कोणासाठी सोडले आहेत. का सोडले आहेत ? एका साध्या पुस्तिकेमध्ये झालेला हा भ्रष्टाचार आहे. आम्ही त्यास भ्रष्टाचार म्हटले तर त्यास आपण आक्षेप घेणार आहात ? प्रचलित पद्धतीनुसार 25 टक्के सूट मिळून सरकारचा पैसा वाचत होता. एकीकडे आपण म्हणतात की, तिजोरीमध्ये खडखडाट आहे. शेतकऱ्यांसाठी पैसे नाहीत. कर्मचाऱ्यांच्याचे पगार देण्यास पैसे नाहीत. असे असताना आपण सरकारचा महसूल का बुडवत आहात ? मुख्य सेविकांसाठी मार्गदर्शक पुस्तिकेची छापिल किंमत 220 रूपये आहे. त्यावर 20 टक्के म्हणजे 44 रूपये सूट घेऊन 176 रूपये प्रति नग या प्रमाणे खरेदी करण्यात आली आहे. तेथे देखील आपण पाठ थोपटून घेतली आहे. कारण हे गतिमान सरकार आहे. पारदर्शी सरकार आहे. मी या सरकारचा बुरखा टराटरा फाडणार आहे. वास्तविक संचालक, ग्रंथालय यांनी निश्चित केलेल्या सूट दरानुसार वाङ्मयीन या सदराखाली 25 टक्के सूट अपेक्षित होती. पण आपण ठेकेदारास प्रति नग रूपये 11 इतका फायदा करून दिलेला आहे. आपण लाखो नगाचा त्याला ठेका दिला होता. कारण लाखो सेविका आहेत. हे सर्व कोणाचे हित साधण्यासाठी केले आहे ? त्याचे आम्हाला उत्तर पाहिजे आहे. हे प्रकरण आम्हीच कोर्टामध्ये नेले आहे.ए.सी.बी.कडे देखील आम्हीच गेलो आहोत. त्यांना आम्ही या प्रकरणाची चौकशी करण्यास सांगितले आहे. आता आम्ही या पेक्षाही पुढे जाणार आहोत. आता तर संबंधितांना धमक्या देखील यायला लागल्या आहेत. आमच्या काँग्रेसच्या प्रवक्त्यांनी याबाबतीत सातत्याने पाठपुरावा केला आहे. या सर्व प्रकरणांच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न केला म्हणून त्यांना धमक्या यायला लागल्या आहेत. आम्ही फिर्याद करून कोणालाही अटक झालेली नाही. विधान सभा सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांना सुद्धा आज धमक्या देण्यात येत आहेत. तरी देखील हे सरकार गतिमान आहे, पारदर्शी सरकार आहे असे म्हणत आहे. आमचे सरकार अच्छे दिनो के सरकार आहे असे म्हणत आहे. असे असेल तर मग आपण गरिबांचे अकरा रूपये का खाल्ले आहेत. हे अकरा रूपये कुठे गेले आहेत ? त्याचे आपण काय केले आहे ? हे अकरा रूपये कोणाचा सांगण्यावरून गेले आहेत ? यात आता प्रशासनाने देखील

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप...

हात झटकले आहेत. प्रशासनाने देखील सांगितले आहे की, हे सर्व चुकीचे आहे. अशा प्रकरे अनेक गोष्टी समोर येत आहेत. चिक्की, वह्या पुस्तके झाल्यानंतर आता हे ताटांकडे देखील वळले आहेत. या शासनाने मुलांच्या ताटात काय वाढले ते देखील आपल्या निदर्शनास आणून देतो.

यानंतर श्री.अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप...

या प्रस्तावावरील उत्तर माननीय मुख्यमंत्री देत असतील तर ते अधिक चांगले. आम्ही त्याचे स्वागतच करु.

सभापती महोदय, मी सुरुवातीलाच सांगितले की, मी फक्त एकाच विभागावर बोलणार आहे. 9 कोटी 14 लाख 72 हजार 325 कोटी रुपयांची ताटे खरेदी करण्यात आली. वर्ल्ड ट्रेड इंडस्ट्री, नागपूर, या कंपनीकडून खरेदी केली असल्याचे सांगण्यात आले. मी जर आरोप करीत असेन तर गोष्ट वेगळी. महिला व बाल कल्याण विकास विभागाने ज्या कंपनीकडून इतकी मोठी खरेदी केली त्याच्या कारखान्यामध्ये मीडियाचे प्रतिनिधी गेले होते. त्या ठिकाणी त्यांना कारखाना सापडला नाही. एका दिवशी म्हणजे 13 तारखेला ही सर्व खरेदी करण्यात आलेली आहे. एकदम फास्ट निर्णय घेण्यात आला. गतिमान सरकार, गतिमान निर्णय. या सरकारची निर्णय क्षमता फार जोरात आहे. ज्या स्टील इंडस्ट्रीकडून ही खरेदी करण्यात आली तेथे स्टील ताटाच्या उत्पादनाची कोणतीही सामुग्री उपलब्ध नसल्याचे दिसून आले. अंतर्भागात असलेल्या जळमटावरुन येथे अनेक दिवसापांसून कोणत्याही प्रकारचे उत्पादन न झाल्याचे दिसून आलेले आहे. शासन निर्णय क्रमांक 215/प्र.क्र.74 /दिनांक 13 फेब्रुवारी, यातील 13 तारीख महत्वाची आहे. यह तेरह इम्पोर्टेंट है, क्योंकि यह सब तेरा ही है, हमारा कुछ नहीं है, इसमें गरीबों का कुछ नहीं है. आदिवासियों का कुछ नहीं है. महिलांओं का कुछ भी नहीं है. तेरा है, वह तेरा है. ते तुम्हाला लखलाभ होवो. महिला व बाल विकास विभागाने अंगणवाडी व मिनी अंगणवाडीकरिता 9 कोटी 14 लाख 72 हजार 325 रुपयांची 8 लाख 93 हजार 330 ताटांची खरेदी केली. आम्ही यावर बोलू नये का ? कोर्टामध्ये केस आहे म्हणून तुम्ही बोलू नका. या ठिकाणी आमचा आवाज दाबाल, पण बाकीच्यांचे काय ? आज एका पत्राने सर्व माहिती उपलब्ध होते. हे सर्व मीडियाने केलेले ऑपरेशन आहे. याला स्टींग ऑपरेशन म्हणतात.

सभापती महोदय, एव्हरेस्ट कंपनीकडून वॉटर फिल्टर खरेदी करण्यात आले. निर्धारित किंमतीपेक्षा जास्त किंमतीने याची खरेदी करण्यात आली. वॉटर फिल्टरची किंमत 4700 होती ती 5200 रुपयांनी खरेदी करण्यात आली. ही खरेदी कोणत्या अधिकारात केली हे मला माहीत नाही.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप...

एव्हरेस्ट इंडस्ट्री, गंगापूर, जिल्हा औरंगाबाद यांच्याकडून वॉटर फिल्टर खरेदी करण्यात आले. त्या कंपनीचा दरकारारामध्ये नोंदणीकृत पत्ता मुख्य रस्त्याजवळ, जुनी सब्जीमंडी, गणपती गल्ली, गंगापूर, जिल्हा औरंगाबाद असा आहे. या ठिकाणी माध्यमांच्या प्रतिनिधींनी भेट दिली आणि त्याबाबत जे वार्तांकन केले ते तुम्ही आम्ही पाहिलेले आहे. सदर पत्त्यावर अशाप्रकारचा कोणताही उद्योग आढळलला नाही. तरी सुद्धा आम्ही पारदर्शी काम केलेले आहे अशी बिरुदावली नावणार काय ? आम्ही अंगणवाडीसाठी लागणारी ताटे खरेदी केली आहेत, फिल्टर खरेदी केली असे सांगणार. ही खरेदी कोठून केली ? या सर्व अदृश्य कंपन्या आहेत. मग हे पैसे कुठे अदृश्य झाले असे आम्ही म्हणालो तर आपणास का प्रॉब्लेम होतो ? यह सब तेरह का कमाल है. ये मेरा वाला मामला नहीं है, सब तेरह का कमाल है. मे.एव्हरेस्ट इंडस्ट्रीकडून 2 कोटी 63 लाख 75 हजार 481 रुपयांची खरेदी करण्यात आली. ही इंडस्ट्री अस्तित्वात नाही असे मीडियाने दाखविलेले आहे. त्याचा खुलासा झाला पाहिजे.

सभापती महोदय, आम्ही विरोधक आहोत म्हणून त्यांच्यावर आरोप करीत आहोत या दृष्टीने आमच्याकडे पाहिले जाईल. कामामध्ये पादर्शकता असावी असे आपणा सर्वांना अभिप्रेत आहे. त्यामध्ये काहीही चूक नाही.

सभापती महोदय, या सदनाचे ज्येष्ठ सदस्य श्री.नितीन गडकरी जे आता केंद्रात मंत्री आहेत. त्यांनी एक लक्षवेधी सूचना उपस्थित केली होती. त्यांच्या सोबत सर्वश्री विनोद तावडे, दिवाकर रावते, डॉ.दीपक सावंत, ॲड.आशिष शेलार यांनी देखील प्रश्न विचारले होते. मी चिक्की प्रकरणावर यासाठी जात आहे की, कारण जेव्हा हा प्रश्न विचारण्यात आला होता तेव्हा सूर्यकांताला 90 कोटी रुपयांचे काम दिले म्हणून त्यांनी प्रश्न विचारला होता. त्यावेळी निर्णय झाला की, आपणास ते देता येणार नाही म्हणून त्यांची 37 कोटी रुपयांची मागणी फेटाळण्यात आली होती.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप...

सभापती महोदय, आपणास माहीत असेल की बिस्कीटांच्या खरेदीमध्ये देखील घोळ झालेला आहे. हा विषय देखील त्यांच्यात विभागाच्या अखत्यारित येतो. मला त्याबाबत मत व्यक्त करायचे आहे. जवळपास पाच कोटी रुपयांची आयुर्वेदिक बिस्कीटांची खरेदी करण्यात आली. त्याबाबत सांगण्यात आले की, मे.गोवर्धन आयुर्वेदिक फार्मा लि.यांना पाच कोटी रुपयांची आयुर्वेदिक बिस्कीटे पुरविण्याची मान्यता देण्यात आली. माननीय महिला व बाल विकास मंत्री यांनी दिनांक 12 फेब्रुवारी, 2015 रोजी बैठक घेऊन आयुक्तांनी पठविलेले पूर्वीचे सर्व प्रस्ताव रद्द केले, हे जास्त महत्वाचे आहे, येथेच सर्व गोम आहे. त्यांनी बारा पत्करले नाही, यह तेरहवाला मामला हैं, दिनाक 12 रोजी माननीय महिला व बाल विकास मंत्री यांनी पूर्वीचे सर्व प्रस्ताव रद्द करुन गोवर्धन फार्मा लि.यांचा प्रस्ताव सादर करण्याबाबत निर्देश दिले असे आयुक्तांनी प्रस्तावात नमूद केले आहे. म्हणजे आपण प्रोससने प्रस्ताव करतो म्हणजे प्रस्ताव मागवितो, त्याची सत्यता पडताळतो, मग आपण त्यांना ऑर्डर देतो. परंतु तसे न करता आयुक्तांना निर्देश देण्यात आले की, आपण हे सर्व प्रस्ताव रद्द करावेत आणि आम्ही 13 तारखेला जे प्रस्ताव देत आहोत त्यावर कार्यवाही करावी.

सभापती महोदय, आदिवासी मुलांच्या आणि विशेषतः मालन्युट्रीशनच्या बाबतीत आपण अतिशय संवेदनशील आहोत आणि तसे असायलाच हवे कारण याबाबतीत महाराष्ट्र राज्याचा जो नंबर आहे, तो आपणास अभिमानास्पद नाही.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप...

या विद्यार्थ्यांसाठी जे मेडीकल किट मिळते त्यातील काही औषधी कमी करुन त्या किटची ऑर्डर विशिष्ट कंपनीला दिली जावी या बाबत विभागाकडून जो प्रयत्न झाला त्याचा मी तीव्र शब्दात निषेध करतो. कुपोषित मुलांचे कुपोषण दूर करण्यासाठी आरोग्य विभाग आणि आंतरराष्ट्रीय आरोग्य संघटनेच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार काम केले जाते. कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याचा तो प्रयत्न असतो. या कामामध्ये सुध्दा भ्रष्टाचार झाला. परंतु तरी सुध्दा या भ्रष्टाचाराच्या बाबतीत विरोधकांनी बोलू नये, असे सरकारला वाटते. गेल्या चार दिवसांपासून हा प्रस्ताव सभागृहासमोर येतो. परंतु या भ्रष्टाचाराच्या विषयावरील प्रस्तावावर चर्चा कशी होणार नाही, या दृष्टिकोनातून सरकारच्या वतीने प्रयत्न झाल्याबद्दल मी खेद व्यक्त करतो. महोदय, हा माझा कोणावर हेत्वारोप नाही. किंबहुना, मी या बाबतीत मी कोणाला दोषी सुध्दा धरणार नाही. लोकशाहीच्या चौकटीत वावरत असताना, लोकशाहीच्या या सार्वभौम सभागृहात वावरत असताना, या सभागृहात लोकांच्या हिताचे कायदे होत असताना, किंबहुना जे कायदे आम्ही केले त्या कायद्यांची पायमल्ली जर मंत्री महोदय करणार असतील तर त्यांना या संदर्भातील जाब त्यांच्या उत्तरात द्यावाच लागेल.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणी संवेदनशीलता दाखविली आहे. त्यांनी या विषयाच्या अनुषंगाने वक्तव्य केले. माननीय उच्च न्यायालयाने सांगितल्यानुसार चिक्कीवर बंदी आलेली आहे. महोदय, चिक्कीचे नमुने विभागाकडे उपलब्ध मंत्रिमंडळाचे प्रमुख असलेले माननीय मुख्यमंत्री मात्र संबंधित मंत्र्यांना क्लीनचीट देतात. सभापती महोदय, आमची एवढीच मागणी होती की, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन दूध का दूध और पानी का पानी होऊ द्यावे. महोदय, आम्ही कधीही गरिबांच्या खिशात हात घालत नाही किंवा घालणार नाही. सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांच्या संवेदनशीलतेबाबत आमच्या मनात शंका नाही. हे मी या पूर्वी सुध्दा सांगितलेले आहे. परंतु विरोधक एखादा प्रश्न विचारत असतील तर त्या विषयाची सरकारने पूर्ण तड लावावयास पाहिजे. जर विरोधी पक्ष म्हणून आमच्याकडून काही चूक झाली असेल तर आम्ही मोठ्या मनाने माफी मागू. आज एका विभागामध्ये 206 कोटी रुपयांचा भ्रष्टाचार झाला आहे. हे सरकार येऊन सहा महिने झाले आहेत. सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर मला सांगत आहेत की, अजून किती तरी वर्षे जाणार आहेत.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप...

सभापती महोदय, महिला व बाल विकास विभाग, आदिवासी विकास विभागासाठी घटनेच्या चौकटीनुसार अर्थसंकल्पात विशिष्ट तरतूद केली जाते. आदिवासी विकास विभागाला एकूण अर्थसंकल्पाच्या 9 टक्के बजेट असते. या माध्यमातून त्या विभागाला चार-साडेचार हजार कोटी रुपये मिळतात. तो त्यांचा हक्क आहे. परंतु आदिवासींच्या हक्काच्या पैशांवर डल्ला मारुन सुध्दा, जर माननीय मंत्र्यांचे समर्थन केले जात असेल तर त्या गोष्टीचा मी निषेध करतो. सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, त्यांनी या संपूर्ण प्रकरणांची चौकशी करावी.

महोदय, अधिवेशनाच्या सुरुवातीला शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचा आम्ही आग्रह धरला होता. तीन-चार दिवस आम्ही सभागृहाचे कामकाज रोखून धरले. परंतु शेतकऱ्यांच्या प्रश्नावर चर्चा व्हावी म्हणून आम्ही दोन पावले मागे गेलो. या निमित्ताने माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, त्यांनी या संपूर्ण प्रकरणांची चौकशी करावी. त्यांनी न्यायालयाचे काम न्यायालयाला करु द्यावे. माननीय मुख्यमंत्री वारंवार सांगतात की, आमचे सरकार गतिमान आहे, ट्रान्सपरंट आहे. मी या निमित्ताने त्यांना सुचवू इच्छितो की, आपण त्याची प्रचिती येऊ द्यावी. या संपूर्ण प्रकरणांची चौकशी करुन, जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करावी. तसेच सरकारी दस्तऐवज आधारभूत मानून, त्यावर विश्वास ठेवून या विभागाच्या मंत्री सन्माननीय श्रीमती पंकजा मुंडे यांनी तत्काळ राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी करतो व येथेच थांबतो.

जय हिंद, जय महाराष्ट्र.

प्रस्ताव प्रस्तुत झाला.

----------

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो की, नियमानुसार या प्रस्तावावरील चर्चा उत्तरासह दुपारी 3 वाजून 18 मिनिटांपर्यंत संपवावयाची आहे. त्यामुळे वेळेची मर्यादा लक्षात घेऊन सन्माननीय सदस्यांनी आपापले विचार मांडावेत.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, ज्या विभागाच्या बाबतीत सभागृहामध्ये चर्चा सुरु आहे त्या विभागाच्या मंत्री महोदयांनी या ठिकाणी उपस्थित असावे की नसावे हा विषय नाही. परंतु किमान संबंधित विभागाच्या सचिवांनी तरी अधिकारी गॅलरीमध्ये उपस्थित असावयास पाहिजे.

**सभापती** : मी माननीय राज्यमंत्र्यांना सांगतो की, या ठिकाणी विभागाचे सचिव उपस्थित नसतील तर त्यांना उपस्थित राहण्याबाबत निरोप पाठवावा.

तसेच दुसरी बाब अशी की, या प्रस्तावावरील चर्चेला माननीय मुख्यमंत्री उत्तर देणार आहेत. त्यामुळे संबंधित मंत्र्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांना सभागृहात येण्याबाबत निरोप पाठविण्याची व्यवस्था करावी.

आता सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी भाषणास सुरुवात करावी.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 260 च्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी आपण मला संधी दिल्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. या अधिवेशनाचा सारासार विचार केला तर भ्रष्टाचार हा एक मोठा विषय आहे. हे शासन सत्तेत येऊन 8-9 महिन्यांचा काळ झाला आहे. परंतु गेल्या तीन-चार महिन्यांत शासनाच्या विविध विभागांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाल्याच्या बातम्या सर्व वर्तमानपत्रातून आणि इलेक्ट्रॉनिक मीडियातून येत आहेत. या विषयी बाहेर मोठ्या प्रमाणावर चर्चा आणि डिबेट सुरु आहे. या प्रस्तावावरील चर्चेच्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, भ्रष्टाचार हा आता कळीचा मुद्दा बनल्याचे कोणीही नाकारत नाही.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शरद रणपिसे ....

दादा, सर्वसामान्य लोकांची भावना आहे की, आम्ही श्रम करतो, आमच्या श्रमातून पैसा निर्माण होतो, या पैशातून विकास झाला पाहिजे, पण हा विकास न होतो भ्रष्टाचाराचा राक्षस हा सर्व पैसा गीळंकृत करतो. महाराष्ट्रासमोर हा ज्वलंत विषय आला आहे. सभापती महोदय, आम्ही या प्रस्तावात विभागांचा उल्लेख केला आहे. मी सहज त्यांची गोळाबेरीज करीत होतो. महिला व बालकल्याण विभाग, शालेय शिक्षण विभाग, आदिवासी विकास विभाग .... काही ठिकाणी प्रपोज झाले असेल तर काही ठिकाणी मान्यता मिळाली असेल, काही ठिकाणी प्रलंबित असेल, सर्व भ्रष्टाचाराची गोळाबेरीज केली तर ती 561 कोटी 15 लाख रूपये इतकी होते. भ्रष्टाचारावर अनेक वेळा या सभागृहात चर्चा झाली आणि संसदेत सुध्दा झाली. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी जे सांगितले ते मी आवर्जून आपल्याला सांगू इच्छितो की, अलीकडच्या काळात महाराष्ट्रात फक्त राजकीय नेतेच नाही तर बडे उच्च पदस्थ प्रशासकीय अधिकारी यांची हातमिळवणी झालेली आहे. दादा, ही लोकशाहीला फार मोठी अशी घातक घटना आहे. मेहेरबानी करून आपण हे लक्षात ठेवले पाहिजे. हे शासन आमच्या आघाडी सरकारवर टीका करून आले आहे. जनतेची फसवणूक केली आहे. तुमचे सर्व नेते असत्य बोलले. मी हा तुमचा जाहीरनामा कायम जवळ ठेवतो. दृष्टीपत्र नाव आहे, यामध्ये जनतेला सांगितले आहे की, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस या आघाडी सरकारच्या भ्रष्ट आणि नाकर्त्या कारभाराला पार विटलेल्या महाराष्ट्रातील जनतेला निःसंदिग्धपणे हवे आहे ते प्रभावी परिवर्तन. म्हणजे सभापती महोदय, आमच्याविरूध्द एक प्रभावी परिवर्तन. एवढ्यावरच भाजप थांबले नाही. आपल्यावर एक कविता लिहिली आहे. कात्रजचा घाट दाखवा. दादा, तुम्ही कोल्हापूरला, साताऱ्याला तिकडूनच जाता. कात्रजचा घाट तुम्हाला माहीत आहे. मोदी नावाचे वादळ आहे, भ्रष्टाचाराला उखडणारे, घराघरात 24 तास प्रकाश घेऊन जाणारे, 15 वर्षांच्या रात्रीनंतर एक पहाट फुटू द्या, विकासाची मोठी लाट महाराष्ट्रातही येऊ द्या, असे म्हटले आहे. बघा, 4-5 महिने झाले नाही तर या सभागृहात 561 कोटी 15 लाख रूपयांचा जो गैरव्यवहार, भ्रष्टाचार आहे त्याच्यावर चर्चा करायला आपण येथे बसलो आहोत, ही अत्यंत दुर्दैवाची बाब आहे. भाजपने जनतेला कसे फसविले आहे ते या निमित्ताने मी आपल्याला सांगू इच्छितो. मी हा ठराव



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शरद रणपिसे ....

मांडला, काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेस मधील अनेक सन्माननीय सदस्यांनी त्यावर सह्या केल्या, पाठिंबा दिला. (अडथळा) दादा आपण बोला. आपण फार सरळ आणि सज्जन आहात. (अडथळा) दादा आणि माननीय मुख्यमंत्री साहेब चांगले आहेत. माननीय मुख्यमंत्री साहेब संवदेनशील आहेत.

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी विषयावर बोलावे. सन्माननीय सदस्यांनी खाली बसून बोलू नये.

श्री. शरद रणपिसे : सभापती महोदय, आम्ही हा प्रस्ताव मांडला आहे. आम्ही भ्रष्टाचाराचे, गैरव्यवहाराचे आरोप केले आहेत. दादा, 2 मिनिटे आमचे आरोप बाजूला ठेवा. आता मी कागद दाखवत नाही, कारण ते सर्वांना माहीत आहे. भाजपचे एक नेते स्वतःला ज्येष्ठ मानतात आणि ते आहेतच, लोकप्रतिनिधी आहेत. त्यांचे एक स्टिंग ऑपरेशन झाले. (अडथळा) आता ते समजून घ्या. आता कशाला बोलता ? तेरी भी चूप, मेरी भी चूप, सब कारभार गुपचूप. या नेत्यांनी स्टिंग ऑपरेशनमध्ये सांगितले, ते आम्ही सांगण्याची गरज नाही. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप, तुम्ही भ्रष्टाचारावर बोलू नका, मी बोलत नाही, सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे तुम्ही बोलू नका, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. धनंजय मुंडे साहेब तुम्ही बोलू नका. सर्व इलेक्ट्रॉनिक मीडियांनी सांगितले आहे. सांगितले आहे की, भाजपमध्ये लोकशाही राहिलेली नाही. आपण आता या लोकशाहीच्या मंदिरात बसलो आहोत. लोकशाही भाजपमध्ये राहिलेली नाही तर तुम्हाला सत्तेवर बसण्याचा काय अधिकार आहे ? दादा, तुमचेच नेते सांगतात. दुसरे वाक्य असे आहे की, भाजप व राष्ट्रीय स्वयंसेवक संघात मनी पॉवर चालते. मनी पॉवर म्हणजे रूपया, हजारांत, लाखांत नाही तर करोडो आणि अब्जोमध्ये. (अडथळा) खोक्याच्या पुढे गेले आहे आणि त्याला मनी पॉवर म्हणतात. सर्वांना हे माहीत आहे. आता हे करोडो रूपये आहेत. माझा प्रश्न भाजपला आहे की, जर तुमचेच नेते म्हणतात की, भाजप व आरएसएसमध्ये मनी पॉवर आहे तर मग हे करोडो रूपये, अब्जोवधी रूपये भाजपला आणि आरएसएसला कोठून मिळतात ? तुम्हाला याचे उत्तर द्यावे लागेल आणि याचे उत्तर हेच आहे की, हे सर्व पैसे ज्याचा पुरवठा होतो, त्याला भ्रष्टाचाराशिवाय दुसरा मार्ग नाही. आम्ही भ्रष्टाचार कशाला सांगायचा ? तुमचेच नेते जगजाहीर सांगतात. स्टिंग



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. शरद रणपिसे ....

ऑपरेशन होते, हे नाही तर आणखी काय म्हणतात की, ब्लॅक मनी. भारतामध्ये 50 टक्क्यांच्या वर व्यवहार ब्लॅकमनीने होतात. हे त्यांचे वक्तव्य आहे. त्यांचा राग मोदी साहेबांवर आहे, देशाच्या माननीय पंतप्रधानांवर आहे. व्यापारी एवढा मदत करीत आहे, सोने-चांदी खरेदी करायला गेला, ते एक लाख रुपयांच्या वर असेल तर पॅन कार्ड पाहिजे. हे पॅन कार्ड चुकीचे आहे. माननीय पंतप्रधान मोदी साहेब निवडणुकीच्या अगोदर म्हणतात की, आम्ही परदेशातील काळा पैसा भारतात आणू, प्रत्येकाच्या बँक खात्यावर जमा होणार. आता तुमचे नेते कोणता दावा करतात हे मला माहीत नाही. पण त्यांनी 2 नेत्यांची नावे घेतली, यानंतर मी तिसरा श्रेष्ठ आहे. कदाचित मुख्यमंत्री पदाचे दावेदार असू शकतील. आम्हाला माहीत नाही. पण हेच नेते असे म्हणतात आणि ब्लॅक मनीला सपोर्ट करतात. देशातील व्यवहार काळ्या पैशावर चालला पाहिजे म्हणतात. कुठे चालला आहे भाजप, कुठे नेऊन ठेवला महाराष्ट्र माझा, कुठे घेऊन चालला आहात ? दादा, तुम्ही काहीही सांगत नाही, फक्त हसता. आमचे तुमच्यावर प्रेम असल्यामुळे आम्हालाही गप्प बसावे लागते. महिला व बालविकास विभागाबद्दल आमचे मित्र, सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप अतिशय चांगले बोलले आहेत, त्यांनी खूप चांगले मुद्दे मांडले आहेत. मी त्याची पुनरावृत्ती करीत नाही. 13 फेब्रुवारीचा उल्लेख झाला. भाजपच्या सर्व नेत्यांनी, माननीय मंत्र्यांनी लक्षात ठेवावे की, 13 फेब्रुवारीला आदरणीय वाजपेयी साहेबांचे सरकार गडगडले होते. 13 हा अशूभ आकडा आहे. माननीय मंत्र्यांना कसे माहीत नाही हे मला समजत नाही. एका दिवसांत 166 कोटी 78 हजार 175 रुपयांचे अंगणवाड्यांना पौष्टिक आहार व इतर साहित्याच्या संदर्भातील 24 जीआर निघाले. हा शासनाचा निर्णय एक पानाचा आहे. खरेदी कशी झाली ? 13 तारखेला जीआर काढला. 11 फेब्रुवारी, 2015 ला महिला व बालविकास विभागाच्या माननीय मंत्र्यांनी निधी वितरणाला मान्यता दिली. मी त्यापूर्वीचा इतिहास सांगत नाही. कारण तो सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप यांनी सांगितला आहे. 11 फेब्रुवारीला माननीय मंत्र्यांची मान्यता, 12 फेब्रुवारी हा एक दिवस मध्ये गेला आणि 13 फेब्रुवारीला 166 कोटी 78 हजार 175 रुपयांचे आदेश निर्गमित होतात.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.दीपकराव साळुंखे)**

श्री.शरद रणपिसे.......
एका दिवसात अंगणवाडीच्या मागण्या गोळा केल्या, त्याचे संकलन केले. क्वालिटी तपासली किंवा नाही, माहीत नाही. पुरवठादाराची क्षमता आहे किंवा नाही, हे कोणाला माहीत नाही. प्रशासन एवढे गतिमान की, एका दिवसात या सर्व गोष्टी केल्या. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप असे म्हणाले की, "हेलिकॉप्टरचा दौरा झाला की काय, माहीत नाही." पण मला असे म्हणावयाचे आहे की, हे करण्यासाठी रॉकेट लागेल. एकाच दिवसात महिला व बाल विकास आयुक्तांच्या सह्या, प्रधान सचिवांच्या सह्या, मंत्री महोदयांचीही सही, हा काय कारभार आहे दादा ? काय सांगायचे दादा ?

सभापती महोदय, मी काल सभागृहात एक हक्कभंगाची सूचना मांडली होती. ती कायदेशीर, भारतीय राज्य घटनेला धरुन, आपले सरकार ज्या नियमाने चालते, त्या नियमाने मांडली होती. माझा दावा आहे की, राज्यपाल महोदयांनी आपल्या अभिभाषणात दिनांक 12 नोव्हेंबर, 2014 रोजी सातव्या मुद्यामधून सांगितले आहे की, "शासनाकडून केल्या जाणाऱ्या खरेदीमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी ई-निविदा अनिवार्य करण्यात येईल." येथेच विषय संपला. त्या अगोदरचे सर्व जी.आर., धोरणे सर्व संपली. राज्यपाल महोदय हे या राज्याचे घटनात्मक प्रमुख आहेत. त्यांचे भाषण सर्व मंत्र्यांच्या संमतीने, मंत्रिमंडळाच्या मान्यतेने तयार होते. राज्यपाल महोदयांनी शासनाचे धोरण सांगत असताना मंत्र्यांनी ई-टेंडरिंग कम्पलसरी केले आहे, याबाबत विचार करु नये ? सन 1992 चा जी.आर., उद्योग खात्याचा जी.आर., रेट कॉन्ट्रॅक्टर, रेट फिक्सेशन चालणार नाही. या सभागृहामध्ये लोकशाही टिकली पाहिजे आणि राज्यपाल महोदयांची कोणीही अवहेलना करता कामा नये, ही आमची मागणी आहे. तुम्ही अवहेलना करता ?

सभापती महोदय, त्यानंतर मग राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाचा ठराव चर्चेला आला. एक दिवसाचे अधिवेशन झाले, आपण नागपूरला भेटलो. दिनांक 15 डिसेंबर, 2014 ला मुख्यमंत्री महोदय अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या ठरावावर बोलताना

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे.......

काय म्हणाले ? ते असे म्हणाले की, "आमचा कॉंट्रॅक्टरना विरोध नाही. परंतु, कोणतीही योजना कॉंट्रॅक्टर गिवन स्किम होता कामा नये. कॉंट्रॅक्टरने एखादी योजना आणावयाची आणि पैसे शिल्लक आहे म्हणून शेवटच्या आठ दिवसात ती लागू करायची, कोणत्या पुरवठादाराकडे साहित्य शिल्लक असेल म्हणून शेवटच्या महिन्यात शासन निर्णय काढायचा आणि त्या साहित्याची खरेदी करायची, त्याचा उपयोगच करायचा नाही, अशा प्रकारच्या अनेक घटना घडलेल्या आहेत म्हणून त्याचे सुसूत्रिकरण करणे गरजेचे आहे. जी खरेदी करायची ती पारदर्शकपणे करायची, जे आवश्यक आहे, त्याच गोष्टींची करायची" सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडेजी मुख्यमंत्री महोदयांचे शेवटचे एक वाक्य आहे, संपूर्ण कार्यवृत्त मी वाचत नाही. मुख्यमंत्री महोदय म्हणाले की, "आर.सी.चा जो प्रॉब्लेम आहे, तो बंदच करावा लागेल." राज्यपाल महोदयांनी धोरण जाहीर केले. मुख्यमंत्री महोदय संवेदनशील आहेत, आम्ही नाकारीत नाही. पण तुम्ही मुख्यमंत्री महोदयांचेही ऐकणार नाही, राज्यपाल महोदयांचेही ऐकणार नाही ? 17 डिसेंबरला याच आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावावर सभागृहाचे नेते आणि महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी सांगितले की, "ई-टेंडरिंग हे आपल्याला करावेच लागेल." आता सरकार एवढे प्रगतीशील, एवढे ॲक्टीव्ह की, 3 लाखाच्या वर ई-टेंडरिंग अनिवार्य करण्यात आले आहे, असा 18 डिसेंबरला लगेच जी.आर.आला.

सभापती महोदय, मी काल हाच मुद्दा मांडला. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरेजी आपण तो ऐकावयास हवा होता. मंत्री महोदयांना शिकवावे की, हे शासन राज्य घटनेच्या 166 कलमानुसार चालते. राज्य शासन कसे चालावे, या संदर्भात रूल्स ऑफ बिझनेस बनतात आणि त्याप्रमाणे राज्य शासन चालते. त्यामध्ये मुख्यमंत्र्यांचे काय अधिकार, कॅबिनेट मंत्र्यांचे काय अधिकार, इतर मंत्र्यांचे काय अधिकार, मुख्य सचिवांचे काय अधिकार आणि वेगवेगळ्या विभागाचे सचिव असतात त्यांचे काय अधिकार हे सर्व नमूद केलेले आहे आणि येथेच खरे तर माशी शिंकली. ज्यांनी ज्यांनी रेट कॉंट्रॅक्ट, रेट फिक्सेशननुसार केले असेल, रूल्स ऑफ बिझनेसप्रमाणे धोरणात्मक निर्णय म्हणून केले असेल, गव्हर्नर यांनी जाहीर केले आणि ज्याला मुख्यमंत्री

...3....

श्री.शरद रणपिसे.......

महोदयांनी पाठिंबा देऊन त्यासाठी जी.आर.निघाला त्यानुसार केले असेल त्या सर्व फाईल्स मुख्यमंत्र्यांच्या आदेशान्वये मंत्रिमंडळापुढे जावयास पाहिजे होत्या. हे रूल्स ऑफ बिझनेस शेड्युल 2 नुसार सांगते. या बाबी मुख्यमंत्र्यांच्या आदेशार्थ ठेवाव्या लागतात. म्हणून मी छातीठोकपणे म्हणेन की, भ्रष्टाचार तर आहेच पण राजकीय नेते आणि उच्चस्तरीय प्रशासकीय अधिकारी यांची ही गट्टी झालेली आहे, ती मोडून काढली पाहिजे. हे आम्ही या सभागृहामध्ये चालू देणार नाही डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी राज्यघटना दिलेली आहे आणि लोकशाहीचे अधिकार दिलेले आहेत. आम्ही हे चालू देणार नाही. देश भीकेला लागेल, देश पारतंत्र्यात जाईल, पुन्हा या देशाचे तुकडे तुकडे पडतील, हे पाप आपण करु नये, अशी विनंती मी या ठिकाणी करीत आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सांगितले की, चिक्की 75 कोटी रुपयांची आहे. त्या विषयावर मी बोलणार नाही. एकच संस्था, निकृष्ट दर्जा, त्यावर मी बोलणार नाही. माझा आणखी एक मुद्दा आहे. घाई झाली, काय झाले, जे झाले असेल ते झाले असेल. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, डिसेंबरमध्ये प्रस्ताव आला. डिसेंबर सोडा, निधी वापरु शकता म्हणून तुम्हाला 30 जानेवारीला एफ.डी.ने मान्यता दिली. फेब्रुवारीचे 28 दिवस आणि मार्चचे 31 दिवस धरले तर तब्बल 60 दिवसांचा कालावधी तुमच्याकडे होता. 60 दिवसांमध्ये ई-टेंडरिंग का केले नाही, हा प्रश्न आम्ही तुम्हाला विचारला पाहिजे. आज मुख्यमंत्री महोदय येथे नाहीत. श्री.मुंडे साहेब तुमच्या भाषणात तुम्ही त्यांना हा प्रश्न विचारा. आम्हाला याचे उत्तर पाहिजे. 24 जून आणि 30 जूनला कॉंग्रेस पक्षाचे अधिकृत प्रवक्ते श्री.सचिन सावंत यांनी लाचलुचपत प्रतिबंध विभागाच्या महासंचालकांकडे लेखी तक्रार केलेली आहे. तुम्हाला जाणीव नाही, सभागृह सुरु आहे, यामध्ये काय घडले ? 24 जूनच्या नंतर किती तरी कालावधी गेला. 15-20 दिवसात तुम्ही माहिती घेऊ शकत नाही ? माझी मागणी आहे की, उद्या अधिवेशन संपणार आहे. या अधिवेशन संपण्यापूर्वी गृह विभागाने कॉंग्रेस पक्षाने केलेल्या तक्रारीबाबत, ज्या बद्दल राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने आवाज उठविला आहे, त्याबाबत लाचलुचपत विभागाचा अहवाल सभागृहासमोर उद्याच्या उद्या आला पाहिजे आणि यामधील काळेबेरे शोधून काढले पाहिजे.

...4.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे.......

सभापती महोदय, आज महाराष्ट्रात आगीचा भडका किती उडावा ? मुलांना सुसंस्कृत करावयाचे, शिकवायचे तर शाळेतच आगीचा भडका. अग्निशमन यंत्राची मागणी 191 कोटी रुपयांची आहे. आजही एफ.डी.आणि प्लॅनिंग या दोन सख्ख्या बहिणींचा वचक आहे म्हणून यांच्यावर अंकुश आहे. अन्यथा, तोही राहिला नसता. एफ.डी.आणि प्लॅनिंग या दोन सख्ख्या बहिणी मंत्रालयात असतात त्या सहजा सहजी सोडत नाहीत.

यानंतर श्री.बोरले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे.......

त्यांनी अग्निशमन यंत्र खरेदी करण्याचा 191 कोटी रुपयांचा प्रस्ताव अडविला. परंतु, 191 कोटी रुपये किंमतीचा प्रस्ताव सादर होत असताना त्या अगोदरच 6 कोटी रुपयांचे अग्निशमन यंत्र खरेदी करण्यात आले आणि वित्त विभागाने आक्षेप घेतला की, मान्यताप्राप्त यादीमध्ये रेट कॉन्ट्रॅक्ट नाही. मग तुम्ही त्याला हे दिलेच कसे ? याची चौकशी लावण्यात आली आणि ही चौकशी शासनाच्या वित विभागाने लावलेली आहे. त्यामुळे हा सरळसरळ भ्रष्टाचाराचा प्रकार आहे. म्हणून मी अगोदर सांगितले की, मुख्यमंत्री महोदयांचे आदेश, मंत्रिमंडळाची मान्यता हा जो रूल्स ऑफ बिझनेस आहे त्याचे उल्लंघन येथे सुद्धा झालेले आहे. मंत्र्यांना हा अधिकारच नाही. अधिकाराच्या बाहेर जाऊन, मुख्यमंत्री महोदयांवर कुरघोडी करुन, मंत्रिमंडळाला काहीही न विचारता रेट कॉन्ट्रॅट आणि रेट फिक्सेशनने जी खरेदी झाली, ती सर्व बेकायदेशीर आहे.

सभापती महोदय, कृषी विभागाने बी-बियाणे, ब्रॉडबँड फेरो मशीन म्हणजे चारा यंत्र यांची खरेदी केलेली आहे. मला कोणी तरी म्हटले की, तुम्ही प्रस्तावात सारा असे लिहिले आहे. मी त्यांना सांगितले की, आमची चूक समजून घ्यावी, टायपिंग मिस्टेक झाली असेल. आपण 'स' ऐवजी 'च' करावे. मी सांगू इच्छितो की, या संदर्भात काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने तक्रार केलेली नाही. विदर्भातील भाजपच्या ज्येष्ठ नेत्याने या संदर्भात लेखी तक्रार नोंदविली आहे. 44,500 रुपयांना एक यंत्र खरेदी करण्यात आले आणि भारजपच्या त्या नेत्यांचे म्हणणे आहे की, हे सर्व बोगस आहे. (...अडथळा...) बघा, ताई सुध्दा म्हणतात की, बरोबर आहे. त्या कधी बोलत नाहीत. त्या राज्यपाल झाल्या पाहिजेत, त्यासाठी माझा पाठिंबा आहे. 44,500 रुपयांना एक यंत्र खरेदी करण्यात आले. भाजपच्या त्या नेत्यांनी सांगितले की, चाक फिरण्यासाठी जी मेटलची चेन आहे त्याचा काहीही उपयोग नाही आणि जी चक्ती बसविलेली आहे, ती ज्या ठिकाणी मेटलची असावयास पाहिजे त्या ठिकाणी फायबरची बसविली आहे आणि जे मेटल आहे ते निकृष्ट दर्जाचे आहे. ते बीबीएफ यंत्र आहे, त्याच्या डिझाईनमध्ये देखील फरक आहे. कॉन्ट्रॅक्टमध्ये काय अट आहे ? यंत्र खरेदी केल्यानंतर राज्य सरकारच्या अधिपत्याखाली असणाऱ्या पंजाबराव कृषी

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे.......

विद्यापीठाकडे जी यंत्रणा आहे त्या यंत्रणेकडून याची तपासणी करुन घ्यावी. परंतु, त्यांच्याकडून तपासणी करुन घेण्यात आली नाही. आम्ही तपासणी करु शकतो, असे एमएआयडीसीने सांगितले. तेथे काय सूर्य प्रकाश पडला हे आपण बघू. सूर्य प्रकाश पडला का दिव्याखाली अंधार आहे, हे आम्हाला बाहेर काढावे लागेल, आम्ही सोडणार नाही. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाकडून चाचणी करुन घेणे अनिवार्य असताना त्यांच्याकडून चाचणी करुन घेण्यात आली नाही आणि हैद्राबादच्या एका क्रीडा नावाच्या संस्थेकडून चाचणी करुन घेण्यात आली आणि सांगितले की, हे सर्व बरोबर आहे. मग हा भ्रष्टाचार नाही काय ? तुमच्याच रेट कॉन्ट्रॅक्टमध्ये जी अट आहे त्या अटीचे पालन न करता तुम्ही भलतीसलतीकडून याची तपासणी करुन घेता, हे योग्य नाही आणि पुन्हा हाच मुद्दा येतो की, राज्यपाल महोदयांची अवहेलना केली, मुख्यमंत्री महोदयांच्या अधिकारांवर अतिक्रमण केले, मंत्रिमंडळ सर्वोच्च आहे त्यांच्या अधिकारावर अतिक्रमण केले. म्हणून हे कॉन्ट्रॅक्ट सुद्धा बेकायदेशीर आहे, हे मी सांगू इच्छितो.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाबद्दल काय सांगावयाचे ? प्रश्नोत्तराच्या तासामध्ये आदिवासी विकास विभागाचा प्रश्न चर्चेला आला होता. सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेबांनी प्रश्न विचारुन बरोबर मुद्यावर बोट ठेवले. त्यांनी असा प्रश्न विचारला की, "यावर्षी आदिवासी विद्यार्थ्यांना वह्या पुरविण्याचे टेंडर काढण्यात आले होते काय, या टेंडर प्रक्रियेत काही गैरप्रकार आढळल्यामुळे या प्रक्रियेला मुख्यमंत्री महोदयांनी स्थगिती दिली होती, ही बाब खरी आहे काय ?" मंत्री महोदयांनी असे उत्तर दिले की, "सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे. शैक्षणिक साहित्य पुरविणाऱ्या टेंडरला मुख्यमंत्री महोदयांनी स्थगिती दिली आहे." सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप काय म्हणाले ते मी वाचून दाखवितो. माझ्याकडे इतिवृत्त आहे, ते मी वाचून दाखवित आहे. ते असे म्हणाले की, "मंत्री महोदयांनी दोन गोष्टी कबूल केलेल्या आहेत. पहिली गोष्ट म्हणजे, मुख्यमंत्री महोदयांच्या निदर्शनास ही गोष्ट आल्यानंतर त्यांनी स्थगिती दिली. दुसरी गोष्ट म्हणजे, यामध्ये काही गैरव्यवहार झालेला आहे, हे आपण मान्य केलेले आहे.

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे.......

गैरव्यवहार झाल्याशिवाय अशी स्थगिती मिळत नाही." मग आता भ्रष्टाचाराचे आणखी कोणते उदाहरण आम्ही तुम्हाला द्यायचे ? तुमचेच मंत्री सांगतात की, स्थगिती दिली. आम्ही विचारलेल्या प्रश्नाला त्यांनी उत्तरे दिलेली आहेत. मग आम्ही या संदर्भात काय करावयाचे, हे मी शासनाला विचारु इच्छितो. 15 रुपये किंमतीची वही 31 रुपयांना खरेदी केली. आम्हाला माहिती मिळते. तुम्ही मुलांच्या पौष्टिक आहारामध्ये खाता ? आपली संस्कृती काय आहे ? आपण लहान मुलांना तळ हातावरील फोडासारखे जपतो. आपल्याकडे कोणी पाहुणा आला तर त्याला प्रथम पाणी द्यावे, असे आपण सांगतो. तुम्ही लहान मुलांवर सुद्धा एवढा अन्याय करता आणि जे शिक्षण घेत आहेत त्यांच्या वह्यांमध्ये सुद्धा तुम्ही घोटाळा करता ? 15 रुपये किंमतीची वही 31 रुपयांना खरेदी केली आणि बूट खरेदी प्रकरणात देखील हायकोर्टाने स्थगिती दिली. 4.5 कोटी रुपये किंमतीचे बूट खरेदी करण्यात आले, चिक्की खाल्ली, वह्या खाल्ल्या, ताट खाल्ली, बूट.... (...अडथळा...) दादा, माझ्याकडे बघून आपण कमीत कमी हसावे तरी, दादा सरळ मार्गी आहेत. ही सर्व प्रकरणे सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी मांडली आणि मी देखील मांडली. माननीय विरोधी पक्षनेते या विषयावर बोलणार आहेत. ते देखील ही प्रकरणे मांडतील, पुरावे देतील. आता भ्रष्टाचाराचा वास तर नक्कीच येतो. परंतु, काही मंत्र्यांच्या वैयक्तिक गोष्टी आहेत, प्रतिज्ञापत्र आहे, डिग्री आहे. मला असे वाटते की, सभागृहाचा तो विषय नाही. आपण आपल्या सहकारी मित्रांचा आदर केला पाहिजे. आपण वैयक्तिक गोष्टीमध्ये जाता कामा नये. (...अडाळा...) प्रश्न असा आहे की, मी हे सर्व रामायण सांगितले. आता रामाची सिता कोण आहे, हे विचारु नका आणि ते सख्खे तुमच्याकडेच बसलेले आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळात जसे केसरी वृत्तपत्रात सरकारचे डोके फिरले आहे का असे लेख छापून येत होते, आता असेच अग्रलेख रोज दैनिक सामना वृत्तपत्रात छापून येतात. स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल आपणा सर्वांनाच आदर आहे, याबद्दल प्रश्नच नाही. परंतु, आज जर ते हयात असते आणि त्यांच्या हातात काठी असती तर डोकी फोडली असती. आम्ही मागणी करीत नाही की, राजीनामा द्यावा, हे करावे, ते करावे. सामना आणि

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे.......

शिवसेना यांचे जे नाते आहे, मी नाव घेत नाही, परंतु शिवसेना पक्षाचे प्रवक्ते, जे वरच्या सभागृहाचे सदस्य आहेत, त्यांनी प्रेसला जाहीरपणे सांगितले की, किमान 2 कॅबिनेट मंत्र्यांनी ताबडतोब राजीनामा दिला पाहिजे आणि जोपर्यंत त्यांचे निर्दोषत्व सिद्ध होत नाही तोपर्यंत त्यांनी मंत्रिमंडळाच्या बाहेर राहावे.

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.शरद रणपिसे...

आमचे ऐकू नका, परंतु तुमच्या सहकारी पक्षाचे आपण ऐकावे, सामना वर्तमानपत्राचे काय म्हणणे आहे ते ऐका, ते देखील तुम्ही ऐकत नाहीत. म्हणून या निमित्ताने आम्ही मागणी करतो की, ज्या मंत्री महोदयांनी रूल्स ऑफ बिझनेसचे उल्लंघन केले, ज्यांनी राज्यपाल महोदयांच्या आदेशाची अवहेलना केली, ज्यांनी भारतीय राज्य घटनेच्या कलम 166 चे उल्लंघन केले, त्या अधिकाऱ्यांना पहिल्यांदा सस्पेंड करावे. मंत्री महोदयांवर तातडीने कारवाई करुन त्यांचे राजीनामे घ्यावेत, अशी मागणी मी या निमित्ताने करतो व माझे भाषण संपवितो.

----------

....2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मी पॉईंट ऑफ प्रोसिजरवर बोलण्यासाठी उभा आहे, नियम 260 अन्वये सभागृहात ज्या प्रस्तावावर चर्चा सुरु आहे, त्याबाबात सहा विभागाच्या मंत्री महोदयांवर आरोप करण्यात आले आहेत, त्या विभागाची सभागृहात चर्चा सुरु आहे. महिला बाल विकास, शालेय शिक्षण, वित्त विभाग, आरोग्य आणि कृषी विभाग या सहा विभागात झालेल्या गैर कारभारावर चर्चा सुरु असून आता माननीय विरोधी पक्ष नेते बोलणार आहेत. आता फक्त आरोग्य खात्याचे मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. पाच खात्याचे मंत्री महोदय उपस्थित नाहीत. माननीय मंत्री श्री.चंद्रकांत पाटील लिहून घेत असले तरी असे अपेक्षित आहे की, विरोधी पक्ष नेते बोलणार असताना संबंधित मंत्री महोदयांनी उपस्थित राहिले पाहिजे. आता सभागृहात फक्त एकाच विभागाचे मंत्री महोदय उपस्थित आहेत. संबंधित विभागाचे राज्य मंत्री उपस्थित असले तरी विषयाचे गांभीर्य लक्षात घेणे आवश्यक आहे. कॅबिनेट मंत्री महोदयांनी सभागृहात उपस्थित राहणे अपेक्षित आहे. मंत्रिमंडळाची एकत्रित जबाबदारी आहे हे मी समजू शकतो.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, या ठिकाणी पाच ते सहा विभागांच्या संदर्भात अतिशय संवेदनशील चर्चा सुरु असताना त्या त्या विभागाचे किमान राज्यमंत्री महोदय उपस्थित राहिले पाहिजे. विधानसभा चालू आहे याची आम्हाला माहिती आहे, तेथे कॅबिनेट मंत्री उपस्थित असतील. मंत्री महोदयांनी सभागृहात उपस्थित रहावे असे सभापती महोदयांनी आदेश द्यावेत.

**तालिका सभापती (श्री.दीपकराव साळुंखे)** : संबंधित मंत्री महोदयांना बोलविण्याच्या सूचना देण्यात येत आहेत.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आम्ही गेल्या अनेक वर्षापासून सभागृहात काम करीत आहोत, सरकारमध्ये काम केलेले आहे. आमच्या विभागाची चर्चा ज्यावेळी सभागृहात उपस्थित होत होती त्यावेळी आम्ही उपस्थित रहावे असे बंधन सन्माननीय सदस्य या बाजूला असताना करीत होते. आज सभागृहात गंभीर विषयावर गांभीर्याने चर्चा सुरु आहे. माननीय मंत्री श्री.चंद्रकांत पाटील हे सरकार मंत्री आहेत, वरिष्ठ नेते आहेत, भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांशी त्यांची फार जवळीक आहे, हे सर्व आम्हाला मान्य आहे. सभागृहाच्या कामकाजासाठी त्या गोष्टीचा काहीही उपयोग होणार नाही. असे लिहून घेणे चालत नाही, त्या त्या विभागाच्या मंत्री महोदयांनी सभागृहात उपस्थित राहणे अनिवार्य केले पाहिजे. विधानसभेत मराठवाड्याच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे...

विषयावर चर्चा सुरु आहे, यापेक्षा वेगळे तेथे काही सुरु नाही. त्यावेळी सर्व मंत्री महोदयांचे त्या सभागृहात काय काम आहे. ज्या विभागांवर आरोप करण्यात आले त्या विभागाची चर्चा नियम 260 अन्वये उपस्थित करण्यात आली आहे. या विषयावर नियम 289 अन्वये सूचना दिली होती. या विषयाबाबत एक विशेष हक्कभंगाची सूचना देण्यात आली आहे. सभागृहाला टाळून आपण मोकळे राहू असे कोणाला वाटत असेल तर तसे होणार नाही. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांचा मी आदरपूर्वक उल्लेख एवढ्यासाठी करतो की, आपल्यावर जेव्हा आरोप झाले तेव्हा आपणाला राजीनामा देण्यास भाग पाडले गेले होते. आपल्याविरुध्द चौकशी नेमली गेली होती. तो न्याय इतरांना का नाही हा प्रश्न चर्चेच्या वेळी विचारण्यात येईल. सभागृहात या विषयावर गांभीर्याने चर्चा होत असताना काय विषय मांडण्यात येत आहेत हे ऐकण्यासाठी संबंधित मंत्री महोदयांनी उपस्थित राहणे हे रूल्स ऑफ बिझनेसमध्ये आहे. हा सामुदायिक जबाबदारीचा भाग नाही, मंत्री महोदयांनी उपस्थित रहावे अशा सूचना आपण द्याव्यात व मंत्री महोदय उपस्थित होईपर्यंत सभागृहाची बैठक 5 किंवा 10 मिनिटांसाठी स्थगित करावी.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी असे सांगितले की, मला राजीनामा मागितला होता, मी राजीनामा दिलेला नव्हता, मी स्वतःहून न्यायालयीन चौकशी मागितली होती, त्यामुळे चुकीचे रेकॉडवर राहू नये.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेता) सभापती महोदय, विरोधी पक्षाने उपस्थित केलेल्या वि.प.वि.नियम 260 अन्वये सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे व इतर सन्माननीय सदस्यांनी राज्यातील विविध खात्याच्या घोटाळ्या संदर्भात प्रस्ताव मांडलेला आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी भारतीय जनता पक्षाचे विधानसभेच्या अगोदरचे दृष्टीपत्र त्यातील संदर्भ व कवितेसह सभागृहात वाचून दाखविले आहे. ही विधानसभा गठीत होण्याअगोदर राज्यात आघाडीचे सरकार होते. विधानसभेची निवडणूक लागल्यानंतर आघाडी सरकार किती वाईट आहे, राज्यकर्ते किती वाईट आहेत, त्या सरकारमध्ये किती घोटाळे झाले, याबाबत संपूर्ण राज्यभर भारतीय जनता पार्टीच्या नेत्यांनी बोंब मारली होती. आम्हाला सत्तेवर आणा, आम्ही या राज्याला पारदर्शक सरकार देऊ, आम्ही या राज्याला गतीमान सरकार देऊ, आम्ही या राज्याला भ्रष्टाचार मुक्त सरकार देऊ असा शब्द भारतीय जनता पक्षाने विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचारात राज्यातील जनतेला दिला होता.

सभापती महोदय, मला वाईट एका गोष्टीचे वाटते की, राज्यातील जनतेने भारतीय जनता पक्षाचे नेते प्रचारात जे बोलले त्यावर विश्वास ठेवून विधानसभेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला 122 जागांवर निवडून दिले. या लोकांनी पारदर्शक, गतीमान व भ्रष्टाचार मुक्त सरकारचे स्वप्न जनतेला दाखविले होते. सत्तेत आल्यावर तिसऱ्या अधिवेशनात या राज्यातील मंत्रिमंडळातील घोटाळ्याची चर्चा सभागृहात व्हावी ही सर्वात मोठी दुर्दैवाची गोष्ट महाराष्ट्राच्या जनतेसाठी आहे. राज्यातील जनतेला असे वाटले होते की, आम्ही मतदान केले व आम्ही ज्या लोकांना सत्तेवर बसविले ते पारदर्शक गतीमान आणि भ्रष्टाचार मुक्त काम करतील.

सभापती महोदय, या प्रस्तावावर मी बोलत असताना जे घोटाळे झाले त्याचे पुरावे आपल्या माध्यमातून सरकारला देणार आहे. ज्यावेळी हा घोटाळा समोर आला त्यावेळी माध्यमामध्ये या घोटाळ्याबाबत चर्चा सुरु झाली होती. ही चर्चा सुरु झाल्यावर माननीय मुख्यमंत्री महोदयांना माध्यमांनी विचारले व मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले की, हे आरोप विरोधकांचे आहेत.

या नंतर श्री.भोगले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

जर विरोधकांकडे पुरावे असतील तर ते पुरावे आमच्याकडे द्यावेत, आम्ही चौकशी करण्यास तयार आहोत. या राज्याच्या सन्माननीय महिला व बालकल्याण मंत्री यांचा टीव्ही वरील खुलासा आम्ही ऐकला. त्या खुलाशामध्ये सुध्दा त्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, आम्ही कोणत्याही चौकशीला तयार आहोत. हे मी माझ्या मनातील सांगत नाही. माझी एवढीच मागणी आहे की, युती सरकारच्या काळातील एक आदर्श उदाहरण आपल्यासमोर आहे, माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस या युती सरकारच्या मंत्रिमंडळामध्ये सदस्य असताना त्यांच्यावर आरोप झाले असताना त्यांनी स्वत:हून मंत्री पदाचा राजीनामा दिला होता. त्या आदर्शाची अंमलबजावणी व्हावी.

सभापती महोदय, मी एक एक पुरावा आपल्या माध्यमातून देणार आहे. माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी काल महिला व बालकल्याण मंत्र्यांविरुध्द विशेषाधिकार भंगाची सूचना मांडली आहे. मी पुन्हा तो संदर्भ देणार नाही. माननीय राज्यपालांचे अभिभाषण हे सरकारला दिशा देणारे असते. सरकारने ते अभिभाषण तयार केलेले असते. त्या अभिभाषणामध्ये खरेदीच्या संदर्भात ई निविदेचा स्पष्ट उल्लेख असतानाही राज्य मंत्रिमंडळातील मंत्र्यांनी ती पध्दत डावलून ई निविदेचा अवलंब न करता दर करारावर खरेदी का केली?

सभापती महोदय, अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना माननीय मुख्यमंत्र्यांनी स्पष्टपणे सांगितले होते की, दर करारानुसार पूर्वी ज्या खरेदी व्हायच्या, त्या कॉन्ट्रॅक्टर धार्जिण्या होत्या, म्हणून त्या बंद झाल्या पाहिजेत व ई निविदांद्वारे खरेदी केली पाहिजे. नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात दिनांक 15 डिसेंबर, 2014 रोजी माननीय मुख्यमंत्र्यांनी हा विषय सभागृहात मांडला होता व 18 डिसेंबरला शासन निर्णय निर्गमित झाला. या शासन निर्णयाबाबत याच मंत्रिमंडळातील मंत्र्यांनी स्वत: खुलासा करताना आक्षेप घ्यावा यासारखे दुसरे दुर्दैव नाही. हा शासन निर्णय काय सांगतो? कोणते पुरावे तुम्हाला पाहिजेत? शासन निर्णयात स्पष्ट म्हटले आहे की, शासकीय खरेदी प्रक्रिया जास्त पारदर्शक, परिणामकारक, गतिमान करण्यासाठी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

1) ई निविदा प्रणाली वापर शासनाने सर्व विभाग, सर्व शासकीय विभागाच्या आधीन असलेली कार्यालये, ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था, सार्वजनिक उपक्रम आणि मंडळे, माहितीचा अधिकार कायदा अधिनियम, 2005 मधील कलम 4 प्रमाणे यांना बंधनकारक राहील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

2) सर्व शासकीय विभागात सध्या माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत उपलब्ध असलेल्या एनआयसी ई निविदा प्रणाली व सी.पी.नेट सेंटरचा वापर करण्यात येत आहे. सर्व विभागांनी प्राधान्याने एनआयसी प्रणालीचा वापर करावा.

हा शासन निर्णयाचा पुरावा मी आपल्याला देत आहे.

सभापती महोदय, माझे शासनाला आवाहन आहे की, दिनांक 18 डिसेंबर, 2014 नंतर शासन निर्णय निर्गमित केला असल्यास तो शासनाने दाखवावा आणि ई निविदेबाबत सरकारने जो निर्णय घेतला तो चुकीचा आहे, हा निर्णय झाल्यानंतर सुध्दा दर करारावर खरेदी करता येते याबाबत शासनाने खुलासा केला पाहिजे. शासनाने या शासन निर्णयातील अटींचे उल्लंघन करुन खरेदी झालेली आहे. माहितीच्या अधिकाराचा कायदा 2005 मध्ये मंजूर झाला. त्या कायद्याच्या अंतर्गत शासकीय विभागांचे सर्व निर्णय विभागाच्या संकेतस्थळावर असायलाच पाहिजेत. मी या ठिकाणी हे बोलत असताना आजच्या तारखेपर्यंत महिला व बालकल्याण विभागाचे 12 व 13 डिसेंबर, 2014 या तारखेचे निर्णय संकेतस्थळावर नाहीत. हा माहितीच्या अधिकाराचा आणि शासन निर्णय संकेतस्थळावर नसल्याचा पुरावा मी देत आहे.

सभापती महोदय, संपूर्ण देशात एक विषय गाजला. चिक्की घोटाळा, चिक्की घोटाळा, चिक्की घोटाळा हा विषय काय आहे याची सर्वांना उत्सुकता लागून राहिली होती. खरे तर सगळ्यांनी हा विषय समजून घेतला पाहिजे. हा विषय मंत्रालयीन विभागांच्या सचिवांना आणि मंत्र्यांनाही कळलेला नाही. राज्यातील 60 लाख बालकांना पुरविण्यात यावयाच्या चिक्की खरेदीचा हा विषय आहे. प्रती बालक एक रुपयाप्रमाणे महागाई वाढ आलेली आहे. त्या वाढीच्या संदर्भात सन्माननीय मंत्र्यांनी जो खुलासा केला त्यात असे म्हटले होते की, केंद्र सरकारकडून आलेला पैसा आहे, तो आम्हाला वेळेत खर्च करावयाचा होता, म्हणून आम्ही एवढी गती दाखविली आणि 80 कोटी रुपयांची चिक्की खरेदीची ऑर्डर दर करारानुसार दिली. आजही माझी शासनाला विनंती आहे की, सूर्यकांता महिला सहकारी संस्थेला 80 कोटी रुपयांची चिक्की पुरवठ्याची ऑर्डर दिली त्या संस्थेचा दर करार दाखवावा. दर करार दाखविला तर मी राजीनामा द्यायला तयार आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

दर करार नसून ती दर निश्चिती आहे. अशा दर निश्चितीनुसार एवढ्या मोठया प्रमाणात ऑर्डर देऊ नये, असे आदेश हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाने दिलेले आहेत.

..3...

30-07-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) X.3

SGB/ AKN/ KTG/ KTG/ AKN/ 14:50

श्री.धनंजय मुंडे.....

सभापती महोदय, सूर्यकांता महिला सहकारी संस्था ही परिशिष्ट 5 मधील संस्था आहे. ज्या संस्था महिलांसाठी, अंध व अपंगांसाठी काम करतात अशा संस्थांबाबत रिझर्व्हेशन ठेवून त्यांचे दर घेऊन दर निश्चिती केली जाते. त्या संस्थांना 50 लाख ते 1 कोटी रुपयांपर्यंतची कामे दिली जातात. अशी ही सूर्यकांता महिला सहकारी संस्था आहे. 2012 मध्ये अशा परिशिष्ट 5 मधील संस्थांकरिता हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाने निर्णय दिला होता. त्या निर्णयानुसार परिशिष्ट 5 मध्ये असणाऱ्या सर्व संस्थांचे रिझर्व्हेशन काढून टाकण्यात आले.

सभापती महोदय, मी माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी मांडलेल्या मुद्याकडे वळतो. 2013 मध्ये पुरवठा आदेश दिल्याच्या संदर्भात जो मुद्दा उपस्थित झाला त्या बाबतचा मंत्र्यांचा खुलासा आम्ही ऐकला. तत्कालीन सरकारने सूर्यकांता महिला सहकारी संस्थेला जशी ऑर्डर दिली तशीच आम्ही दिली. हे बोलण्यातील मतितार्थ संपूर्ण राज्यातील आणि देशातील जनतेला अधिक स्पष्ट होतो. हे खरे आहे की, 2013 मध्ये आदिवासी विकास विभागाने सूर्यकांता महिला सहकारी संस्थेला चिक्की पुरवठयाची ऑर्डर देण्याबाबत फाईल मूव्ह केली होती.

नंतर वाय.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

त्या फाईलवर तत्कालीन सचिवांनी एवढी मोठी चिक्कीची ऑर्डर देऊ नये असे फाईलवर लिहिले आहे. त्यातील कंटेन्ट मी आपल्याला वाचून दाखवितो. त्यानंतर मी मूळ मुद्यावर येतो. दर निश्चिती आणि दर करार यातील फरक सरकारच्या लक्षात आला नसेल का तो फरक जाणीवपूर्वक टाळला कारण यात आपले हात गरम करायचे होते हे कारण होते काय हे सुद्धा आम्हाला समजायला पाहिजे. सूर्यकांताच्याबाबतीत असे म्हटल आहे की, "The CSO has rate contract for chikki. There is only a rate fixation." ओपन टेंडरने दर मागविले जातात आणि रेट कॉंट्रॅक्ट वेगळे आहे. सूर्यकांताला दर निश्चितीने काम देण्यात आले होते. दर करारावर काम देण्यात आले नव्हते. "It only means that the rate is reasonable, it does not mean that it is a competitive rate fixation. It is only meant for the small orders and reservation is given for certain items produced by Women's Group, Societies, Organisations of Ex-servicemen, blind, handicapped persons, etc. In the present case, where purchase is not due of 37.07, it is advised that purchase whereon rate fixation would not be appropriate. Open tender procedure needs to be followed wherein specifications and standards are clearly spelt out." तत्कालीन सचिव श्रीमती रस्तोगी मॅडम यांनी ही नोट लिहिलेली आहे. त्यानंतर प्रधान सचिवांनी 37 कोटी रूपयाच्या ऑर्डरला स्टे दिलेला आहे. ऑर्डर देण्यात आणि स्टे करण्यामध्ये दीड ते दोन महिने गेले.

सभापती महोदय, आता मी मूळ मुद्यावर येतो. महिला व बालविकास मंत्री यांच्या निदेशानुसार तसेच सन्माननीय प्रधान सचिव, महिला व बालविकास यांच्या मार्गदर्शनानुसार पूर्वीचे सर्व प्रस्ताव रद्द करून आम्ही खालील प्रस्ताव याठिकाणी मंजूर करीत आहोत अशा आशयाचे जी.आर.निघाले आहेत. 206 कोटी रूपयांचे 24 शासन निर्णय अशा पद्धतीने निघाले आहेत. हे झाले 12 तारखेचे. माझा आक्षेप हा आहे की, आपण मागचे प्रस्ताव रद्द केले आहेत ते नेमके काय होते ? ते सुद्धा समोर येणे आवश्यक आहे. ते का रद्द केले हे देखील समोर येणे आवश्यक



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

आहे. मी आपल्याला जबाबदारीपूर्वक हा पुरावा देत आहे. 12 तारखेच्या मिटींगमध्ये लाडूचा प्रस्ताव आला होता तो रद्द केलेला आहे. हा प्रस्ताव राजगिरा लाडूचा होता. हा प्रस्ताव 15 कोटी रूपयांचा होता. त्यानंतर शेंगदाणा लाडूचा देखील प्रस्ताव होता. हा प्रस्ताव देखील सूर्यकांताचा होता. तो 14 कोटी रूपयांचा होता. दोन्ही मिळून 29 कोटी रूपयांचे प्रस्ताव होते. मग या प्रस्तावांमध्ये बदल करून आपण हा प्रस्ताव 80 कोटी रूपयांचा कसा काय केला आहे, तो कुठल्या आधारावर केला आहे? त्याच बरोबर गोवर्धन आयुर्फार्मा बिस्कीटचा देखील विषय आहे. तो विषय देखील मी आपल्याला सांगणार आहे. गोवर्धन आयुर्फार्माचा 13 कोटी रूपयाचा प्रस्ताव होता. हे पुरावे शासनाने मागचे जे प्रस्ताव रद्द केले आहेत त्यातीलच असून ते शासनानेच दिलेले आहेत. ते मी आपल्याकडे देतो. लाडूची चिक्की का झाली ? मी जबाबदारीपूर्वक सांगतो की, 2013 मध्ये सूर्यकांताला ऑर्डर दिली होती. ती नंतर रद्द झाली. दीड महिन्यामध्ये सूर्यकांताने चिक्की बनवून ठेवली होती. ती चिक्की नंतर आता वाटप करण्यात आलेली आहे. त्यानंतर घोटाळ्याच्यासंबंधातील विषय आले. त्यावेळी मंत्र्यांचे खुलासे देखील आले. ते आम्ही पाहिले. त्यातील एक गोष्ट सामान्य नागरीक म्हणून माझ्या मनाला लागली. माध्यमांनी विचारले की, या चिक्कीमध्ये आता अळ्या सापडत आहेत. लोखंड, ब्लेड सापडत आहे. त्यावेळी सन्माननीय मंत्री म्हणाल्या की, हे आताच कसे काय सापडत आहे ? हे सर्व चुकीचे आहे. त्याच वेळी या सन्माननीय मंत्र्यांनी त्या गोष्टीची दखल घेऊन सूर्यकांता चिक्कीचा पुरवठा थांबविला असता तर आम्हालाही सन्माननीय मंत्र्यांचा बाणेदारपणा कळला असता की, होय चुकीचे झाले. त्या गोष्टीचे समर्थन मंत्री या राज्यात करीत नाही. पण ती चूक पाठीशी घातली आणि 2013 मध्ये तयार झालेली चिक्की आता वाटप करण्यात आली. त्यामुळेच राजगिराच्या चिक्कीत अळ्या सापडल्या आहेत. यासाठीच लाडूची चिक्की झाली आहे. 30 कोटी रूपयाची ऑर्डर 80 कोटी रूपयांची झाली आहे. ..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

सभापती महोदय, मी येथे बोलत असताना 2-3 पुरावे देण्याचे राहून गेले आहे. मी आपणाकडे हा सगळा बंच देतो. मी नागपूर खंडपीठातील रिट-पीटीशन नंबर सांगितला आहे. नागपूर खंडपीठाने संस्थेच्या परिशिष्ट 5 संबंधी निकाल दिलेला आहे. 12 तारखेला सूर्यकांताला ऑर्डर देण्यात आलेली आहे. वैद्य इंडस्ट्रीला ऑर्डर देण्यात आलेली आहे. त्यानंतर वॉटर प्युरिफायर दिलेले आहे, ताट दिलेले आहे, वाट्या दिलेल्या आहेत. बिस्कीटे दिलेली आहेत. चटया दिलेल्या आहेत. पावडर दिली आहे. या सगळ्या प्रकरणांमध्ये मला एक गोष्ट आपल्या सर्वांच्या निदर्शनास आणावयाची आहे. नागपूर खंडपीठाने रेट कॉन्ट्रॅक्टच्या आणि दर निश्चिती निर्णय दिल्यानंतर तत्कालीन मुख्य सचिवांनी सर्व विभागाच्या सचिवांची बैठक घेतली. त्या बैठकीचे मिनिटस् मी आपल्याला पुरावे म्हणून देतो. उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचा शासन निर्णय 3.1.1992 मधील परिशिष्ट पाच मधील शासनाचे अंगीकृत व्यवसाय सहकारी संस्था, अंध व अपंग, यांच्या धर्मादाय संस्थ्ा, इतर संस्था यांना उत्पादित केलेल्या वस्तूसाठी आरक्षण देण्यात आले आहे. अशा संस्थेच्या उत्पादित वस्तूंची दर निश्चिती ई-निविदा पद्धतीने न करता शासन निर्णयातील भंडार खरेदी समितीमार्फत केली जात आहे. परंतु, माननीय उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाने प्रीती महिला मंडळ बचत गट गडचिरोली व इतर विरुद्ध महाराष्ट्र शासन, श्री जगदंबा महिला रेडिमेड या सगळ्या परिशिष्ट पाच मधील संस्था आहेत.

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

याचिका क्रमांक 2545 प्रकरणी न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार त्यावेळच्या मुख्य सचिवांनी सर्व विभागाच्यास सचिवांना आदेश दिले की, अशा संस्थाची दर निश्चिती करण्यात येऊ नये, यापुढे जाहीर पद्धतीने निविदा मागवून नियमानुसार खरेदी प्रक्रिया करावी. त्या आदेशाची प्रत मी आपणास देतो.

सभापती महोदय, सूर्यकांता कंपनीस 80 कोटी रुपयांची ऑर्डर दिली. त्याचप्रमाणे 206 कोटी रुपयांच्या वेगवेगळ्या ऑर्डर्स दिल्या. या ठिकाणी 12 तारखेचा संदर्भ दिला जातो. महिला व बाल विकास विभागाने मला लेखी कळविले आहे की, दिनांक 12 रोजी अशी मिटींग झाली नाही. ही अतिशय गंभीर बाब आहे. 12 तारखेला मिटींग झाली नसेल तर मग 206 कोटी रुपयांचा शासन निर्णय झाला कसा ? 13 तारखेला 206 कोटी रुपयांच्या ऑर्डर्स काढण्यात आल्या त्यामध्ये 12 तारखेच्या मिटींगचा संदर्भ दिलेला आहे. मंत्री महोदयांचा आणि सचिवांचा संदर्भ दिलेला आहे. हे प्रस्ताव कसे आले ? हे सरकार किती गतिमान आहे हे देखील मी आपणास सांगतो. दिनांक 12 रोजी अशी बैठक झाली नाही अशा आशयाचे पत्र महिला व बाल विकास विभागाने मला दिलेले आहे. ते पत्र मी आपल्या माहितीसाठी देतो. त्यांच्याच विभागाने हे पत्र दिलेले आहे, माझे काहीच नाही. याबाबतीत आम्ही आणखी कोणते पुरावे द्यायचे ? आपण ज्या 206 कोटी रुपयांच्या ऑर्डर्स दिल्या त्या संदर्भात मिटींग झाली नाही तर मग कोठे बसून या ऑर्डर्स दिल्या ? कोणी ऑर्डर्स दिल्या, प्रस्ताव कसे आले, सचिवांनी काय केले , मंत्र्यांनी काय केले, हे आम्हाला कळायला नको काय ? 206 कोटी रुपयांचा प्रश्न आहे.

सभापती महोदय, ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी या ठिकाणी सांगितले की, माननीय आदिवासी मंत्र्यांनी प्रश्नोत्तराच्या तासात उत्तर देत असताना ई-निविदेद्वारे 19 कोटी रुपयांच्या वह्या खरेदीसाठी फक्त तिघेजण क्वॉलिफाय झाले. ते प्रोसिडींगवर आहे. त्यानंतर तिघांकडून वह्या मागविण्यात आल्या. या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांकडे तोंडी तक्रार आली म्हणून आम्ही ती खरेदी स्थगिती केली,असे माननीय आदिवासी विकास मंत्र्यांनी सांगितले. त्यांनी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

पुढे असेही सांगितले की, आम्ही या वह्या प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविलेल्या आहेत. वह्यांची क्वालिटी तपासण्यासाठी त्या प्रयोगशाळेत पाठविण्यात आल्या. प्रयोगशाळा आहे किंवा नाही याबाबतीत मी काही बोलणार नाही. 80 कोटी रुपयांची चिक्कीची ऑर्डर देताना ती चिक्की लहान मुलांसाठी खाण्या योग्य आहे किंवा कसे हे मंत्री महोदयांना किंवा सरकारला तपासावेसे वाटले नाही काय ? या ठिकाणी सांगण्यात आले की, व्यक्तिगत आरोप केले जातात. आज मला या गोष्टीचा खुलासा करावयाचा आहे. विरोधी पक्ष नेता म्हणून माझी जबाबदारी काय आहे ते सांगतो. मी आज या विषयावर पहिल्यांदा सभागृहात बोलत आहोत. यापूर्वी मी बाहेर याची कोठेही वाच्यता केली नाही. माझ्यावर आरोप झाले. ते का झाले हे मला माहीत नाही. यामध्ये त्यांना काय मिळवावयाचे होते हे देखील मला माहीत नाही. मला माननीय मुख्यमंत्र्यांकडून एका गोष्टींचा खुलासा पाहिजे. दिनांक 20 मे रोजी राज्याचा विरोधी पक्ष नेता म्हणून मी मुख्यमंत्री महोदयांना भेटलो होतो. माझ्यासोबत सन्माननीय सदस्य सर्वश्री हेमंत टकले, जयंतराव जाधव आणि अन्य सदस्य होते. मी आठ आमदारांचे शिष्टमंडळ घेऊन माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलो होतो. मी आज आपल्याकडे जे पुरावे देत आहे, तेच पुरावे मी त्यांच्याकडे दिले. 206 कोटी रुपयांच्या ऑर्डर्सच्या बाबतीत निवेदन दिले. त्या निवेदनासोबत मी वेगळे चार निवेदने दिली. त्यामध्ये पीक विम्याचे निवेदन होते. सरकारने पीक विम्याचे 1600 कोटी रुपये जाहीर केले. शेतकऱ्यांना पीक विम्याचे पैसे लवकर मिळाले पाहिजेत हे सांगण्यासाठी ते निवेदन होते. या संबंधातील सर्व पुरावे त्या निवेदनासोबत जोडून माननीय मुख्यमंत्र्यांना प्रत्येक ऑर्डर दाखविली आणि हात जोडून एवढीच विनंती केली की, हा विषय बाहेर येण्यापूर्वी त्यांनी आजच्या आज या खरेदीला स्थगिती द्यावी. आम्हाला संवेदनशील मुख्यमंत्री महोदयांकडून एवढीच अपेक्षा होती. कारण त्याच दिवशी या ऑर्डरसे सर्व पैसे रिलिज होत होते. मी माननीय मुख्यमंत्री महोदयांकडे चार निवेदन दिल्यानंतर या चार निवेदनांच्या बाबतीत माध्यमांसमोर येऊन सांगितले की, आम्ही मुख्यमंत्री महोदयांकडे पीक विम्याची मागणी केली. आणखी दोन सार्वजनिक निवेदनाची मागणी केली. पण मी या घोटाळ्याच्या बाबतीत एक अवाक्षरही बोललो नाही. मी आता हे सभागृहात बोलत आहे.ज्या संवेदशनशीलतेने



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

आदिवासी मुलांच्या चादरी खरेदीच्या बाबतीत आताचे माननीय मुख्यमंत्री त्यावेळी विरोधी पक्षाचे सदस्य असताना ज्या तळमळीने बोलत होते, ते खरेदी केलेल्या चादरी सभागृहात घेऊन आले होते, अशाप्रकारच्या चादरी आदिवासींच्या मुलांना पांघरण्यासाठी देता काय असा त्यांनी प्रश्न केला होता. मी सभागृहातील गॅलरीमध्ये बसून त्यांचे भाषण ऐकत होतो. चादरी खरेदीच्या बाबतीत विरोधी पक्षाचा आमदार इतका संवेदनशील आहे. त्यांच्या बोलण्याने माझा असा समज झाला की, श्री.देवेंद्र फडणवीस माननीय मंत्री महोदयांना समोरचा माईक तोडून त्यांच्यावर मारतील की काय इतका राग मी त्यांच्यात पाहिला होता. मी माननीय मुख्यमंत्र्यांकडे निवेदन दिल्यानंतर माझी माफक अपेक्षा होती की, राज्याचे संवेदनशील मुख्यमंत्री हे प्रकार लगेच थांबवतील. मी त्यांना हे देखील सांगितले होते की, आजच पैसे जाणार आहेत, तेव्हा आपण हे थांबवावे. दिनांक 13 रोजी ऑर्डर काढताना सांगितले की, आम्हाला हे पैसे लवकर खर्च करायचे आहेत, मग आपण 20 मे रोजी पैसे कसे दिले ? जे पैसे आपल्याकडे डिसेंबर महिन्यात आले होते. यामध्ये फार मोठा भ्रष्टाचार झालेला आहे. लहान मुलांना द्यावयाच्या चिक्कीची प्रयोगशाळेत तपासणी करावी असे सरकारला वाटले नाही. सूर्यकांता कंपनीची साधी माहिती घ्यावीशी वाटली नाही. सूर्यकांता कंपनीची चिक्की बनविण्याची मशीन 15 लाख रूपयांची आहे. सूर्यकांता कंपनीची वार्षिक उलाढाल 10 लाख रूपये आहे. हे पुरावे आहेत. हे आरोप झाल्यानंतर सुद्धा सन्माननीय मंत्र्यांनी आणि त्यांच्या विभागातील काही अधिकाऱ्यांनी चिक्की किती चांगली आहे असे दोन रिपोटर्स मॅनेज केले.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

त्यांनी दोन अहवाल मॅनेज करुन पुन्हा सांगितले की, आम्ही किती स्वच्छ आहोत, बघा आमची चिक्की किती चांगली आहे. मला वाटते हे आपण सुध्दा ऐकले असेल. आजही त्याचे पुरावे उपलब्ध आहेत.

सभापती महोदय, मी आपल्याला फूड ॲनालाईझचा अहवाल देतो. हा अहवाल माझा नव्हे तर सरकारचाच आहे. महोदय, या चिक्कीच्या पाकिटांवर बॅच नंबर नमूद नाही. मी सरकारला विचारु इच्छितो की, पाकिटावर बॅच नंबरची गरज नाही काय ? वास्तविक पाहता ही चिक्की लहान मुलांना देत असताना त्यावर बॅच नंबर असणे आवश्यक होते. ही चिक्की लहान मुलांना पोषण आहार म्हणून देण्यात येणार असल्यामुळे ती हायजेनिक असावयास पाहिजे होती. त्या चिक्कीच्या पाकिटांवर बॅच नंबर नव्हता, परंतु मॅन्युफॅक्चरींग डेट सुध्दा नमूद केलेली नाही. महोदय, अहवालाच्या शेवटी नमूद केले आहे की, "Contravenes regulation 2.2,2/8/9 2.3/1/5 as per the Food Safety & Standard Food Packaging and Labeling Regulation, 2011 it contains europine-36, external matter as per section 3.1 of Food Safety & Standards Act 2011, regarding It is inedible." याचाच अर्थ ती चिक्की खाण्यायोग्य नाही. हा अहवाल स्टेट पब्लिक हेल्थ लेबॉरेटरीचा आहे. सभापती महोदय, हा अहवाल मी आपल्याकडे पाठवितो.

सभापती महोदय, निकृष्ट चिक्कीचे प्रकरण समोर आल्यानंतर सांगितले गेले की, हे प्रकरण नगर जिल्ह्यातून सुरु झाले आहे. कारण नगर जिल्ह्याची जिल्हा परिषद ही राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या ताब्यात आहे. महोदय, मी निदर्शनास आणून देतो की, नगर जिल्ह्याच्या पारनेर तालुक्यातील शिवसेना पक्षाच्या एका पंचायत समिती सदस्यांनी सुरुवातीला ही चिक्की तपासली. त्यानंतर त्यांनी हे प्रकरण बाहेर काढले. मी पुन्हा एकदा सांगतो की, ज्याने हे प्रकरण बाहेर काढले तो पंचायत समिती सदस्य भाजपाचा नव्हे तर शिवसेना पक्षाचा आहे. ते सदस्य एवढ्यावरच थांबले नाहीत. ते नगरच्या बस स्थानकासमोर सूर्यकांता महिला औद्योगिक सहकारी संस्थेची चिक्की घेऊन बसले आणि जनतेला बोलावून सांगत होते की, तुम्ही ही चिक्की खा आणि चिक्कीविषयी आपले अभिप्राय नोंदवा. महोदय, लोकांनी या चिक्कीच्या बाबतीत काय काय

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

अभिप्राय नोंदविले ते मी आपल्याकडे पाठवितो. आपण ते अभिप्राय सरकारला दाखवावेत. महोदय, इतर कोणत्याही बाबतीत पाप केले असते तर चालले असते, परंतु लहान मुलांच्या चिक्कीमध्ये पाप करावयास नको होते. महोदय, चिक्की संदर्भातील सर्व पुरावे मी आपल्या माध्यमातून सरकारला देतो.

सभापती महोदय, दुसरा एक विषय हा आयुर्वेदिक बिस्किटांचा आहे. शासन निर्णय क्रमांक अेबवि-215-प्रकरण 16 क्र. फेब्रुवारी, 2015 अन्वये मे.गोवर्धन आयुफार्मा यांना 5 कोटी रुपयांची आयुर्वेदिक बिस्किटे पुरण्यास मान्यता देण्यात आली. महोदय, ज्या गोवर्धन आयुफार्माला ही आर्डर दिली त्यांच्याकडे काही तरी असावयास पाहिजे होते. मी मागणी करतो की, आपण या बिस्किटांचे रेट कॉन्ट्रॅक्ट दाखववावे. मी खात्रीने सांगतो की, या बाबतचे रेट कॉन्ट्रॅक्ट नाही. महोदय, या संदर्भात विभागाचा मूळ प्रस्ताव काय होता ? आयुक्तांकडून ही बिस्किटे खरेदी करण्यासंदर्भात 95 लाख रुपयांचा प्रस्ताव सादर करण्यात आला होता. पण माननीय मंत्र्यांना असे काय वाटले की, त्यांनी 95 लाख रुपयांची ऑर्डर 5 कोटी रुपयांची केली. महोदय, ज्या गोवर्धन आयुफार्माला आयुर्वेदिक बिस्किटांचा पुरवठा करण्याचे कॉन्ट्रॅक्ट दिले त्या कंपनीकडे बिस्किटे तयार करण्याचा लायसेन नाही. या कंपनीकडे जर लायसेन असेल तर आपण ते आणून दाखववावे. त्यांच्याकडे लायसेन असल्यास मी राजकारण सोडून देईन. मी जबाबदारीने सांगतो की, गोवर्धन आयुफार्माकडे बिस्किटे तयार करण्याचे लायसेन नाही. त्या कंपनीकडे जे लायसेन आहे ते FSSAI चे आहे. ते लायसेन उत्पादन व विक्रीसाठी सौ.भाग्यश्री रामदास सोंडे, सौ.राजश्री रामदास सोंडे, भागीदार यांच्या नावे दिले आहे. या लासेनमध्ये नमूद केले आहे की, "For dairy detail of location with address in capacity of milk chilling centre, bulk milk cooling centre, milk processing unit, milk packaging unit owned by the holder of license." माननीय सहकार मंत्री, दुधाच्या चिलींग प्लांटमध्ये अशाप्रकारे आयुर्वेदिक बिस्किटे तयार करता येत असतील तर एक चिलींग प्लांट तुम्हाला सुध्दा देतो. आपण त्या प्लांटमधून आयुर्वेदिक बिस्किटे तयार करुन दाखवा. महोदय, गावेर्धन आयुफार्माचे लायसेन मी आपल्या माध्यमातून सरकारला देतो.

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

सभापती महोदय, याशिवाय अजून एक गंभीर बाब मी सभागृहाच्या निदर्शनास आणून देतो. शासन निर्णयाच्या आधारे मे.गोवर्धन आयुफार्माला 5 कोटी रुपयांच्या बिस्किटांचा पुरवठा करण्याची ऑर्डर दिली. त्या पुरवठा आदेशातच गोवर्धन आयुफार्माच्या रेटला मुदतवाढ दिली गेली. ज्या दिवशी या संदर्भातील प्रस्ताव विभागाकडे आला त्या दिवशी सदरहू गोवर्धन आयुफार्मा कंपनी बिस्किटांचा पुरवठा करण्यास नियमानुसार पात्र नव्हती. महोदय, माझ्याकडे जी कागदपत्रे आहेत त्यामध्ये शासन निर्णयाचा क्रमांक दिलेला आहे. यामध्ये "आयर्वेदिक बिस्किटे, शासन निर्णय दि. 28/07/2011 अन्वये, ई-निविदेद्वारे निश्चित केलेल्या दरास शासन निर्णय दि.13/02/2015 अन्वये, दिनांक 31/03/2015 पर्यंत दिलेल्या मुदतवाढीनुसार" असे नमूद केले आहे. सभापती महोदय, या ठिकाणी विभागाचे सचिव बसलेले आहेत. मे.गोवर्धन आयुफार्माला बिस्किटांची ऑर्डर देत असताना विभागाच्या सचिवांनी नोटमध्ये काय नमूद केले होते ते मी वाचून दाखवितो. त्या नोटमध्ये असे नमूद आहे की, "It is not advisable to repeat the order time and again without floating fresh tender, against the purchase rules and various guidelines used by the Government from time to time."

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

सचिव सांगत आहेत की, असे करू नका. To suggest that the fresh tender would require time is totally incorrect. तुम्ही जी गडबड म्हणत आहात ती ही आहे की ते म्हणतात की आम्हाला पैसे खर्च करायचे आहेत. This is incorrect, as the department could have easily planned out fresh E-tenders before the expiry of the tender period; however, the same was not done. सचिव सांगत आहेत की, हा वेळकाढूपणा आहे. ज्यावेळी पैसे आले होते त्यावेळी ई-टेडरिंग फ्रेश करायला पाहिजे होते. परंतु हे झाले नाही. एवढे सर्व सचिवांनी लिहिले असताना सुध्दा 5 कोटी रूपयांची ऑर्डर आहे. बिस्किटे आहेत, खा बिस्किटे. सभापती महोदय, ही लहान मुलांची चेष्टा नाही का ? एवढे पुरावे दिले आहेत, आणखी काय केले पाहिजे, पुरावे दिल्यानंतर काय केले पाहिजे ? मी एक विषय जबाबदारीपर्वूक सांगतो. गोवर्धन आयुर फार्मा यांच्याकडे उत्पादन करण्यासाठी अन्न व औषध प्रशासनाचे लायसन्स पाहिजे. कारण ही आयुर्वेदिक बिस्किटे आहेत. मात्र त्यांच्याकडे लायसन्सच नाही. जर असेल तर मला आणून दाखवावे. या विभागाचे सह आयुक्त श्री. शशिकांत केंकरे यांनी या अवैधरित्या उत्पादित व वितरित केलेल्या बिस्किटांचे साठे परत बोलाविण्याचे आदेश सुध्दा हा विषय निघाल्यानंतर काढले आहेत. त्यांच्याकडे असलेल्या एफएसएसआय, अन्न सुरक्षा व मानके यांचा जो परवाना आहे तो तर मी आपल्याला पुरावा म्हणून या ठिकाणी अगोदर .... तो चिलिंग प्लँटचा आहे, यासंबंधीचे सुध्दा पुरावे मी आपल्याला सादर करतो. औषधांचा संच याचा उल्लेख झाला. प्रिस्ट फार्मास्युटिकल, अमरावती यांच्याकडून मेडिसिन किट पुरवठा करण्याच्या बाबतीत 3 कोटी 69 लाख 7 हजार 20 रूपयांचा आदेश निर्गमित करण्यात आला. सन 2013-14 मध्ये जाहीर करण्यात आलेल्या ई-निविदांमधील प्राप्त दर खरेदीचा प्रस्ताव आयुक्तांनी दिनांक 14.03.2014 व दिनांक 11.06.2014 असे दोन वेळा शासन मान्यतेसाठी पाठविले आहेत. ते काय आहे, याचे स्पष्टीकरण होऊ नये का ? तुम्ही कशा पध्दतीने चालू केले आहे, वाटेल त्या कोणालाही बोलाविले, या, काय पाहिजे, असे विचारले, ते म्हणाले, आमच्याकडे औषधे विकण्याचा धंदा आहे, तुम्ही म्हणाला, ठीक आहे, किती, देऊन टाका हा असा प्रकार आहे. सदर बाबतीत गंभीर आहे ते

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

असे की, अनेक जणांनी सरकारमध्ये मंत्री म्हणून काम केले आहे. सचिवांच्या हे का लक्षात आले नाही ? प्रिस्ट फार्मास्युटिकल, अमरावती यांना ऑर्डर दिली आहे, त्याचा खरे तर दरकरार नाही, काहीही नाही, त्याला ऑर्डर कशी दिली आहे ? त्याने एकदा सन 2011 मध्ये शासनाकडे एक निविदर भरली, ती शासनाने अस्वीकृत केली. अस्वीकृत केलेल्या त्या निविदेवर औषधांचा पुरवठा द्यावा का ? अजून काय पुरावा द्यायचा ? अस्वीकृत केलेली निविदा आहे, त्याचा आधार घेऊन महिला व बालकल्याण विभागाने प्रिस्ट फार्मास्युटिकला ऑर्डर दिली. निविदा अस्वीकृत झाल्यानंतर .... (अडथळा) सन्माननीय सदस्य श्री. महादेव जानकर साहेब मुंडे परिवारावरील आपले प्रेम मी सुध्दा जाणून आहे. त्यामुळे कदाचित मनातून आपल्यालाही वाईट वाटत असेल, जसे मला वाटत आहे. माझेही अंतःमन आहे, मला सुध्दा नात्याची, सर्व गोष्टींची काळजी आहे. पण येथे राजधर्म आहे. तुम्ही ज्या पक्षात आहात, त्यातील काही जणांना तो पाळायला जमत नाही, तो विषय वेगळा आहे.

सभापती महोदय, निविदा स्वीकृत झाल्यानंतर निविदेचे दर पुढील एक वर्षाकरिता वैध असतात. तथापि या प्रिस्ट फार्मास्युटिकलचा शासनाने 2 वेळा नाकारलेला प्रस्ताव जाणीवपूर्वक अवैधरित्या दिनांक 13 फेब्रुवारी, 2015 रोजी मान्य केला. अजुन पुरावा काय पाहिजेत ? आज तुम्ही-आम्ही सर्वांनी, देशाच्या जनतेने न्यायव्यवस्थेचे एका निकालाच्या संदर्भात आभार मानले, ती ही न्यायव्यवस्था आहे. हे गंभीर आहे. अस्वीकृत निविदेवर हे कॉंट्रॅक्ट देण्यात आले आहे आणि त्यात आणखी एक गंभीर बाब म्हणजे कोणत्याही निविदेमध्ये कोणत्याही माननीय मंत्र्यांना मागण्याच्या आधारे किंवा कोणत्याही आधारे त्यातील आयटममध्ये खाडाखोड करता येत नाही. मला माहीत नाही. कारण मी मंत्री झालो नाही, होईन की नाही माहीत नाही. (अडथळा) तुमच्या रेटमध्ये तुमच्या निविदेमध्ये तुमच्या मनानुसार काहीही औषधे कमी केली. औषधे आहेत, औषधात सुध्दा तुम्हाला ऑर्डर द्यायची आहे म्हणून तुम्ही पाप केले का, आपल्याला काहीही वाटले नाही का ? औषधात, चिक्कीत, बिस्किटात झाले आहे. हे काय आहे ? एवढी वाईट वेळ आली आहे का ? (अडथळा) ज्या संस्कृतीत माझा, तुमचा-आमचा जन्म झाला आहे, त्या संस्कृतीत पाणी पाजणे



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

पूण्याचे काम आहे आणि त्या पाण्यात सुध्दा जर पाप करीत असाल तर काय संस्कृती काय, काय संस्कार म्हणावे ? आता मी वॉटर फिल्टर बाबत बोलतो. दादा, मी बोलत नव्हतो. मला या विषयावर बोलायचेही नव्हते. मी हे तुम्हालाही बोललो होतो की, मला या विषयावर बोलायचे नाही. काहीही झाले तरी मला भावना आहेत. मी घरातील मोठा आहे, मला याची जाणीव आहे. पण स्वत:च्या स्वार्थासाठी मला यांनीच केले, यांनीच केले असे म्हटले तर मग मी गप्प बसू का ? मी राज्याचा विरोधी पक्षनेता आहे. तुम्ही चुका केल्या तर त्या दाखविण्याचे काम कोणाचे आहे, ते माझे आहे. तुम्हीही सत्तेत असताना असे काढले आहे. माननीय मंत्री श्री. विनोद तावडे साहेब, तुम्हीही काढले आहे. कारण तुम्ही बसायचा त्यामागे मी बसायचो, हे खरे आहे ना ? आता तुम्हाला सर्व बाबतीत ॲक्शन घ्यावी लागेल. वॉटर फिल्टरची ऑर्डर दरकरारावर दिली आहे. एव्हरेस्ट आहे. डायरेक्ट एव्हरेस्टहून पाणी आले आहे. वॉटर फिल्टरचा दरकरार व्हायच्या अगोदरच ऑर्डर दिली गेली आणि दरकरार नंतर झाला. पुरावे आहेत. मी पुरावे सुध्दा आपल्याला देतो. दादा, तुमच्या प्रामाणिकपणाचा काही उपयोग नाही. आम्ही ओरडून सांगितले की, 3 लाख रूपयांचे 10 लाख रूपये करा. परंतु तुम्ही त्यास नाही म्हणालात. आपण म्हणालात की, नाही, 3 लाख रूपयांच्या पुढील सर्व खरेदीसाठी ई-निविदा राहील.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे..........

काही उपयोग नाही तुमचा. या वॉटर फिल्टरच्या बाबतीत जो प्रस्ताव आला तो असा होता की, "वॉटर फिल्टर कम प्युरिफायर हे 25 लीटर पाणी साठवणूक क्षमता असलेले, 100 टक्के पाणी निर्जंतुकीकरण करणारे असून उद्योग संचालनालय, मंत्रालय, मुंबई यांच्या संदर्भित पत्र क्रमांक 3 अन्वये एव्हरेस्ट इंडस्ट्रिज, गंगापूर, औरंगाबाद यांच्याशी दर करार झालेला आहे. सदर दरकरारानुसार 25 लीटर पाणी साठवणूक क्षमता असलेल्या या वॉटर फिल्टर कम प्युरिफायरची किंमत सर्व करासहीत 4500 निश्चित केलेली आहे." हा प्रस्ताव आयुक्तांनी पाठविला. त्यानुसार 6 कोटी 94 लाख रुपयांमध्ये 15426 अंगणवाड्यांसाठी हे वॉटर फिल्टर खरेदी करण्यात आले. प्रस्ताव 4500 रुपयांचा आणि खरेदी 5200 रुपयांनी झाली आहे. यासारखी वाईट वेळ कोणावर येऊ नये. माझ्यावर आली तर मी मरुन जाईन, पण पाण्यात कधी पाप करणार नाही. दर करार नसताना एव्हरेस्टला ऑर्डर देण्यात आली. दर करार नंतर झाला. याबाबतचे सर्व पुरावे माझ्याकडे आहेत व ते मी आपल्याला देत आहे.

सभापती महोदय, प्लॅस्टिकच्या चटयांच्या खरेदीबाबतही तेच झाले आहे. त्याचाही पुरावा मी आपल्याला देतो. ज्या दिवशी ऑर्डर दिली त्या दिवशी दर करार नव्हता. दर कराराच्या अगोदरच ऑर्डर देण्यात आली आहे. क्या गती है, उसमे गई हमारी मती है. दर कराराच्या अगोदर ऑर्डर देणे, हे गंभीर नाही, याचे काहीच वाटत नाही ?

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी त्यांच्या भाषणात एक मुद्दा उपस्थित केला होता. त्यांनी तो सविस्तरपणे मांडला आहे त्याचा मी पुन्हा उल्लेख करणार नाही. पण त्यामधील गंभीर बाब जी सन्माननीय सदस्यांकडून चुकून राहून गेलेली आहे, तेवढीच मी मांडणार आहे. पुस्तकांची खरेदी झालेली आहे. ती पुस्तके ज्या ग्रंथालयाच्या दर करारावर घेतली तो ग्रंथालय विभाग असे म्हणतो की, हे दर करार फक्त आमच्या विभागासाठी आहेत. त्याचा पुरावा सुध्दा माझ्याकडे आहे व तो सुध्दा मी आपल्याला देतो. तो दर करार फक्त आमच्या विभागासाठी आहे, असे सांगितल्यानंतरही यांनी ती पुस्तके खरेदी करीत असताना ग्रंथालयाच्या दर करारानुसार, जे या विभागाला लागू नाहीत, त्यानुसार खरेदी केली आहे. बर आपण असे समजू

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे..........

की, फार यांना फार गती मी घ्यायची होती म्हणून त्यांनी खरेदी केली. पण जर ग्रंथालयाचा दर करार तुम्हाला मान्य असेल तर ग्रंथालयाने याच दर कराराच्या माध्यमातून असे सांगितले आहे की, अशी खरेदीच्या बाबतीत 25 टक्क्यांची सुट घ्यावी. मग 20 टक्क्यांची सुट का घेतली ? 5 टक्के कुणाला गेले, कुठे गेले, हे सुध्दा मी आपल्याला पुराव्यानिशी देणार आहे.

सभापती महोदय, पाण्यात, पुस्तकात, चिक्कीत, चटईत सर्व खरेदीत भ्रष्टाचार झाला आहे. चटईचा दर करार नाही. दर करार नसताना चटईची ऑर्डर दिली. आता चटईमध्ये काय मोठे पाप झाले आहे ? अंगणवाड्यांच्या खोल्यांची साईज कोणाला माहीत आहे का ? 10 x 10 क्षेत्रफळाची अंगणवाड्यांची खोली असते. मी 8-9 वर्ष जिल्हा परिषदेचा सदस्य होतो, उपाध्यक्षही होतो म्हणून गावागावात फिरलो आहे. अंगणवाड्यांची खोली 10 x 10 ची आहे. परंतु, चटई 10 x 14 या साईजची घेतली गेली. तुम्हाला एवढी घाई झाली होती की, अंगणवाड्यांकडून कोणते प्रस्ताव पाहिजेत, काय पाहिजे, त्यांची आवश्यकता काय आहे, याचीही माहिती घेतली नाही. ही माहिती घ्यायला नको ? 10 x 14 साईजची चटई खरेदी करुन टाकली. आता या सर्व चटया पडून आहेत. एकही चटई अंगणवाडी वापरीत नाही. दर करार नसताना बेकायदेशीररित्या या ठिकाणी खरेदी करण्यात आली आहे.

सभापती महोदय, मला सांगा की, 15000 अंगणवाड्यांना एव्हरेस्टचे वॉटर फिल्टर दिले आहे. त्या वॉटर फिल्टरला इलेक्टिसिटी कनेक्शन लागते. मला शासनाकडून या गोष्टीची माहिती पाहिजे आहे की, ज्या 15000 अंगणवाड्यांसाठी एव्हरेस्टचे वॉटर फिल्टर घेतले गेले त्या 15000 अंगणवाड्यांमध्ये इलेक्ट्रिसिटी आहे का, किती अंगणवाड्यांमध्ये आहे ? हे मी माझ्या डोळ्यांनी पाहिले आहे आणि येथे बोलतो आहे, जबाबदारीपूर्वक बोलतो आहे. ते वॉटर फिल्टर तसेच पडून आहेत. कारण इलेक्ट्रिसिटी नाही. गावातील शाळेत लाईट नाही. नो कनेक्शन. सन्माननीय ऊर्जा मंत्री श्री.चंद्रशेखर बावनकुळे साहेब, तुम्ही असे कनेक्शन लावू नका. असे जर लागले तर पुढच्या वेळचे भाषण कदाचित तुमच्याविरोधात असेल. हे कनेक्शन देऊ नका. बाकी कोणतेही द्या. आम्ही तुमच्या सोबत आहोत. पण आता बेकायदेशीर खरेदी झाली म्हणून तुम्ही कनेक्शन देऊ म्हणत असाल तर बेकायदेशीर काम कायदेशीर करण्यामागची तुमची भावना मी समजू शकतो.

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे..........

सभापती महोदय, मापात पाप, ताटात सुध्दा पाप. सन्माननीय सहकारी मंत्री श्री.चंद्रकांत दादा पाटील साहेब, नागपूरच्या वैद्य इंडस्ट्रिजचे काय कनेक्शन आहे, हे तुम्ही शोधून काढा. तुम्ही कोल्हापूरचे आहात म्हणून मी विचारतो आहे. तुम्ही ते शोधून काढले पाहिजे. तुम्हालाही कळायला पाहिजे की, काय कनेक्शन आहे. वैद्य इंडस्ट्रिज, नागपूर जी गेल्या 6 वर्षांपासून अस्तित्त्वात नाही. बंद आहे. 6 वर्षांपासून बंद असलेल्या वैद्य इंडस्ट्रिजला जवळ जवळ 9 कोटी रुपयांच्या 8 लाख ताटांची ऑर्डर दिली गेली आहे. 125 रुपयांना एक ताट पडते. चला ताट घ्यायला. चांगल्या स्टिलचे ताट केवढ्याला पडते ? खरेदीत किती पाप करणार आहात ? अस्तित्वात नसलेल्या उद्योगाला.. आजही वैद्य इंडस्ट्रिजचे एक रुपयांचे इलेक्ट्रिसिटी बिल नाही. दर करार आहे. ताट बनविण्याची कसलीही मशिनरी त्या ठिकाणी नाही. त्या ठिकाणी एक वेल्डींगची मशिन आहे. हे माध्यमांनी सांगितलेले आहे, माध्यमांनी इंडस्ट्रि सुध्दा दाखविली आहे. माझी एवढी ऐपत नाही. पण या सभागृहातील माझ्या सर्व सहकाऱ्यांच्या साक्षीने एक हिंमत मी करतो. 9 कोटी रुपये आम्ही सर्व जमा करुन देतो, 9 कोटी रुपयांची जी वैद्य इंडस्ट्रिजला ऑर्डर दिलेली आहे, ती वैद्य इंडस्ट्रि सुरु करुन ही 8 लाख ताटे तुम्ही एक वर्षात तयार करुन दाखवा, ज्या क्षमतेची ही इंडस्टि आहे, असे तुम्ही सांगितले, ती वैद्य इंडस्ट्रि सन्माननीय सहकार मंत्री श्री.चंद्रकांत दादा पाटील साहेब तुम्ही सुरु करा, आम्ही आहे, नाही, ते आमचे विकू आणि 9 कोटी रुपये देऊ पण 1 वर्षात 8 लाख ताटे तयार करुन दाखवा. कुणाला फसविता आहात ? (अडथळा......) सन्माननीय राज्यमंत्री श्री.विजय शिवतारे साहेब दर कराराला आऊट सोर्सिंग करता येत नाही. आपण आता मंत्री झाला आहात. दर कराराचा अर्थ काही सन्माननीय मंत्री महोदयांना माहीत नसेल तर मी पुन्हा एकदा येथे सांगतो की, दर करार का होतो, कशामुळे केला जातो. ज्याच्याकडे मॅन्युफॅक्चरिंग आहे, त्यालाच दर करार दिला जातो. दर करारान्वये जेवढी ऑर्डर दिली आहे, तेवढी ऑर्डर त्याच कंत्राटदाराने मॅन्युफॅक्चरिंग करुन द्यायची असते म्हणून दर कराराचा विषय पूर्वी व्हायचा.

यानंतर श्री.बोरले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.........

परंतु, यामध्ये वैद्य इंडस्ट्रीने आऊट सोर्सिंग केले. तुम्ही त्याचे समर्थन करता ? म्हणजे चुकीचे झाले हे तुम्ही सांगत आहात. स्टिलच्या ताटांच्या बाबतीत आपल्याकडे त्या कंपनीच्या संदर्भातील मागील 6 वर्षाचे पुरावे आहेत. त्या कंपनीचे काय आहे आणि काय नाही, हे सर्व पुरावे आपल्याकडे आहेत. जसे ताटात पाप झाले, ग्रामीण भागात मापात पाप करु नये, अशी म्हण आहे. अंगणवाडी केंद्रात लहान मुलांचे वजन मोजण्याचे जे यंत्र असते त्याला आम्ही माप करण्याचे यंत्र म्हणतो. त्यामध्ये तर अजब प्रकार आहे. तुम्हाला सुद्धा आश्चर्य वाटेल. वेईंग मशिनच्या बाबतीत स्थानिक पातळीवरुन एक प्रस्ताव आला आणि तो साई हायटेक यांच्या नावाने आलेला आहे. हा प्रस्ताव आल्यानंतर अचानकपणे मंत्रालयात मंत्री महोदयांच्या फाईलमध्ये नितीराज इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड मध्येच आली. स्थानिक पातळीवरुन नितीराज इंजिनिअरिंगचा प्रस्ताव आलेला नाही. आयुक्तांकडून आलेल्या प्रस्तावात नितीराज इंजिनिअरिंगचे नाव कोठेच नाही. नितीराज इंजिनिअरिंग यामध्ये अचानकपणे घुसलेली आहे. मूळ प्रस्तावात नितीराज इंजिनिअरिंगचे नाव नाही आणि जी ऑर्डर दिलेली आहे ती 18 कोटी रुपयांची आहे. वेईंग मशीन घेण्याबाबत साई हायटेक कंपनीचा जो मूळ प्रस्ताव होता त्यांना किती कोटी रुपयांची ऑर्डर दिली ? त्यांना 3 कोटी 46 लाख रुपयांची ऑर्डर दिली आणि मध्येच जी नितीराज इंजिनिअरिंग आली त्यांना किती कोटी रुपयांची ऑर्डर दिली ? त्यांना 6 कोटी 92 लाख रुपयांची ऑर्डर दिली. म्हणजे ज्यांचा प्रस्ताव नाही त्यांना 6 कोटी 92 लाख रुपयांची ऑर्डर देण्यात आली....

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सभागृहात गंभीर विषयावर चर्चा सुरु आहे. सभागृहात पुरावे देऊन चर्चा सुरु असताना जे अदृष्य लोक आहेत, ते पेपर वाचत आहेत. त्यांना चर्चेचे किती गांभीर्य आहे ? हे गांभीर्य आहे काय, हे प्रशासन आहे काय, हे काय चालले आहे ? म्हणजे फक्त खुर्च्या गरम करावयाच्या काय ? त्यांच्यावर कारवाई करावी. त्यांना काय दर्शवायचे आहे ?

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, ते नवाकाळ पेपर वाचत आहेत.

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी उपस्थित केलेला मुद्दा बरोबर असला तरी आजच्या नवाकाळ वृत्तपत्रात एक बातमी छापून आलेली आहे. मी माझ्या विभागाच्या सचिवांना त्याबाबत माहिती मागवून घ्यावी अशी नोट लिहून पाठविली आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, ते बाहेर जाऊन हे काम करु शकले असते.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपल्या विभागाची चर्चा सुरु असल्यामुळे त्यांनी उपस्थित राहिले पाहिजे आणि मला ती माहिती लगेच खाली पाठवावयाची आहे, म्हणून मी त्यांना सांगितले. अन्यथा असे होता कामा नये, हे मला मान्य आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी जे सांगत होतो त्यामध्ये एक चूक झालेली आहे. नितीराज इंडस्ट्रीजला 7 कोटी रुपयांची नाही तर 18 कोटी रुपयांची ऑर्डर दिली. मूळ प्रस्तावात नितीराज इंडस्ट्रीजचे नाव नाही. मूळ प्रस्तावात साई हायटेक यांचे नाव आहे आणि ज्यांचा प्रस्ताव अचानक मंत्रालयात प्रकट झाला त्यांना 18 कोटी रुपयांची आणि साई हायटेकला 6 कोटी रुपयांची अशी एकूण 26 कोटी रुपयांची ऑर्डर दिली. वजन करण्याच्या यंत्रात, हे कठीण आहे. सभापती महोदय, या संबंधिचे पुरावे मी आपल्याकडे देत आहे.

सभापती महोदय, मघाशी ग्रंथालयाच्या डिस्काऊंटच्या संदर्भातील एक कागद द्यावयाचा राहिला होता. शासनाच्या अधिकाराने 25 टक्के डिस्काऊंट द्यावयास पाहिजे होते, तो कागद देखील मी आपल्याकडे देत आहे.

सभापती महोदय, खादी व ग्रामोद्योग आयोगाच्या छपाईच्या कामात सुद्धा पाप घडले आहे. ग्रादी व ग्रामोद्योग आयोगाच्या हात कागद संस्था पुणे यांच्या दर करारावर अंगणवाडी केंद्रांना हॅन्डमेट पेपर, दृक संदेश प्रबोधन पुस्तिका/चार्टचा पुरवठा करण्याबाबत 2,99,52,955/- रुपयांचा पुरवठा आदेश शासन निर्णयानुसार दिला, तो शासन निर्णय 13 तारखेचाच आहे. प्रबोधनपर माहिती पुस्तिकेचा पुरवठा करणे 2 कोटी 92 लाख रुपयांचा पुरवठा आदेश शासन निर्णय क्रमांक तोच आहे. विविध फोल्डर, रजिस्टर, प्रगती पुस्तके इत्यादींचा पुरवठा करावयाचा आहे. खादी व ग्रामोद्योग आयोगाची पुणे येथील जी हात कागद संस्था आहे ती कोणी बघितली, हे मला माहीत

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.........

नाही. परंतु, मी ती संस्था बघितली आहे. ती संस्था तुम्ही देखील बघितलेली आहे. तेथे कागद तयार करण्याच्या पलीकडे दुसरे कोणतेही काम होत नाही आणि यामध्ये मात्र फाईल तयार करावयाची, यामध्ये सुद्धा बेकायदेशीर रीत्या दरकरार एकाचा आणि ऑर्डर एकाला, हे दरकरार अशा पद्धतीने वापरता येत नाहीत. कायद्याचे उल्लंघन करुन ही खरेदी झालेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप या विषयावर बोलत असताना महिला व बाल कल्याण विभागाच्या मंत्री महोदयांनी एक विषय उपस्थित केला. त्यांनी नियम सांगितला आणि हा विषय न्यायप्रविष्ट आहे, असे सांगितले. हा विषय कोर्टात आहे, हे सर्वांनाच माहीत आहे. परंतु, अशा भ्रष्टाचाराच्या आणि घोटाळ्यांच्या संदर्भात ज्यावेळी कोर्टात प्रकरणे सुरु होती त्या त्या वेळी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात सन्माननीय सदस्यांनी त्या संदर्भात चर्चा केलेली आहे, आरोपही केलेले आहेत आणि घोटाळे उघड केलेले आहेत. मग आज चर्चाही होऊ नये, अशी भूमिका असेल तर ते चुकीचे आहे. तुम्ही तर चौकशीसाठी तयार आहेत ना ? खुलाशात स्पष्टपणे सांगितले आहे. किती फसवावे याला मर्यादा आहेत. 9 तारखेला मुंबई हायकोर्ट या संपूर्ण खरेदीबाबत काही तरी निर्णय घेईल म्हणून 9 तारखेला शासनाने शपथपत्र दिले की,....

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

आम्ही जी चिक्कीची खरेदी केली त्या चिक्कीचे वाटप आम्ही थांबिवले आहे, हे कशासाठी करण्यात आले तर कोर्ट नरम व्हावे यासाठी करण्यात आले आहे. परंतु येथे पाप कसे करण्यात आले ते मी सांगतो. मी जबाबदारीने सांगतो की, शासनाने चिक्कीचा पुरवठा थांबविला नाही. चिक्कीचा पुरवठा करु नका असे पत्र एकाही जिल्हापरिषदेमध्ये आयसीडीएस कमिशनर किंवा या खात्याच्या सचिवांकडून देण्यात आले नाही, यापेक्षा काय वाईट असेल. या खात्याने 9 तारखेला हायकोर्टात शपथपत्र दिले होते. त्यानंतर 16 तारखेला चिक्कीच्या वाटपात नंदूरबार जिल्ह्यात अळ्या मिळाल्या आहेत. 9 तारखेला कोर्टात शपथपत्र दिले त्याबाबत शासनाला काहीही वाटत नाही. त्या शपथपत्राच्या बाबतीत यांना काहीही देणेघेणे नाही. चिक्कीची ऑर्डर थांबविली असे हायकोर्टात सांगितले आहे, याबाबत मी आपणाला पुरावा देतो. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, बाल विकास विभाग, जिल्हा परिषद नंदूरबार यांनी पत्र दिलेले आहे. त्यातील शेवटच्या ओळी मी वाचून दाखवितो. 'सूर्यकांता महिला औद्योगिक सहकारी संस्था यांनी पुरवठा केलेल्या चिक्कीत अळ्या व बुरशी आढळून आल्याने तसेच उत्पादन वर्षे व महिना स्पष्ट दिसज नसल्याने संबंधित संस्थेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी व पुढील कारवाईसाठी लेखी निर्देश प्राप्त व्हावेत ही विनंती.' हे पत्र उप मुख्य कार्यकारी अधिकारी, नंदूरबार यांनी 16 तारखेला दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई गिरकर आपण कोणत्याही गोष्टीचे समर्थन करुन नका, आता हा पराचा कावळा आहे काय ?

सभापती महोदय, शपथपत्राचा विषय आला म्हणून मी हे बोलत आहे, त्यातील एक विषय मांडावयाचा राहून गेला आहे. राज्यातील सरकार बदलल्यानंतर महिला व बाल विकास खात्याने नागपूर येथील कोर्टात शपथपत्र दिले आहे, डिसेंबर 2014 मध्ये दिलेले हे शपथपत्र माझ्या हातात आहे. त्या शपथपत्रात असे नमूद केले आहे की, " I state that as per the p0licy of State Government, the process of tendering is required by adopting e-tender process for any tender more than 3 lakhs. The respondent is ready to adopt the e-tender process for the supplier of THR...." टीएचआर याला वेगळे करता येणार नाही. टीएचआर म्हणजे पोषण आहार, पोषण आहार म्हणजे न्युट्रीएन्ट आणि न्युट्रीएन्ट म्हणजे चिक्की.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

सभापती महोदय, या प्रस्तावात एक मोडस ऑपरेंडी आहे, म्हणजे 206 कोटी रुपयांची ऑर्डर देतांना एक कार्यपध्दती अवलंबिण्यात आली आहे. मी जबाबदारीपूर्वक बोलतो, एखादा पुरवठादार एखादी वस्तू घेऊन आल्यावर त्याला खरोखर गरज आहे किंवा नाही, त्याची उपयुक्तता आहे किंवा नाही, असल्यास किती प्रमाणात आहे, त्याची कोणतीही शहानिशा करायची नाही, यामध्ये शहानिशा झाली आहे काय ते सरकारने स्पष्ट करावे. चिक्कीची मागणी अंगणवाड्यांकडून आली होती काय ? अंगणवाड्यांकडून बिस्किटांची मागणी आली होती काय ? अंगणवाड्यांकडून ताटांची मागणी आली होती काय ? अंगणवाड्यांकडून पाण्याची मागणी आली होती काय ? अंगणवाड्यांकडून चटईची मागणी आली होती काय ? यापैकी एकही मागणी अंगणवाड्यांकडून करण्यात आलेली नाही. हे सर्व येथेच करण्यात आले आहे. येथे जी पध्दत वापरली ती मी आपणाला सांगत आहे, एक ठेकेदार आला, तो म्हणाला की, मी तुमच्या सर्व मागण्या मान्य करतो, (...अडथळा...) 206 कोटी रुपयांची ऑर्डर देतांना ज्यांच्या सह्या आहेत त्यांच्या मागण्या. एक ठेकेदार येतो, तो म्हणतो ई-टेंडर नको, बाकी तुमच्या सर्व मागण्या मला मान्य आहेत. माझ्याकडे दर करार आहेत, त्यावर आपण ऑर्डर द्यावी. दुसरा ठेकेदार येतो, तो म्हणतो साहेब मी तुमच्या सर्व मागण्या मान्य करतो, पण ई-टेंडर नको. माझ्याकडे दर करार पण नाही, माझ्याकडे दर निश्चिती आहे. ठीक आहे, तुला पण 80 कोटी रुपयांची ऑर्डर देतो. तिसरा ठेकेदार येतो, मी तुमच्या सर्व मागण्या मान्य करतो, ई-टेंडर नको, माझ्याकडे दर करार नाही, माझ्याकडे दर निश्चितीपण नाही, मी शासनाकडे एक वर्षापूर्वी टेंडर भरले होते ते अस्वीकृत झाले, त्याचा पुरावा आहे. त्याला ऑडर देऊन टाका आणि ऑडर देण्यात आली. चौथा ठेकेदार येतो, मी तुमच्या सर्व मागण्या पूर्ण करतो, ई-टेंडर नको, माझ्याकडे दर करार नाही, दर निश्चिती नाही, माझे चार वर्षापूर्वीचे एक टेंडर आहे, त्याचे काही करता येते काय ते पहा. ते बालेले ठीक आहे, त्याला देखील ऑर्डर देण्यात आली. यामध्ये नियमांची, कायद्याची व राज्यपाल महोदयांनी केलेल्या अभिभाषणाची तसेच मुख्यमंत्री महोदयांनी या अभिभाषणाला दिलेल्या उत्तराची आणि या सभागृहात तीन लाखाच्या वर सर्व ई-निविदा करण्यात येतील या सर्व भूमिका महिला व बालविकास मंत्री

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

महोदयांनी कच-कच पायाखाली तुडविल्या आहेत. मंत्री महोदय, श्री.चंद्रकांत पाटील काय तुडविले ते तुम्ही पहा, मी पाहणार नाही.

....3...



सभापती महोदय, आज ही गोष्ट आम्हाला गंभीर का वाटत आहे, ते मी सांगतो, कॉंग्रेस पक्षाचे प्रवक्ते माननीय श्री.सचिन सावंत यांनी हे प्रकरण बाहेर काढले आहे. यामध्ये कोठे तरी नात्याचा व सहानुभूतीचा विचार करुन हे मी केले, असे म्हटले गेले, आता केले तर केलेच.

या नंतर श्री.भोगले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

सभापती महोदय, 20 मे रोजी राज्याच्या मुख्यमंत्र्यांकडे हे थांबवा म्हणून मी निवेदन दिले. 20 जून रोजी हे प्रकरण बाहेर आले. या देशात सत्ता परिवर्तन झाले. राज्यात सत्ता परिवर्तन झाले. केंद्रात नरेंद्र आले, राज्यात देवेंद्र आले. हे सत्ता परिवर्तन एकाच गोष्टीवर झाले ते म्हणजे Zero tolerance against corruption. अशा सरकारच्या विरोधात जर अशी भ्रष्टाचाराची प्रकरणे आमच्या हातात असतील तर आम्ही काय केले पाहिजे? माननीय मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांना मी विचारु इच्छितो की, तुम्ही आमच्या जागेवर असता तर काय केले असते? एक माजी विरोधी पक्षनेते सभागृहात उठून गेले. ज्या दिवशी माननीय मुख्यमंत्र्यांना निवेदन दिले, त्या दिवशी मी माध्यमासमोर यायचे नको का? आलो नाही. ज्यावेळी प्रकरण बाहेर आले, ते कसे आले, कुठून आले, सहाव्या मजल्यावरुन कसे पाय फुटले याची चौकशी तुम्ही करा. आम्हाला कशासाठी मध्ये घेता? त्या फाईलला पाय कसे फुटले? मी आजच या सभागृहात प्रकरण उपस्थित केले. माध्यमातून माझ्यावर आरोप झाले. सोशल मीडियाच्या माध्यमातून माझ्यावर आरोप झाले. जे कोणी माझ्यावर गलिच्छ आरोप करतात त्यांनी डोळ्यात डोळे घालून आरोप करावा. मी आजही कोणाच्याही डोळ्यात डोळे घालून आरोप करावयास तयार आहे.

सभापती महोदय, कॉंग्रेस पक्षाचे नेते श्री.सचिन सावंत यांनी एसीबीकडे या प्रकरणाबाबत तक्रार दिली. एसीबीला अचानक काय झाले? आघाडी सरकारमधील मंत्र्यांविरुध्द, आमच्या नेतृत्वाविरुध्द एसीबीकडे तक्रार केल्यानंतर लगेच एसीबीकडून खुल्या चौकशीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला. परंतु या प्रकरणातील सर्व दस्तऐवज एसीबीला दिलेले असताना खात्याच्या सचिवांकडून क्लॅरिफिकेशन मागविण्यात आले. पाप केले त्यांच्याकडूनच क्लॅरिफिकेशन मागत आहात. कोणाची चेष्टा करीत आहात, हे काय चालले आहे? एकाला एक न्याय, दुसऱ्याला वेगळा न्याय. तुम्ही सत्तेमध्ये असतानाही या सगळया गोष्टी घडत आहेत. आमच्या नेत्यांनी चौकशीच्या बाबतीत जे सामर्थ्य दाखविले, ते तुम्ही दाखविणार आहात का, चौकशी करणार आहात का? तुम्ही चौकशी करु शकत नाही. चौकशी करणार की नाही याची मला माहिती नाही. न्याय व्यवस्था काय भूमिका घेणार याची मला माहिती नाही. परंतु महाराष्ट्राच्या जनतेने ज्या विश्वासाने तुमच्या हाती सत्ता दिली, तो जनतेचा विश्वास मात्र तुम्ही गमावला आहे, हे आज स्पष्ट होत आहे.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

सभापती महोदय, शिक्षण विभागाचा एक मुद्दा मी मांडू इच्छितो. 191 कोटी रुपयांची फायर एस्टिंग्विशरची खरेदी करण्यात आली. सन्माननीय मंत्र्यांनी ग्रामीण भागातील शाळा पाहिल्या असतील. त्या शाळांमध्ये फायर एस्टिंग्विशरची आवश्यकता आहे का? शहरातील शाळा एक मजली, दुमजली किंवा त्यापेक्षा अधिक मजल्यांच्या असतात. त्या ठिकाणी फायर एस्टिंग्विशरची आवश्यकता भासू शकते. परंतु ग्रामीण भागातील शाळांसाठी 191 कोटी रुपयांची फायर एस्टिंग्विशर खरेदीची दर करारावर ऑर्डर दिली. मला तीन गोष्टींचा खुलासा अपेक्षित आहे. 191 कोटी रुपयांची अग्निशामक यंत्रांच्या खरेदीचा प्रस्ताव नेमका खालून आला की वरुन मागविण्यात आला? हा प्रस्ताव मंत्रालय पातळीवरुन म्हणजे मंत्र्यांनी मागविला आहे. शिक्षण संचालकांनी विभागाच्या लेखाशिर्षकावर तेवढा निधी उपलब्ध आहे की नाही याची खातरजमा केली नाही. मंत्र्यांनी सुध्दा याची काळजी न घेता ऑर्डर देऊन टाकली. दर करार आहे की नाही हेही पाहिले नाही. ज्या रिलायबल फायर इंजिनिअरिंग संस्थेला डी.जी.एस.अँड ओ. यांनी दर करार दिला आहे, तो दर करार 28 फेब्रुवारी, 2011 पर्यंतच होता. याचा पुरावा मी आपल्याकडे देतो.

सभापती महोदय, रिलायबल फायर इंजिनिअरिंग कंपनीबाबत कोणताही दर करार विभागाच्या संकेतस्थळावर काल संध्याकाळपर्यंत उपलब्ध असल्याचे दिसून आले नाही. या दर करारावर 2011 ऐवजी 2015 असा बदल करुन 191 कोटी रुपयांची ऑर्डर दिली गेली हे लक्षात आले. प्रत्येक गोष्टीच्या खरेदीबाबत यांच्यावर आरोप करायचे का? ही फाईल वित्त विभागाकडे गेली नसती तर 191 कोटी रुपये वाया गेले असते. ऑर्डर देईपर्यंत 6 कोटी रुपयांची यंत्रे रिलायबल फायर इंजिनिअरिंग कंपनीने वेगवेगळया शाळांमध्ये बसविली होती. नेमके बँक लुटायला आणि अलार्म वाजायला लागणे हा योगायोग आहे. हे आम्हाला माहीत नव्हते. फाईल वित्त विभागाकडे गेली की बाहेर पडली? आम्ही काय करायचे ते आपणच सांगा. मी याबाबत पुरावे दिले आहेत. दर करार नसताना 191 कोटी रुपयांची ऑर्डर दिली. मग त्या संदर्भात स्टे आला. त्यांनी मान्य केले की, ई टेंडरिंग करावयास हवे होते. परंतु चूक झाली हे नक्की आहे. तुमच्या भावना चांगल्या नव्हत्या हेही नक्की आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे.....

सभापती महोदय, शिक्षण विभागाच्या या संचिकेवर अर्थ विभागाच्या सचिवांनी गंभीर आक्षेप नोंदविलेले आहेत. त्यांनी असे सुचविले आहे की, ज्यांनी प्रस्ताव मागविला त्यांच्यापासून ऑर्डर देईपर्यंत आणि दर कराराच्या तारखेपर्यंत सर्व गोष्टींची चौकशी व्हावी. मी आणि काही मंडळींनी हे प्रकरण बाहेर आल्यानंतर माहितीचा अधिकार कायदा, 2005 अंतर्गत या संपूर्ण संचिकांची मागणी केली होती. माहितीचा अधिकार कायद्यान्वये आमच्याकडून फाईलची कागदपत्रे देण्यासाठी 4000-4000 रुपये फी म्हणून घेण्यात आले.

नंतर 2 जी.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

महिला बाल कल्याण विभागाने देखील सुद्धा चार हजार रूपये शुल्क घेतले आहेत. ही फाईल देखील मी चार हजार रूपये शासनाकडे भरून घेतलेले आहेत. एक महिन्याच्या आत कायद्याने माहितीच्या अधिकारात ही सर्व कागपत्र द्यावयास पाहिजे. पण एक महिना झाला तरी अजून ती कागदपत्रे मिळत नाही. अपिलात गेलो तरी देखील ती कागदपत्रे मिळत नाही. अनधिकृपणे सांगितले जाते की, महिला बाल कल्याण विभागाच्या फाईल्स, शिक्षण विभागातील 191 कोटी रूपयाच्या संबंधातील फाईल्स या सर्व माननीय मंत्र्यांच्या चेंबर्समध्ये लॉक आहेत.

सभापती महोदय, आता मी सार्वजनिक आरोग्य विभागावर बोलणार आहे. मी माननीय मंत्र्यांवर स्पष्टपणे आरोप करणार नाही. पण एक गोष्ट अशी आहे की, सन्माननीय आरोग्य मंत्र्यांच्या विभागामध्ये जी काही खरेदी चालली आहे ती योग्य नाही. माझ्या माहिती नुसार आरोग्य विभागाच्या ठेकेदार धार्जिणे कारभारामुळे पन्नास कोटी रूपयांची औषधांची मागणी नसताना खरेदी करण्यात आली आहे. ती खरेदी करून विना वापर पडून आहे. त्याची एक्सपायरी डेट संपली आहे. ती आता फेकून द्यावी लागणार आहे. नागरी आरोग्य अभियाना अंतर्गत औषधी खरेदी करताना महानगरपालिका, नगरपालिका यांच्याकडून औषधांच्या गरजेबाबत माहिती घेण्यात येते. ती मागणी घेण्यात आली नाही. निव्वळ निधी शिल्लक आहे म्हणून औषधांची खरेदी झालेली आहे. सदरची औषधे महानगरपालिका व नगरपालिका यांनी न स्वीकारल्यामुळे आज रोजी विनावापर पडून आहेत. मी उदाहरण देणार आहे. त्याची चौकशी सरकारने करावी अशी विनंती करतो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, यावर चर्चा झालेली आहे. याची चौकशी ऑल रेडी सुरू झालेली आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी बोलताना जबाबदारीपूर्वक बोललो आहे. औषधांचे तीन-चार ट्रक काही दिवस उभे होते. घाई-गडबडीने 8 परिमंडळामध्ये चार ते पाच गोदामे अचानकपणे भाड्याने घेतली आहेत. बांधकाम विभागाच्या नियमानुसार तीन महिन्यांचे भाडे पाच ते सहा लाख रूपये असताना या गोदामांसाठी तीन महिने प्रत्येकी 25 ते 30 लाख इतके भाडे



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

देण्यात आले आहे. गरज नसताना औषधांची खरेदी करण्यात आली आहे. एवढचे नव्हे तर ट्रक देखील उभे ठेवले. ती औषधे ठेवण्यासाठी गोदामे भाड्याने घेण्यात आली आहेत.

सभापती महोदय, सन्मानीय आदिवासी मंत्र्यांकडे आम्ही पाहिल्यानंतर अर्धे होतो. एका गोष्टीची चौकशी होणे आवश्यक आहे. या राज्यातील मंत्रिमंडळातील मंत्र्यांनी केलेल्या घोटाळ्याची चर्चा 15 ते 20 दिवस सुरू होती. या सभागृहामध्ये माननीय आदिवासी मंत्र्यांनी दिलेले उत्तर फार महत्त्वाचे आहे. त्याचा उल्लेख मी माझ्या भाषणात अगोदर देखील केला आहे. आदिवासी मंत्र्यांनी ई-निविदेने 19 कोटी रूपयांची वह्यांची खरेदी केलेली आहे. येथे त्यांनी नियम पाळला आहे. त्यांनी सांगितले की, मुख्यमंत्र्यांनी तोंडी सांगितले की, याची चौकशी करावी आणि स्थगिती द्यावी. असे का ? श्री.सावरा साहेब आपण सहा वेळा निवडून आला म्हणून असे झाले का ? आपण सर्वात सिनिअर आहात म्हणून असे झाले काय ? आदिवासी मंत्र्यांनी 19 कोटी रूपयांच्या वह्यांची खरेदी ई-निविदेने केली आहे. ते वह्या तपासायला गेले. ई-टेंडरिंगमध्ये गैरप्रकार झालेला आहे. याची चौकशी झाली पाहिजे. ऑर्डर्स स्थगित करा. हे खरे आहे किंवा नाही हे कळायला पाहिजे. सन्माननीय मुख्यमंत्र्यांना कोणी तोंडी सांगते की, एखाद्या ई-निविदेमध्ये गैर प्रकार झाला आहे, तर राज्याचा विरोधी पक्ष नेता म्हणून मी माझ्या सहकाऱ्यांसोबत सन्माननीय मुख्यमंत्र्यांकडे 20 वेळा ज्या घोटाळ्याबाबत चर्चा होत होती ते सगळे घेऊन गेलो होतो. त्याचे पुरावे दिले होते. तेथे आदिवासी मंत्र्यांना लावलेला मुख्यमंत्र्यांचा नियम येथे का लागला नाही ? कारण श्री.सावरा हे जनतेच्या मनातील मंत्री नाहीत.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

सभापती महोदय, माझी आपल्याला कळकळीची विनंती आहे नव्हे मागणी आहे. सरकार खरोखरच पारदर्शक असेल आणि ज्यांच्या नावाच्या लाटेवर येथे जे निवडून येऊन बसले आहेत त्यांच्या नावावर झिरो टॉलरन्स करप्शन असेल तर या सर्व घोटाळ्याची चौकशी उच्च न्यायालयाच्या सिटींग जज्जच्या माध्यमातून केली पाहिजे. भ्रष्टाचाराबाबत ज्यांनी व्हिसल ब्लोअर केला आहे त्या श्री.सचिन सावंत आणि श्री.अंकुशराव काकडे यांना धमक्या देण्यात आल्या आहेत. त्यांनी पोलीस ठाण्यामध्ये तक्रार केली आहे. एफआयआर दाखल झाला. पण राज्य सरकार अद्यापि एकाही आरोपीला पकडू शकलेले नाही. ज्या मोबाईलवरून त्यांना धमक्या देण्यात आल्या ते मोबाईल नंबर देखील दिले. .... (अडथळा).... त्यांना संरक्षण दिले पाहिजे. त्यांच्या फिर्यादीवर आज पर्यंत सरकारने आणि पोलीस खात्याने का कारवाई केली नाही तसेच आता पर्यंत काय उचित कारवाई काय झाली आहे हे देखील समजले पाहिजे. नाही तर उद्या असे कोणीही घोटाळे बाहेर काढण्याचा प्रयत्नच करणार नाही. असाच हा प्रकार आहे. आमच्या सारख्याला या धमक्या का आल्या नाहीत हे देव जाणे.

सभापती महोदय, राज्यात युती शासनाच्या भ्रष्टाचाराबद्दल विरोधी पक्ष आणि राज्यतील जनता बोलतच आहे. परंतु, सरकारमध्ये सामील असलेल्या शिवसेनेचे नेते सुद्धा आणि भाजपचे कार्यकर्तेसुद्धा आपल्या भ्रष्ट कारभाराबद्दल जाहीरपणे आणि खासगीत बोलत आहेत, याचा कमीतकमी राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी विचार करावा. खरेच आपण पारदर्शक आहाता काय ? आपण गतिमान आहात. आपल्यामध्ये करप्शनच्या अगेन्स्ट झिरो टॉलरन्स आहे. पाच वेळा मी राज्याच्या मुख्यमंत्र्यांच्या तपासणीची आणि ही भावना महाराष्ट्राची जनता व्यक्त करीत आहे. ती आम्ही आमच्या तोंडून बोलत आहोत. खरेच हिंमत असेल आणि श्री.देवेंद्रजी फडणवीस काही ठिकाणी कर्ज माफ दिली नाही म्हणून धाडसी निर्णय घेतात असे वर्तमानपत्रात छापून आले. या मंत्र्यांच्या चौकशीच्या बाबतीत आणि राजीनामा घेण्याच्याबाबतीत मुख्यमंत्र्यांनी हे धाडस करावे ही महाराष्ट्रातील जनतेची इच्छा आहे.

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

त्यांनी हे धाडस करावे, ते हे धाडस करतील काय ? शिवसेना पक्षाचे पक्षप्रमुख श्री.उद्धवजी ठाकरे यांनी स्वतः आजूबाजूला भ्रष्टाचार बोकाळलेला असल्याचे जाहीरपणे कबूल केले आहे. आपले सोबती जर अशाप्रकारे भ्रष्टाचार करीत असतील तर माझी शिवसेना पक्षातील मंत्री महोदयांना सांगणे आहे की, आपण सरकारमध्ये कशाला राहता ?

सभापती महोदय, राज्याचे मुख्यमंत्री आपली स्वतःची प्रतिमा जपण्याचा प्रयत्न करीत आहेत. मी आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी युवक संघटनेमध्ये एकत्रितपणे काम केलेले आहे. मी त्यांना ओळखून आहे. त्यांची कार्यपद्धती मला माहीत आहे. परंतु आज राज्याच्या मुख्यमंत्री महोदयांवर प्रश्न चिन्ह निर्माण झालेला आहे. ज्यावेळी हे घोटाळे बाहेर आले त्यावेळी माननीय मुख्यमंत्री विदर्भात एका कार्यक्रमामध्ये होते. त्यांना प्रसार माध्यमांनी विचारले की, अशाप्रकारचे घोटाळे होऊ लागले आहेत, त्यावेळी ते म्हणाले की, आम्हाला प्रथम दर्शनी असे कुठे दिसले नाही, विरोधकांनी मोकळे आरोप करु नयेत, त्यांनी पुराव द्यावेत, असे कुठे काही घडले असेल, असे मला वाटते नाही. माझ्यादृष्टीने ती क्लिन चीट आहे. आपण पुरावे दिल्यास आम्ही चौकशी लावू, असे सांगितले. आज आम्ही या सार्वभौम सभागृहात पुरावे दिलेले आहेत. हे कायदे मंडळ आहे. येथे कायदे तयार केले जातात. या पवित्र मंदिरात आम्ही राज्यातील मंत्र्यांच्या भ्रष्टाचाराचे पुरावे सादर केले असतील तर त्यांनी मंत्री महोदयांनी चौकशीला सामोरे जावे आणि तोपर्यंत आपल्या पदाचे राजीनाम द्यावेत. मी जबाबदारीपूर्वक सांगतो की, सूर्यकांताला 80 कोटी रुपयांची चिक्की वाटपाची ऑर्डर दिली असेल तर त्यासाठी 27 लाख किलो चिक्की बनवावी लागेल आणि तेवढी चिक्की बनवावयाची असेल तर त्यासाठी कमीत कमी 15 लाख किलो गुळ लागेल. संपूर्ण सिंधुदुर्ग जिल्ह्यात मागील पाच वर्षात 15 लाख किलो गुळाची खरेदी झाली नाही. संपूर्ण कोकणात इतकी खरेदी झाली नाही. जर 27 लाख किलो चिक्की तयार केली असेल तर त्या प्रमाणात विजेचे देयक आले असेल. पण तेवढे देयक आले नाही. या ठिकाणी जलसंपदा मंत्री उपस्थित आहेत. 27 लाख किलो चिक्की बनविण्यासाठी किती पाणी लागले याची माहिती त्यांनी द्यावी. चिक्की बनविण्यासाठी पाणी लागले नाही, गुळ लागला नाही, शेंगदाणे लागले नाहीत, वीज लागली नाही मग ही चिक्की

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

आली कोठून ? मी हे जबाबदारीपूर्वक सांगत आहे की, 80 कोटी रूपयांच्या ऑर्डर्समध्ये सूर्यकांताने फक्त 12 कोटी रूपयांची चिक्की अंगणवाड्यांना पुरविली आहे. जेवढे बिल सूर्यकांताच्या नावाने गेले असेल, वैद्य इंडस्ट्रीच्या नावाने गेले असेल, एव्हरेस्टच्या नावाने गेले असेल, फार्मास्युटीकलच्या नावाने गेले असेल त्यांच्या खात्याचा उतारा महाराष्ट्रातील जनतेसमोर जाहीर करावा. त्यावरून कोणाला किती पैसे गेले हे समजले. वैद्य इंडस्ट्रीजला 9 कोटी रूपये दिले. वैद्य इंडस्ट्रीजकडून कोणाला पैसे गेले, सूर्यकांताला किती बिल दिले, सूर्यकांताकडून कोणाला पैसे गेले, आपण याबाबत चौकशी केली काय ? हा विषय गंभीर आहे. आज सरकारच्या आणि मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह निर्माण झालेले आहे. आदरणीय अडवाणी साहेबांवर हवालाचा आरोप झाला. तेव्हा त्यांनी सांगितले की, जोपर्यंत मी स्वच्छ म्हणून बाहेर येणार नाही, तोपर्यंत सभागृहात पाऊल ठेवणार नाही. त्यांनी राजीनामा दिला. युतीचे सरकार असताना तत्कालीन मंत्री महोदया श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी ही चर्चा असताना सांगितले की, डाळीचे प्रकरण कोर्टात गेले. त्यांनी स्वतःहून राजीनामा दिला. ही आदर्श उदाहरणे आपल्या डोळ्यासमोर असतील आणि आपण आपल्या आदर्श नेत्याचा वारसा जपत असाल तर या ठिकाणी जे आरोप झाले ते आरोप बाजूला करण्यासाठी स्वत: मंत्री पदावरून बाजूला होऊन चौकशीला सामोरे जावे आणि मुख्यमंत्री महोदयांनी सुद्धा याबाबत चौकशी लावावी एवढी मागणी करून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मला या ठिकाणी छोटासा खुलासा करायचा आहे. माझा कोणीही राजीनामा मागितला नव्हता, मी राजीनामा दिला नव्हता, मी स्वत: न्यायालयीन चौकशी करा असे सांगितले. न्यायालयाने चौकशी करून मला क्लिनचीट दिली होती.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आता सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सांगितले तेच आमच्या भावांनी ऐकावे एवढेच आमचे म्हणणे आहे.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**<u>मुंबईत ड्रोनवर बंदी असताना सुद्धा मुंबईत ड्रोनची डिलिव्हरी होत असणे</u>**

**<u>याबाबत पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन</u>**

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, राज्याच्या सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून एक अतिशय महत्वाचा मुद्‌दा मी उपस्थित करीत आहे. मुंबई शहरावर दहशतवादी संकट आहे. अशा परिस्थितीत मुंबईत ड्रोन ही पद्धत बंद आहे. तरी देखील काही दिवसांमध्ये ड्रोनची डिलिव्हरी मुंबई शहरामध्ये झालेली आहे. या संदर्भात मी पोलीस आयुक्तांना सर्व माहिती दिलेली आहे. माननीय गृह राज्यमंत्र्यांनी त्यांच्याकडे चौकशी करुन हे ड्रोन कोणाकडे गेले, कशासाठी गेले, ते कशासाठी वापरणार आहात याची चौकशी करावी. मी ड्रोनच्या डिलर संबंधी देखील माहिती दिलेली आहे. तेव्हा ड्रोनच्या संदर्भात सखोल चौकशी करावी व हे सभागृह संपेपर्यंत माननीय गृह राज्यमंत्र्यांनी निवेदन करावे, अशी माझी विनंती आहे.

----------

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** सन 2015-16 या वर्षाकरिता मुंबईतील विजेच्या दराबाबतची वस्तुस्थिती

**मु.शी.:** सन 2015-16 या वर्षाकरिता मुंबईतील विजेच्या दराबाबतची वस्तुस्थिती, या संबंधी माननीय ऊर्जा मंत्र्यांचे निवेदन

श्री.चंद्रशेखर बावनकुळे (ऊर्जा मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

सभापती महोदय, राज्यामध्ये गेल्या 10 वर्षात पहिल्यांदाच विजेचे दर कमी झाले आहेत.

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**<u>सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याच्या बाबतीत</u>**

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी अतिशय महत्त्वाचा औचित्याचा मुद्दा उपस्थित केला होता. या ठिकाणी माननीय गृह राज्यमंत्री उपस्थित आहेत. त्यांनी या विषयी खुलासा करावा.

डॉ.रणजित पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांनी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून अतिशय महत्त्वाचा विषय मांडला आहे. मुंबईमध्ये काही लोकांनी ड्रोन आणल्याची माहिती त्यांनी दिली आहे. या विषयी सखोल चौकशी करण्यात येईल. या विषयी आजच्या आज माहिती घेऊन उद्या संध्याकाळपर्यंत निवेदन करण्यात येईल.

---------

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** शासनाच्या विविध विभागांकडून शासन निर्णयाचे उल्लंघन करुन कोट्यवधी रुपयांची खरेदी करण्यात येणे

**मु.शी.:** शासनाच्या विविध विभागांकडून शासन निर्णयाचे उल्लंघन करुन कोट्यवधी रुपयांची खरेदी करण्यात येणे, या संबंधी सर्वश्री शरद रणपिसे, धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, संजय दत्त, हेमंत टकले, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री अमरसिंह पंडित, अशोक ऊर्फ भाई जगताप, किरण पावसकर, चंद्रकांत रघुवंशी, श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री अनंत गाडगीळ, अनिल भोसले, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री सुभाष झांबड, प्रा.जनार्दन चांदूरकर, सय्यद मुझफ्फर हुसेन, जयंत प्र.पाटील, जयवंतराव जाधव, वि.प.स.यांचा प्रस्ताव

(चर्चा पुढे सुरु....)

श्री.संदीप बाजोरिया (यवतमाळ स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, म.वि.प. नियम 260 अन्वये मांडलेल्या प्रस्तावावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या प्रस्तावावर सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप व सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांनी विस्तृतपणे मुद्दे मांडलेले आहेत. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी पुराव्यासह मुद्दे मांडले आहेत. तसेच सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सुध्दा सविस्तर माहिती दिली आहे.

सभापती महोदय, पुरवठा करण्यात आलेली चिक्की निकृष्ट दर्जाची असल्यामुळे तिचा पुरवठा थांबविण्यात आल्याचे प्रतिज्ञापत्र माननीय मंत्र्यांनी दिनांक 9 जुलै रोजी न्यायालयात सादर केले आहे. या प्रस्तावावरील चर्चेच्या अनुषंगाने मी माननीय मंत्र्यांना विचारु इच्छितो की, ज्या पुरवठादारांनी निकृष्ट दर्जाची चिक्की पुरविली आहे त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करणार काय ? त्यांनी निकृष्ट दर्जाची चिक्की व बिस्किटे पुरविल्यामुळे त्यांना जे पेमेंट करण्यात आलेले आहे ते त्यांच्याकडून वसूल करण्यात येईल काय ? सभापती महोदय, वैद्य इंडस्ट्रीज आणि सूर्यकांता इंडस्ट्रीज या कंपन्याना देण्यात आलेले पैसे त्यांच्याकडून सतीश मुंडे नावाच्या व्यक्तीच्या संस्थेकडे गेलेले आहेत. त्यामुळे या संदर्भातील चौकशी करण्यात येईल काय ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.संदीप बाजोरिया....

सभापती महोदय, महिला व बाल विकास विभागाच्या प्रधान सचिवांच्या मार्गदर्शनाखाली हे सर्व प्रस्ताव तयार झाल्यामुळे त्यांना तत्काळ निलंबित करुन त्यांची चौकशी करण्यात येईल काय ? एवढीच माहिती या प्रस्तावावरील चर्चेच्या अनुषंगाने जाणून घेतो व येथेच थांबतो.

**तालिका सभापती** (श्री.दीपकराव साळुंखे) : या प्रस्तावावरील चर्चा आता संपलेली आहे. सभागृहाच्या नेत्यांनी सांगितले आहे की, या प्रस्तावावरील चर्चेला उद्या उत्तर देण्यात येईल.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

<u>**सभागृहापुढील कामकाजाबाबत पॉईंट ऑफ प्रोसिजर**</u>

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसिजर आहे. माननीय सभापतींबरोबर विधेयके मंजूर करण्याच्या बाबतीत चर्चा झालेली आहे. जर विधेयकांवर चर्चा करण्यास सरकारची तयारी नसेल तर आमची काही हरकत नाही.

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक मी सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत स्थगित करतो.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 4.49 ते 5.00 पर्यंत स्थगित झाली.)

---------

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. दीपकराव साळुंखे)**

**तालिका सभापती** : आता उत्तराला सुरुवात होईल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, आम्हाला माननीय मुख्यमंत्र्यांकडून उत्तर हवे आहे.

**तालिका सभापती** : माननीय मुख्यमंत्री येत आहेत.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलत असतात.)

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांना विचारू इच्छितो की, ज्यांच्यावर आरोप करायचे त्यांनी उत्तर द्यायचे नाही ही सभागृहामध्ये कोणती प्रथा आहे. (गोंधळ) सभापती महोदय, आपण उत्तराला परवानगी द्यावी. तुम्ही जेवढे बोललात त्याच्या दुप्पट आम्हालाही बोलता येते. आरोप करायचे आणि ऐकायचे नाही म्हणजे तुमच्या आरोपांमध्ये तथ्य नाही. एवढे गंभीर आरोप केल्यावर माननीय मंत्र्यांनीच उत्तर दिले पाहिजे. (गोंधळ) त्या त्या खात्याच्या माननीय मंत्र्यांना उत्तर देऊ द्यावे. आपल्याला तेवढे ऐकावे लागेल. माननीय मुख्यमंत्र्यांनीच उत्तर द्यावे असे कसे होईल ? त्यामुळे माझी विनंती आहे की, उत्तराला सुरुवात करावी. माननीय मंत्री उत्तर देत आहेत, त्या त्या खात्याचे मंत्री उत्तर देत आहेत. (गोंधळ) माननीय मुख्यमंत्री कशाला उत्तर देतील ? ज्यांच्यावर आक्षेप आहे ते उत्तर देतील. माझ्यावर आक्षेप आहे तर मी बोलणार आहे. सारा यंत्रांची पावणे दोन कोटी रुपयांची खरेदी आहे आणि सव्वाशे कोटी रुपयांचा भ्रष्टाचार आहे असे सांगता. काहीही नाटके करीत राहता. (गोंधळ) आम्ही 15 वर्षांची चौकशी करण्यास तयार आहोत. (गोंधळ)

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून मोठ्याने बोलतच असतात.)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्यांनी जागेवर बसावे.

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. ज्या माननीय मंत्र्यांवर आक्षेप घेतले, त्या माननीय मंत्र्यांनी त्या आक्षेपांचे उत्तर द्यायला नको का ? सभागृहात नेहमी नवीन नियम कोणता आहे ? त्यामुळे माझी विनंती आहे की, सन्माननीय सदस्यांना शांत करावे. आम्ही शांततेने ऐकले आहे. सन्माननीय सदस्यांनीही शांततेने ऐकून घ्यावे.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, माननीय मंत्री सभागृहात नव्हते. सुरूवातीला सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप बोलत असताना, माननीय मंत्र्यांनी उठून नियम सांगितला. नियम 34 प्रमाणे या विषयावर चर्चा करायला नको असे मत त्यांनी मांडले. नियम 34 प्रमाणे हा कोर्ट मॅटर आहे. कोर्टाशी संबंधित विषय आहे. आम्हाला राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांकडून उत्तर हवे आहे.

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक संध्याकाळी 05.03 ते 05.13 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

----

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापती स्थानी माननीय सभापती)**

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, या सभागृहाच्या काही प्रथा आणि परंपरा आहेत. हे सभागृह नियमाने चालते. आपण एखाद्या मंत्र्यांवर आरोप करायचे, बेछुट आरोप करायचे आणि उत्तर मात्र ऐकायचे नाही, हे योग्य नाही. मंत्री महोदयांना उत्तर देण्याचा पूर्ण अधिकार आहे. त्यामुळे माझी समोरच्या बाकावरील सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, तुमचे म्हणणे आम्ही शांतपणे ऐकून घेतले आहे. आरोप करण्याची हिंमत ठेवता तर उत्तर ऐकून घेण्याचीही हिंमत दाखविली पाहिजे.

सभापती महोदय, माझी आपल्याला विनंती आहे की, आपण या ठिकाणी घटनेचे संरक्षक आहात. मंत्री महोदयांना जो अधिकार आहे त्याचा वापर आपण त्यांना करु दिला पाहिजे. मंत्री महोदयांचे उत्तर सभागृहाने ऐकून घेतले पाहिजे, अशी माझी विनंती आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी सांगितली ती वस्तुस्थिती आहे आणि ती आम्हाला मान्यही आहे. मघाशी सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे यांचे भाषण संपल्यानंतर सन्माननीय सदस्यांचीही भाषणे संपली आणि आपण सन्माननीय सदस्य ॲड.अनिल परब यांना औचित्याचा मुद्दा मांडण्याची परवानगी दिली. त्यानंतर शासनाच्या वतीने दोन निवेदनेही करण्यात आली. ज्यावेळी मंत्री महोदयांच्या उत्तराचा प्रश्न आला त्यावेळी सन्माननीय सभागृह नेते श्री.एकनाथराव खडसे असे म्हणाले, त्यांचा माईक सुरु नव्हता, ही गोष्ट वेगळी, पण ते असे म्ळणले की, "उद्या मुख्यमंत्री महोदय या चर्चेला उत्तर देतील." मुख्यमंत्री महोदयांना वस्तुस्थिती कळली पाहिजे, यासाठी मी हे सांगत आहे. (अडथळा......) ते नाही म्हणाले तर मी माझे वक्तव्य मागे घेईन. त्यावर आम्ही 'होय', असे म्हणालो.

सभापती महोदय, आज मुख्यमंत्री महोदय कोणत्या व्यापात आहेत, याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे. त्यामुळे त्यांनी उद्या उत्तर दिले तरी चालेल, असा मुद्दा त्यावेळी झाला. कालपासून किंवा अनेक दिवसांपासून रखडलेली बिले काढू आणि इतर प्रस्ताव चर्चेला घेऊ, अशी आमची धारणा होती. परंतु, मंत्री महोदयांची उत्तरे घेऊन नंतर विधेयके चर्चेला घ्यायची असतील तर आमची काही हरकत नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.......

सभापती महोदय, ज्या नियमाने हे सभागृह चालते, त्याच नियमाने आम्हालाही कामकाज करावयाचे आहे. आम्हीही सत्तारुढ असताना असे ऐकलेले आहे आणि त्याला उत्तरे दिलेली आहेत. त्यामुळे मंत्री महोदयांच्या उत्तर देण्याला आमचा काही प्रत्यवाय असण्याचे कारण नाही. मंत्री महोदयांनी जरुर उत्तरे द्यावीत. तथापि, तत्पूर्वी मुख्यमंत्री महोदय उत्तर देणार आहेत की नाही, हे आम्हाला कळले पाहिजे. मंत्री महोदयांच्या उत्तराने समाधान होईल किंवा नाही, हा भाग वेगळा आहे. मुख्यमंत्री महोदय बोलणार की नाही, हे कळावे, एवढीच विनंती आहे. मंत्री महोदयांना उत्तर देण्याचा नक्कीच अधिकार आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस (बसून) : आवश्यकता भासली तर मी बोलेन.

--------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे (महिला व बाल कल्याण मंत्री) : सभापती महोदय, विरोधी पक्षाने नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव प्रस्तुत केलेला आहे. माझ्या विभागाच्या माध्यमातून जी काही कृती झालेली आहे, त्याबाबत अनियमिता, गैरव्यवहार, भ्रष्टाचार झाल्याचा आरोप विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी केला आहे. त्या संदर्भात उत्तर देण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, ज्यावेळी या प्रस्तावावर चर्चा सुरु झाली त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांच्या भाषणात अडथळा येऊ नये म्हणून मी काही वेळ थांबले होते. परंतु, भाषण लांबेल असे वाटल्याने मी पॉईंट ऑफ इन्फॉर्मेशनचा मुद्दा उपस्थित केला. हा विषय न्यायप्रविष्ट आहे, त्यामुळे सभागृहात या विषयी बोलणे योग्य आहे किंवा नाही, या संदर्भात सभापती महोदयांनी मार्गदर्शन करावे, असा मुद्दा मी उपस्थित केला होता. विरोधी पक्षाच्या कोणत्याही सन्माननीय सदस्यांच्या मुद्यावर मी आक्षेप घेतला नाही, विरोधी पक्षाच्या कोणत्या सदस्यांच्या भाष्यावर मी आक्षेप घेतलेला नाही.

सभापती महोदय, न्यायालयाने 20 जुलैला आम्हाला आदेश दिले. त्यानुसार 5 ऑगस्ट ही न्यायालयाची तारीख आहे. परंतु, तारीख झालेले आहे, वगैरे वगैरे रेकॉर्डवर आले आहे. ते रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, मी नोव्हेंबर, 2015 मध्ये महिला व बाल कल्याण विभागाची मंत्री झाले. मला वाटते, महिला व बाल कल्याण विभागावर झालेल्या या आरोपानंतर या विभागाचा आतापर्यंतचा इतिहास काय आहे, याबाबत मी खूप अभ्यास केला. सन 1975 पासून आयसीडीएस योजना सुरु झाली आहे. मला असे वाटते की, या वर्षी महिला व बाल कल्याण विभाग जेवढा प्रकाशझोतात आणि चर्चेमध्ये आला तेवढा इतिहासात आतापर्यंत आला नव्हता व या विभागावर एवढी चर्चाही झालेली नाही. त्यामुळे मला याचा आनंद वाटतो की, जे महिला आणि बाल वंचित आहेत, कुपोषित आहेत, त्यांच्याकडे कोणत्या का दृष्टीने होईना लोकांचे लक्ष वेधले गेले आहे. त्या प्रत्येक गोष्टीचे उत्तर देण्यासाठी मी तयार आहे. विरोधकांनी आतापर्यंत कोणत्याही मंत्र्यांवर एवढे लक्ष दिलेले नाही जेवढे लक्ष माझ्यावर दिले आहे] त्याबद्दलही मी त्यांचे स्वागत करते.

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे.......

सभापती महोदय, माझ्या या महिला व बाल कल्याण विभागामध्ये एकूण अंगणवाडया 97183 आहेत. यामध्ये मिनी अंगणवाड्या 10822 आहेत. एकूण 1,08,005 एवढ्या अंगणवाड्या आहेत. अंगणवाडी सेविकांची संख्या 95341 आहे. मिनी अंगणवाडी सेविकांची संख्या 9898 एवढी आहे. या महिला व बाल कल्याण खात्यामध्ये 6 महिने ते 3 वर्षे वयोगटातील 30,35,245 मुले आहेत. आणि 3 वर्षे मे 6 वर्षे वयोगटातील 29,27, 739 मुले आहेत. गर्भवती आणि स्तनदा माता सुध्दा या विभागांतर्गत आहेत. आम्ही त्यांना सुध्दा सेवा देतो. माझ्या लाभार्थ्यांची संख्या ही 70,94,374 एवढी आहे. या एवढ्या लोकांची काळजी आपल्याला घ्यावयाची आहे. ही फार मोठी जबाबदारी आहे. एवढ्या लाभार्थ्यांपर्यंत कुठलाही लाभ पोहोचविण्यासाठी जबाबदारीने पावले उचलणे ही एक महत्वाची जबाबदारी पार पाडत असताना माझी तारेवरची कसरत झालेली आहे.

सभापती महोदय, या महिला व बाल कल्याण विभागाचा कार्यभार मी जेव्हा सांभाळला तेव्हा या विभागामध्ये काही खरेदी करावयाची आहे आणि ही खरेदी कशी करायची, याबाबत डिसेंबर पासून ते फेब्रुवारी पर्यंत अनेक बैठका झालेल्या आहेत. जरूरी नाही की, याचे मिनिटस् शासनाला द्यावेत किंवा आरटीआय मार्फत कुणाला द्यावेत. माझे कमिशनर आणि माझे सेक्रेटरी यांना मी जवळपास दर दिवसाआड भेटते आणि आम्ही जी काही चर्चा करतो त्याचे मिनिटस् सर्व जगाला दाखविण्याची किंवा सांगण्याची गरज नाही.

यानंतर श्री.बोरले.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप : सभापती महोदय,.....

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी प्रश्न लिहून ठेवावेत.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना सांगू इच्छितो की, हे बरोबर नाही. आपण कृपया जागेवर बसावे. मंत्री महोदयांनी आपले उत्तराचे भाषण सुरु ठेवावे.

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, माझ्या ऑफिशिअल मिटिंग आणि माझ्या डिपार्टमेंट बरोबर झालेले माझे रोजचे संवाद या दोन गोष्टीमध्ये फरक आहे. माझ्या डिपार्टमेंट संदर्भात बोलताना रेट कॉन्ट्रॅक्ट विषयी बोलले गेले. यामध्ये सेंट्रल सप्लाय ॲन्ड परचेस ऑर्गनायझेशन हे भांडार डायरेक्टर ऑफ इंडस्ट्रीयल गर्व्हमेंट महाराष्ट्र अंतर्गत स्थापित झाले आहे आणि हे भांडार आपल्या काही रेट कॉन्ट्रॅक्टच्या संदर्भात निर्णय घेत असते. आदिवासी मंत्रालयात सन 2013 मध्ये एक चिक्कीचा व्यवहार झाला किंवा चिक्की खरेदी करण्याविषयी विचार झाला आणि त्या विषयी सचिवांनी त्यांचे काही मत व्यक्त केले, कमिशनरांनी मत व्यक्त केले आणि त्याची गरज नाही असे कमिशनरने सांगितल्यानंतर ती चिकी तेथे खरेदी करण्यात आली नाही. त्या विषयी जे एन्डॉर्समेंट झालेले आहेत ते आदिवासी विभागापुरते मर्यादित आहेत. त्यांनी ते पाळले नाहीत, ते तेथेच थांबले आणि त्यानंतर त्याच रेट कॉन्ट्रॅक्टवर महिला व बाल कल्याण विभागाकडून सर्व गोष्टींची विचारणा करुन चिकी सुद्धा खरेदी झालेली आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आरोप केला की, आदिवासी मंत्रालयाने ऑर्डर केलेली चिक्की तशीच पडून होती आणि ती चिक्की आता घेण्यासाठी लाडुची चिक्की झाली. सन 2013 मध्ये जी ऑर्डर झालेली आहे त्या सन 2013 च्या ऑर्डरमध्ये सन 2015 मध्ये डिस्ट्रीब्युट करण्यासाठी मी ही ऑर्डर केली, असा त्यांनी माझ्यावर सभागृहात आरोप केला आहे. या चिक्कीची सेल लाईफ 4 महिने आहे. तेव्हा चिक्कीची ऑर्डर झाली आणि ती चिक्की आता खपविण्याचा मी प्रयत्न केला, असे त्यांनी सांगितले. म्हणजे मला सन 2013 मध्ये माहितीही नव्हते आणि मला स्वप्नही पडले नव्हते की, मी महिला व बाल कल्याण विभागाची मंत्री होणार आहे किंवा त्या कॉन्ट्रॅक्टरलाही स्वप्न पडले नव्हते की, पुढे जाऊन 122 कोटी रुपयांचा पोषण आहार

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे..........

राज्याला मिळणार आहे आणि जेणे करुन भविष्यात अशी चिक्कीची खरेदी होणार आहे. 122 कोटी रुपयांचा पोषण आहाराचा 1 रुपया वाढीव आल्यामुळे एवढ्या मोठ्या प्रमाणात ही चिक्कीची खरेदी करता आली. अनेक अंगणवाडी सेविका मला भेटल्या. परवाच माझ्या घरी 400-500 अंगणवाडी सेविका आल्या होत्या. त्यांना बघितल्यानंतर मला धडकीच भरली की, एवढ्या मोठ्या संख्येने त्या कशा काय आलेल्या आहेत ? कारण, आता महिला व बाल कल्याण किंवा चिक्की ऐकले की, माझ्याही काळजात धडधड व्हायला लागते. सभापती महोदय, ज्यावेळी मी त्यांना भेटले, त्यावेळी त्यांनी मला आभाराचे एक पत्र दिले. मी ते पत्र आपल्याला सादर करु शकते. त्यांनी सांगितले की, आता पर्यंत प्रत्येक अंगणवाडीला हार्डली 4 पाकिटे आली असतील, परंतु आता आम्ही एका मुलाला 4-4 पाकिटे देऊ शकलो, एवढी चिक्की तुम्ही आम्हाला दिलेली आहे. त्याबद्दल त्यांनी आभार मानलेले आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सांगितले की, 166 कोटी रुपयांची चिक्की खरेदी केली. मी सांगू इच्छिते की, 166 कोटी रुपयांची चिक्की खरेदी केलेली नाही. 166 कोटी रुपयांची ही खरेदी आहे. 206 कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याचे बोलले गेले. यातील 41 कोटी रुपये डायरेक्ट अंगणवाडीतील मुलांसाठी इतिहासात पहिल्यांदा अंगणवाडी सेविकांच्या खात्यात जमा झाले. अंगणवाडी सेविकांनी त्यातून अंडी आणि केळी खरेदी करुन ती मुलांना दिलेली आहेत. गरिबांच्या मुलांचे अन्न खाण्याची संस्कृती माझी सुद्धा नाही आणि अशी वेळ माझ्यावर आली तर तो माझा अखेरचा श्वास असेल, हे मी सभागृहाला सांगत आहे. मला असे वाटते की, बालिश प्रकारचा आरोप आहे की, सन 2013 ची चिक्की मी आता खपविण्याचा प्रयत्न केला.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय,....

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी मुद्दे लिहून घ्यावे आणि नंतर बोलावे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : भाई, हे बरोबर नाही. मंत्री महोदयांना बोलू द्यावे. मी सर्व सन्माननीय सदस्यांची भाषणे ऐकली आहेत. आपण नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने त्यांना बोलू द्यावे.

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, मुलांच्या आरोग्याचा विचार करुन जर हाताने लाडू बनविले तर हायजेनिक पद्धत राहणार नाही आणि त्यामध्ये मानवी संसर्ग होऊ नये किंवा माणसाचा हात लागून इन्फेक्शन होऊ नये, असे सुप्रिम कोर्टाचे आणि केंद्र शासनाचे स्पष्ट आदेश आहेत. म्हणून आम्ही लाडू ऐवजी चिक्की देण्याचा निर्णय घेतला. शास्त्रशुद्ध पद्धतीने ही चिक्की दिली जावी, म्हणून आम्ही शासनातर्फे हा निर्णय घेतला. मी तेथे जाऊन ही चिक्की बनविली नाही. चिक्कीमध्ये हे आढळून आले, ते आढळून आले, असे आरोप झालेले आहेत. चिक्की देण्याचा निर्णय जरी माझा असला तरी चिक्कीच्या क्वॉलिटीबाबत माझ्या विभागाला सक्त आदेश दिले गेले आहेत आणि त्या आदेशाचे मी पालन केलेले आहे. कोर्टाने मला चिक्की विथ्ड्रॉ करायला सांगितलेली नाही किंवा मला कोणी आदेश दिले म्हणून मी चिक्की विथ्ड्रॉ केलेली नाही. ज्या दिवशी माझ्याकडे नगर जिल्हापरिषदेच्या अध्यक्षांची तक्रार प्राप्त झाली त्याच दिवशी मी माझ्या विभागाच्या कमिशनरांना आदेशित केले होते आणि आम्ही चिक्की न तपासता ती विथ्ड्रॉ केली, ती चिक्की वाटप न करण्याचा निर्णय घेतला. परंतु, याबाबत एक खुलासा करावासा वाटतो की, सर्वच मी जबाबदारीने बोलतो असे म्हणतात. मीही जबाबदारीने सांगते की, ज्या चिक्कीची तक्रार झाली ती चिक्की वाटपच झाली नव्हती आणि त्या चिक्कीबाबत माता समिती, अंगणवाडी सेविका, मुलांच्या घरच्या लोकांची तक्रार नसून त्या संदर्भात सरपंचांनी तक्रार केली होती. परंतु, तरी देखील आम्ही केवळ तक्रार आली म्हणून ती चिक्की विथ्ड्रॉ केली आणि ती चिक्की वाटप करण्यास मनाई केली. एका लॅबचा रिपोर्ट आला की, चिक्की खाण्यासाठी योग्य आहे तर दुसऱ्या लॅबचा रिपोर्ट आला की, चिक्की खाण्यासाठी अयोग्य आहे. मग दोन वेगवेगळे रिपोर्ट आल्यामुळे आपण काय करायला पाहिजे, म्हणून आम्ही तिसऱ्या लॅबकडे नमुने दिलेले आहेत आणि तो तिसरा रिपोर्ट काय येतो असा आम्ही निर्णय घेतला आहे. आम्ही कोर्टात देखील सांगितले आहे. आम्ही स्वतःच्या सदसद्विवेक बुद्धीला स्मरुन आणि आमच्या सोशल रिस्पॉन्सिबिलिटीच्या जीवावर चिक्कीची ऑर्डर थांबविली. चिक्कीच्या क्वॉलिटी बद्दल मी पूर्णपणे खातरजमा केलेली आहे. जेथे क्वॉलिटी खराब



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे.........

असेल तेथे त्या लोकांवर योग्य ती कारवाई करु आणि जेथे गरीब मुलांना खराब चिक्की चारण्याचा प्रकार झाला त्यांना क्षमा केली जाणार नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांनी सांगितले की, चिक्की खराब असल्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे अहवाल आलेले आहेत, हे धांदांत खोटे आहे. मी भाई यांना सांगू इच्छिते की, यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांचे अहवाल येत नाहीत. कोणत्याही जिल्हाधिकाऱ्यांचे अहवाल आलेले नाहीत. आयसीडीएसचे सीईओ तपासणी करतात. त्यांच्याकडे तक्रार आली, ती तक्रार कमिशनरांकडे आली, कमिशनरांकडून ती तक्रार माझ्याकडे आली आणि त्याच तक्रारीवर आम्ही ॲक्शन घेतली. जळगाव येथील एक तक्रार आली. एका सरपंचांनी सांगितले की, यामध्ये एक पट्टी सापडली. दुसरी तक्रार एक व्यक्ती टीएचआर असल्यामुळे चिक्की घरी घेऊन गेले आणि त्यांनी दोन दिवसांनी सांगितले की, आम्हाला चिक्कीमध्ये एक पिन आढळून आली. आम्ही त्याची चौकशी करु तो विषय नाही. एका दिवशी सरपंच दोन-चार मित्रांना घेऊन अंगणवाडीत गेले. त्यांनी चिक्की उघडली आणि सांगितले की, आम्हाला चिक्कीवर काही तरी दिसत आहे. एक चिक्कीचे पाकिट दोन दिवसापासून उघडून ठेवले होते आणि त्यावर बुरशी लागली होती. हे मान्य आहे. जेथे चूक झाली असेल त्याची कसून चौकशी होईल आणि त्यामध्ये जो गुन्हेगार आढळेल त्याला नक्कीच शिक्षा होईल. परंतु, ही चिक्की म्हणजे त्या लहान मुलांना काही तरी विषच खायला घालण्याचे पातक माझ्या माथी मारण्याचा प्रयत्न कोणीही करु नये. कारण, हे सर्व कोर्टात देखील येणार आहे. यामध्ये आम्ही व्यवस्थित क्वॉलिटी कन्ट्रोल केले आहे.

सभापती महोदय, दुसरा विषय ई-टेंडरींगचा आहे. मी ई-टेंडरींग संदर्भात प्रत्येक ठिकाणी घसा कोरडा करुन समजावून सांगण्याचा प्रयत्न करीत आहे. शासनाने दिनांक 18 डिसेंबर 2014 रोजी 3 लाखापेक्षा जास्त खरेदी करावयाची असेल तर ई-टेंडर करावे, असा नियम केला आहे. यामध्ये कोणताही वाद नाही. आमच्या शासनाने सत्तेवर आल्यानंतर हा निर्णय केला, याचे आम्ही स्वागत करतो. त्यामुळे जेव्हा ई-टेंडर करावयाचे असेल तेव्हा ते ई-टेंडरने करावे. परंतु, ही

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे.........

प्रक्रिया नेमकी काय आहे ? दिनांक 6 ऑगस्ट, 2010 रोजी 50 लाखापेक्षा अधिक खरेदी करावयाची असेल किंवा काम करावयाचे असेल तर ते ई-टेंडरींगने करावे, असा निर्णय झाला. त्यानंतर दिनांक 19 जानेवारी, 2013 रोजी ती किंमत 10 लाखापर्यंत करण्यात आली आणि आता 26 नोव्हेंबर रोजी 3 लाख करण्यात आली. ई-टेंडरींग याचा जो गावाजावा केला जातो त्याचा अर्थ काय आहे ? आपण कागदोपत्री जी टेंडरींगची प्रक्रिया पूर्ण करतो त्याऐवजी ई-मीडिया, इलेक्ट्रॉनिक मीडियाचा वापर करावा, असे म्हटले आहे. त्या शासन निर्णयामध्ये असे कोठेही म्हटलेले नाही की, जेथे दर करार निश्चित असतील तेथे तुम्ही ई-टेंडरींगने खरेदी करावी. मी सांगू इच्छिते की, महिला व बाल कल्याण विभागाने ई-टेंडरींग बद्दल सन 2013 मध्ये हा संभ्रमही दूर केलेला आहे. सन 2013 मध्ये मी मंत्री नव्हते. त्यावेळी जे मंत्री होते, त्यांनीच हा संभ्रम दूर केलेला आहे. ई-टेंडरींग बाबत दिनांक 19 जानेवारी, 2013 रोजी शासन निर्णयाच्या अनुषंगाने महिला व बाल कल्याण विभागाने सामान्य प्रशासन विभागाकडे खुलासा मागविला होता. याबद्दल त्यांचा खुलासा काय आहे ? त्यावेळी सामान्य प्रशासन विभागाने राज्य शासनाच्या खरेदी धोरणानुसार प्राधिकृत एजन्सी उदाहरणार्थ सीएसपीओ, एमएसएसआयडीसी, डीएमईआर, ईएसआयसी, डीजीएसएनडी यांनी निश्चित केलेला दर करार उपलब्ध असताना वरील शासन निर्णयानुसार सुमारे 10 लाखापेक्षा जास्त खरेदी करण्यासाठी, कारण त्यावेळची किंमत 10 लाख रुपये होती. या मध्ये असे म्हंटले आहे की, "The G.R. does not issue any guidelines, change for the current tendering process or any procedures followed at the department for tendering, except the issue of tender in electronic mode instead of paper based tenders. It is recommended to continue with existing rate cards and issue E-tender in case of new rate cards....." असे त्यांनी स्पष्ट म्हंटले आहे.

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे...

असे त्यांनी स्पष्ट सांगितले आहे, त्यामुळे या ई-टेंडरमध्ये कोणत्याही नियमाचे उल्लघंन झालेले नाही. एक कोटी रुपयांच्या वरच्या रकमेचे ई-टेंडर करण्याचे धोरण एप्रिल 2015 मध्ये अस्तित्वात आलेले आहे, यानंतर माझ्या विभागाने एकही रुपयाचा व्यवहार केलेला नाही. मुख्यमंत्री महोदयांनी व सरकारने जे नियम लावून दिले आहेत, त्या प्रमाणे कार्यवाही होणार आहे. वेगवेगळे आरोप करताना सन्माननीय सदस्य म्हणाले की, इतके जी.आर. तुम्ही काढले, हे सरकार फारच फास्ट आहे, मला तुम्ही फास्ट म्हटल्याबद्दल मी तुमचे आभार मानले पाहिजे. मला एक बाब सभागृहाच्या निदर्शनास आणून द्यावयाची आहे की, खरेदी करण्याचा विषय येतो तेव्हा 25-15 ची रक्कम जिल्ह्यांमध्ये किती दिवसात वाटप करण्यात आली, याबाबत कोणी काही म्हणाले नाही, जलसंधारणाची कामे इतक्या लवकर कशी झाली व त्यांचे जी.आर. कसे लवकर काढले याबाबत कोणी काहीही बोलले नाही. हे जी.आर. एका दिवसात काढले म्हणजे मी आंधळेपणाने त्यावर सही केलेली नाही. त्यासंदर्भातील प्रोसिजर, चर्चा, विचारविनिमय हे दोन तीन महिन्याअगोदर करण्यात येत होती. विविध विचारविनिमय झाले, विविध अभिप्राय मागविण्यात आले, यामध्ये जे रेट कॉन्ट्रॅक्ट झाले आहेत, ते माझ्या विभागाचे नाहीत, हे विविध विभाग व केंद्र शासनाच्या उद्योग विभागाने व इतर विभागांनी केले आहेत, सन 2011-2012 मध्ये 30 व 31 मार्च रोजी रेट कॉन्ट्रॅक्टनुसार एका दिवसात दहा पुरवठा आदेश देण्यात आले आहेत. सन 2013-2014 मध्ये 28 जून 2013 मध्ये 14 पुरवठा आदेश एका दिवशी देण्यात आले होते. त्याच्या मागेपुढे कोणतीही निवडणूक झाली नव्हती की मंत्री फार नवीन होते, त्यांना निर्णय करण्याबाबत जास्त घाई जाणवत होती असे नसून निवडणुका होऊन तीन ते चार वर्षे झालेली होती. यानंतर सन 2014-2015 मध्ये आचारसंहिता लागायच्या अगोदर 30 जून रोजी एका दिवसात 10 पुरवठा आदेश देण्यात आले आहेत. बाकीच्या मंत्री महोदयांनी 10,14,15 पुरवठा आदेश काढले व मी 24 पुरवठा आदेश काढले तर माझ्या स्पीडच्या हिशोबाने मी योग्यच केले आहे असे मला वाटते. आदेश काढणे हे जर चुकीचे वाटत असेल तर आपण देखील खूप फास्ट आहात, आपण देखील खरेदीला घोटाळे म्हणायला लागला आहात, हे म्हणताना आपण थोडा विचार केला पाहिजे.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे...

सभापती महोदय, दुसरा विषय रेट कॉन्ट्रॅक्टनुसार पंकजाताई यांनी चिक्की खरेदी केली, अशी चर्चा केली जाते. याच रेट कॉन्ट्रॅक्टनुसार जिल्हापरिषदांनी देखील खरेदी केलेली आहे. पुणे जिल्हापरिषदेने एक कोटी रुपयांची चिक्की खरेदी केली आहे. एका जिल्हापरिषदेने त्यांच्या बजेटमध्ये एक कोटी रुपयांची खरेदी करणे योग्य आहे, राज्य शासनाकडे सर्व जिल्ह्यांचा कारभार असतो येथे लाखो लाभार्थी आहेत, तेथे जी चिक्की देण्यात आली ती देखील कमी आहे, भविष्यात त्यांना चिक्की मिळेल किंवा नाही याची मला माहिती नाही. तेथील मुलांना मला आणखी चिक्की देता आली तर मी नक्की देईन. 41 कोटी रुपये डायरेक्ट अंगणवाडी सेविकांच्या हातात देण्यात आले आहेत. त्या पैशातून तेथील मुलांना अंडी व केळी खाऊ घातली आहे. याची मात्र चर्चा कोणीही करीत नाही.

सभापती महोदय, 206 कोटी रुपयांमधून 41 कोटी रुपये वजा करण्याची तसदी कोणीही घेत नाही, इतके कच्चे गणित आमच्या विरोधी पक्षाचे आहे. रायगड, कोल्हापूर, पुणे, जळगांव, अहमदनगर व नंदूरबार या जिल्हापरिषदांमध्ये आम्ही सत्तेत नाही. या जिल्हापरिषदा कोणाच्या आहेत त्याची तपासणी सभापती महोदय आपण करुन घ्यायला पाहिजे. जे आरोप माझ्यावर होत आहेत त्याच रेट कॉन्ट्रॅक्टनुसार या जिल्हापरिषदांनी खरेदी केलेली आहे. रेट कॉन्ट्रॅक्टनुसार खरेदी करताना मी गेल्या पाच वर्षातील अभ्यास केला आहे. आतापर्यंत 1402 कोटी रुपयांची खरेदी रेट कॉन्ट्रॅक्टनुसार झालेली आहे. (अडथळा..) मी केलेल्या 166 कोटी रुपयांच्या खरेदीला चूक म्हणायचे असेल तर वर्षानुवर्षे होत असलेली ही सर्व खरेदी चुकीची होती असे यांना म्हणावे लागेल. यापूर्वी देखील ई-टेंडरिंग होते, तेव्हा दहा लाख रुपयांच्या वरची खरेदी ई-टेंडरद्वारे करण्यात येत होते. तेव्हा मागील सरकारने रेट कॉन्ट्रॅक्टनुसार 408 कोटी रुपयांची खरेदी केलेली आहे. ती खरेदी कशी करण्यात आलेली आहे.(अडथळा...) तुम्ही जर असे खोटे बोलले तर मी हक्कभंग आणेल.

सभापती महोदय, जेव्हा दहा लाख रुपयांच्यावरची खरेदी ई-टेंडद्वारे करावी असा नियम होता तेव्हा 14 व 15 कोटी रुपयांची खरेदी ई-टेंडरद्वारे का करण्यात आलेली नाही. (....गोंधळ...)

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे...

सभापती महोदय मला संरक्षण देण्यात यावे. सभापती महोदय, या 20 जिल्ह्यांमध्ये आयएसएनआयटी व आयसीडीएस मधून 122 कोटी रुपये आले होते. यामध्ये 75 कोटी रुपयांची चिक्की देण्यात आली आहे. यामध्ये 52 (....गोंधळ....)

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांना आपण एक मिनिटे थांबावे, सन्माननीय सदस्यांना पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलायचे आहे.

(दोन्ही बाजूंकडील सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करतात)

**सभापती** : कृपया सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे, सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित आपण खाली बसा. विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांची भाषणे शांतपणे सर्वांनी एकून घेतली आहेत, ही वस्तुस्थिती आहे, मी चेअरवर नव्हतो तरी मी सर्वांची भाषणे ऐकत होतो. मंत्री महोदयांना उत्तर देऊ द्या, त्यावर आपणाला नंतर काय हरकत घ्यावयाची आहे ती आपण घ्यावी, पॉईटऑफ ऑर्डरवर मी आपणाला बोलण्यास संधी देतो.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, आपण सांगितल्याप्रमाणे राईट ऑफ रिप्लायमध्ये काही प्रश्नोत्तरे होऊ शकतात हा भाग वेगळा आहे, माननीय मंत्री महोदया उत्तर देताना त्यांनी सन्माननीय सदस्यांच्या नावाचा उल्लेख केला आहे. सन्माननीय सदस्यांना पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलावयाचे आहे. मंत्री महोदया उत्तर देत असताना पॉईंट ऑफ ऑर्डर सन्माननीय सदस्यांना विचारता येतो. सभापती महोदय, आपण या प्रस्तावाबाबत निर्णय दिलेला आहे. पॉईंट ऑफ ऑर्डरवर सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांना बोलायचे आहे, त्यांना आपण बोलण्यास संधी द्यावी.

**सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना पॉईंट ऑफ ऑर्डरवर बोलण्यास संधी देतो, कोणीही वैयक्तिक बोलू नये, कोणाचेही नाव घेऊ नये. कोणीही खाली बसून बोलू नका.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, मंत्री महोदया बोलत असताना त्यांनी ई-टेंडरिंग बाबत इतर जिल्हापरिषदांची उदाहरणे दिली आहेत. मी ज्या दर कराराप्रमाणे चिक्की घेण्याचे ठरविले आहे त्याच दर कराराप्रमाणे अमुक अमुक जिल्हा परिषदांमध्ये चिक्की घेण्याचा निर्णय झाला. सभापती महोदय, ई-टेंडरचा निर्णय झाल्यानंतर त्यातील कंडीशन गृहित धरुन कार्यवाही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित...

केली आहे. हा इंटरपिटीशनचा भाग आहे, त्यांनी ई-मिडिया वगैरे जे सांगितले तो इंटरपिटीशनचा भाग आहे. मूळ ई-टेंडरिंगचा निर्णय झालेला आहे तो आदेश मी करेक्ट करीत आहे. जे आदेश काढण्यात आले ते मी पॉईंट आऊट करीत आहे. मंत्री महोदया मूळ विषयापासून बाजूला चालल्या आहेत. हे मी मंत्री महोदयांना सांगण्याचा प्रयत्न करीत होतो.

श्रीमती पंकजा मुंडे : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले की, 75 कोटी रुपयांच्या चिक्कीपैकी 52 कोटी रुपयांची चिक्की शेंगदाण्याची होती. 23 कोटी रुपयांची चिक्की राजगीऱ्याची होती. जेथे जेथे चिक्कीचे वाटप करण्यात आले तेथे कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही. एक रुपयाची देखील तक्रार प्राप्त झालेली नाही. फक्त या दोन तीन जिल्ह्यांमध्ये तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत त्याची आम्ही कसून चौकशी करीत आहोत.

या नंतर श्री.भोगले....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे.....

सभापती महोदय, दुसरा विषय माननीय सदस्य सर्वश्री भाई जगताप व शरद रणपिसे यांनी मांडला होता. संच खरेदीच्या विषयामध्ये आम्ही चेक दिला असे त्यांचे म्हणणे आहे. खरेदी करीत असताना ज्या कॉन्ट्रॅक्टरच्या नावाने कॉपीराईट आहे त्यांच्याच नावाने चेक देतो. ज्याच्या नावाने कॉपीराईट आहे त्यांच्या नावाने चेक न देता दुसऱ्याच्या नावाने चेक इश्यू झाल्याचे आरोप केले गेले. चेक माझ्या हातामध्ये आहे, मी आपल्याकडे सादर करते. जगद्‌गुरु प्रिंटिंग प्रा.लि.च्या नावानेच चेक दिला आहे. कॉपीराईटचे अधिकार त्यांच्याकडे होते, त्यांना चेक दिला आहे. इपीजीएम मशीन बाबत असा आरोप करण्यात आला की, दोन लोकांना ऑर्डर दिली गेली. ही ऑर्डर देत असताना एकाला अगोदर ऑर्डर दिली गेली. हा आरोप होत असताना मी सभागृहात उपस्थित नव्हते, कामानिमित्त बाहेर लॉबीमध्ये होते. परंतु मी त्याची शहानिशा केली असता असे आढळून आले की, यामध्ये कोणत्याही प्रकारे अशी गोष्ट झाल्याचे आढळून आलेले नाही. सर्व गोष्टी नियमामध्ये झालेल्या आहेत. त्यांचा करार झाल्यानंतर खरेदी झालेली आहे. दोन लोक त्यामध्ये उतरले असताना दोन वेगवेगळ्या हेडखाली खरेदी करावयाची होती, त्या हेडमध्ये समान रक्कमेची खरेदी केली आहे. 9-9 कोटी रुपयांची ऑर्डर दोघांना देण्यात आली. एकाला जास्त आणि एकाला कमी ऑर्डर दिली असे झालेले नाही. त्यामध्ये आपले थोडेसे ज्ञान वापरुन हेल्दी कॉम्पिटीशन निर्माण करुन दोघांकडून चांगले काम करुन घेता येईल.

सभापती महोदय, पूर्वी ग्रोथ मॉनिटरींग कागदोपत्री व्हायची, आता ही ग्रोथ मॉनिटरिंग सॉफ्टवेअरच्या आधारे होणार आहे. मुलांचे खरे वजन, त्यांचा बॉडी मास इंडेक्स एका सेंटरमधून ऑपरेट होणार आहे. मालन्यूट्रिशन आपण खरेच दूर करतो की नाही, कुपोषण कमी होते की नाही हे मॉनिटरिंग होणार आहे. याची खरेदी आताच ऐतिहासिक झाली आहे असे नाही. याबद्दल पूर्वीही निर्णय घेतलेले आहेत. याचे दर करार केंद्र सरकारच्या डी.जी.एस. अँड डी. यांच्याकडून झालेले आहेत. या दर कराराच्या निश्चितीनंतर हे निर्णय झालेले आहेत. हा निर्णय करण्यासाठी टेक्नीकल विंग आहे. फायनान्शियल आणि टेक्नीकल, क्लॅरिटी विंग हे निर्णय करीत असतात. देशाच्या पातळीवर हे निर्णय त्यांनी केलेले आहेत. देश पातळीवरील निर्णय मी या ठिकाणी बसून केलेला नाही. दर करारावर ज्या दोन एजन्सी पुढे आल्या, त्यांना काम दिले आहे.

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे.....

ग्लोबल टेंडर फ्लोट झालेले होते. ग्लोबल टेंडर फ्लोट होताना त्यामध्ये महिला व बालकल्याण मंत्र्यांचा हात असण्याचे कारण नाही. त्यामुळे मी कोणाला फेव्हर करण्याचे कोणतेही कारण नाही.

सभापती महोदय, वैद्य इंडस्ट्रीबाबत उल्लेख झालेला आहे. त्या इंडस्ट्रीच्या संदर्भात बऱ्याच बातम्या ऐकण्यात आल्या. मी वेगवेगळया स्टोरी ऐकल्या आहेत. मी यामुळे व्यथीत झाले. मला वाटले की, आपण खरे उत्तर द्यावे. जेव्हा कळले की, ही टाटाची इंडस्ट्री नाही अशी टीव्हीवर बातमी आली किंवा आरोप झाले तेव्हा आम्ही त्यांना शो कॉज नोटीस पाठविली. त्या व्यक्तीनी दिलेले पत्र मी आपल्यासमोर सादर करते. 1996 पासून ती फॅक्टरी अस्तित्वात आहे. त्यांनी सांगितले की, रविवारी माझी फॅक्टरी बंद असताना काही लोकांनी माझ्या फॅक्टरीचे शूटिंग करुन दिले. दुसऱ्या दिवशी फॅक्टरी सुरु असतानाचे शूटिंग दाखविले नाही. ही फॅक्टरी आर्मीला पुरवठा करते. देशभरात त्यांचे कॉन्ट्रॅक्ट आहेत. ते महाराष्ट्र शासनाच्या बालकल्याण विभागाचे कॉन्ट्रॅक्ट नसून डी.जी.एस.अँड डी. या केंद्र सरकारच्या एजन्सीने केलेला दर करार आहे. त्यामुळे त्यांची फॅक्टरी नाही असा आरोप झाले तो पूर्णपणे चुकीचे आहे. ती फॅक्टरी अस्तित्वात आहे. कोणतीही चुकीची घटना घडली तर त्यावर कडक शासन करण्याची आमची मानसिकता आहे. त्यांच्या क्वालिटीबद्दल खात्री करुन प्रोसीजर करुन निर्णय घेतला आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी वॉटर फिल्टरबद्दल बोलत असताना बाजारात जी किंमत आहे त्यापेक्षा जास्त दराने खरेदी केली असे म्हटले आहे. प्रत्यक्षात असे झालेले नाही. महाराष्ट्र शासनाच्या सी.एस.पी.ओ.नी दर करार केलेले आहेत. वॉटर फिल्टरबाबत दर करारामध्ये जे नियम घालून दिलेले आहेत त्याप्रमाणे खरेदी झालेली आहे. त्यांचा जो निर्णय झाला आहे त्यामध्ये वॉटर फिल्टरची खरेदी जर 1 ते 2 कोटी रुपयांपर्यंतची असेल तर 25 लीटर स्टोरेज टाईप वॉटर फिल्टरचा दर 5292 रुपये आहे. 2 ते 3 कोटी रुपयांपर्यंतची खरेदी असेल 25 लीटर स्टोरेजच्या वॉटर फिल्टरचा दर 5220 रुपये आहे. 3 ते 4 कोटी रुपयांपर्यंतची खरेदी असेल 25 लीटर स्टोरेजच्या वॉटर फिल्टरचा दर 5120 रुपये आहे. 4 ते 5 कोटी रुपयांपर्यंतची खरेदी असेल 25 लीटर स्टोरेजच्या वॉटर फिल्टरचा दर 5040 रुपये आहे आणि 5 कोटी रुपयांपेक्षा अधिक किंमतीची खरेदी असेल तर 25 लीटर स्टोरेजच्या वॉटर फिल्टरचा दर 5040

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे.....

रुपये आहे. जेवढ्या किंमतीची खरेदी करावयाची आहे त्याप्रमाणे त्यांनी दर आकारले आहेत. त्यामध्ये कोणत्याही दर निश्चितीमध्ये आमचा सहभाग असण्याचे काहीच कारण नाही.

सभापती महोदय, अनेक विषय सभागृहासमोर मांडण्यात आले. माझ्यावर अनेक प्रकारचे आरोप करण्यात आले. बिस्किट खरेदीबाबत आरोप झाले. त्या कंपनीकडे बिस्किट पुरविण्यासाठी एफडीएची परवाना नाही असे सांगण्यात आले. त्याबाबत आम्ही त्यांच्या एफडीए परवान्याची चौकशी केली असता 2009 ते 2013 पर्यंत त्यांना परवानगी होती अशी माहिती मिळाली. नंतर केंद्र सरकारच्या सूचनेप्रमाणे एफएएसएसओ यांचा त्यांना परवाना आवश्यक असते तो त्यांनी घेतली असून त्याची मुदत 2015 ते 2018 पर्यंत आहे. जेवढे प्रॉडक्ट यादीमध्ये दिलेले आहेत ते सर्व प्रॉडक्ट त्यामध्ये आलेले असून त्याला एफडीएची परवाना एफएएसएसओमध्ये कन्व्हर्ट झालेला आहे. त्यामध्ये कोणतीही अनियमितता झालेली नाही. मी गेली अनेक दिवस या आरोपांबाबत खोलवर विचार करीत होते. कधी कधी वयाची आणि कर्तृत्वाची माणसे कशी सांगड घालतात हे मला कळत नाही. माझे वय लहान म्हणून मला काही येत नाही, कळत नाही, मी बोलू शकत नाही, महिला राजकारणी आहे म्हणून चांगली कणखर भूमिका घेऊ शकत नाही असे वाटणाऱ्यांना मी सांगू इच्छिते की, या सगळया चुका करण्यासाठी मी येथे आलेली नाही, हे त्यांनाही माहीत आहे. ही माझी संस्कृती नाही. गरीब मुलांच्या तोंडातील घास काढण्याचे रक्त माझ्या अंगात नाही. त्या मुलांना घरचा घास देणाऱ्या संस्कृतीत मी वाढलेली आहे. ही माझी संस्कृती नक्की नाही. या लहान मुलांचे कुपोषण आणि शोषण करण्यासाठी नव्हे तर त्यांच्या पोषणासाठी या मंत्रालयाची जबाबदारी माझ्याकडे दिलेली आहे.

सभापती महोदय, कोण म्हणतो हे चांगले आहे, कोण म्हणतो ते चांगले आहे. कॉन्ट्रॅक्टर लॉबीमध्ये टग वॉर मोठया प्रमाणात आहे. हे कॉन्ट्रॅक्टर लोक ऑपरेट करतात. सभागृहात कोणाचे तरी नाव घेऊन यांना तुम्ही चेक दिला असे सांगितले गेले. मी कोणालाही कोणता चेक दिलेला नाही. मंत्रालयाची माहिती माझ्यापेक्षा तुम्हाला जास्त आहे. महिला बालकल्याण मंत्रालय असे काम करीत नाही. मी कोणाच्या नावाने चेक दिलेला नाही. कोणाचे तरी नाव माझ्याशी जोडून माझा परिचय असल्याचे म्हणणे हा बालिश आरोप आहे. मी सगळयांना ओळखते. देशातील मोठमोठया उद्योगपतींपासून ऊसतोड कामगारांच्या मुकादमापर्यंत मी सगळ्यांना ओळखते.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे.....

मी आल्यानंतर नवीन कॉन्ट्रॅक्टर पिक्चरमध्ये यायचे. मी आल्यानंतर नवीन माणसे पिक्चरमध्ये आली आहेत. ही माणसे वर्षानुवर्षे तेथे काम करीत आहेत. त्यांच्याबरोबर निर्णय घेताना मी डिलिव्हरीची खात्री करुन घेतली. डिलिव्हरी करण्याची खात्री घेतली. ते मुलांच्या तब्येतीबाबत कोणतीही हेळसांड केली जाणार नाही. मुलांना काही तरी वेगळे दिले म्हणून तक्रार आहे, मुले आजारी पडली, त्यांना बाधा झाली अशी माहिती पुढे आलेली नाही, असे चित्र समोर आलेले नाही. जे काही झाले ते तपासून नंतर निर्णय घेण्यासाठी आम्ही समर्थ आहोत. मात्र जे आरोप झाले ते भविष्यात राजकारण्यांना कशा प्रकारचे वातावरण निर्माण करुन घेतील याबद्दल नक्कीच मला मत व्यक्त करावेसे वाटते.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.भाई जगताप भाषण करताना असे म्हणाले की, मी त्यांचे नाव घेत नाही. माननीय सदस्य माझे नाव घेऊ शकतात. माझे नाव घ्यायला बंदी नव्हती. मी महिला बालकल्याण मंत्री आहे. त्यांनी माझे नाव घेतले किंवा महिला बालकल्याण मंत्री म्हणून जरी उल्लेख केला तरी त्यात फरक पडत नाही. संस्कृतीबद्दल कोणी तरी बोलले. ही आपल्या महाराष्ट्राची संस्कृती आहे. एक महिला सक्षमपणे काम करीत असताना अशा प्रकारे घेरणे, पायरीवर बसून निदर्शने करणे, माझ्या घरच्या नावाने चिक्कीचे एक पाकिट लेबल लावून फोटो काढून ती प्लॅटफॉर्मवर वाटणे हे महाराष्ट्राच्या संस्कृतीचे काम नाही. महिला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील असो, भारतीय जनता पक्षातील असो, शिवसेना पक्षातील असो किंवा कोणत्याही पक्षातील असो, त्या महिलेला अशा प्रकारे अवमानीत करणे हे राजकारणाच्या संस्कृतीत बसत नाही. परवा काही ज्येष्ठ पत्रकार माझ्याशी बोलत होते, आठवण काढत होते. माननीय श्री.शरद पवार मुख्यमंत्री होते त्यांची आठवण काढत होते. कोणी तरी स्व.विलासराव देशमुख यांची आठवण काढत होते. कोणी तरी स्व.गोपीनाथ मुंडे यांची आठवण काढत होते. मी सगळयांची नावे या ठिकाणी घेऊ इच्छित नाही. मला वाटले की, ते पत्रकार खूप नशिबवान आहेत. त्यांच्यासमोर एवढे चांगले नेते आणि त्यांच्या आठवणी आहेत. पुढील पत्रकारांना आणि पुढच्या पिढीला चांगल्या आठवणी काढण्यासाठी या सभागृहाचा उपयोग झाला पाहिजे. हे सर्वोच्च सभागृह आहे.

2ओ.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती पंकजा मुंडे...

या सभागृहातून वैयक्तिक राजकारण पेरले जाण्याची प्रथा पाडू देऊ नये एवढी मी या निमित्ताने विनंती करते. मी सक्षमपणे या आरोपांना सामोर जाण्यास तयार आहे. मी कधीही कुठल्याही तक्रारी किंवा चौकशीसंबंधीं माघार घेतलेली नाही. मला जेव्हा पहिली बातमी टीव्हीद्वारे समजली तेव्हा मी माननीय मुख्यमंत्र्यांना स्वत: फोन केला आणि साहेबांना सांगितले की, मी कुठल्याही चौकशीला सामोरे जाण्यास तयार आहे. कोणत्या तरी कार्यकर्त्याने ॲन्टी करप्शनकडे तक्रार केली आहे. त्यास देखील आम्ही उत्तर देऊ. न्यायालयात देखील खेचण्यात आले आहे. त्याला देखील उत्तर देईन. न्यायालय हे सर्वोच्च आहे. ते ठरवेल नक्की काय आहे. यामध्ये एका रूपयाचा देखील भ्रष्टाचार झालेला नाही. यात पंकजा गोपीनाथ मुंडे असेल तर मी राजकारणातून बाहेर जाईन. मी राजकारणातून बाहेर जावे यासाठी स्वप्ने बघितली जात असतील तर ती स्वप्ने कधीही पूर्ण होऊ शकत नाही. माजी राष्ट्रपती श्री.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे नुकतेच निधन झाले आहे. त्यांच्या अग्निपंख या पुस्तकात एक चांगला सुविचार आहे. ज्यांना झोप येते ते स्वप्न पहात नाही. स्वप्ने ती असतात जी झोप उडवतात. त्यामुळे महाराष्ट्राचे चांगले करण्याचे स्वप्न आम्ही पाहिलेले आहे. गरीब मुलांचा निवारा, त्यांच्या अन्नाचा घास काढून घेणारे रक्त आमच्या अंगात नाही. त्या मातीत मिसळून काम करण्याचे, त्या गरीबांना सेवा देण्याचे आमच्या रक्तात आहे. यात एकाही रूपयाचा घोटाळा किंवा गैर व्यवहार नाही. हे आरोप बिनबुडाचे आहेत. हे आरोप सिद्ध करण्यासाठी आपल्याकडे फक्त जी.आर.आणून दाखविण्यात आले आहेत. यात प्राईझ एस्क्लेशन आहे, यात ऑडिटमध्ये कुठल्याही प्रकारचे ताशरे ओढलेले आहेत, कॅगच्या अहवालात काही तरी सांगितले आहे, असे असते तर गुन्हे दाखल करण्यासंबंधी मी काही तरी समजू शकले असते. पण एकाने उभे राहायचे आणि हे सगळे गलत आहे हे सगळेच वाईट आहे असे म्हणून आम्हाला राजकारणातून परावृत्त करण्याची मागणी करायची हे चूक आहे. माझे नेते मला ज्या दिवशी सांगतील आणि ज्या दिवशी एक रूपयाची चूक मला आढळेल त्या दिवशी मी स्वत:हून आपणा सर्वांची परवानगी न मागता बाहेर जाईन. त्या मुलांचे भवितव्य कोणाच्याही हातामध्ये देण्याची आता मला हिंमत होत नाही. त्या मुलांचे भविष्य सांभाळण्याची खंबीरता माझ्यात आहे. आरोपांना सामोर जाण्याची देखील माझ्या मनामध्ये हिंमत आहे. प्रत्येक आरोपाला कोर्टामध्ये सामोरे जाऊन मी प्रत्येक आरोपातून स्वच्छपणे बाहेर येईन हा माझा आत्मविश्वास आहे. धन्यवाद. ..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे (कृषी मंत्री) : सभापती महोदय, कृषी खात्याच्या चारा यंत्राच्या खरेदीमध्ये 125 कोटी रूपयांपेक्षा जास्त रकमेचा गैरव्यवहार आढळून येणे अशा स्वरूपाचा एक आक्षेप यामध्ये आहे. त्यामुळे मी वस्तुस्थिती सभागृहाच्या निदर्शनास आणून देत आहे. मूळामध्ये महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट कार्पोरेशनच्या माध्यमातून ही खरेदी होत असते. याचा कृषी आयुक्त, कृषी सचिव, कृषी मंत्री यांचा काही संबंध येत नाही. कारण त्यांच्याकडे कधीच फाईल येत नाही. महाराष्ट्र ॲग्रो इंडस्ट्रीयल डेव्हलपमेंट कार्पोरेशन खरेदी करण्याचे पूर्ण अधिकार आहेत. कारण ती व्यवसाय करणारी संस्था आहे. त्यांची क्वालिटी कंट्रोलसाठी, विक्री करण्यासाठी, निर्णय घेण्यासाठी, आर.सी.करण्यासाठी तसेच, ई-टेंडर मागविण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा आहे. एक व्यावसायिक महामंडळ म्हणून त्यांच्याकडे सर्व अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. एका वृत्तपत्रामध्ये हेड लाईन आली की, एकनाथ खडसे यांचा 125 कोटी रूपयांचा महाघोटाळा. एकनाथ खडसे यांचे नाव घेतले की, त्यांचा टीआरपी वाढतो. लोक पेपरपण विकत घेतात आणि वर म्हणतात की, एवढा कमी घोटाळा केला. असे म्हणणारे आमचे सहानुभूतीदार देखील असतात. त्यामुळे मी यासंबंधातील माहिती घेण्याचा प्रयत्न केला. चारा आणि सारा ही यंत्रे आहेत. आमच्या कालखंडामध्ये किती यंत्रे खरेदी झाली यासंबंधातील माहिती घेण्याचा प्रयत्न केला. मी मागचे काही काढणार नाही. आमच्या कालखंडामध्ये 1 कोटी 68 लाख रूपयांची ट्रॅक्टरचलित सारा यंत्राची खरेदी झालेली आहे. कडबा कुट्टी चारा यंत्रांची 1 कोटी 73 लाख रूपयांची खरेदी झालेली आहे. ही सर्व खरेदी पाहिली तर ती तीन ते चार कोटी रूपयांच्या आत आहे हे स्पष्ट दिसून येते, तर मग हा 125 कोटी रूपयांचा आकडा आला कुठून ? ज्या वृत्त पत्रामध्ये बातमी आली होती त्यांना मी विनंती केली की, पुढील पानावर नाही तर निदान मागच्या पानावर आमचा खुलासा अगदी छोटासा तरी छापावा. याच्याशी माझा काहीही संबंध नसल्यामुळे एमएआयडीसीच्या आयएएस अधिकाऱ्याच्या सहीने महामंडळांच्या लेटरहेडवर खुलासा पाठविण्यात आला. ही बातमी गंभीर होती.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.

लोकांमध्ये संभ्रम होता कामा नये म्हणून काय काय खरेदी केली, केव्हा केली, कोणी केली व का केली याचा खुलासा देण्यास सांगितले. त्यांनी या संबंधातील खुलासा नीटपणे केला. यातील काही व्यवहार हे मागच्या कालखंडात झाले होते. चाप कटर वगैरे यंत्रे एका विशिष्ट कंपनीकडून खरेदी केले पाहिजे असे मागच्या कृषी मंत्र्यांचे आदेश होते. त्यांची मुदत संपल्यानंतर माजी मंत्र्यांनी या संदर्भात आदेश दिला होता की, याच कंपनीकडून पुढील रेट कॉन्ट्रॅक्ट किंवा ई-टेंडरिंग होई पर्यंत यंत्रे खरेदी केली पाहिजेत. नवीन सरकार आल्यानंतर त्यांनी ठरविले की, एवढ्या रकमेमध्ये एकाच कंत्राटदाराकडून यंत्रे का विकत घ्यायची ? त्यामुळे बाकीच्या यंत्र खरेदी संदर्भात ई-टेंडरिंग काढण्यात आले. अजूनही ई-टेंडरिंगची प्रक्रिया सुरूआहे. दोन महिन्यांपूर्वी ई-टेंडरिंग काढले होते. ती प्रक्रिया आता पूर्णत्त्वास येत आहे. आता पर्यंत एका कंत्राटदाराकडून खरेदी करण्यात येत होती. त्याऐवजी आता सहा कंत्राटदारांकडून यंत्रे खरेदी करण्यात आलेली आहेत. आमचा खुलासा वर्तमानपत्राने छापलाच नाही. मात्र नाव तर एकनाथ खडसेचे येऊन गेले. मी त्यांना आमचा खुलासा छापावा एवढीच विनंती केली होती. आज 40 वर्षे राजकीय जीवनामध्ये काम करीत असताना, आरोप करीत असताना आमचा जो खुलासा असतो तो एका शब्दात तरी छापला पाहिजे होता. एकनाथ खडसे यांचा 125 कोटी रुपयांचा घोटाळा अशी बातमी देऊन आपण विषय संपवतात. दोन रुपयाचा आपला पेपर अडीच रुपयात खपला असेल. कारण नाव एकनाथ होते. माझी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना एवढीच विनंती आहे की, त्यांनी या चारा यंत्राच्यासंबंधात नीट माहिती घेतली घ्यायला पाहिजे होती. त्यांना यासंबंधसतील मीच दिली असती. याची चौकशी करण्याची आपली इच्छाच आहे म्हणून मी माननीय मुख्यमंत्र्यांना म्हटले की, .....

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मला कोट केले असल्यामुळे मी उभा आहे. मी या विषयाच्याबाबतीमध्ये एक अवाक्षर सुद्धा बोललो नाही. ठरावामध्ये आहे हे मान्य आहे. त्यामुळे ठरावामध्ये असे म्हटले आहे असा माननीय मंत्र्यांनी उल्लेख करावा. ज्या गोष्टींबद्दल मी बोललो आहे त्याचा उल्लेख राईट टु रिप्लायच्या वेळी करणार आहे. विरोधी पक्ष नेते असा उल्लेख केला म्हणून मी बोलण्यास उभा राहिलेलो आहे.

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, मी विरोधी पक्ष नेते हा शब्द मागे घेतो. ठरावात आपले नाव होते म्हणून मी उल्लेख केला होता. मी माझे शब्द मागे घेतो. जी तीन कोटी रूपयांची यंत्र खरेदी करण्यात आली आहे त्याची चौकशी झाली पाहिजे अशी सभागृहाची इच्छा आहे. त्यामुळे चारा यंत्र असो, सारा यंत्र असो, डीबीएम असो, बीबीएम असो या सर्वांची चौकशी करण्यासाठी मी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती केली आहे. यावेळी त्यांना याची लिंक जरा मागच्याशी पण जोडली जावी अशी देखील विनंती केली आहे.

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सभापती** : सभागृहाची वेळ सायंकाळी 6.00 वाजेपर्यंत होती. सभागृहाची वेळ कामकाज संपेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, जोपर्यत रेट कॉन्ट्रॅक्ट येत नाही तोपर्यंत त्याच ठेकेदाराकडून खरेदी करावी. तेव्हा या महामंडळामध्ये पूर्वी जे काही व्यवहार झाले असतील माझ्या कारभारासहित त्याची चौकशी करावी. कर नाही त्याला डर कशाला ? त्यांनी मागील 15 वर्षाची, 10 वर्षाची, 5 वर्षाची अगदी दोन वर्षातील खरेदीची चौकशी करावी, पण सत्य जनतेसमोर आणावे. मी माझ्या विभागापुरता बोलत आहे. सर्व विभागांची चौकशी करायला माझी काय हरकत आहे ? या ठिकाणी माननीय मंत्री महोदया श्रीमती पंकजी मुंडे यांनी अगदी सविस्तर स्पष्टीकरण दिलेले आहे. मला वाटते आपणास स्व.गोपीनाथ मुंडे साहेबांची आठवण झाली असेल. त्यांची देखील चौकशी करावी अशी मी विनंती करणार आहे. मानननीय मंत्री श्री.विनोद तावडे, खडसे असतील या सर्वांच्या कारभाराची चौकशी करावी अशी विनंती मी माननीय मुख्यमंत्र्यांना करीन. कारण काही नसताना नुसते झोडपत रहायचे, भ्रष्टाचारी आहे, भ्रष्टाचारी आहे असे म्हणत रहायचे. तेव्हा यातील सत्य समाजासमोर आले पाहिजे. आपण मागणी केल्याप्रमाणे माननीय मुख्यमंत्री कोणाकडून चौकशी करायची ते ठरवतील. त्याबद्दल माझे म्हणणे नाही. परंतु या कारभाराची चौकशी झाली पाहिजे. त्यातील सत्य जनतेसमोर आले पाहिजे. तीन कोटी रुपयांची खरेदी असताना 125 कोटी रुपयांची खरेदी करण्यात आली असे सांगण्यात आले. मला देखील या गोष्टीचे आकलन झाले नाही की, तीन कोटी रुपयांची खरेदी असताना ती सव्वाशे कोटी रुपये कशी दाखविली ? या गोष्टीला स्कील म्हणतात. माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांनी स्कील डेव्हलपमेंट आणल्यापासून जास्त स्कील यायला लागले आहे.

सभापती महोदय, मला येथे सरकार म्हणून खुलासा करावा लागला. याची सर्व जबाबदारी महामंडळाची आहे. सरकारचा त्यामध्ये काही हस्तक्षेप नाही. महामंडळास पूर्ण अधिकार दिलेले आहेत. तेव्हा या प्रकरणाची देखील चौकशी करण्याची सरकारची तयारी आहे. जी काही खरेदी झाली असेल त्या संदर्भातील चौकशी करावी,अशी मी मुख्यमंत्री महोदयांकडून अपेक्षा करतो.

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षाच्या प्रस्तावामध्ये शिक्षण खात्याचा उल्लेख आहे. आणि त्याबाबत काही उल्लेख झाला त्याचा खुलासा करण्यासाठी मी उभा आहे. आग विझविण्याचे यंत्रच आग कसे लावते याचे मूर्तीमंत उदाहरण म्हणजे या प्रस्तावावर झालेली ही चर्चा होय.

सभापती महोदय, या विषयावर सन्माननीय सदस्यांनी त्यांची मते मांडली. हे प्रकरण साधे व सरळ आहे. शिक्षण विभागाचा मंत्री म्हणून माझ्याकडे त्या विषयाची नस्ती आली. ती नस्ती मी मागविली नाही. माननीय सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिल्याप्रमाणे तत्कालीन सरकारने 27 हजार शाळांना अग्निशमन यंत्रे पुरविली आहेत. अजून 33 हजार शाळांना यंत्र पुरवावयाची होती. आमच्या विभागाकडे फक्त 18 कोटी रुपये शिल्लक होते. तेवढी रक्कम कशी देणार ? जर आपण ती यंत्रे खरेदी केली नाही तर उद्या आपल्यावर कन्टेम्प्ट येईल. तेव्हा जेवढी रक्कम आहे तेवढ्या रकमेची यंत्रे घेऊ शकतो, अधिकच्या खरेदीबाबत वित्त विभागाची मान्यता घ्यावी, असा शेरा लिहून मीच ती फाईल वित्त विभागाकडे पाठविली. वित्त विभागाने त्यामध्ये काही त्रुटी काढल्यावर आम्ही त्याची उत्तरे दिली. पुन्हा वित्त विभागाने त्रुटी काढल्यावर मीच त्याच प्रक्रियेला स्थगिती दिली. वित्त विभागाने ज्या त्रुटी काढलेल्या आहेत त्याबाबत शिक्षण आयुक्तांनी चौकशी करावी असे आदेश मीच त्यांना दिले. त्यावेळी ही बातमी पेपरमध्ये नव्हती, चर्चेमध्ये नव्हती, मी ही खरेदी थांबविली. या प्रकरणी एक पैशाचीही खरेदी झाली नाही. तरी सुद्धा इतक्या मोठ्या प्रमाणात चर्चा होते. एखाद्याने चांगले काम केल्यानंतरही त्याच्यावर आरोप करायचे.

सभापती महोदय, मला महाभारतातील गोष्ट आठवली. द्रोणाचार्याने जे राजपुत्र होते, आताच्या भाषेत जे पैसेवाले आहेत, त्यांना शिकवले. एकलव्याकडे काही नव्हते तो लांबून शिकला. तो ज्ञानेश्वर विद्यापीठात शिकला आणि कोठे शिकला असेल. पण त्या द्रोणाचार्यांनी गुरु दक्षिणा म्हणून एकलव्याचा अंगठा मागितला होता. आज त्या द्रोणाचार्याचे सर्व पाठीराखे असाच अंगठा मागण्याचा प्रयत्न करीत आहेत. हा विषय आपल्या प्रस्तावामध्ये उल्लेख नाही म्हणून मी त्यामध्ये जात नाही.

सभापती महोदय, माननीय मंत्री महोदया श्रीमती पंकजा मुंडे यांनी ई-टेंडरींग बद्दल अतिशय सविस्तरपणे माहिती दिली. सन 2010 मध्ये 50 लाख रुपयांवरील खरेदीसाठी ई-टेंडरींग

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे....

अनिवार्य केली. सन 2013 मध्ये ही मर्यादा 10 लाख रुपयांपर्यंत खाली आली. सन 2010 मध्ये 50 लाखांच्यावरील खरेदीसाठी ई-निविदा अनिवार्य असताना सुद्धा 2010 मध्ये 371 कोटी 85 लाख रुपयांची खरेदी आर.सी.वर करण्यात आली. ती ई-निविदेद्वारे करण्यात आली नाही. सन 2011 मध्ये 112 कोटी 97 लाख रुपयांची खरेदी आर.सी.वर करण्यात आली. ही खरेदी ई-निविदेद्वारे खरेदी करण्यात आली नाही. सन 2012 मध्ये 218 कोटी रुपयांची खरेदी आर.सी.च्या माध्यमातून झाली. ई-निविदेद्वारे खरेदी झाली नाही. 10 लाख रुपयांची मर्यादा असताना सन 2013 मध्ये 176 कोटी 54 लाख आणि सन 2014 मध्ये 114 कोटी 18 लाख इतक्या रकमेची खरेदी पाच वर्षात करण्यात आली. फक्त शिक्षण विभागामध्ये 994 कोटी 5 लाख रुपयांची खरेदी आर.सी.च्या माध्यमातून करण्यात आली. हे सर्व नियमबाह्य काम केले त्यावेळी कोणी का बोलले नाही ते मला कळत नाही. मी त्यावेळी विरोधी पक्षाच्या बाकावर बसलो असताना रेट कॉन्ट्रॅक्ट ई-निविदेद्वारे व्हायचे. तेव्हा आमच्याकडे बरेच मोठे विषय बोलण्यासारखे होते. आम्हाला असे बारीक विषय कुडतरावे लागत नव्हते. वित्त विभागाने हरकत घेतल्यानंतर मी फाईल थांबविली. परंतु मागील काळात वित्त विभागाचे ऑब्जेक्शन जलसिंचन, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि इतर काही विभागांनी ओव्हर रुल्ड केले. माझी मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, यापूर्वी वित्त विभागाचे आदेश ओलांडून ज्या विभागांनी काम केलेले आहे त्या सर्व विभागांची चौकशी करावी आणि त्यातील सत्य सभागृहाला कळू द्यावे. कारण मी खरेदीला स्थगिती दिली. मी चौकशीचे आदेश दिले तरी सुद्धा ज्या पद्धतीने येथे वक्तव्य होत आहेत हे बरोबर नाही.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.शरद रणपिसे यांनी सांगू इच्छितो की, मी चौकशी लावली. वित्त विभागाने कोणतीही चौकशी लावली नाही. कॉन्ट्रॅक्टर दर करारावर नाही असे सांगण्यात आले. सभागृहातील सदस्यांनी दिलेली माहिती सत्य असते म्हणून मी पुन्हा जी.आर.आणून पाहिला. विरोधी पक्ष नेते म्हणाले की, त्याचे नावच नाही. मी कलम 24 डी ची

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे....

माहिती घेतली. आपणास हे माहीत आहे. समोर बसलेल्यांना कोण लॉबीत आहेत, कोण काय आहेत, याची सर्व माहिती आहे. या प्रकरणात प्रत्यक्षात एकाही पैशाची खरेदी झालेली नाही. एक पैशाचे सुद्धा पेमेंट झालेले नाही. तरी सुद्धा आपण भ्रष्टाचार झाला,भ्रष्टाचार झाला, पैसे खाल्ले, असे सांगितले. चीटफंडवाले चॅनेल करतात. पण आपण कशासाठी करायचे ?

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे....

या प्रकरणी क्वेरिज काढल्यानंतर आम्ही ती खरेदी प्रक्रिया थांबविली. सुदृढ लोकशाहीकडे जायचे असेल तर ही खरेदी थांबविल्यामुळे संबंधित मंत्र्यांचे कौतुक वा अभिनंदन करणे आवश्यक होते. परंतु तसे काही झाले नाही. अनेक मजल्यांच्या इमारतींमध्येच आग लागते असे नाही. मी विरोधी पक्षाच्या सदस्यांना विचारु इच्छितो की, सिंगल मजली इमारतीमध्ये आग लागत नाही काय ? आपल्या सर्वांना माहीत आहे की, चेन्नईमध्ये सिंगल मजली इमारतीला आग लागून त्यात 125 मुले मृत्युमुखी पडली. माननीय सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आपण वाचला तर त्यात दिसून येईल की, त्यांनी सर्व शाळांमध्ये सदरहू अग्निशामक यंत्रे लावण्यास सांगितले आहे. त्यांनी विशिष्ट मजल्याच्या इमारतींमध्ये ते बसविण्याबाबत सांगितलेले नाही. माझ्या विभागाचे काम नीट असताना सुध्दा विरोधी पक्षाकडून नस्तीच्या आधारे मंत्र्यांवर शंका उपस्थित केल्या जात आहेत.

सभापती महोदय, या संदर्भातील नस्ती बाहेर कशी गेली या बाबतची चौकशी माननीय मुख्यमंत्री करतील. यातील वस्तुस्थिती समोर येईल. महोदय, खाया पिया कुछ नही......सभापती महोदय, मला दुसरेच वाक्य बोलायचे होते. परंतु विरोधी पक्षाच्या सदस्यांनी प्रचलित असलेली ही म्हण पूर्ण केली. असो.

सभापती महोदय, अगोदरच्या सरकारने काय केले आणि काय केले नाही हा भाग सोडून द्या. परंतु माझ्या विभागाशी संबंधित कोणताच व्यवहार झालेला नसताना हे सर्व केले गेले. मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, चांगले काम करणारे शिक्षण मंत्री म्हणून कधी नव्हे ते शिक्षक आमदार सुध्दा माझे कौतुक करीत आहेत. ते म्हणतात की, माझ्या सारखा शिक्षण मंत्री गेल्या 10-15 वर्षात पहिल्यांदा बघितला आहे. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे सुध्दा माझे कौतुक करतात. त्यामुळे आपण अशा प्रकारे चांगले काम करणाऱ्याच्या बाजूने उभे राहायचे की नाही ? जर माझ्याकडून काही चुकीचे घडले तर त्यावर बोलणे ही तुमची जबाबदारी आहे. माझ्याकडून चुकीचे काम झाले तर ते आपण बाहेर काढले पाहिजे, किंबहुना ते विरोधकांचे कामच आहे आणि ते आपण केलेच पाहिजे. मी विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, मी करीत असलेल्या चांगल्या कामाचे कौतुक करु नका, परंतु माझ्या बाबतीत निदान गैरसमज तरी पसरवू नका. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित, तुमचे नवाब साहेब म्हणतात की, दुसरीचा

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

पोरगा दहावीला डमी - काँग्रेस-राष्ट्रवादी रोजगार हमी. महोदय, ज्याचे वय 45 होते आणि माझे

..2..



श्री.विनोद तावडे...

वय 53 वर्षे होते, तो माझ्या ठिकाणी डमी बसला होता. दुसरीचा मुलगा माझ्या नावाने डमी बसविल्यामुळे मी पास झालो असे त्यांचे म्हणणे आहे. मी पुन्हा एकदा सांगतो की, आपण माझ्या चांगल्या कामाचे कौतुक का करीत नाही ?

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून एकाच वेळी बोलतात.)

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो उल्लेख केला तो कामकाजातून काढून टाकावा.

**सभापती** : ठीक आहे. मी काढून घेतो.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, एका तांबड्या पैशाचा संबंध नसलेला विषय इतका का वाढवावा, हा खराच मला प्रश्न पडला होता, एवढेच या निमित्ताने सांगतो.

-----

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.दीपक सावंत (सार्वजनिक आरोग्य मंत्री) : सभापती महोदय, नियम 260 च्या प्रस्तावामध्ये सार्वजनिक आरोग्य विभागाशी संबंधित केवळ एकच ओळ आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी त्यांच्या भाषणात सांगितले की, माझ्यावर काही आरोप नाही. परंतु विभागाच्या माध्यमातून 50 कोटी रुपयांची जी खरेदी केली गेली त्यावर लक्ष ठेवावे. महोदय, या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये जी खरेदी होते ती सर्व खरेदी ई-टेंडरद्वारे होते. सार्वजनिक आरोग्य विभागाची खरेदी दर करारावर नव्हे तर संख्या करारावर होते. सार्वजनिक आरोग्य विभागाकडे प्राथमिक आरोग्य केंद्र, उप केंद्र, जिल्हा रुग्णालय यांच्याकडून मागणी येते. त्यांच्याकडून आलेल्या मागणीच्या आधारावर क्वॉंटीटी ठरविली जाते आणि त्यानुसार निविदा अंतिम केल्या जातात. निविदा प्रक्रियेमध्ये जे एल-1, एल-2 मध्ये येतात त्यांच्याकडून ही खरेदी केली जाते व त्यानुसारच ही खरेदी करण्यात आलेली आहे.

सभापती महोदय, सार्वजनिक आरोग्य विभागामध्ये 50 कोटी रुपयांच्या औषधांची खरेदी कोठून झाली याची मला माहिती नाही. परंतु या 50 कोटी रुपयांच्या मॅजिक फिगरविषयी मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांकडून निश्चितपणे माहिती घेईन. सभापती महोदय, याच सभागृहामध्ये मी सोडीयम हायड्रोक्लोराईडच्या खरेदीची चौकशी करण्याचे आश्वासन दिले होते. मागच्या कुंभमेळ्यामध्ये अडीच लाख लोक आले होते. जिल्हाधिकारी आणि आयुक्तांचे म्हणणे होते की, या कुंभमेळ्याला मागच्या तुलनेत दीड ते दोन पट जास्त लोक येतील. त्यामुळे त्यांनी सांगितल्यानुसार कुंभ मेळ्यासाठी 5 लाख लोक येण्याची शक्यता होती. या संदर्भात त्यांच्या महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांबरोबर बैठका झाल्या. नोडल एजन्सी म्हणून आरोग्याची जबाबदारी आयुक्तांवर आहे. बैठकीमध्ये सर्वांनी सांगितले की, आम्हाला सोडीयम हायड्रोक्लोराईडचा पुरवठा करण्यात यावा. मी सभागृहाला सांगू इच्छितो की, सदरहू सोडीयम हायड्रोक्लोराईड हे औषधी नसून, ते लादी पुसण्यासाठी वापरले जाते. ते डीसइन्फेक्टंट आहे. परंतु आमच्या विभागाच्या लोकांनी जरा जास्तच धैर्य दाखवून सोडीयम हायड्रोक्लोराईडची खरेदी मोठ्या प्रमाणात केली. ही खरेदी केल्यानंतर ज्यावेळी महापालिकेला थेट पैसे मिळाले त्यावेळी त्यांनी सांगितले की, आमची मागणी गृहीत धरु नका. त्यांनी पत्र पाठवून कळविले की, तुम्ही पुरविलेल्या वस्तू परत

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.दीपक सावंत.....

घेऊन जा. सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले की, हा संपूर्ण साठा 25 लाख रुपये भाड्यापोटी मोजून एका गोदामात ठेवण्यात आला. मी त्यांना सांगू इच्छितो की, हा साठा गोदामात ठेवला नाही. तसेच दुसरी बाब अशी की, यापोटी 25 लाख रुपये अदा केल्याची कोणतीही नोंद माझ्या कार्यालयात नाही. एवढेच नव्हे तर आमच्या डीएचएस मध्ये सुध्दा याची नोंद नाही. मुळात असा साठा ठेवण्यासाठी आम्ही सार्वजनिक बांधकाम विभागाचे गोदाम घेतो. त्यांच्याकडे गोदाम उपलब्ध नसेल तर त्यांनी ठरविलेल्या दरानुसार खाजगी गोदाम घेतो. तसेच कुंभ मेळ्यासाठी येणारे लोक नाशिकपासून शिर्डी, शनी-शिंगणापूरपर्यंत जातात. त्यामुळे त्या भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रात हा साठा वितरित केला गेला हे सत्य आहे. परंतु तरी देखील जर मागणी नसताना अशा प्रकारची खरेदी केली असेल तर त्या बाबत जरूर चौकशी करण्यात येईल.

सभापती महोदय, मी दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सार्वजनिक आरोग्य विभागाच्या औषध खरेदीमध्ये कोठेही घोटाळा दिसला तर त्यांनी डी.एच.एस. कार्यालयात यावे. आपल्यासाठी त्या कार्यालयातील कोणतीही फाईल उघडी राहील. कारण आम्हाला पारदर्शकता ठेवावयाची आहे. माननीय मुख्यमंत्र्यांची परवानगी घेऊन दोन्ही सभागृहातील सन्माननीय सदस्यांची समिती गठीत करावी. ज्यावेळी दर करारात अशा गोष्टी होतील त्यावेळी आपण आम्हाला प्रश्न विचारु शकता.

सभापती महोदय, 2013 ते 2015 या कालावधीत कॉटन, सिरींजेस, गॉजेसची खरेदी दर करारावर होत होती. कारण या वस्तूंची क्वाँटीटी आम्हाला ठरविता येत नाही. 2013-14 मध्ये हिबोफोलियाची औषधी दर करारावर खरेदी केली. तसेच 2013 ते 2015 मध्ये टी.बी. आजारावरील औषधांची खरेदी दर करारावर केली. या व्यतिरिक्त कोणतीही खरेदी दर करारावर झाली नाही. कारण केंद्र सरकारने कळविले होते की, "The State is to initiate the process of floating rate contracts for all the first line and second line of TB drugs to meet the demands of the emergency procurement. "मी पुन्हा एकदा सांगतो की, आमच्या विभागाची खरेदी 50 कोटी रुपयांची नव्हती.

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, ....

**सभापती** : माननीय मंत्री श्री.विष्णू सवरा, आपण या प्रस्तावावर उत्तर देण्याची गरज नाही. कृपया आपण खाली बसावे.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या नियम 260 अन्वये विरोधी पक्षाने प्रस्ताव आणला. सभागृहातील चर्चा आम्ही उगाच कोणावर मोघम आरोप करायचे म्हणून केली नाही. मी प्रत्येक गोष्टीच्या बाबतीत बोलताना त्या संबंधीचा पुरावा सभागृहात सादर केला आहे. चर्चेला सुरूवात झाली. आम्ही त्यावेळी खरेदीच्या बाबतीत पहिला आक्षेप घेतला. सन्माननीय सदस्य श्री. शरद रणपिसे साहेबांनी भाषण केले. सरकार बदलल्यानंतर माननीय राज्यपालांचे अभिभाषण झाले आणि त्यानंतर राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी भाषण केले. 18 तारखेला सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय काढला, त्याचा संदर्भ सुध्दा मी वाचून दाखविला. शासकीय खरेदीप्रक्रिया जास्त पारदर्शक, परिणामकारक व गतीमान करण्यासाठी निर्णय आहे, तो निर्णय असा आहे की, ई-निविदा प्रणालीचा वापर शासनाचे सर्व विभाग, सर्व शासकीय विभागाच्या अधिनस्त असलेली कार्यालये, ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज संस्था, सार्वजनिक उपक्रम आणि मंडळे, माहिती अधिकार कायदा अधिनियम, 2005 मधील कलम 4 प्रमाणे जी कोणती सरकारी कार्यालये येतील त्या सर्वांना बंधनकारक राहील. हे खरेदीच्या संदर्भात आहे. सभागृहाची आणि राज्यातील जनतेची दिशाभूल माननीय मंत्र्यांच्या माध्यमातून तरी होऊ नये ही माझी माफक अपेक्षा आहे. माननीय मुख्यमंत्र्यांच्या सहीने सामान्य प्रशासन विभागाने हा शासन निर्णय काढला. मी बोललो होतो. हा खरेदीचा निर्णय आहे. हा शासन निर्णय माननीय मुख्यमंत्र्यांच्या सहीने निघाला असेल तर या शासन निर्णयाचे समर्थन देखील माननीय मुख्यमंत्र्यांना करावे लागेल. खरेदी करारास परवानगी असेल असा जर खुलासा झाला तर मग या शासन निर्णयाचे काय करायचे याचा खुलासा मात्र कोणत्याही माननीय मंत्र्यांनी येथे केलेला नाही. आम्ही या संदर्भात काय समजायचे, आम्ही याचा अर्थ काय काढायचा ? आपणच आपल्या शासन निर्णयाचे अर्थही समजून सांगावेत. शासन निर्णयात खरेदीच्या बाबतीत स्पष्टपणे सांगितले आहे आणि असे असताना असे होते हा आमचा आक्षेप होता. सन 2010, सन 2011 ला मागे काय झाले या बाबतीत त्यांना चौकशी करायची असेल करू द्यावी. मी सन 2012 च्या नागपूर खंडपीठाचा आधार घेतला, त्या निकालाची प्रत आपल्याकडे दिली. खंडपीठाने जो निर्णय दिला आहे तो परिशिष्ठ 5 मधील संस्थांना दिला आहे. तुम्ही एकीकडे दरकराराचे समर्थन करता. मग या शासन निर्णयाचे काय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे ....

करायचे आहे हे आम्हाला माहीत नाही. आम्ही सूर्यकांताच्या बाबतीत आक्षेप घेतला, त्याचा दरकरार तरी दाखवा. सभापती महोदय, तो दरकरार नाही. ती दरनिश्चिती आहे. दरनिश्चिती ही ई-निविदेवर दर मागून दरकरारासारखी केली जात नाही. शासनाकडून याचे समर्थन कसे होते याबाबतीत खुलासा झाला नाही. शासनाकडून हा खुलासा व्हायला नको होता का, त्याचा दरकरार कुठे आहे ? सर्वात मोठी 75-80 कोटी रूपयांच्या चिक्कीची ऑर्डर सूर्यकांताला दिली असेल आणि तुम्ही जर त्याला दरकरार म्हणत असाल तर तो दरकरार नाही तर ती दरनिश्चिती आहे. दरनिश्चितीच्या बाबतीत सन 2012 ला नागपूरच्या खंडपीठाने निर्णय दिला आहे आणि त्याचे उल्लंघन झाले आहे असा आक्षेप विरोधी पक्षाने केला आहे. मात्र त्याचे उत्तर माननीय मंत्र्यांकडून मिळालेले काही. माझी माफक अपेक्षा या संदर्भात होती. आम्ही एक-एक खरेदीच्या बाबतीत येथे सांगितले.

सभापती महोदय, मी आपल्याकडे गोवर्धन फार्माचे लायसन्स दिले आहे. प्रिस्ट फार्मास्युटिकलच्या बाबतीत मी आपल्याला निविदा दिली, जी अस्वीकृत झालेली निविदा आहे. अस्वीकृत झालेल्या निविदेवर कोणत्याही प्रकारचा करार नाही, ही खरेदी कशी झाली याबाबतची प्रत्येक गोष्ट मी आपल्याला सांगितली आहे. एक ठेकेदार आला, दोन ठेकेदार आले, तीन ठेकेदार आले, चार ठेकेदार आले आणि कशी खरेदी झाली ते मी आपल्याला सर्व सांगितले आहे. आम्ही अस्वीकृत झालेल्या निविदेवर सरकारने कशी काय ऑर्डर दिली हा आक्षेप घेतला. परंतु त्याचे उत्तर माननीय मंत्र्यांकडून मिळाले नाही. हा विषय येथे येणे आवश्यक हाते. मला एका गोष्टीचे वाईट वाटते. माझ्या भाषणाच्या वेळी माननीय मंत्री येथे असते तर उत्तर आणखी चांगले झाले असते. माझी अपेक्षा तीच होती. मी एका गोष्टीच्या संदर्भात आक्षेप घेतला. माननीय आदिवासी विकास मंत्री उपस्थित आहेत. सभागृहात प्रश्नोत्तराच्या तासात 19 कोटी रूपयांच्या वह्याची ई-निविदेद्वारे खरेदी झाल्याच्या संदर्भात प्रश्न उपस्थित झाला. ई-निविदेद्वारे खरेदी झाल्यानंतर कोणीतरी तोंडी तक्रार केली. प्रश्नोत्तराच्या तासात माननीय मंत्र्यांनी सांगितले की, माननीय

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

मुख्यमंत्र्यांनी आदेश दिले, चौकशी लावली, स्थगित केली, 3 ठेकेदारांकडून ज्या वह्या सॅम्पल म्हणून मागविल्या त्या फॉरेन्सिक लॅबकडे पाठविल्या. माननीय मंत्र्यांनी या संदर्भात उत्तरात

..3



श्री. धनंजय मुंडे ....

सांगितले आहे आणि ते रेकॉर्डवर आहे. मी सूर्यकांताच्या संदर्भात आक्षेप घेतला. राज्यातील लहान मुलांची खरोखर तुम्हाला काळजी आहे, पोडतिडीक आहे तर चिक्की देताना किमान वह्यांसारखी चिक्कीची तपासणी फॉरेन्सिक लॅबमध्ये का केली नाही ? आम्हाला या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही. आपण वह्यांची तपासणी करता, मात्र चिक्कीची करीत नाही. वह्या तर लिहायला असतात. रिपोर्टच्या संदर्भात विचारले जाते. वह्या कोणत्या फॉरेन्सिक लॅब तपासल्या हे माहीत नाही. काय विषय आहे, चुकीचे काय आहे, काहीही माहीत नाही. (अडथळा)

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, राईट-ऑफ-रिप्लाय 2 तास होणार आहे का, भाषण सविस्तर होणार आहे का ?

(गोंधळ)

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझा राईट टू रिप्लायचा अधिकार आहे. (अडथळा) नियमाने चालायला सांगा. माझा अधिकार आहे, कमी वेळ आहे. माननीय मंत्री उत्तर देऊ शकले नाहीत.

(विरोधी पक्षोतील अनेक सन्माननीय सदस्य मोठ्याने बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती** : सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी थोडक्यात बोलावे. (गोंधळ) मी या संदर्भातील नियम वाचून दाखवितो. भाषण करण्याचा व उत्तर देण्याचा अधिकार या संदर्भात नियम 32 आहे. नियम 32 मधील (2) मध्ये असे नमूद केले आहे की, उत्तर देण्याच्या अधिकाराचा वापर करून असेल किंवा अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त कोणताही सदस्य व्यक्तिगत स्पष्टीकरण करण्याच्या प्रयोजनासाठी सभापतींच्या परवानगीने असेल त्याव्यतिरिक्त कोणत्याही प्रस्तावावर एकाहून अधिक वेळा बोलणार नाही. परंतु अशा बाबीमध्ये कोणतीही विवाद्य बाब पुढे आणण्यात येणार नाही. त्यामुळे सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी राईट-टू-रिप्लाय 5 मिनिटांत उरकावा. सर्व सन्माननीय सदस्यांनी खाली बसावे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, मी सर्वात मोठा आक्षेप घेतला की, दरकरार आहेत, ते स्वत: मॅन्युफॅक्चरर असले पाहिजेत. मी आक्षेप घेतला होता, आरोप केला होता की, सिंधुदुर्ग

..4



श्री. धनंजय मुंडे ....

येथील सूर्यकांताने मागच्या 5 वर्षांत 27 लाख किलोची चिक्की दिली, त्याच्यात अर्धा सुध्दा गूळ खरेदी केला नाही. ज्या दरकराराने ऑर्डर देता, त्या दरकरारानेच सप्लाय केला पाहिजे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे............

नियम असताना उल्लंघन झाले, याबाबतचे उत्तर आम्हाला अपेक्षित होते.

सभापती महोदय, कोणाचेही वैयक्तिक राजकारण संपविण्यासाठी किंवा कुणावरही वैयक्तिक आरोप करण्यासाठी... सभापती महोदय, हा विषय झाला म्हणून मी बोलत आहे. पुरवठ्याचे आदेश स्वतःहून दिले, पुरवठ्याचे आदेश स्वतःहून बंद केले, या बाबतीत येथे विषय झाला. पुरवठा आदेश कधी बंद झाले ? 9 तारखेला बंद झाले. मी पुराव्यानिशी हे सांगितले आहे. आपल्याच सरकारच्या लॅबकडील ही चिक्की खाण्यास लायक नाही, त्यावर मॅन्युफॅक्चररचे नाव नाही, एक्सपायरी डेट नाही, बॅच नंबर नाही, हे पुरावे मी दिले आहेत. त्याचा खुलासा आम्हाला अपेक्षित होता. पण तो झालेला नाही.

सभापती महोदय, माझी एवढीच अपेक्षा आहे की, मुख्यमंत्री महोदयांनी अगोदर या सर्व खरेदीची सिटिंग जज यांची न्यायीक चौकशी आणि जोपर्यंत चौकशी पूर्ण होत नाही, तोपर्यंत आपल्याच पक्षातील आदर्श नेतृत्वाचे उदाहरण समोर ठेऊन मंत्री महोदयांनी मंत्री पदापासून बाजूला व्हावे, चौकशी मोकळेपणाने व्हावी आणि त्यानंतर ते जर धुतल्या तांदळासारखे निघाले तर आम्ही सुध्दा त्यांना वाकून नमस्कार करु, त्यांचे मंत्रिमंडळात पुन्हा स्वागत करु.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, माझा घटनात्मक हरकतीचा मुद्दा आहे.....

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मला बोलण्याची संधी द्यावी........

**सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांच्या भावनेचा विचार करुन, एक अपवाद म्हणून मी त्यांना बोलण्याची संधी देत आहे. त्यांनी आपले बोलणे पाच मिनिटात संपवावे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी आपला फार आभारी आहे. मध्यंतरी आम्ही हरकत घेत होतो त्यावेळी आपण असे म्हणाला की, तुम्ही थांबा, तुम्हाला शेवटी संधी देतो.

**सभापती :** मूळ मुद्यावर आपण बोलावे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी फक्त मुद्यांवर बोलणार आहे. भावनिक भाषणे आम्हालाही चांगल्या प्रकारे करता येतात. आमचा त्यामधील अनुभव नक्कीच 10 ते 15 वर्षांनी जास्त आहे. भावनिक आव्हाने करीत असताना, त्या पदावर असताना आणि कर्तव्यामध्ये कसूर

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप........

झाली आहे, त्याबाबतचे सर्व पुरावे दिले असताना ठराविक मुद्दे वगळता त्याबाबतीत साधा उल्लेख नाही. जे उल्लेख त्यांनी केले आहेत, ते मी आपल्या निदर्शनास आणून देत आहे.

सभापती महोदय, ही सरकारची नस्ती आहे. हा सरकारचा कागद आहे. हा तुम्हाला मिळेल. मी तो वाचून दाखवितो, तेवढा वेळ कृपया मला द्यावा. ज्या अंगणवाडी सेविकांच्या मार्गदर्शक पुस्तिकेची छापील किंमत प्रति नग 120 रुपये आहे त्यावर 20 टक्के म्हणजे 24 रुपये सुट घेऊन प्रति नग 96 रुपयांप्रमाणे खरेदी करण्यात आली आहे. वास्तविक संचालक, ग्रंथालय यांनी निश्चित केलेल्या सुट दराप्रमाणे वांडमयेतर सर्व विषय या सदराखाली 25 टक्के सुट घेणे अपेक्षित होते. त्यामुळे ठेकेदारास प्रति नग 6 रुपयांचा फायदा झाल्याच्या चुकीच्या परिगणनेपोटी शासनाचे 6 लक्ष 30 हजार 660 रुपयांचे नुकसान झाले आहे. हे आमचे आरोप नाहीत.

सभापती महोदय, दुसरा मुद्दा म्हणजे मुख्य सेविकांसाठी मार्गदर्शक पुस्तिका.... हे विभागाचे शेरे आहेत, माझे नाहीत. त्याबाबतीत सुध्दा प्रति नग 176 रुपयांप्रमाणे खरेदी करण्यात आली आहे. वास्तविक संचालक, ग्रंथालय यांनी निश्चित केलेल्या दराप्रमाणे सदर वांडमय 25 टक्के सुट ऐवजी 20 टक्के सुटीवर घेतले आहे.

सभापती महोदय, हा भावनिक विषय झाला आहे. तो आपल्या जागी राहू द्यावा. कर्तव्यात कुठे कसूर झाली आहे, हे सरकारी अधिकाऱ्यांनी दाखवून दिले आहे. आता या ठिकणी त्यांनी बोलताना ईपीजीएम मशिन बाबत उल्लेख केला. या मशिनची खरेदी 2 कोटी, 63 लाख रुपयांची झाली आहे. आयुक्त कार्यालयाच्या प्रस्तावानुसार 4500 रुपयांप्रमाणे पुरवठा करण्यास तयार असताना देखील 5220 रुपयांना खरेदी केली आहे. हा त्यांचा शेरा आहे, आमचा नाही.

सभापती महोदय, सर्वात महत्वाचे की, चिक्कीच्या बाबतीत वारंवार बोलले जात आहे.

**सभापती :** सन्माननीय सदस्यांनी कृपया भाषण करु नये. मुख्य मुद्दा मांडावा.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मी जराही भाषण केलेले नाही. चिक्कीच्या बाबतीत त्यांनी असा आक्षेप घेतला की, मी 166 कोटी रुपये असे म्हणालो. मी असे म्हणालो नाही. माझ्या कोणत्याही वाक्यात तसे आलेले नाही. सूर्यकांताच्या बाबतीत राजगिरा चिक्की 23 कोटी रुपये, खोबऱ्याची चिक्की 10 कोटी रुपये, दुसरी चिक्की 80 कोटी रुपये.... (अडथळा......) हा त्यांचा शेरा आहे, तो ऐकून घ्यावा. हा शेरा सरकारच्या कागदातील आहे. आम्ही आरोप करीत नाही.

**सभापती :** सन्माननीय सदस्यांनी तपशील सांगत बसू नये. तात्पर्य काय आहे ते सांगावे. आपल्याला काय अपेक्षित आहे, तेवढेच बोलावे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, अपेक्षित असे आहे की, मंत्रिमहोदयांनी जे उत्तर दिले आहे..... ही कागदपत्रे आम्ही आपल्याला सादर केलेली आहेत. त्यामध्ये पूर्णतः भ्रष्टाचार झालेला आहे.

**सभापती :** ठीक आहे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांची भाषणे शांतपणे ऐकली आहेत. माझा घटनात्मक आणि हरकतीचा मुद्दा आहे.

**सभापती :** हरकत ही घटनात्मक कशी असते हे एकदा मला समजावून सांगावे.

श्री.शरद रणपिसे : सभापती महोदय, सांगतो. राज्यपाल महोदयांनी जे भाषण केले. त्यामध्ये 7 क्रमांकावर शासनाकडून केल्या जाणाऱ्या खरेदीमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी ई-टेंडरिंग अनिवार्य करण्यात येईल, असे म्हटले आहे. रूल्स ऑफ बिझनेसप्रमाणे एखादा प्रश्न ज्यावेळी पॉलिसी मॅटर होतो त्यावेळी कोणताही निर्णय मंत्र्यांना घेता येत नाही. ती फाईल मुख्यमंत्र्यांच्या आदेशार्थ जाऊन कॅबिनेटच्या मंजुरीनेच निर्णय घेता येतो. हे शेडयुल 2 मध्ये दिलेले आहे, माझ्या मनाचे सांगत नाही.

**सभापती :** ठीक आहे, आपला मुद्दा माझ्या लक्षात आलेला आहे.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, आपल्या माध्यमातून मला एवढीच माहिती हवी आहे की, राईट ऑफ रिप्लायला किती वेळ देता येतो, किती सदस्यांना बोलता येते ? मला तर आश्चर्य वाटले की, सर्व चर्चा झाल्यानंतर अनेक सदस्य बोलतात. हा नवीन अनुभव आहे. मी

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे.......

आपल्या अध्यक्षतेखाली ट्रेनी माणूस आहे, प्रशिक्षण घेणारा माणूस आहे. मला आपल्या माध्यमातून याबाबतचे मार्गदर्शन व्हावे. असे कधी पाहिलेले नव्हते. आता ही नवीन प्रथा, परंपरा सुरु केली आहे का, याची माहिती आपल्याकडून मला हवी आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सभागृहाचे नेते आपल्यावर हेत्वारोप करीत आहेत. (अडथळा..........) मी 'सभागृहाचे नेते' असे म्हणालो. मी बरोबर बोललो आहे.

(दोन्ही बाजूचे काही सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

**सभापती :** सन्माननीय विरोधी पक्षनेते व अन्य सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. मी उभा राहिल्यानंतर आपण कसे बोलू शकता ?

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सभागृहाचे नेते हेत्वारोप करीत आहेत. नवीन प्रथा, परंपरा सुरु झाल्याचा त्यांनी उल्लेख केला आहे. (अडथळा.....) श्री.खडसे साहेब मी त्यावरच बोलत आहे. (अडथळा.....) आता आपण आयुष्यभर, 15 वर्षात हेच करीत आला आहात, यापेक्षा वेगळे काय केले ?

यानंतर श्री.बोरले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सुनील तटकरे.........

यापेक्षा वेगळे काय झाले ? (...अडथळा...) सभापती महोदय, ही पद्धती होत नाही. माझी सभागृहाच्या नेत्यांना पुन्हा विनंती आहे की, आपण शांतपणे बोलावे. आपण सभागृहाचे नेते आहात, आपण विरोधी पक्षनेते नाही. आपण अजूनही त्या भूमिकेतून बाहेर आलेले नाही, असे दिसत आहे. (...अडथळा...) माननीय श्री.शिवतारे साहेब आपण मध्ये बोलू नका. मंत्री महोदयांनी मध्येच बोलू नये. ही शिस्त सुद्धा आम्ही पहिल्यांदाच बघत आहोत. 10-10 मंत्री एकाच वेळी उभे राहतात. विरोधी पक्षाचे दोन सदस्य बोलायला लागल्यानंतर मंत्री महोदय मध्ये हस्तक्षेप करतात, ही प्रथा आम्ही नव्याने बघत आहोत. याबाबत सुद्धा आम्हाला मौलिक मार्गदर्शन झाले पाहिजे. माझे म्हणणे एवढेच आहे की, माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे, सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांचा जो मूलभूत आक्षेप होता त्याबाबत त्यांना मंत्री महोदयांकडून उत्तर मिळाले नाही. त्या संदर्भात त्यांनी प्रश्न उपस्थित केलेले आहेत. खरे तर, यावर मंत्री महोदयांना पुन्हा बोलता येत नाही. (...अडथळा...) परंतु, विरोधी पक्षनेत्यांनी मागणी केली की, मुख्यमंत्री महोदयांनी या संदर्भात उत्तर द्यावे. मुख्यमंत्री महोदयांनी जरुर उत्तर द्यावे. त्यांच्या मागणीच्या संदर्भात.....

**सभापती** : ठीक आहे, ज्यांना कोणाला माझ्या रुलिंगविषयी माहिती पाहिजे, नवीन मार्गदर्शन पाहिजे, ते मी यथावकाश करीन. आता मुख्यमंत्री महोदय बोलतील.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, विरोधी पक्षाच्या वतीने म.वि.प. नियम 260 अन्वये जो ठराव मांडण्यात आला त्या ठरावावरील चर्चेला मंत्री महोदयांनी अतिशय समर्थपणे उत्तरे दिलेली आहेत. तरी देखील मी उत्तर द्यावे अशी अपेक्षाही होती आणि माननीय विरोधी पक्षनेत्यांनी पुन्हा एक रिपीट भाषण केल्यामुळे (...अडथळा...) आपण राईट ऑफ रिप्लायच्या माध्यमातून जो अधिकार गाजविला, त्या अधिकारामध्ये आपण जे प्रश्न उभे केले, त्याचे उत्तर देणे हा माझा राईट आहे आणि तो ऐकून घेणे हा तुमचा राईट आहे. म्हणून मी बोलण्यासाठी उभा आहे. (...अडथळा...) ड्युटी आहे. खरे म्हणजे, जर ही चर्चा बघितरी तर खोदा पहाड़ और निकला चूहा. जेथे एका महामंडळाने 2 का 3 कोटी रुपयांची खरेदी केली त्याबाबत 125 कोटी रुपयांचा

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.........

आरोप, ज्या ठिकाणी खरेदीच झाली नाही त्याबाबत 191 कोटी रूपयांचा आरोप करण्यात आला. माननीय आरोग्य मंत्री डॉ.दीपक सावंत यांच्या विभागाविषयी 50 कोटी रूपयांचा आकडा कोठून आला, याबाबत काहीच माहिती नाही. (...अडथळा..) मी सर्वच विषयांवर बोलणार आहे. अमरसिंह जी अभी तो शुरूआत हुई है. त्यामुळे विरोधी पक्षाने मूळ प्रस्ताव आणताना जर नीट अभ्यास करुन प्रस्ताव आणला असता तर या ठिकाणी अशी अवस्था आली नसती. परंतु, आरोप करावयाचे आहेत, शासनाला कटघऱ्यात उभे करावयाचे आहे, या भावनेतून ही चर्चा उपस्थित केलेली आहे. मंत्री महोदयांनी जवळपास सर्व मुद्यांची उत्तरे दिलेली आहेत. परंतु, तुम्ही समजून न समजल्यासारखे केल्यामुळे मला काही मुद्यांची उत्तरे द्यावी लागतील.

सभापती महोदय, पहिला आक्षेप असा आहे की, 3 लाखाच्यावर ई-टेंडरचा शासन निर्णय तुम्ही काढला. 3 लाखाच्यावरचा ई-टेंडरचा शासन निर्णय निघाल्यानंतर तुम्हाला रेट कॉन्ट्रॅक्टने खरेदी करता येणार नाही आणि जो संपूर्ण डोलारा आधारित आहे, तो यावरच आहे. मुळात या ठिकाणी अशाच प्रकारची परिस्थिती ज्यावेळी 50 लाखावरून 10 लाखावर ई-टेंडरची किंमत आणली होती, अमरसिंहजी आपण मघाशी याबाबत विचारत होता. ज्यावेळी राज्य शासनाने असा निर्णय घेतला की, 10 लाखाच्यावरची सर्व खरेदी ई-टेंडरने केली जाईल आणि त्यानंतर हा प्रश्न निर्माण झाला की, जर 10 लाखाच्यावरची सर्व खरेदी ई-टेंडरने करावयाची असेल तर दर करारावर खरेदी करता येईल किंवा नाही ? हाच आजचा मूळ प्रश्न आहे की, दर करारावर खरेदी करता येईल की नाही ? त्यावेळच्या शासनाने यावर मार्गदर्शन मागितले होते. ई-टेंडरींगबाबत दिनांक 19 जानेवारी, 2013 रोजी शासन निर्णयाच्या संदर्भात मार्गदर्शन मागितले होते. हे मार्गदर्शन कोणत्या विभागाकडून मागविण्यात आले ? हे मार्गदर्शन सामान्य प्रशासन विभागाकडून मागविण्यात आले. म्हणजे त्यावेळी मुख्यमंत्री महोदयांकडे जो सामान्य प्रशान विभाग होता त्या विभागाकडून मार्गदर्शन मागविण्यात आले. त्यांच्याकडून असे मार्गदर्शन मागविण्यात आले की, आता शासनाला 10 लाखाच्यावरची सर्व खरेदी ई-टेंडरने करावी लागेल, असा निर्णय घेतलेला आहे. तुमच्या आणि

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...........

आमच्या शासन निर्णयामध्ये फरक काय आहे ? त्यामध्ये एवढाच फरक आहे की, तुमच्या 10 लाखाच्या ऐवजी आम्ही 3 लाख रुपये असा बदल केला आहे. बाकी काहीही फरक नाही. तुम्ही ती मर्यादा 10 लाखापर्यंत आणली होती, आम्ही ती 3 लाखापर्यंत आणली. असे मार्गदर्शन मागविण्यात आले की, आता 10 लाखाच्यावरची खरेदी आम्हाला दर करारावर करता येते की ती ई-टेंडरनेच करावी लागेल. सामान्य प्रशासन विभागाने त्यावर अतिशय स्पष्टपणे उत्तर दिले आहे. मार्गदर्शन काय मागितले ? राज्य शासनाच्या खरेदी धोरणानुसार प्राधिकृत एजन्सी उदाहरणार्थ सीएसपीओ, एमएसएसआयडीसी, डीएमईआर, ईएसआयसी, डीजीएसएनडी यांनी निश्चित केलेला दर करार उपलब्ध असताना वरील शासन निर्णयानुसार 10 लाखापेक्षा जास्त खरेदी करण्यासाठी पुन्हा या विभागाने ई-निविदा मागविणे आवश्यक आहे किंवा कसे, याचे मार्गदर्शन करावे. बरोबर आहे ? सामान्य प्रशासन विभागाने उत्तर काय दिले ? सामान्य प्रशासन विभागाने सांगितले की, "The G.R. does not issue any guidelines, change for the current tendering process or any procedures followed at the department for tendering except the issue of tender in electronic mode instead of paper based tenders. It is recommended....." शब्द आहे आणि त्यावेळच्या मुख्यमंत्र्यांच्या मान्यतेने सामान्य प्रशासन विभागाने काय सांगितले ? "It is recommended to continue with existing rate cards and issue any e tender in case of new rate cards are to be issued." म्हणजे काय ? याचा अर्थ असा आहे की, तुमचे जे रेट कॉन्ट्रॅक्ट आहेत ते रेट कॉन्ट्रॅक्ट कायम आहेत. तुम्ही त्यावर खरेदी करु शकता. जर पुन्हा नव्याने रेट कॉन्ट्रॅक्ट करण्याची आवश्यकता असेल तर ई-टेंडरने पुन्हा रेट कॉन्ट्रॅक्ट करु शकता. याचा अर्थ काय आहे ? याचा अर्थ असा आहे की, 10 लाखाच्यावरची खरेदी देखील (...अडथळा...) आपण ऐकून घ्यावे. काहीच इन्टरप्रिटेशन नाही, क्लिअर आहे. Everything is clear, nothing is to be interpreted. आदरणीय श्री.पृथ्वीराज चव्हाण साहेबांबद्दल सर्व लोक असे सांगतात की, अतिशय स्वच्छ प्रतिमेचा मुख्यमंत्री, प्रामाणिक (....अडथळा...) मी तेच सांगतो. त्यांच्याच विभागाने अतिशय स्पष्टपणे सांगितले की, 10

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...........

लाखाच्यावरची खरेदी दर कराराने करता येते. त्याकरिता ई-टेंडर बोलाविण्याची आवश्यकता नाही. हे एवढे क्लिअर झाल्यानंतर कोणता बदल झाला ? बदल एवढाच झाला की, आम्ही ती 10 लाखाची मुदत 3 लाखावर आणली आणि पुन्हा हा प्रश्न उपस्थित झाला. आपण फाईल बघावी, असे नाही झाले. हा प्रश्न पुन्हा उपस्थित झाल्यानंतर त्यावर मार्गदर्शन मागविण्यात आले आणि त्यावर उद्योग विभागाने अतिशय स्पष्टपणे लिहून दिले की, हा प्रश्न यापूर्वीच निकाली निघालेला आहे.

यानंतर श्री.खर्चे वि........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

जे रेट कॉन्ट्रॅक्ट आम्ही केले ते जून 2015 पर्यंत कायम आहेत. त्यानंतर रेट कॉन्ट्रॅक्ट करायचे असतील तर तुम्हाला ई-टेंडरद्वारे रेट कॉन्ट्रॅक्ट करावे लागतील किंवा हे रेट कॉन्ट्रॅक्ट संपल्यानंतर तुम्हाला ई-टेंडर काढावे लागतील (....अडथळा...) सभापती महोदय, मी सत्य सांगायला लागलो आहे. मी काहीही विसंगत बोललो असेल तर, I am talking on record. मी काही विसंगत बोलत असेल तर विरोधी पक्षाने माझ्यावर हक्कभंग आणावा. विरोधी पक्ष नेते आपणाला अजून पुष्कळ ऐकावयाचे आहे, आपण काळजी करु नका. सभापती महोदय, यामुळे एक बाब क्लिअर झाली आहे की, रेट कॉन्ट्रॅक्टनुसार खरेदी करता येते. यानंतर आम्ही 4 एप्रिल रोजी निर्णय का घेतला ? कारण आमच्या पहिला निर्णयानुसार तीन लाख रुपयांच्या वर खरेदी करायची असेल तर ई-निविदा काढावी असा होता. त्यानंतर 17 एप्रिलला सरकारला पुन्हा निर्णय करावा लागला व तो निर्णय आम्ही असा घेतला की, एक कोटी रुपयांच्यावरची खरेदी रेट कॉन्ट्रॅक्टने करता येणार नाही. पहिल्या जी.आर.नुसार हा विषय कव्हर झाला असता तर दुसऱ्यांदा निर्णय घेण्याची आवश्यकता का पडली असती ? ती याकरिता पडली व ही बाब सरकारच्या लक्षात आली की, शासनाला ई-टेंडरने सर्व खरेदी करायची आहे. यापूर्वीच सरकारने असा निर्णय केला आहे की, तीन लाख रुपयांच्यावरची सर्व खरेदी रेट कॉन्ट्रॅक्टच्या ऐवजी इटेंडरमध्ये आणायची असेल तर त्यासाठी विशेष निर्णय घ्यावा लागेल. तो निर्णय घेतल्यानंतर सरकारकडून कोणतीही खरेदी रेट कॉन्ट्रॅक्टनुसार करण्यात आलेली नाही.

सभापती महोदय, या ठिकाणी सूर्यकांता महिला सहकारी गृह उद्योगाच्या संदर्भात माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितले आहे. त्यांची दर निश्चिती आहे, दर करार नाही, पहिल्यांदा ही बाब लक्षात घेतली पाहिजे की, आपण न्यायालयाने दिलेल्या ज्या निर्णयाच्या उल्लेख करीत आहात त्यानंतर झालेली प्रोसिजर मी सांगत आहे. आघाडी सरकारच्या काळात झालेली बाब मी सांगत आहे, मध्यवर्ती भांडार खरेदी संघटनेच्या सीएसपीओच्या परिपत्रकान्वये शक्तीवर्धक व जीवनसत्वयुक्त खाद्यपदार्थ सर्व शासकीय निमशासकीय कार्यालयाची उपरोक्त परिपत्रकान्वये दर निश्चिती प्रमाणे सूर्यकांता महिला सहकारी गृह उद्योगाकडून खरेदी करणे बंधनकारक आहे. माननीय श्री.नारायण राणे उद्योग मंत्री असताना त्यांच्या सहीने परिपत्रक काढण्यात आले आहे.

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देतात)

श्री.देवेंद्र फडणवीस...

तेव्हा माननीय श्री.पृथ्वीराज चव्हाण साहेब मुख्यमंत्री होते. त्यानंतरच्या खरेदीच्यावेळी पुन्हा हा विषय उद्योग विभागाकडे पाठविण्यात आला होता, उद्योग सचिवांनी त्यावर असे शेरा मारला आहे की, अशा प्रकारे एकाच संस्थेकडून खरेदी करणे योग्य होईल काय ? त्याला देखील तत्कालीन उद्योग मंत्री माननीय श्री.नारायण राणे यांनी ओव्हर रूल केले होते. ( अडथळा...) यामध्ये जर काही चुकीचे असेल तर आपण माझ्यावर हक्कभंग दाखल करु शकता. मी सरकारचे कागद घेऊन बोलत आहे.

सभापती महोदय, सूर्यकांता महिला सहकारी गृहउद्योग संस्था यांना इतकी जवळची वाटली की, या संस्थेच्या व्यतिरिक्त कोणाकडूनही चिक्की घेऊ नका असा जी.आर. आघाडी शासनाने काढला होता. त्या सूर्यकांता संस्थेकडून आम्ही खरेदी केली तर आम्ही चोर ठरतो, आणि तुम्ही साव ? (...अडथळा....)

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे जाऊ नये.

**सभापती** : असंसदीय शब्द असतील तर मी ते तपासून काढून टाकेल.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मी जे बोललो त्यामध्ये काही असंसदीय शब्द असतील तर आपण सभागृहाच्या कामकाजातून ते काढून टाकावे, माझी काहीही हरकत नाही.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य वेलमध्ये येऊन घोषणा देत असतात)

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, हा निर्णय आमच्या सरकारने घेतलेला नाही, उद्योग ऊर्जा व कामगार विभागाने दिनांक 28 ऑगस्ट, 2014 रोजीच्या पत्रान्वये सूर्यकांता महिला सहकारी संस्थेच्या दर करारास दिनांक 30 जून 2015 पर्यंत मुदतवाढ दिली आहे. ही मुदतवाढ कोणी दिली ? 28 ऑगस्ट 2014 रोजी कोणत्या पक्षाचे सरकार होते ? 28 ऑगस्ट 2014 रोजी आघाडीचे सरकार होते. आता 'हे चोर आहे, चोर आहे' अशा घोषणा देत आहेत, हे आमच्याबाबत म्हणतात की, 28 ऑगस्ट, 2014 रोजी जे सरकार होते त्यांच्याबाबत म्हणत आहेत, याची मला माहिती नाही. हा निर्णय आमच्या सरकारने घेतलेला नाही. हा आघाडी सरकारने घेतलेला निर्णय आहे.

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

सभापती महोदय, क्वॉलिटीच्या संदर्भात चिक्कीचा दर्जा चांगला असल्याबाबत आम्ही पूर्ण खात्री करुन घेऊ. मी आपणाला सांगू इच्छितो की, श्री.बालाजी टेस्ट लॅब प्रायव्हेट लिमिटेड नवी दिल्ली, ॲक्युरेट लेबॉरिटरी अहमदाबाद, अश्वमेघ लेबॉरिटरी नाशिक या प्रयोग शाळांना National Accreditation Board for Testing and Calibration Laboratories (NABL) यांनी मान्यता दिलेली आहे. वरील प्रयोग शाळेत चिक्कीची तपासणी करण्यात आली आहे, चक्की दर्जेदार असल्याचा अहवाल प्राप्त झालेला आहे. तरी देखील आमची काही हरकत नाही, आम्ही पुन्हा चिक्कीची तपासणी करण्यास तयार आहोत.

सभापती महोदय, मी या पलीकडे जाऊन सांगतो की, माझ्या एकाही मंत्री महोदयांवर एकही आरोप विरोधी पक्ष सिध्द करु शकला नाही. याबाबत इंग्रजीतील एक म्हण आहे. "Caeser's wife should be above suspicion." त्यामुळे सभापती महोदय, आमची चौकशीची तयारी आहे, गेल्या 15 वर्षातील खरेदी व आताची खरेदी या सर्व खरेदीची माननीय मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली दोन सचिव यांची समिती तयार करण्यात येईल व त्यांच्याकडून संपूर्ण चौकशी करण्यात येईल. 'दूध का दूध आणि पाणी का पाणी' करण्यात येईल. आता विरोधी पक्षाकडे बोलण्यासाठी काही राहिले नसल्यामुळे केवळ गोंधळ घातला जात आहे, हे या ठिकाणी उघडे पडले आहेत, 'खोदा पहाड़ और निकला चूहा भी नहीं,' अशी यांची परिस्थिती झालेली आहे.

**सभापती** : सभागृहाने या प्रस्तावावर विचार केला आहे.

आता सभागृहाची बैठक पाच मिनिटांसाठी स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक 6.58 ते 07.03 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

या नंतर श्री.भोगले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(स्थगितीनंतर)**

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

**पृ.शी.:** दिनांक 12 मार्च, 1993 रोजीच्या मुंबई शहरातील साखळी बॉम्बस्फोटांच्या घटनेतील आरोपीला देण्यात आलेली फाशी

**मु.शी.:** दिनांक 12 मार्च, 1993 रोजीच्या मुंबई शहरातील साखळी बॉम्बस्फोटाच्या घटनेतील आरोपीला देण्यात आलेली फाशी यासंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांचे निवेदन

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

---



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.....

सभापती महोदय, या निमित्ताने माझी विनंती आहे की, या प्रकरणी न्यायालयीन प्रक्रियेच्या माध्यमातून सदरहू बंद्याला फाशी देण्यात आलेली असल्यामुळे या संदर्भात राज्यातील जातीय सलोखा आणि शांतता कायम ठेवण्यासाठी सर्वांनीच यामध्ये मदत करावी.

-----------

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** मेक इन महाराष्ट्र संकल्पना यशस्वी करण्यासंबंधी विविध उपाय अंमलात आणणे

**मु.शी.:** मेक इन महाराष्ट्र संकल्पना यशस्वी करण्यासंबंधी विविध उपाय अंमलात आणणे यासंबंधी माननीय उद्योगमंत्र्यांचे निवेदन

श्री.सुभाष देसाई (उद्योगमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

नि वे द न

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

---

नंतर 2डब्ल्यू.1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पृ.शी.:** विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था
(प्रवेश व शुल्क यांचे विनियम) विधेयक

**L. A. BILL NO. XXXIII OF 2015**

(A BILL TO PROVIDE FOR REGULATION OF ADMISSIONS AND FEES BY UNAIDED PRIVATE PROFESSIONAL EDUCATIONAL INSTITUTIONS IN THE STATE OF MAHARASHTRA AND FOR MATTERS CONNECTED THEREWITH OR INCIDENTAL THERETO.)

श्री.विनोद तावडे ( उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, विधान सभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 33 - महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक मांडतो.

**सभापती :** विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 33 - महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

सभापती महोदय, विधानसभेने या विधेयकाला चार सुधारणा सुचविल्या आहेत. त्या सुधारणेसह हे विधेयक आपण येथे आणलेले आहे. हे विधेयक आपल्या सभागृहात एकमताने पारित होणे अतिशय महत्त्वाचे आहे. कै.वसंतदादा पाटील यांनी आणलेला नॉन ग्रँटीझम हा खऱ्या स्पिरीटने खाल पर्यंत नेण्याचा या माध्यमातून प्रयत्न करीत आहोत. त्यामुळे यात निवृत्त न्यायाधीश किंवा निवृत्त मुख्य सचिव अशी एक सुधारणा आहे. दुसरी सुधारणा अशी आहे की, चूक झाली तर प्राचार्यांबरोबर सगळे ट्रस्टी असा उल्लेख होता. त्या ऐवजी आता सगळ्या ट्रस्टींऐवजी एक ट्रस्टी अपॉईंट केला जाईल तो तेवढ्या पुरता दोषी असेल. संस्थाचालकाने आपल्यातील एक ट्रस्टी या कॉलेजसाठी नेमावयाचा आहे व त्याने सगळी माहिती द्यायची आहे. वर्तमानपत्रासाठी पीआरबी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे...

ॲक्ट आहे. वर्तमानपत्रातील सर्व बातम्यांसाठी संपादक जबाबदार असतो. तसा बदल आपण यात केलेला आहे. सरकारने हे विधेयक मांडल्यानंतर विरोधी पक्षाकडून ज्या चार सुधारणा आल्या आहेत त्या आपण स्वीकृत केलेल्या आहेत. तेव्हा महाराष्ट्रातील सामाजिक व शैक्षणिक वातावरणासाठी हे विधेयक एक मताने पारित होणे आवश्यक असल्यामुळे हे विधेयक मंजूर करावे अशी मी सभागृहाला विनंती करीत आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती :** विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 26 (दोन्ही सिम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.विनोद तावडे : सभापती महोय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 15 संमत करण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती :** सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 33 संमत झाले आहे.

......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** विद्यापीठे (विद्यापीठ प्राधिकरणे व इतर मंडळे यांच्या सदस्यांच्या निवडणुका तात्पुरत्या पढे ढकलणे) विधेयक.

**L. A. BILL NO.XXXIV OF 2015**

(A BILL TO PROVIDE FOR TEMPORARY POSTPONEMENT OF ELECTIONS TO AUTHORITIES AND BODIES OF CERTAIN NON-AGRICULTURAL AND NON-TECHNOLOGICAL UNIVERSITIES IN THE STATE OF MAHARASHTRA.)

श्री.विनोद तावडे (उच्च शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, विधान सभेने संमत केल्याप्रमाणे मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 34 - राज्यातील विवक्षित कृषीतर व तांत्रिकेतर विद्यापीठांमधील प्राधिकरणे व मंडळे यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याची तरतूद करण्याकरिता विधेयक मांडतो.

**सभापती :** विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 34 - राज्यातील विवक्षित कृषीतर व तांत्रिकेतर विद्यापीठांमधील प्राधिकरणे व मंडळे यांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकलण्याची तरतूद करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे (औरंगाबाद विभाग शिक्षक) : सभापती महोदय,सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 34- महाराष्ट विद्यापीठे (विद्यापीठ प्राधिकरण व इतर मंडळे यांच्या सदस्यसांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकले) विधेयक, 2015 यावर बोलण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या राज्यातील जी काही विद्यापीठे स्थापन करण्यात आली आहेत, ती सर्व विद्यापीठे स्वायत्त आहेत. या विद्यापीठांतून गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षण देण्याचे काम व्हावे, त्यांच्यावर कोणत्याही प्रकारचा अन्याय होऊ नये म्हणून विद्यापीठाचे प्रमुख म्हणून कुलगुरु नेमलेले असतात. परंतु त्यांनी सुद्धा विद्यापीठात मनमानी कारभार करु नये अशी अपेक्षा असते. त्यांच्यावर अंकुश ठेवण्यासाठी सन 1994 मध्ये कायदा करण्यात आला. त्या कायद्यामध्ये निवडणूक मंडळाची रचना करण्यात आली. सन 1994 पासून हा कायदा अस्तित्वात आला तेव्हा पासून विद्यार्थ्यांच्या,शिक्षकांच्या आणि महाविद्यालयाच्या अहिताचा निर्णय असेल तर अधिसभा सदस्य असतील किंवा कार्यकारिणी सदस्य असतील त्यांना विद्यार्थ्यांचे प्रतिनिधी म्हणून किंवा शिक्षकांचे प्रतिनिधी म्हणून आवाज उठविण्याचे साधन मिळालेले आहे. त्यांना आपले प्रश्न मांडण्याची सुविधा मिळालेली आहे. या माध्यमातून विद्यार्थ्यांना एक प्रकारे मदत मिळालेली आहे.

सभापती महोदय, आपण लोकशाही प्रणालीमध्ये निवडणुकीला महत्व दिलेले आहे. तेव्हा निवडणुका झाल्या पाहिजेत. त्यादृष्टीने सन 1994 च्या कायद्यामध्ये तशी तरतूद केलेली आहे. तेव्हा पासून आतापर्यंत या कायद्यामध्ये सुधारणा करावी, अशी कोणतीही बाब पुढे आली नाही. पण आताच्या सरकारला त्यामध्ये सुधारणा करण्याचा साक्षात्कार का झाला, या कायद्यामध्ये सुधारणा करावीशी का वाटली ? आपणास नवीन कायदा आणायचा असेल तर नवीन कायदा अस्तित्वात येईपर्यंत जुना कायदा अस्तित्वात राहतो. त्यानुसार 1994 च्या कायद्यानुसार विद्यापीठामध्ये जी काही प्राधिकरण कार्यरत आहेत, जे कोणी अधिसभा सदस्य आहेत, जे कार्यकारिणी सदस्य आहेत त्यांचा कार्यकाल संपत आला असेल तर नियमाप्रमाणे तेथे निवडणुका झाल्या पाहिजेत. अजून नवीन कायद्याचे प्रारुप तयार झालेले नाही, नवीन कायदा केव्हा आणणार हे स्पष्ट झालेले नाही. आपल्या विचाराचे लोक त्या ठिकाणी येणार नाहीत म्हणून अशा पद्धतीने राजकारण करुन

.2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे....

कायद्यामध्ये बदल केला जात असेल तर ते महाराष्ट्राला शोभणारे नाही. शिक्षण क्षेत्राला शोभणार नाही. ज्या प्राधिकरणाची मुदत संपली आहे त्यांच्या निवडणुका झाल्या पाहिजेत. आपणास निवडणुका घ्यायच्या नसतील तर अस्तित्वात असलेल्या प्राधिकरणाला मुदतवाढ दिली पाहिजे. आपणास माहीत आहे की, एखाद्या कारखान्यातील संचालक मंडळाची मुदत संपली असेल आणि निवडणुका झाल्या नाहीत तर पुढील निवडणुका होईपर्यंत त्या संचालक मंडळाला मुदत वाढ दिली जाते.(अडथळा)...मंत्री महोदयांना इतकी घाई का झालेली आहे ? आम्ही अधिकृत कॉलेजमधून पदवी घेतलेली आहे. नवीन कायदा अस्तित्वात येईपर्यंत जुन्या कायद्याप्रमाणे जी तरतूद आहे त्याप्रमाणे विद्यापीठाच्या निवडणुका घेतल्या पाहिजेत. तेव्हा माझी विनंती आहे की, आपण हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठवावे, एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

--------

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर ) : सभापती महोदय,सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 34- महाराष्ट विद्यापीठे (विद्यापीठ प्राधिकरण व इतर मंडळे यांच्या सदस्यसांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकले) विधेयक, 2015 यावर बोलण्यासाठी मी उभा आहे

सभापती महोदय, माननीय उच्च व तंत्र शिक्षण मंत्री नवीन विधेयक आणत आहेत त्याबद्दल त्यांना धन्यवाद देतो. कारण मागील 20 वर्षामध्ये शिक्षण पद्धतीमध्ये बदल झालेला आहे. मी जास्त काही बोलणार नाही. दिनांक 31 ऑगस्ट रोजी या अधिकार मंडळाची मुदत संपत आहे. आता आपण निवडणुका घेणार नाहीत, हे मला मान्य आहे. हा नवीन कायदा हिवाळी अधिवेशनात आणणार आहोत असे माननीय मंत्र्यांनी सांगितले. सध्या फक्त चार महिने राहिले आहेत तेव्हा सध्याच्या अधिकार मंडळाला मुदतवाढ द्यावी. आपले अधिकारी आपल्याला काय सांगतात हे मला माहीत नाही. 1 सप्टेंबरनंतर विद्यापीठामध्ये फक्त कुलगुरुंचे पद अस्तित्वात राहील. आम्ही काही कुलगुरुंची काम करण्याची पद्धती पाहिलेली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात मागील एक वर्षापासून रजिस्ट्रार, एक्झाम कंट्रोलरचे पद भरलेले नाही. आपण याची अधिकाऱ्यांकडून माहिती घ्यावी. अधिकार मंडळाचा अंकुश असताना देखील कुलगुरु मनमानी पद्धतीने वागत असतील तर 1 सप्टेंबर नंतर त्या विद्यापीठाचे काय होईल हे मला माहीत नाही. तेव्हा 1 सप्टेंबर नंतर आपली इच्छा असेल तर निवडणुका घ्याव्यात, जर आपणास निवडणुका घ्यायच्या नसतीत तर नवीन विधेयक येईपर्यंत सध्या असलेल्या अधिकार मंडळाला मुदतवाढ द्यावी एवढीच माझी विनंती आहे, एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे (कोकण विभाग पदवीर ) : सभापती महोदय,सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 34- महाराष्ट विद्यापीठे (विद्यापीठ प्राधिकरण व इतर मंडळे यांच्या सदस्यसांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकले) विधेयक, 2015 यावर बोलण्यासाठी मी उभा आहे

सभापती महोदय, माननीय मंत्री शिक्षण विभागात सकारात्मक काम करण्याचा प्रयत्न करीत आहेत त्यासाठी सर्व सदस्य आपल्यासोबत आहेत. या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांनी सांगितले की, जुनी सिनेट कमिटी तशीच पुढे चालू ठेवावी. नवीन विधेयक येईपर्यंत सध्या असलेल्या अधिकार मंडळाला मुदतवाढ द्यावी. माझी विनंती आहे की, 12 सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे, अशी माझी विनंती आहे.

----------

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

डॉ.सुधीर तांबे (नाशिक विभाग पदवीधर ) : सभापती महोदय,सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 34- महाराष्ट विद्यापीठे (विद्यापीठ प्राधिकरण व इतर मंडळे यांच्या सदस्यसांच्या निवडणुका तात्पुरत्या पुढे ढकले) विधेयक, 2015 यावर बोलण्यासाठी मी उभा आहे

सभापती महोदय, विद्यमान अधिकार मंडळे ही लोकशाही पद्धतीने निवडून आलेली आहेत. माझ्या अगोदर सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केल्या आहेत. विद्यापीठ हे शिक्षणाचे अत्यंत महत्वाचे केंद्र आहे. त्यामध्ये संस्था चालकांचे प्रतिनिधी आहेत, प्राध्यापकांचे प्रतिनिधी असतात. आपण सहकारक्षेत्रामध्ये निवडणुका पुढे ढकलेल्या तरी अस्तित्वात असलेले मंडळ काम करीत राहते तसेच विद्यापीठात सध्याचे अधिकार मंडळ पुढील निवडणुका होईपर्यंत कायम ठेवावे आणि हे विधेयक संयुक्त समितीकडे पाठवावे अशी विनंती करून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

---------

..6..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे (उच्च व तंत्र शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण, सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे आणि सन्माननीय सदस्य डॉ.सुधीर तांबे यांना विधेयकामध्ये काय आहे हे समजले आणि अधिकृत विद्यापीठातून आलेले सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे म्हणाले की, या कायद्यामध्ये बदल करावेसे का सुचले ? मागील सरकारने निगवीकर समिती नेमली होती. त्या समितीच्या अहवालावर सरकारने कुमुद बन्सल समिती नेमली. सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी अधिकृत विद्यापीठातून पदवी घेतली आहे. मी बोगस विद्यापीठातून आलो आहे. सन्माननीय सदस्य ज्यापद्धतीने बोलेले त्यापद्धतीने मी बोलणार. त्यांनी काहीही माहिती नाही.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे....

महोदय, मला वाटते सन्माननीय सदस्यांनी निगवेकर समितीचा अहवाल, ताकवाले समितीचा अहवाल, कुमुद बन्सल समितीचा अहवाल वाचला नसेल. मी हे अहवाल वाचले आणि त्या अनुषंगाने अंमलबजावणी करण्यास निघालो आहे. या निवडणुका जर आता झाल्या तर डिसेंबरच्या अधिवेशनात नवीन कायदा पारित केल्यानंतर या सगळ्या निवडणुकांमध्ये आपला पैसा ...

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय,....

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण, मी आपल्याला सांगत नाही. मी अधिकृत विद्यापीठातून आलेल्या सन्माननीय सदस्यांना सांगत आहे. सन्माननीय सदस्य, आपण सर्वजण अनधिकृत पदवीधारक आहोत. महोदय, अधिकृत विद्यापीठातून आलेल्या सन्माननीय सदस्यांना म्हणावयाचे आहे की, या निवडणुका घ्या. त्यामुळे....

**सभापती** : मला वाटते माननीय मंत्री महोदयांनी त्यांच्या भाषणात आता 'अधिकृत किंवा अनधिकृत' असा शब्दप्रयोग करु नये.

श्री.विनोद तावडे : ठीक आहे. सभापती महोदय, नवीन विद्यापीठ कायदा झाला की, या निवडणुकांमध्ये झालेले पॅनल, खर्च, प्रचार, वाद हे पुन्हा जानेवारीत करावेत, असे सन्माननीय सदस्यांना वाटते काय ? मला वाटते सन्माननीय सदस्यांना हे विधेयक काय आहे हे आता समजू लागले आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री सतीश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, ॲड.निरंजन डावखरे, ॲड.अनिल परब यांनी जी चिंता व्यक्त केली ती थोडी रास्त असली तरी मी सांगू इच्छितो की, मॅनेजमेंट कौन्सिलवर आता 22 सदस्य आहेत, त्यामध्ये आपले 10 सदस्य राहणार आहेत. सिनेटमधून जे निवडून जातात ते हे सदस्य नाहीत. जे इलेक्टेड असतात ते हे सदस्य आहेत. ॲकॅडेमिक कौन्सिल मात्र खूप मोठी आहे. परंतु यामध्ये नवीन अभ्यासक्रम वगैरे विषय आला तर मुद्दा निर्माण होईल. मॅनेजमेंट कौन्सिलमध्ये 22 सदस्य असतील तर, त्यात आपले 9 जण राहणार आहेत. फॅकल्टीज, बोर्ड ऑफ कॉलेज डेव्हलपमेंट मध्ये 15 जण असतील तर त्यामध्ये आपले 9 जण राहणार आहे. ही नावे मी पटलावर ठेवतो. माझे म्हणणे एवढेच आहे की, माननीय श्री.शरद पवार हे मुख्यमंत्री असताना आणि तत्कालीन शिक्षण मंत्री असताना, त्यांनी जसे विधेयक आणले होते तशाच प्रकारचे हे विधेयक आहे. या विधेयकामध्ये शब्दाचा सुध्दा बदल केलेला नाही. माननीय पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली मांडण्यात आलेले विधेयक सन्माननीय सदस्यांना नको

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे....

असेल तर त्यावर माझे काही म्हणणे नाही. सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांना विद्यापीठातून जो अनुभव आला त्यामुळे त्यांनी ही भीती व्यक्त केली. ते चांगल्याप्रकारे शैक्षणिक संस्था चालवितात. शिवाय ते विद्यापीठाच्या राजकारणामध्ये सकारात्मकदृष्ट्या सक्रीय आहेत. मी त्यांना आपल्यामार्फत आश्वस्त करतो की, सगळ्यांनाच सहा महिने मुदतवाढ दिली तर घटनात्मक बाबी निर्माण होऊन, त्यातून नवीन कायदा करण्यात अडचणी निर्माण होतील. त्यामुळे सरकार हे करीत नाही. सन्माननीय सदस्यांची भीती खरी असली तरी ती भीती वास्तवात येणार नाही, अशी मी हमी देतो. त्यामुळे सभागृहाने माझ्यावर विश्वास ठेवून हे विधेयक संमत करावे, अशी मी विनंती करतो.

**सभापती** : मंत्री महोदय, मी या बाबतीत आगंतुक विचार मांडतो. तो तुम्हाला पटतो का ते बघा. सन्माननीय सदस्य श्री.सतीश चव्हाण यांना जी भीती आहे तशीच भीती माझ्या ओळखीतील लोकांना आहे. राज्यामध्ये निवडणुका घोषित झाल्यानंतर मॉडेल कोड ऑफ कंडक्ट सुरु होते. त्यावेळी काळजीवाहू सरकार अस्तित्वात असते. ते सरकार आवश्यक असलेलेच निर्णय घेऊ शकते. त्यामुळे तशाच प्रकारे या ठिकाणी काम केले तर बरे होईल. माननीय मंत्र्यांनी कोणत्याही परिस्थितीत येत्या चार महिन्यात या संदर्भातील नवीन कायदा आणण्याबाबत सभागृहाला आश्वासन दिले तर हा प्रश्न संपेल. तसेच त्यांनी अधिकृत पदवीधर असलेल्या सन्माननीय सदस्यांना विनंती करावी की, त्यांनी त्यांची सुधारणा मागे घ्यावी.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण अतिशय योग्य आणि व्यावहारिक सूचना केली आहे. सन्माननीय सदस्यांना जी भीती वाटत होती त्यातून आता मार्ग निघाला आहे. त्यामुळे मी सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांना विनंती करतो की, त्यांनी आपली सुधारणा मागे घ्यावी.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आम्ही शिक्षक आहोत आणि आम्ही नेहमीच सकारात्मक विचार करतो. सभापती महोदय, आपण या विषयामध्ये हस्तक्षेप करुन माननीय मंत्र्यांना जे सूचित केले आहे त्यानुसार कार्यवाही करण्याचे त्यांनी मान्य केले आहे. त्याबद्दल मी आपल्या माध्यमातून माननीय मंत्र्यांचे आभार मानतो. माननीय मंत्री सभागृहाला दिलेला शब्द पाळतील अशी अपेक्षा व्यक्त करतो. तसेच आता जे पदाधिकारी त्या ठिकाणी कार्यरत आहेत

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे....

त्यांना पुढील निवडणुका होईपर्यंत मुदतवाढ देतील अशी अपेक्षा करतो. ते या बाबतचा आदेश या आठवड्याच्या आत काढतील अशी अपेक्षा करतो. माननीय मंत्र्यांचे नाव 'विनोद' आहे. त्यामुळे त्यांनी दिलेल्या आश्वासनाचा 'विनोद' होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त करून माझी सुधारणा मागे घेण्यास सभागृहाची अनुमती मागतो.

सभागृहाच्या अनुमतीने सुधारणा मागे घेण्यात आली.

**स**भापती : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 व 3 विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतूवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आपण केलेली सूचना तंतोतंत पाळली जाईल. त्यामुळे मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक-34 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक 34 संमत झाले आहे.

----------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : करमणूक शुल्क (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO XXIX OF 2015

(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA ENTERTAINMENTS DUTY ACT.)

AND MOTION FOR REFERRING THE BILL TO SELECT COMMITTEE.

श्री.संजय राठोड (महसूल राज्यमंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केल्याप्रमाणे, सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक-29, महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडतो.

**सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

श्री.संजय राठोड : महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि. क्रमांक-29, महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियम यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न प्रस्तुत झाला.

**सभापती** : विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्यासंबंधी सन्माननीय सदस्य सर्वश्री धनंजय मुंडे, भाई जगताप, शरद रणपिसे यांचा प्रस्ताव आहे. त्यांच्यापैकी एकाने तो मांडावा.

(प्रस्ताव मांडण्यात आला नाही.)

**सभापती** : आता मी विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न मतास टाकतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडशः विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 7 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री.संजय राठोड : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-29 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**सभापती** : सन 2015 चे वि.स.वि.क्रमांक-29 संमत झाले आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

---------- नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION